# भक्ति-कुसुमें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. नं.

लेखक

आचार्य काका कालेलकर

अनुवादक

वामन चोरघडे : माधव सावंत

REFBK-0007166

किंमत २ रुपये

संग्रहालय

# भक्ति-कुसुमें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७१६६

लेखक
आचार्य काका कालेलकर

अनुवादक
वामन चोरघडे : माधव सावंत

REFBK-0007166

किंमत ३ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार, पुणें २.

संचालक
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्एल्. बी.

( १ ) या पुस्तकाचे पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे वगैरे सर्व हक्क लेखकाकडे आहेत.

( २ ) मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

— मुद्रक —
म. वि. सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय,
१९५|५ सदाशिव पेठ, पुणें २.

# अनुक्रमणिका


१ तीन प्राचीन वटवृक्ष ... ९
२ कामाक्षीच्या राज्यांत ... २०
३ तेंदूला आणि सुरवा ... २८
४ शिवनाथ आणि ईब ... ३२
५ वसईचा किल्ला ... ... ३८
६ जुन्या महाराष्ट्राची पडकी राजधानी ... ... ४४
७ गुरु गोविंदसिंहाचा गुरुद्वारा ५२
८ पुण्य तारा नगरी ... ... ५६
९ एकाकी अश्वत्थ ... ... ६१
१० कर्नाटक ... ... ६३
११ सोन्याची खाण ... ... ६८
१२ नंदीदुर्ग ... ... ७९
१३ बाहुबली ... ... ८७
१४ जोगकडे ... ... १०५
१५ जोगचा धबधबा ... १०८
१६ जोगचे पुनर्दर्शन ... १२७
१७ पाषाण-हृदय ... ... १३५
१८ अजिंठा ... ... १४३
१९ वैराग्यवैभवाचा वारसा ... १५४
२० उपसंहार ... ... १६०

# देशमुख आणि कंपनीचीं आगामीं प्रकाशनें

### वि. स. खांडेकर
१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ तिसरी भूक
४ वर्षाकाल
५ छाया भाग १–२
६ चार भिंती
७ चक्रवर्ती
८ बडी मां
९ विसावें शतक
१० कल्पलता
११ वालुका
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ चल ये राणी
१४ माझ्या कादंबऱ्या
१५ वटपत्रें.
१६ साहित्यसाधना.

### ग. त्र्यं. माडखोलकर
१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका
८ दोन तपें
९ हें युद्ध

### द. र. कवठेकर
१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी

### ना. धों. ताम्हनकर
१ गुजाताई
२ शेजारी
३ संतु

### प्र. के. अत्रे
१ 'मी कसा झालों
२ ! [ लघुकथा ]

### कृष्णाबाई मोटे
१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली
४ गुणाची पोर

### काकासाहेब कालेलकर
१ स्मरण–यात्रा

### अनंत काणेकर
१ काळे आणि पांढरे

### चिं. वि. जोशी
१ गुंड्याभाऊ
२ दरबारकथा
३ लंकावैभव
४ वायफळाचा मळा

### दत्तु बांदेकर
१ हिरवी माडी
२ कबुलीजबाब
३ गडी फू

### गोपीनाथ तळवलकर
१ मंगल धाम

### साने गुरुजी
१ संध्या
२ निळा पक्षी

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड (आ. दुसरी) | ३ |
| घरट्याबाहेर ( ,, ) | ३ |
| पहिली लाट ( ,, ) | ३ |
| स्त्री आणि पुरुष | २ |
| सूर्यकमळें ( ,, ) | २॥ |
| कालचीं स्वप्नें | ३ |
| आजचीं स्वप्नें | ३ |
| कलिका | २। |
| मृगजळांतील कळ्या | २॥ |
| सुवर्ण कण | २। |
| सायंकाल ( आ. २ री ) | २॥ |
| अविनाश | १॥। |
| मंदाकिनी | १॥। |
| मंजिऱ्या | २। |
| सहा भाषणें | २ |
| फुलें आणि कांटे | २। |
| हिरवा चांफा ( आ. तिसरी ) | ५ |
| दोन ध्रुव ( ,, ,, ) | ५ |
| पहिलें प्रेम ( आ. २ री ) | ३ |
| क्रौंच वध ( ,, ,, ) | ५ |
| पांढरे ढग ( ,, ,, ) | ४। |
| जळलेला मोहोर | ३ |
| मराठीचा नाट्य-संसार | ३॥ |

## ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| तात्या भाग १ ला (आ. दुसरी) | ४ |
| तात्या भाग २ रा | ३ |
| निवाडे भाग १ ला | २॥ |
| निवाडे भाग २ रा | ४ |
| चकमकी | १॥ |
| बच्चा नवरा | १॥ |
| अनेक आशीर्वाद | ३॥ |
| दाजी भा. १ ला (आ. तिसरी) | ३॥ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | २ |
| व्यक्तिरेखा | २। |
| माझी नभोवाणी | २ |
| नवे संसार (जप्त ) | ४ |
| चंदनवाडी | ६॥ |
| नागकन्या | २ |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| आस्तिक ( ,, ) | २॥ |
| सोन्यामारुति? ( ,, ) | २ |
| गोड निबंध (भा. १ ) | ३ |
| गोड निबंध (भा. २ ) | ३ |
| गोड निबंध (भा. ३ रा) | ३ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| नवें भारूड | २ |
| स्टेशनमास्तर | २ |
| नटश्रेष्ठ | ॥। |

## दत्तु वांदेकर

| | |
|---|---|
| सख्याहरी (आ. दुसरी) | १॥ |
| नवी आघाडी | १॥ |
| तूं आणि मी | २। |
| नजरबंदी | २। |

### अनंत काणेकर

धुक्यांतून लाल ताऱ्याकडे (दु. आ.) ३
पिकलीं पानें ( ,, ) १॥
उघड्या खिडक्या १॥

### वा. म. जोशी

स्मृति–लहरी २
विचार–लहरी २।
विचार–विहार ४।

### प्र. के. अत्रे

साखरपुडा १॥
ललितवाङ्मय ३॥
दूर्वा आणि फुलें २।

### द. र. कवठेकर

अपुरा डाव ३
रेशमाच्या गांठी ३
आभाळाची सावली ८

### ना. ह. आपटे

फसगत १॥
साजणी ५

### ना. म. पटवर्धन

हितपत्रें ३
वा. म. जोशी यांचें चरित्र ४।

### य. दि. पेण्ढरकर

प्रापंचिक पत्रें ३
घायाळ २

### काकासाहेब कालेलकर

ब्रह्मदेशचा प्रवास १॥
भक्तिकुसुमें ३

### वि. म. भुस्कुटे

स्टॅलिन ३॥
आई ( मॅक्झिम गार्की ) ८

### पु. य. देशपांडे

नवें जग ? २॥

### भाई वेके

रॉयचरित्र १॥

### वि. स. खांडेकर(परिचय लेखक)

काव्यज्योति १

### आनंदीबाई जयवंत

पारंब्या २

### लक्ष्मणराव सरदेसाई

ढासळलेले बुरुज २

### प्रो. वि. ह. कुलकर्णी

व्यक्तिचित्रें २॥

### क्षमाबाई राव

देणगी २।

### शकुंतला परांजपे

भिल्लिणींचीं बोरें ३

### कृष्णाबाई मोटे

मिनाक्षीचें जीवन २

### र. गो. सरदेसाई

चलतीं नाणीं २

### रा. श्री. जोग

सौन्दर्यशोध आणि आनंदबोध ८

### वि. वि. बोकील

बेबीची बहीण ३

### सत्याग्रही

ग्रह आणि तारे ४॥

### कमलाबाई टिळक

आकाशगंगा २॥

### रामतनय

साखरगोटी ५

### ह. रा. महाजनी

आपलें आर्थिक नियोजन ५

### आचार्य भागवत

वर्धा शिक्षण योजना ४

पू. काकांचें श्री. वामनराव
चोरघड्यांना आलेलें पत्र

सिवनी, स्पेशल जेल
१३-११-४४

प्रिय बापु,

*...माझे हे लेख म्हणजे भक्ति-कुसुमें आहेत. त्यांत सौंदर्य असेल तें प्रेमाचें सौंदर्य आहे. साधुसंतांनीं म्हटलें आहे कीं देवाला सोडून देवळाची पूजा कां करितां ? माझ्या भारत-भक्तींत देव आणि देऊळ असें द्वैतच नाहीं. देव देवळाच्या आंतहि आहे, बाहेरहि आहे आणि देऊळहि देवच आहे. बालपणीं पाठ केलें होतें—*

*"देवाचिये द्वारीं, उभा क्षणभरी,*
*तेणें मुक्ति चारी, साधियेल्या ॥"*

*माझ्या उपासनेंत मातेचें मंदिर एवढें मोठें आहे कीं त्याला बाहेरचें दारच नाहीं. येथें इतकीं अनंत दर्शनें आहेत कीं उभें राहण्याचीहि सोय नाहीं. पायांत शक्ति असेल तितकें चालावयाचें*

आणि विविध दर्शनांनीं डोळ्याची आणि हृदयाची वाढती भूक तृप्त करण्याचा प्रयत्न करावयाचा. आणि या प्रेमास्वादाचे भागीदार होण्यास सर्वांना आमंत्रण द्यावयाचें. आजवर जीं फुलें मीं वाहिलीं तीं कल्पना-कुसुमें नव्हतीं पण जीवन-कुसुमेंच होतीं. पूजेच्या शेवटीं प्रसादाचीं फुलें आपण स्वकीयांना देतों त्याप्रमाणें साहित्याच्या रूपांत हीं जीवन-कुसुमेंच इथें मांडलीं आहेत. त्यांत भाषाभक्ति आहे, हितचिंतन आहे, हृदयाचें निवेदन आहे आणि सर्वांचा स्वीकार आहे !

अशा वृत्तीच्या पुष्पसंचयांतील वेंचणी मला करतां यावयाची नाहीं. ती तुम्हीच करा. नांवेंहि तुम्हीच द्या. पुरोहितांनाहि कांहीं काम असलें पाहिजेच ना ?......

**काकांचा सप्रेम वंदेमातरम्**

दा. क्र. ७७६६

# तीन प्राचीन वटवृक्ष

‘ संस्कृतीचा विस्तार ’ ह्या लेखांत हिंदुस्थानचें प्रतीक म्हणून जें चित्र मीं रेखाटलें आहे त्यांत एका विशाल वटवृक्षाला एका साध्या व सुबक झोंपडीच्या दाराशीं एक सवत्स गाय बांधिलेली आहे. अनेक पारंब्यांच्या विस्तारानें आसपासचा प्रदेश आपल्या छत्राखालीं घेणारा परोपकारी वटवृक्ष, उन्हाळयांत गारवा आणि हिवाळयांत ऊब देणारी गवताची झोंपडी आणि आजीवन आणि मृत्यूनंतरहि सेवा करणारी कारुण्यमूर्ति गोमाता. ह्या तीन गोष्टी आश्रमसंस्कृतीचीं प्रतीकें आहेत. ह्या चित्रांत हिंदुस्थानचें प्राकृतिक वातावरण चित्रित झालें असून त्याचें आर्यहृदयहि व्यक्त झालेलें आहे !

आपण लोकांनीं गाईच्या बाबतींत फारच दयाभाव दाखविला आहे. पण गाईवर काव्यें मात्र फारशीं लिहिलीं नाहींत. लहान लहान मुली सकाळीं उठून न्हाऊन धुवून गाईला कुंकू लावतात. आईच्या कडेवर बसून तिच्या पाठीवर हात फिरवितात आणि गाईच्या वासराप्रमाणें गाईच्या आसपास उड्या मारतात.

——हें स्वाभाविक जीवनकाव्य हिंदुस्थानांत जिकडे तिकडे पाहायला मिळतें. परंतु कवी तर गाईचीं करुणकाव्येंच गाण्यांत चूर झालेले आहेत.

पर्णकुटीचीं वर्णनें ऋषींच्या आश्रमापुरतींच. बाकी सामान्य लोकांना ‘ चतुःशालंगृहम् ’ आणि प्रासादच हवेत. झोंपडीचा आनंद उपभोगायचा म्हटलें तर कॉलि ( Cawley ) सारख्या इंग्रजी कवीची—

‘ Mine be a cot beside the hill ’

सारखी कविता वाचली पाहिजे. भर्तृहरीनेंहि अशा स्थळाचें वर्णन केलें आहे. परंतु तें कौटुंबिक समाधान व्यक्त करण्यासाठीं नसून वैराग्याची साधना साधण्यासाठीं.

वटवृक्षांचीं वर्णनें आपल्या साहित्यांत सर्वत्र आढळायला हवींत. बाण-भट्टाच्या कादंबरींत अच्छोद सरोवराच्या काठीं पोपटाचें घरटें असलेलें जें

विशाल झाड आहे तें वडाचें आहे कीं नाहीं तें आतां आठवत नाहीं. परंतु वडाच्या पारंब्यांनीं आपले पाय किंवा केस बांधून टांगून घेऊन तप करणाऱ्या ऋषींचीं वर्णनें वाचल्याचें मात्र आठवतें खरें.

गुजरात विद्यापीठाच्या मुद्रे ( Seal ) साठीं मीं वटवृक्षाचें चिन्ह सुचविलें तें ह्याच भावनेनें !

एका महाराष्ट्रीय लेखक व कवीनें हिंदुस्थानाला पारंब्या असलेल्या वटवृक्षाची उपमा दिली आहे. वडाच्या शाखांतून पारंब्या सुटून जमिनीला जाऊन पोंचल्या कीं एक नवें झाड तयार होतें. अशा प्रकारें एक संबंध वृक्षकुटुंबच निर्माण होतें आणि मग मूळचें वैदिक खोड कोणतें तें ओळखणें कठिण होऊन जातें. कित्येक वेळां मूळ खोड कुजून जातें परंतु सारा वृक्ष ताजातवानाच राहतो.

हिंदुस्थानांतले असले विशाल वटवृक्ष साऱ्या दुनियेंत प्रसिद्ध आहेत. परदेशांतलि लोक जेव्हां आपल्या देशांत येतात तेव्हां ह्या देशांतील एक ‘ कौतुक ’ म्हणून अशा वृक्षाचें दर्शन घेतात.

—२—

मी पहिल्या वहिल्यानें नांव ऐकलें तें अडियारच्या वटवृक्षानें. मद्रासला जातां क्षणींच अडियारला जाऊन तेथल्या त्या वटवृक्षाचें दर्शन घेतलें. बिझांट बाईनें या वडाची फारच काळजी घेतलेली आहे. वडाखालची जमीन साफसूफ ठेवून अनेक प्रान्तांतील आणि अनेक देशांतील धर्मजिज्ञासूंनीं एकत्रित होऊन धर्मचर्चा करावी, अनुभवाची देवघेव करावी आणि वेळ प्रसंगीं स्नेहभोजनहि करावें अशी व्यवस्था ठेवण्यांत आली आहे. या वृक्षाचा विस्तार आणि त्याची टवटवी आपलें लक्ष वेधून घेतात. तेथें गांभीर्य आणि प्रसन्नता यांचा प्रत्यय आला. त्याच्या मोठमोठ्या पारंब्या पाहून मनांत विचार आला कीं मधलें खोड हा एक कुलपति आहे आणि आसपासच्या या मोठ्या पारंब्या या कुलपतीचें विद्यापीठ चालविणारे उपाचार्य आहेत. त्याच्या मधोमध बसून माणसें विचारांची चर्चा करतात आणि या पारंब्या इतिहासाच्या साक्षीरूप असल्यामुळें माणसांशीं चर्चा करीत असतील.

कल्पना वाढूं लागली आणि तिनें या वडाखालीं कितीतरी वानस्पत्य प्रवचनें ऐकलीं.

—३—

मद्रासला जाण्यापूर्वी शुक्ल तीर्थातल्या कबीर वडाविषयीं मी ऐकलें होतें. असेंहि ऐकलें होतें कीं कविवर रविबाबूंना हा कबीर वड पाहून फार दुःख वाटलें आणि त्यांनीं असे उद्गार काढले कीं गुजरातचे लक्ष्मीपुत्र आपल्या प्रांताचें हें भूषण कां वरें सुरक्षित ठेवीत नाहींत ?

गुजराथेंत मी जवळ जवळ २० वर्षें राहिलों. परंतु इच्छा असूनहि हा कबीर वड पाहण्याची संधि मिळली नाहीं. नुकताच राष्ट्रभाषा प्रचारासाठीं श्री. अमृतलाल नानवटी यांच्याबरोबर गेलों होतों. अविधा येथील श्री. गोपाळराव कुलकर्णी यांची शाळा पाहावी असा कार्यक्रम होता. तो मागून रद्द करावा लागला. पण गोपाळराव थोडेच ऐकणार ? त्यांनीं आपल्या निराग्रही आग्रहानें माझे हातपाय बांधून मला अविधा येथें ओढून नेलें.

अविधाला जातांच समजलें कीं कबीर वड येथून फार दूर नाहीं. नर्मदेच्या विशाल पातांत एक विस्तीर्ण व समृद्ध पेठ आहे आणि तेथें हा पुराण पुरुष तप करीत बसला आहे. हें कानीं पडतांच मनाची दौड सुरूं झाली आणि पाय व डोळे तेथें पोहोंचण्यापूर्वींच तें अनेकवार तेथें जाऊन आलें. तो वृक्ष कसा असेल, त्याचीं पानें कसला जप करित असतील, पक्षी, बालकें त्या म्हाताऱ्याला कसा भंडावून सोडत असतलि आणि जर त्या बेटावर गाई असतील तर त्या आपलीं शिंगें त्याच्यावर घासून त्याचीच चामडी कशी सोलून काढीत असतील. हेच विचार मनांत येऊं लागले.

संध्याकाळीं एक मुसलमान पोलीस अंमलदार भेटायला आला. खेड्यां-तले लोक पोलीस अधिकाऱ्यांशीं हृदयशून्य परंतु विवेकपूर्ण सहकार कसा करतात त्याचा मला अनेक ठिकाणीं अनुभव आलेला आहे. मीहि माझ्या पूर्व जीवनांत पोलीस अधिकाऱ्यांना पाहून चिडून जात असें. आणि बिथर-लेल्या जनावरांप्रमाणें शिंगांनीं त्यांच्यावर चाल करून जात असें. आज ती वृत्ति राहिली नाहीं. पोलीस खात्याचीं कृष्णकृत्यें माहित असूनहि पोलिसां-विषयीं मनांत घृणा उत्पन्न होत नाहीं. त्यांची म्हणजे एकादी स्वतंत्र जात

आहे असें नाहीं. आपल्याच समाजांतले लोक संधि मिळतांच त्या खात्यांत प्रवेश करतात. जसा समाज तसें त्याचें पोलीस खातें !

म्हणून त्या अधिकाऱ्याशीं मी स्वाभाविक माणुसकीनें बोलणें सुरू केलें. तो मूळचा बलुचिस्तानांतला. हिंदुस्थानांत येऊन येथली भाषा शिकला. त्याच्या वाणींत संस्कारिता ओथंबून होती. आणि विवेक कसा सांभाळावा हें तो बरोबर जाणत होता. असेंहि असेल कीं संस्थानातर्फे आमच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठीं त्याची नेमणूक झालेली असावी. परन्तु मला वाटलें कीं आपण माणसांमाणसांतील स्वाभाविक संबंध कां वाढवूं नये ? आम्ही पुष्कळ बोललों. राजपिंपळा संस्थानाविषयीं, तेथल्या जगाविषयीं, जंगलांतील जनावरांविषयीं आणि त्या जनावरांत राहणाऱ्या द्विपाद लोकांविषयीं मला त्याच्याकडून बऱ्याच गोष्टी कळल्या.

कबीर वडाला जातांना काय काय सोयी गैरसोयी आहेत तें विचारायला मी कसा बरें विसरेन ? त्यानें आवश्यक ती माहिती मला पुरविली. परन्तु मग त्याला वाटलें कीं उद्यां आपणहि ह्या मंडळीबरोबर कबीर वडाला कां जाऊं नये ? मी मनांत विचार केला पोलीस अंमलदार बरोबर असला कीं सोय होईल पण सामान्य जनतेला माझ्याशीं मोकळेपणानें बोलतां येणार नाहीं. पोलिसांच्या दर्शनानें सामान्य जनतेचें हृदयकमल मिटून जातें.

परन्तु आम्हांला प्रवासाची घाई होती. कबीर वडाच्या दर्शनाव्यतिरिक्त दुसरा कांहीं संकल्प नसल्यामुळें कासमखान यांची आमच्याबरोबर येण्याची सूचना मी आनंदानें स्वीकारली. आम्हांला मोटारींतून लहानमोठीं शेतें बाटवून नदीच्या किनाऱ्यापावेतों जायचें होतें. तेथून होडींत बसून प्रवाहाचें वळण निरखित, लहानमोठे भोंवरे टाळीत, नागमोडी जलरस्त्यानें कबीर वडाच्या बेटावर जाऊन पोहोंचावयाचें होतें. त्या बेटाचा विहार आटोपून पलिकडच्या कांठावरचा रेतीचा विस्तीर्ण तट ओलांडून पुन्हां होडींत बसून बाकीचा प्रवाह पार करावयाचा होता. आणि समोरच्या तीरावर वेळेवर बस गाठून भडोचला जावयाचें होतें. हा सगळा कार्यक्रम आमच्या त्या नव्या मित्रानें व्यवस्थित बसविला. इतकेंच नव्हे तर आमच्या इतक्याच उत्साहानें त्यांत तो सामीलहि झाला. पायीं प्रवासांत पाय चालले आणि तोंड चाललें नाहीं तर त्यांतला अर्धाच आनंद मिळायचा. आमचा

हा नवा मित्र मुखदुर्बलहि नव्हता आणि आपल्याचकडे बोलण्याचा ठेका घेऊन आपलेंच तट्टू हांकणारा वाचाळ पण नव्हता. त्यामुळें आमचा संघ चांगल्या रीतीनें प्रवासाचा आनंद लुटूं शकला. आम्ही मोटारींत निघालों आणि कांहीं जोडीदार घोड्याच्या गाडींतून मधल्या रस्त्यानें सरळ कांठाकडे धावले; इतकेंच नव्हे तर मोटारच्या आधीं जाऊन पोंचले ! एखादा खेडवळ माणूस आश्चर्यचकित होऊन शहरांतल्या गल्ल्यांत भटकावा यांत माझ्या दृष्टीनें जितकें काव्य आहे तितकेंच काव्य एखाद्या 'नागर मोटारनें' रस्ते नसलेल्या खेड्यांतल्या शेतांतून आपला रस्ता शोधत फिरावें आणि संशोधनाचा आनंद मिळवावा यांतहि आहे.

आमचे यजमान आम्हांला दाखवीत गेले कीं अमुक वर्षीं नदीचा पूर अमुक हद्दीपर्यंत आला होता, गेल्या वर्षीं तीं शेतें बुडालीं होतीं, दहा वर्षांपूर्वीं ही नदी अमुक दिशेनें वाहात होती आणि प्राचीन काळीं तें मंदिर नदीच्या कांठीं होतें. भूगोल आणि भूस्तर शास्त्राच्या नजरेनें जो पाहील त्याला ह्या माहितींतून कितीतरी अनुमानें सुचत असतात. आपल्या माहितीचा किती बहुमोल उपयोग होत आहे याचा सांगणाऱ्या मंडळींना गंधहि नसतो.

मी आपल्या पोलीस मित्राला विचारलें कीं कबीरवड असलेलें बेट राजपिंपळा संस्थानांत आहे कीं खालसा मुलखांत ? त्या राजनिष्ठ सेवकानें थोडेंसें उद्वेगानें उत्तर दिलें कीं अगोदर बेट तर होतें आमचें पण दैवयोगानें ब्रिटिश हद्दींत गेलें.

एकादें बेट किंवा जमीन 'दैवयोगानें' एकाच्या मालकीची न राहातां दुसऱ्याच्या मालकीची होणें कसें शक्य आहे त्याविषयीं कुतूहल उत्पन्न झाल्यामुळें मीं त्याला त्याविषयीं विचारलें. गोष्ट अशी आहे कीं, राजपिंपळा आणि ब्रिटिश राज्य ह्यांमध्यें नर्मदेची हद्द ठरली. ह्या बेटाच्या दोहों बाजूनें नर्मदेचा प्रवाह वाहतो, तेव्हां त्यांतला मुख्य कोणता ठरवावा असा प्रश्न उत्पन्न झाला. जो मुख्य प्रवाह असेल तोच दोहोंचीहि सरहद्द ठरावी हें उघड होतें. परन्तु दोन शाखांत प्रधानतेचा मान कसा ठरवायचा ? म्हणून नशिबाची परीक्षा पाहण्याचें ठरलें.

बेटाच्या वरच्या बाजूला जेथें एकच प्रवाह आहे तेथें धारेवर बरेचसे

भोपळे प्रवाहांत सोडण्यांत आले. आतां हे भोपळे जो प्रवाह पसंत करतील तो मुख्य समजावयाचा आणि दुसरा गौण. राजपिंपळ्याकडचा जो प्रवाह होता तोच त्या भोपळ्यांनीं पसंत केला. आणि कबीर वडाचें बेट ब्रिटिश हद्दींत गेलें. माझ्या मनांत विचार आला कीं हें पवित्र बेट देशांतील एका क्षात्रिय राजाच्या हातीं न राहतां विधर्मी इंग्रजांच्या हातांत गेलें याचें लोकांना दुःख झालें असेल! आमच्या स्वराज्याच्या दिवसांत कदाचित् आपणांस वाटेल कीं बरें झालें, भोपळ्यांनीं राजपिंपळ्याकडचा प्रवाह पसंत केला. नाहीं तर हें बेट जनतेच्या हातांत इतक्या लवकर आलें नसतें. आंधळे भोपळे क्षत्रियत्वाचें महत्त्व काय जाणणार! आणि स्वराज्याचेंहि त्यांना काय होय! अदृष्ट नेहमीं आंधळेंच असतें!

गुजरातची सुपीक जमीन व नर्मदेचा कांठ! मग काय विचारायला हवें! सोनें पेरलें तरी हजार पटीनें पीक यायचें. नर्मदेच्या कांठीं जेथें मका पेरायला हवा तेथें धनलोभी शेतकरी तंबाकू लावतात आणि त्याचीं मोठ-मोठीं पानें आनंदानें डोलत असतात. हीं पानें पिकून वाळतील आणि मग लोक त्याच्या विड्या, सिगरेटी बनवितील आणि त्यांतून धूर काढून पैसा, बुद्धि आणि आरोग्य तिहींचा नाश करतील. नर्मदामाईला वाटत असेल कीं अमरकंटकच्या जंगलांतून आणि भेडाघाटच्या संगमरवरी डोंगरांतून जीं कांहीं बहुमोल जीवतत्त्वें मी घेऊन येतें त्यांचा उपयोग हे अभागी लोक तंबाकू पिकविण्यांत करीत आहेत. तेव्हां आतां मी काय करावें? असे पुष्कळ विचार मनांत येऊन गेले.

आम्हीं तंबाकूचीं शेतें एकदांचीं पार करून वडापाशीं जाऊन पोंचलों. अविधा सोडल्यापासून दुरून वडाचें दर्शन घडतच होतें. दुरून वाटत होतें कीं आपण एकादें जंगल पाहात आहोंत. एक वड इतका विस्तीर्ण असेल अशी कल्पनाहि मनाला शिवत नाहीं. जेव्हां जवळ गेलों तेव्हां त्याच्याखालीं अनेक गाई बैल बांधलेले दिसले. असलें दृश्य बाळपण ओलांडल्यानंतर मी पाहिलें नव्हतें. जुन्या जमान्यांत पुन्हां प्रवेश झाला म्हणून मला आनंद झाला. कुंपणांत खिंडार कोठें आहे त्यांचा शोध करीत करीत आम्हीं आंत घुसलों. तों आंत भारतवर्षांतील एकादें अविभक्त कुटुंब एक सबंध गांव वसवून राहात असावें अशा प्रकारें कबीरवडाचें दर्शन घडलें.

माझ्या मनांत तत्क्षणीं विचार आला कीं ह्या पुराणपुरुषाची मी कशा-प्रकारें स्तुति गाऊं ? त्याचा विस्तार कोठें किती आहे हें त्याला स्वतःलाच माहित नाहीं. आणि जेथें वाव सांपडला तेथें त्यानें आपलें अस्तित्व पसरलें. पारंब्या एकाच कुळांतल्या असूनहि आपापसांत चढाओढ चालवितात. जेथें पारंब्या अगदीं दाट होत्या तेथें आम्ही आमचें आसन ठोकलें. खेड्यांतल्या लोकांनीं आपल्या सनातन स्वभावानुसार आमचें पाहुणपण करण्यासाठीं धावपळ करायला सुरुवात केली. आमच्या गप्पांना भरती आली, लाल लाल कलिंगडें कांहींहि तक्रार न करतां पोटांत पोहोंचूं लागलीं. दरेकाचा संतुष्ट झालेला आत्मा संगीताची मागणी करूं लागला. आमच्याबरोबर पंडित-जींची मथुरा होती. अमृतराव नानवटी होते. संगीत ऐकून डोलणाऱ्या फांद्या होत्या. आणि तुमच्या संगीताशीं आम्हांला कांहीं करायचें नाहीं असें सक्रियतेनें सांगणारे पक्षी होते. संगीताची बैठक चांगली जमली असती. परन्तु मीं मथुरेला एक भजन गायला सांगितलें जें गाण्याची तिची वृत्ति दिसली नाहीं. मी माझी वृत्ति अन्तर्मुख केली आणि मग भगवान् सनातन् कालाचें अखंड संगीत ऐकूं लागलों. हळूं हळूं हृदय मरावें, फुलावें आणि स्फुट व्हावें असे त्याचे आरोह अवरोह चालले होते. जणूं सागराचा प्रतिस्पर्धीच. इतिहासाशीं परिचित असलेल्या ह्या संगीतांत जुन्या नव्या राजांचीं ओळखीचीं नांवें सांपडतात कीं काय याचा मी शोध करूं लागलों. परन्तु कालाचे बखरींत हे राजे म्हणजे ‘ कीटश्च कीटायते ! ’ जेथें मानव-इतिहासच क्षणजीवी तेथें ह्या राजांची कारकीर्द कोणत्या रीतीनें व्यक्त होणार ? हें संगीत बव्हंशीं भूस्तर शास्त्राविषयींच होतें. ज्वालामुखी पेटतात, मोठमोठीं खंडें जलसमाधि घेतात, नद्या आपली दिशा फिरवितात आणि मोठमोठ्या तलावांतून गरम पाण्याचीं कारंजीं उडतात ! हे राग मीं प्रथम ऐकले आणि त्यानंतर केवळ आपल्या संख्येमुळेंच प्रचंड कामें करून दाखविणारे सूक्ष्म किडे ! ह्या किड्यांचें एक महाराज्य समुद्राच्या तळाशीं जाऊन पोंचलें. त्यांनीं आपलें बांधकाम सुरू केलें. सागरानें त्यांना विरोध केला. सागर आंधळा आणि हे किडे संकल्पवान ! त्यामुळें विजय किड्यांचाच झाला ! हजार एक वर्षांत त्यांनीं एक सुंदर बेट तयार केलें.

पुराणांत लिहिलें आहे कीं, ब्रह्मदेवाच्या सृष्टीनें विश्वामित्राला वैषम्य

वाटून त्यानें प्रतिसृष्टि निर्माण केली. ब्रह्मदेवानें एक डोकें असलेला मनुष्य निर्माण केला. कवीनें दहा शिरांच्या रावणाची कल्पना चालवली. विश्वामित्रानें शेकडों माथीं असलेलीं नारळीचीं झाडें उत्पन्न केलीं. मला वाटतें कीं विश्वामित्रानें नारळीचीं झाडें लावल्यावरच ब्रह्मदेवाला मनुष्य घडवायला सुचलें असावें ! मग माकडें आलीं. त्यांनीं एकमेकांच्या शेपट्या धरून नद्या ओलांडण्याची कला विकसित केली व आपली वसाहत वाढविली.

पट्टेपट्टे असलेल्या वाघाला असली कांहीच युक्ति माहित नव्हती. रात्रीं झाडाखालीं उभें राहून शेपटी आपटत एक डरकाळी फोडली कीं कीतीतरी वानर झाडांवरून पटापट खालीं पडत आणि वाघाचें भोजन पुरें होत असे. अखेर वानरांनीं शाखा-मुळांतून झोंपण्याचें सोडून दिलें आणि आपण पडूं शकणार नाहीं असे माळे बांधायला सुरुवात केली.

राजांच्या इतिहासापेक्षां जीवनाच्या दृष्टीनें हें सर्व संशोधन किती महत्त्वाचें! एकामागून एक चित्रें नजरेसमोर येऊन उभीं राहात आणि रेखांकित होण्याच्या आधींच तीं विरून जात. इतिहासक्रम इतक्या जोरानें पळत होता कीं डोळ्यापुढें काजवे चमकूं लागले आणि केवळ कानांनाच ह्या ऐतिह्य रागाचे आरोह अवरोह ऐकूं येऊं लागले. नर्मदेची संस्कृति हिंदुस्थानांत अतिशय प्राचीन ! पारंब्यांत खेळणाऱ्या वायूनें तिची कथा सुरू केली, तेव्हां जणूं महाभारत ऐकण्यासाठीं कीं काय कान एकाग्र झाले. कबीर वडाचें बाह्य दर्शन भव्य तर आहेच परंतु हें अंतर दर्शन अलौकिक होतें !

आम्हीं वडाला प्रदक्षिणा घालूं लागलों. केवढा विशाल विस्तार ! वाटूं लागलें कीं आकाशच खालीं उतरलें आहे. आणि ताऱ्यांनीं पानांचें रूप धारण केलें आहे. जें पान गळून पडत असे तें उल्कापाताचें स्मरण देई. एका कांठावर मोठी दरड पडली होती. तिनें सांगितलें कीं या बाजूला कितीतरी विस्तार होता. नदीला पूर आला. बेटाचा पुष्कळसा भाग वाहून गेला आणि त्याबरोबर वटवृक्षाच्या एका महाशाखेचा लोप झाला. अशा भव्य ठिकाणीं जर एखादें देऊळ नसलें तर हिंदुधर्माची लाज जाईल ना ? मंदिर तर पाहिजेच परंतु येथलें मंदिर पाहिल्यावर खात्री झाली कीं तें बांधूनहि लाज काहीं राहूं शकली नाहीं. इतकें बेढोल आणि असंस्कारी

मंदिर मी हिंदुस्थानांत कोठेंच पाहिलें नाहीं. काशीवासी भगवान् कबीर खरो-खरच येथें येऊन राहिले होते कीं त्यांच्याच नांवाच्या एकाद्या व्यक्तीनें हें स्थान पसंत केलें होतें कोण जाणे ! त्यांच्या काळीं हें झाड कसें दिसत असेल कुणास ठाऊक ! आज या झाडाची भव्यता पाहून त्याच्याविषयीं भीति किंवा आदर मनांत उत्पन्न होण्याऐवजीं उद्विग्नता आणि दयाभावच निर्माण होतात. कारण हिंदु धर्मासारखी या वडाची देखील दुर्दशाच आहे ! अमुक पुरांत बेटाबरोबर या वडाचाहि अमुक भाग वाहून गेला. अमुक खोडें आणि शाखा कुजून गेल्या. मोंगल साम्राज्यांत ज्याप्रमाणें ईस्ट इंडिया कंपनी आपणांसाठीं जागा करून घेत होती त्याप्रमाणें कितीतरी धीट झाडें याच्या छायेखालीं आपलें डोकें काढूं शकलीं आहेत. हा वटवृक्ष पुरातन आहे असा संतोष वाटत असला तरी तो सनातन राहील असा विश्वास वाटत नाहीं. अखेर सगळें जायचें आहे. हा कबीर वड देखील कांहीं जमान्याचाच पाहुणा आहे, असा विचार मनांत आल्यावांचून राहात नाहीं. फार फार जगला तर आणखी दहा वर्षें ! मन उद्विग्न होतें पण त्याबरोबरच दुसराहि विचार मनांत येतो. हजार वर्षांची मुदत ज्याला संतोष देऊं शकत नाहीं तें मानवी मन कोणत्या सनातनतेच प्रतिनिधि असेल ?

ह्याचें उत्तर आत्म्याची सुरता साधणारा कबीरच देऊं शकेल. मला वाटतें आज कबीर साहेब येथें आले तर चिडून म्हणतील, ‘ माझ्या नांवानें बांधलेलें हें मंदिर येथून काढून टाका, ह्या झाडांच्या छायेंत मंदिर बांधण्या-पेक्षां हा वटवृक्ष ज्याच्यांत सहज समावून जाऊं शकेल असें हें निसर्गाचें मंदिर आपणाला पुरेसें आहे. चार दिशा ज्याच्या भिंती आहेत, चंद्रसूर्य ज्याचे दिवे आहेत आणि दरवाजे आणि गवाक्षांना जेथें सुमार नाहीं असें विराट मंदिर असतांना ह्या चुना, विटा व दगड येथें रचण्याचें तुम्हांला सुचलें तरी कसें ?’

कबीर वडाला शोभेल असें चुन्या विटांचें मंदिर येथें बांधणें अशक्य नाहीं. गंगेच्या कांठीं नऊ लाख रुपये खर्चून स्वामी विवेकानंदांच्या गुरु-बंधूंनीं आणि शिष्यांनीं काय कमी सुंदर मंदिर बांधलें आहे ! भक्तीची भव्यता असेल तर आजहि विरक्त कबिराचेंहि मन लोभावून जाईल असें मंदिर बांधतां येईल !

—४—

गुजरातेंतून परतलों आणि थोड्याच दिवसांत गांधी सेवा संघाच्या वार्षिक अधिवेशनासाठीं मलिकन्दा येथें जावें लागलें. दोन दिवस लौकर निघून आम्ही कलकत्त्यांत राहिलों. कलकत्त्यांतलीं प्रेक्षणीय स्थळें मीं अनेक वेळां पाहिलीं आहेत. परंतु तेथला बोटानिकल गार्डन अद्याप पाहिला नव्हता. तेथेंहि एक मोठा वड आहे असें जर मला माहित असतें तर कधींच जाऊन आलों असतों. मला बगीचे पाह्यला आवडतात परंतु बोटा-निकल गार्डन्स असलें अरसिक नांव ऐकायला आवडत नाहीं. मी त्याचें नांव ठेवलें, 'वानस्पत्यम्' मीं त्याचें 'वनोद्यान' किंवा 'पादपविहार' असेंहि नांव ठेवलें असतें. आम्हीं सायंकाळीं वानस्पत्यांत जाऊन पोंचलों.

कलकत्त्यांतील हा बगीचा खरोखर ब्रिटिश राजधानीचें भूषण आहे. अडियारच्या वडापेक्षां येथला वटवृक्ष अधिक मोठा आणि भव्य आहे. त्याचा संभाळहि नीटपणें केला जातो. त्याच्याकडे पाहून मन प्रसन्न होतें. भक्तीचा उमाळा मात्र फुटत नाहीं. झाडाच्या चहूं बाजूंला मोटार रस्ता आहे त्यामुळें त्याची अधिक वाढ होण्यास वावच नाहीं. जवळचीं चहाचीं हॉटेलें म्हणतात, या झाडाखालीं येऊन तुम्ही मजा मारूं शकतां. परंतु भक्तीसारखा आत्म्याचा खुराक तुम्हांला येथें मिळणार नाहीं. लहानशा पाटीवर या झाडाचा इतिहास इंग्रजींत लिहिला आहे कीं जमिनीपर्यंत पोंहचलेल्या याच्या पारंब्या इतक्या आहेत, मधलें खोड अमुक ठिकाणीं होतें, झाडाचें वय इतकें असावें. संशोधनाची कांहीं गरजच नाहीं. पाटी वाचतां आली कीं झालें. परंतु हिंदुस्थानांत ही सोय शेकडा एका माणसापुरतीच आहे. ब्रिटिश राजधानींत असेंच असायचें !

येथें बसल्या बसल्या अडियारच्या वडाची आणि कबीर वडाची स्मृति ताजी झाली. मदुरेपाशीं आणि गुजरातेंत गायकवाडी भादरणपाशीं असेच पण लहान मुलांप्रमाणें वाटणाऱ्या पारंब्या असलेले वटवृक्ष मीं पाहिले होते. त्यांचेंहि स्मरण झालें. आंत गेल्यावर दिसलें कीं ज्या ठिकाणीं मूळ खोड होतें तेथें त्याचा मागमूसहि नाहीं. खोड कुजून गेलें. शाखा कापून टाकाव्या लागल्या. खालची जमीनहि साफ करण्यांत आली. त्यामुळें जेथें

मोठें खोड असावयास पाहिजे होतें तेथील जागा कोरून काढण्यांत आली आहे. आणि वर पानांचा विस्तार नसल्यामुळें उघडें आकाश दिसतें. चोंहोंकडे पारंब्या आणि त्यांच्या पानांचा विस्तार आणि मध्येंच हा उघडा भाग जणूं भगवंताच्या सुंदर मूर्तीची वाट पाहात उभा आहे. या वृक्षाची आंगठी मूळ खोडाच्या स्मृतीलाच अर्पण केली पाहिजे.

वडाखालीं उभा राहून शहाळ्यांतलें पाणी पीत होतों इतक्यांत मन लाखों वर्षांची यात्रा संपवून गंगानदीच्या बालपणापर्यंत जाऊन पोंचलें. भूस्तर शास्त्रज्ञांनीं गंगेच्या कांठावर खोदकाम करून पात्र किती पुरातन आहे हें शोधून काढलें आहे. त्यावरून गंगा नदीचें वय सुमारं सात लाख वर्षांचें आहे. तेव्हांपासून येथें दरवर्षीं पूर येत असावेत. ह्या सरस भूमींत किती तरी वटवृक्ष उगवले असतील आणि वाहून गेले असतील. त्या वट-वृक्षांची ही कोणती पिढी आहे हें कोण सांगूं शकेल? त्यांच्याहि भाग्यांत आणखी किती वर्षें हवा खाण्याचें लिहिलेलें आहे तेंहि कोण सांगेल? हा सगळा पारंब्यांचा विस्तार अखेर कुजून जाईल कीं पाण्यांत वाहून जाईल कीं भूकंपानें जमिनींत पुरला जाईल, त्याचा कोळसा बनेल कीं फॉसिल हेंहि कुणाला सांगतां येणार?

लंकेंत अनुराधापुर येथें अशोकाच्या काळांतला एक जुना बोधिवृक्ष आहे. हा वृक्ष जसजसा वृद्ध होत गेला तसतशीं लोकांनीं त्याच्या मुळांत भर घालून त्याला उंच करून त्याचा ‘ कायाकल्प ’ केला आहे. अशा प्रकारें ह्या पिंप-ळाला एकावर एक पांच पार बांधून लंकेच्या लोकांनीं तो अश्वत्थ शाश्वत बनवून टाकला आहे. असें सांगतात कीं एका वर्षीं ह्या बोधिवृक्षाचीं पानें गळून पडूं लागलीं आणि लोकांना वाटलें कीं आतां हा ‘ निर्वाण ’ पावणार, तेव्हां सबंध सिलोनमध्यें हाहाकार माजला. दूरदुरून लोकांनीं दुधाचे घडे आणून त्याच्या मुळाचें सिंचन केलें आणि अखेर च्यवन ऋषीप्रमाणें हा वृक्ष तरुण बनला.

तर मग आपल्या ह्या वटवृक्षांचा कायाकल्प करणारा एखादा उपाय नाहीं काय? पटण्याच्या अजायब घरांत ( म्युझियम ) संथाल प्रदेशांतील लाखों वर्षांच्या जुन्या अशा एका झाडाचें फॉसिल ठेवण्यांत आलें आहे. तें पाहून मनामध्यें एक विचार उठतो, तर अनुराधापुरांतील पुराण बोधि-

वृक्ष पाहून दुसरा. होय, हा बोधिवृक्ष पुराणच आहे. 'पुरा अपि नवं पुराणं'! इतका पुरातन असून इतका टवटवीत अश्वत्थ पाहून जे आनंदाचे रोमांच मी त्याच्याखालीं अनुभवले त्यांचा प्रत्यय पटण्यातल्या किंवा कलकत्त्यांतल्या अजायब घरांतले प्राचीन फॉसिल पाहून कसा येणार! जीवन तें जीवन!

अडियार, कबीर वड आणि कलकत्त्याचें वानस्पत्यम् हीं ह्या रीतीनें आपलीं तीन तीर्थस्थानें आहेत. परंतु प्रत्येकाचें माहात्म्य भिन्न भिन्न आहे.

## कामाक्षीच्या राज्यांत २

हिंदुस्थानच्या तांत्रिक त्रिकोणाचीं काश्मीर, केरळ आणि कामरूप हीं तीन टोंकें आहेत. आणि प्रकृतिमातेनें ह्या तीन प्रान्तांना अप्रतिम सौंदर्याची देणगी दिली आहे. ह्या तिहींत अधिक रमणीय कोण असें आज जर मला कोणीं विचारलें तर त्याचें उत्तर सोपें नाहीं. कामरूपचें अति प्राचीन नांव 'प्रागज्योतिष' असें होतें. आज तो 'असम' ह्या नांवानें ओळखला जातो.

गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्या अनेकमुखी पाण्यांमुळें सुंदरवनाचें सौंदर्य वाढलें आहे. त्याचें प्राचीन नांव 'समतम' असें होतें. 'समतम' म्हणजे सपाट भूमीचा प्रदेश. ह्याच्या उलट 'असम'! हिमालयापासून 'उफला' पर्वतापर्यंतच्या आणि दक्षिणेकडील चेरापुंजी ते 'गारो' पर्वतापर्यंतच्या साऱ्या प्रदेशांत जिकडे नजर टाकाल तिकडे डोंगरच डोंगर! ह्यामुळें कदाचित् ह्या प्रदेशास 'असम' हें नांव मिळालें असावें!

ज्या प्रदेशांतून ब्रह्मपुत्र वाहतो त्याच्या दोन्ही तीरांवर लागवडीलायक जी जमीन आहे त्या भूभागावरच असमची वस्ती आहे. 'ब्रह्मपुत्रच' असमी लोकांचा माता पिता आहे. ईशान्येकडे 'सदिया'पासून, पश्चिमेकडे 'धुब्री' पर्यंत १५ अंशाच्या भागांत 'असम' प्रान्त पसरला आहे.

ह्या प्रान्तावर निसर्गाची अनन्यसाधारण कृपादृष्टि आहे असें एका

दृष्टीनें म्हणतां येईल. सर्वांत मोठी आणि सर्वांत लांब नदी ह्या प्रान्तांतून वाहते. ह्या नदींतून वाहून येणारा गाळ आणि पर्वतावरील वृक्षांच्या पानांचें खत विचारांत घेतलें तर येथल्यासारखी सुपीक जमीन कोठेंच आढळायची नाहीं. केरोसिन आणि दगडी कोळशाच्या खाणीं शेजारीं शेजारीं जर कोठें सांपडत असतील तर त्या येथेंच. वनसमृद्धि आणि खनिज पदार्थांच्या बाबतींत तर हा प्रदेश असामान्य संपन्न आहे. भात, कापूस, बटाटे, भाजी-पाला, चहा, नीळ—जी वस्तु आपण मागूं ती देण्याला येथली भूमि तयार! येथलीं नारळी पोफळीचीं झाडें पाहून तर हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याची आठवण होते. मत्स्याहारी लोकांच्या दृष्टीनें हें नंदनवन आहे. आणि फलाहारी लोकांनीं जर मनांत आणलें तर फणस आणि केळीं ह्यांवरच ते आपलें सारें आयुष्य कंठूं शकतील.

कच्च्या मालाच्या बाबतींत हा प्रांत जितका श्रीमंत आहे तितकाच 'कच्च्या' लोकवस्तीच्या बाबतींतहि आहे. नागा, खसी, मिकीरी, गारो, मिष्ठी, आभोर, मिसमिस आदि अनेक पर्वतीय आणि वन्य लोकांची वस्ती ह्या प्रान्तांत अधिक आहे. कच्च्या मालाची किंमत तेच लोक करूं जाणे, ज्यांना त्यापासून पक्का माल करतां येतो. त्याचप्रमाणें ह्या पहाडी वनौकसांची किंमत संस्कृति-धुरीणच करूं शकतील. इतिहास पूर्वकालीन नृ-वंश-शास्त्रज्ञांना अध्य-यनाच्या दृष्टीनें ' असम ' प्रान्त चांगलें क्षेत्र आहे. समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीनें ती एक अप्रतिम प्रयोगभूमि आहे. गोव्यांतले, कोकणांतले आणि केरळ-मधले थोडेसे साहसी लोक जर येथें येऊन राहिले आणि येथल्या लोकांत मिसळून गेले तर ह्या प्रान्तांत एका नव्या युगाचा प्रारंभ होईल. कारण भात, सुपारी, नारळ, मासळी, फणस आणि केळीं ह्यांचा हा प्रान्त आहे. पश्चिम भारतांत जी कांहीं कारागिरी आहे, जीवनकला आहे तिचा लाभ येथल्या लोकांना मिळेल व त्यांना आपल्यांतील शक्तीचा साक्षात्कार करून घेतां येईल. येथल्या आरण्यकांना आपल्यांत घेतल्यानें असमिया लोकांची शक्ति कमींत कमी दसपट तर होईलच. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि निसर्गाशीं कसें झगडावें व जीवंत राहावें ही कला ह्या ' वनचरांना ' जितकी अवगत आहे तितकी फारच थोड्या शहरी व ग्रामीण जनतेला असेल. पाद्री लोकांनीं ह्या लोकांवर आपला धर्म आणि आपली संस्कृति लादण्याचा बराच

प्रयत्न केलेला आहे. ह्या प्रयत्नाच्या बुडाशीं कोण कोणते हेतु आणि आदर्श लपलेले आहेत तें सांगणें कठिण आहे. धर्माच्या नांवावर हे प्रचार करतील आणि वेळ आली म्हणजे आपल्या प्रचाराच्या योगें लष्करी फायदे करून घ्यावयालाहि ते मागेंपुढें पाहणार नाहींत. त्यांच्या ओठीं आणि पोटीं धर्मशास्त्र असलें तरी त्यांच्या मेंदूंत आणि आचरणांत साम्राज्यवादी समाजशास्त्र भरलेलें असणार! हिंदुस्थानाचें सामाजिक, आर्थिक आणि भाषिक ऐक्य नष्टभ्रष्ट करण्याच्या बाबतींत ह्या पाद्र्यांनीं चांगलेंच यश मिळविलें आहे. 'असम' च्या इंग्रज सरकारनें ह्या अरण्यबंधूंच्या शिक्षणाचें सारें 'मिशन' पाद्र्यांच्या हातीं सोपविलें आहे. इतकेंच नव्हे तर कोठें कोठें मिशनच्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाहि ह्या पर्वतीय प्रदेशांत जाऊं न देण्याचें धोरण अगदीं उघड उघड चालविलें आहे. आज देखील ही नीति सोडली गेली नाहीं.

ह्या वनचरांत राहून त्यांची सेवा करणाऱ्या आणि आपलें भरण पोषण करणाऱ्या मारवाडी लोकांची आपण जितकी कदर करतों त्यापेक्षां जास्त कदर त्यांची व्हायला हवी. इंग्रज लोक येथें येऊन जितका नफा मिळवितात तितका नफा ह्या बिचाऱ्या मारवाड्यांच्या स्वप्नींही येत नसेल. पण मारवाड्यांना धनलोभी आणि लुटारू म्हणण्याचा रिवाजच पडून गेला आहे. येथील सर्व प्रकारचे कष्ट अत्यंत समाधानानें सहन करणारे हे मारवाडी जर ह्या पर्वतीय लोकांत येऊन राहिले नसते तर त्यांचें जीवन अशक्यप्राय झालें असतें, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

जेव्हांपासून येथें केरोसिनच्या आणि कोळशाच्या खाणी सांपडल्या आणि चहाचे मळे उठले तेव्हांपासून इंग्रज लोक निरनिराळ्या प्रान्तांतील मजुरांना येथें घेऊन आले. येथें येऊन ते लोक अत्यंत परिश्रमानें आपली गुजराण करतात परंतु ते येथील मूळ रहिवाशांशीं अजून एकरूप होऊं शकलेले नाहींत. येथल्या लोकांशीं मिसळून जाणें तसें कांहीं फार कठिण नाहीं. असमिया लोक पिढ्यानुपिढ्यांपासून शेतकरी आहेत. परंतु बंगालच्या मैमनसिंग जिल्ह्यांतील लाखों मुसलमान येथें जेव्हांपासून वरतीला येऊं लागले तेव्हांपासून त्यांच्या जीवनशक्तीसमोर हे लोक अगदीं फिके पडले आहेत. हे नवे लोक गुरें पाळतात, बटाटे पेरतात, भाजीपाला विकतात आणि

येथल्या सुपीक जमिनींत हवी तेवढी अंगमेहनत करून लाखों रुपये कमावतात.

'नौगांव' जिल्ह्यांत ह्या लोकांना वाटेल तेथें तळ ठोकण्याची परवानगी नाहीं. असमिया लोकांशीं तंटे बखेडे होऊं नयेत म्हणून सरकारनें ह्या जिल्ह्यांत एक सीमारेखा आंखून दिली आहे. तिच्या अलीकडील भागाला असमिया लोकच शेती करूं शकतात. मैमनसिंगच्या मुसलमानांना येथें वाव नाहीं. सीमारेषेच्या असमिया भागांतील जमिनीची किंमत दर एकरीं जर ५ रु. असेल तर त्याच दर्ज्याच्या तितक्याच जमिनीची मुसलमान भागांत ५० रुपयांपेक्षां अधिक किंमत आहे. ह्यावरून दोन्ही समाजांतील क्रयशक्तीचा बोध होतो.

हिंदुस्थानचा ईशान्य कोपरा जेथें आहे तेथें एक छोटासा हिंदुस्थानच आपणास आज पाह्यला मिळतो. 'डिग्बोई' आणि 'तिनसुखिया'च्या आसमंतांतील तेलाच्या आणि कोळशाच्या खाणी अहोरात्र चालू असतात. आणि आपल्या हिंदुस्थानच्या सगळ्या प्रांतांतले ३०।४० हजार लोक मिळून निढळाच्या घामानें इंग्रजी कंपन्यांच्या खिशांत नफ्याचे हजारों रुपये दररोज भरत असतात ! !

प्राचीन काळीं मानवांनीं गाय, म्हैस, घोडा, गाढव, उंट, हत्ती यांच्याकडून काम करून घेण्याची आणि त्यांच्या मेहनतीवर जगण्याची विद्या प्राप्त करून घेतली होती. तर अर्वाचीन काळीं पाश्चात्य भांडवलदारांनीं आशिया आणि आफ्रिका खंडांतील जनतेला राबवून त्यांच्या मेहनतीवर जगण्याचें कसब शोधून काढलें आहे. पशूंकडून श्रम करवून घेण्याची संवय लागतांच मानवी स्वभावांत आणि मानवी जीवनांत मोठीच क्रान्ति घडून आली आहे. गुलामीची प्रथा, बिगार, दुबळ्या शेतकऱ्यांची पद्धति ( हल्लीं पर्यंतहि गुजरातच्या सुरत जिल्ह्यांत होती ) आणि कारखान्यांत मजुरांकडून काम करवून घेण्याची प्रथा यांच्यामुळेंहि मनुष्य जीवनांत, त्याच्या सामाजिक आदर्शांत फारच मोठी घडामोड झाली आहे. व त्यामुळें वर्गविग्रह आणि समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान निर्माण झालें आहे.

पशुंकडून काम घेण्याची मानवांनीं जेव्हां सुरुवात केली असेल तेव्हां सिंह, लांडगे, हरिण, रानडुक्कर वगैरे प्राण्यांकडूनहि काम करवून घेण्याचा

प्रयत्न झाला असेल. परंतु ह्या पशूंनीं इतक्या सफाईनें काम करण्याचें नाकारलें असेल कीं मनुष्यप्राण्यानें त्याचें नांवच सोडून दिलें. "आम्ही मरूं परंतु तुमची गुलामी पत्करणार नाहीं" हेंच त्यांचें आव्हान असावें. तें त्यांनीं पूर्णपणें अमलांत आणलें. ह्या पशूंचा आणि मानव समाजाचा झगडा आजहि आघाड्यांवर रोज चालू आहे.

असम प्रान्तांत गाई आहेत, म्हशी आहेत, हरिणादि वन्य पशु आहेत आणि विशेष म्हणजे खड्गविषाण गेंडेहि येथें आहेत. गेंडयाकडून काम करवून घेण्याची कला मानव कधीं ना कधीं हस्तगत करील अशी माझी खात्री आहे. हत्ती हें हिंदुस्थानचें प्रतीक आहे. ब्रह्मदेशचा मोर, दक्षिण आफ्रिकेचा शहामृग तसें आसामचें प्रतीक म्हणजे हा गंभीरवेदी गेंडा!

आणि जर नव्या दृष्टीनें पाहायचें म्हटलें तर गाईच्या बरोबरच आणखी एका प्राण्याचा विचार केला पाहिजे. गाईला पवित्र म्हणायचें तर हा प्राणीहि तितकाच पवित्र आहे. गाय मनुष्य जातीला जर अमोल आहार पुरवीत असेल तर हा प्राणीहि तितकाच महत्त्वाचा आहार तयार करून देतो. मनुष्याच्या सहवासामुळें गाय पाळीव व सौम्य बनली आहे तर हा प्राणीहि तितकाच पाळीव आणि सौम्य बनूं शकतो. असा हा प्राणी म्हणजे मधमाशी! गाईला प्रेमानें वागविलें, निसर्गाच्या कोपापासून तिचें संरक्षण केलें, तिला योग्य खानपान घातलें तर ती अधिक दूध देते. त्याप्रमाणें मधमाशाहि मनुष्याची मदत मिळाली असतां मध बनविण्याची आपली शक्ति अनेक पटींनीं वाढवूं शकतात. आसाम प्रांतांत जिकडे पाहाल तिकडे असंख्य पुष्करणी, विहिरी, तळीं आणि सरोवरें दिसून येतात. त्यांत जीं असंख्य बरीं वाईट फुलें उगवतात त्यांच्यांतलें अमृत टिपून टिपून त्यांचा मध बनविणाऱ्या मधमाशा असम प्रांतांत असंख्य आहेत. ह्या प्रान्तांतील मध दूर दूर जात असतो.

कामरूपचा इतिहास महाभारत कालापासून सुरू होतो. महाभारतांत तेथल्या भगदत्त राजाचा आणि त्याच्या हत्तींचा उल्लेख आहे. अनेक राजांच्या कन्यांचें हरण करून त्यांना आपल्या अंतःपुरांत कोंडून ठेवणारा नरकासुर येथेंच राज्य करीत होता. श्रीकृष्णानें जेव्हां या देशावर स्वारी केली, त्या वेळीं सत्यभामेकडे सेनेचें धुरिणत्व होतें. याचें रहस्य काय?

श्रीकृष्णाच्या काळीं येथें स्त्री-राज्य होतें काय? मध्य-पाण्डव अर्जुनाची चित्रांगदा ह्याच प्रान्तांतली–मणिपुरची–होती! कृष्णाच्या नातवाला देखील असें वाटलें कीं आपल्यालाहि एखादी वधू मिळावी आणि तोहि बिचारा येथेंच येऊन फसला. अनिरुद्ध असून उषेच्या प्रेमांत तो 'रुद्ध' झाला! द्वारकेच्या अनिरुद्धानें कामरूपच्या उषेशीं विवाहबद्ध होऊन हिंदुस्थानचीं दोन टोकें जोडून टाकलीं.

आपल्या पौराणिक काळीं पट्टीचे असे तीन भटके प्रवासी होऊन गेले. अमर वार्ताहर नारद, शीघ्रकोपी बलराम, आणि क्षत्रिय ब्राह्मण परशुराम! दुर्वास, दत्तात्रेय, हनुमान वगैरे मंडळीहि कमी भटकी नव्हती. परंतु त्यांच्या तीर्थाटनाचा इतिहास उपलब्ध नाहीं. परशुरामानें पश्चिम किनाऱ्यावर एक मोठा यज्ञ केला आणि सारी भूमि ब्राह्मणांना देऊन टाकली. पण जेव्हां त्याला असें आढळून आलें कीं आपणास रहावला देखील जागा उरली नाहीं तेव्हां त्यानें समुद्र हटवून स्वतःसाठीं थोडीशी भूमि तयार केली. ह्याच परशुरामाचें एक कुण्ड या प्रान्तांत सादिया स्टेशनपासून पूर्वेकडे पन्नास मैलांवर आहे. येवढें समजल्यावर त्याचें दर्शन घेण्याची प्रबळ इच्छा कोणत्या आर्यहृदयाला होणार नाहीं? परंतु तेथें जाण्यासाठीं अनुकूल मुहूर्त हवापाण्याला विचारावा लागतो.

परशुराम–कुण्ड अथवा ब्रह्मकुंड हें फारच आरोग्य-प्रद स्थळ आहे आणि तेथली नैसर्गिक सृष्टि देखील निसर्गप्रेमी मनुष्याला उन्माद चढविणारी आणि विलासी माणसाला प्रशम-शांति देणारी आहे. परशुरामाच्या काळीं आम्हां लोकांत निसर्गप्रेम, धर्मप्रचाराची वृत्ति आणि आपल्या सीमान्त प्रदेशांतून सैन्य शिबिरें स्थापन करण्याची लष्करी दृष्टि होती. आज आम्ही निराशावादी, संकोचप्रिय आणि जडतेचे उपासक बनलों आहोंत. मग आम्हांला ह्या कुण्डाचा पत्ता तरी कोठून लागणार? तसें असतें तर आम्हीं लोकांनीं पूर्वेकडच्या आणि पश्चिमेकडच्या सीमान्त प्रदेशांतून पराक्रमी, पुरुषार्थी आणि दीर्घदर्शी नवयुवकांचे मोटमोठे आश्रम नेहमींकरितां स्थापून ठेवले असते. एकटा चाणक्यच असा होऊन गेला कीं, ज्याला वायव्य सरहद्द संभाळण्याचें महत्त्व समजून आलें होतें. त्याच्या वंशजांनीं अटकेची 'अटक' निर्माण करून भारतीय विकासाला अटकाव केला.

असम प्रांताच्या सौंदर्य-समृद्धीची आणि तेथल्या भाग्यलक्ष्मीची कथा ही अशी आहे. पण त्याचबरोबर पक्षपाताचा आरोप टाळण्यासाठीं सृष्टि-मातेनें आपला कोप ह्या भूमीवर प्रकट केला आहे त्याचेंहि थोडेंसें वर्णन येथें करणें उचित आहे.

असम प्रान्त भूकंपासाठीं प्रसिद्ध आहे. जणूं काय ही भूमि न मेलेल्या गयासुराच्या कलेवरावरच बसली आहे. भूमि जेव्हां मृत किंवा सुप्त झालेली नसते तेव्हां चलनवलन करण्याची तिला इच्छा होतच असते. असम प्रांतांत आजवर इतके धरणीकंप झाले आहेत कीं त्यांचें वर्णन ऐकून मनापुढें एक प्रश्न उभा राहतो. जेथली जमीन वारंवार हादरे देते आणि ठिक-ठिकाणीं उत्पात करते तेथें एक तर भूकंपाचें वैज्ञानिक कारण शोधण्याचा प्रयत्न करण्यांत येतो; अथवा मनुष्य आपल्या कवि-कल्पना चालवून पौरा-णिक कथा रचत असतो. महाभारतादि प्राचीन ग्रंथांत भूकंपाचे उल्लेख आणि कथा आहेत तर जपानसारख्या देशांत सिस्माग्राफीचा विचार होत असतो. परंतु असममध्यें ह्या दोन्ही गोष्टी नाहींत. ज्या प्रदेशांत वारंवार भूकंप होतात तेथले लोक एकतर तो प्रदेश सोडून तरी जातात किंवा जीवन क्षणभंगुर आहे असें मानून मृत्यूचें भय टाकून देतात. हे दोन्ही मार्ग स्वाभाविक आणि मनुष्योचित आहेत. परंतु दैववाद ही एक अशी विषारी वस्तु आहे कीं, ती मनुष्यास जड बनवून टाकते. 'नशीबवादी' समाज स्थानांतर करणार नाहीं, नैसर्गिक शक्तीशीं संगर देणार नाहीं आणि पुरातन काळापासून चालत आलेल्या आपल्या जीवन-प्रणालींत कांहीं परिवर्तनहि करणार नाहीं. असममध्यें भूकंपविज्ञानशास्त्राचें कोठें नांवहि ऐकूं येत नाहीं. नदाला पूर येतो तो माणसें, घरें आणि गुरेंढोरें वाहून नेतो. लोक दुःखी होतात. पण ह्या सगळ्या आपत्तीचें रसाळ वर्णन करून आणि सगळें विसरून हे लोक 'जैसे थे' म्हणून आपली जीवनयात्रा चाल-वीत असतात.

असम प्रान्तांतलें हवापाणी हवें तसें आल्हाददायक नाहीं. उंच उंच पर्वतावरील ठिकाणें त्याला अपवाद आहेत. लोकांतील जीवनशक्ति यामुळें फारच कमी आहे. असममधले सगळे डॉक्टर आणि आरोग्य-मंत्री मिळून व्यक्तिगत आरोग्याच्या नव्हे तर सामाजिक आरोग्याच्या

बाबतींत तसेंच लोकांच्या राहणींत, त्यांच्या आहार-विहारांत आणि गृह-रचनेंत काय काय परिवर्तन करतां येण्यासारखें आहे ह्याचा जर विचार करतील तर सबंध प्रान्ताचा कायाकल्प होईल. पाण्याचा प्रश्न देखील कांहीं सरळ नाहीं. पर्वतीय लोकांना आणि शेतकऱ्यांना कमींतकमी खर्चांत जर शुद्ध पिण्याचें पाणी मिळूं लागलें तर केवळ असमच्या आरोग्यावरच नव्हे पण त्याच्या पुरुषार्थावरहि इष्ट आणि सखोल परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं.

'आमच्या हातून कांहीं घडणार नाहीं' हा जो न्यूनगंड लोकांच्या मनांत खोल रुजून बसला आहे त्याच्या ऐवजीं "आम्ही मनुष्य आहोंत, आणि सर्व कांहीं करूं शकतों" ही वृत्ति त्यांच्यांत निर्माण झाली पाहिजे. निसर्गावर विजय मिळविणें हें मनुष्याचें सर्वांत मोठें कार्य आहे. त्यानें विज्ञान व रसायन-शास्त्र ह्यांत संशोधन करून लहान मोठीं यंत्रें बनविलीं, प्रवासाचीं साधनें निर्माण केलीं, आहार वाढविण्याचे प्रयत्न केले; परंतु अद्याप नद्यांना ताब्यांत ठेवण्याच्या, मोठमोठ्या जंगलांत परिवर्तन करण्याच्या, वातावरणांत आणि पर्जन्यांत बदल घडवून आणण्याच्या, समुद्राच्या प्रवाहापासून फायदा करून घेण्याच्या, सूर्याच्या शक्तीपासून प्राणशक्ति वाढविण्याच्या व्यापक कार्यांना अजून त्यानें हात घातलेला दिसत नाहीं. हीं कामें मानवी शक्तीच्या पलीकडचीं नाहींत. असम प्रान्ताची समृद्धि इतकी विशाल आहे कीं तेथें साऱ्या विपत्तींवर इलाज करण्याचा 'मसाला' सांपडलाच पाहिजे.

असम प्रान्ताच्या सरकारनें मानवविज्ञानाचें ( anthropology ) एक खातें उघडून व त्यांत एतद्देशीय लोकांची नेमणूक करून नवे नवे शोध करविले पाहिजेत. दक्षिणेकडे आर्य आणि द्रविड लोकांच्या सांनिध्याची संघर्षांची आणि संमिश्रणाची हकीगत सांपडते. सिंध, पंजाब आणि सीमान्त प्रदेशांत आर्य, सीथियन पल्लव इत्यादि जातींच्या मूळ इतिहासाचा शोध आपण करूं शकतों. प्राचीन इतिहासाच्या दृष्टीनें ह्या संशोधनाचें महत्त्व फार आहे. परंतु भविष्यकालाच्या दृष्टीनें असम प्रान्तांत ब्रह्मदेश, चीन, तिबेट आदिदेशांत ज्या अनेकविध जाती आहेत त्यांच्या जीवनसत्त्वांचा खूप सखोल अभ्यास व्हायला पाहिजे. आम्ही ज्यांना ॲबॉरिजीनी (मूळ निवासी) म्हणूं लागलों आहोंत त्या सर्व जातींचा विचार श्रीकृष्णाच्या काळीं वैष्णव

धर्माच्या प्रचारकालांत हिंदुस्थानांत बराच झाला होता. बौद्ध कालांत त्यांच्यांत सेवाकार्यहि झालें असेलच. परंतु आजकाल आम्ही लोकांनीं अध्ययन आणि सेवेचा मक्ता परदेशीयांकडे सोंपविला आहे !

आणि आतां चिनी लोकांचें विश्वविद्यालय समुद्रकिनारा सोडून असमच्या सरहद्दीपासून शंभर दोनशें मैलांवर येऊन बसलें आहे. डोंगरी रस्ते, मोटारी आणि विमानें ह्यांच्या द्वारा चीनशीं आमचा संपर्क बराच वाढणार आहे. असें झालें कीं आमच्या ईशान्य सीमान्त पहाडी जातींचें वर्णन आणि त्यांच्याविषयींची सूक्ष्म महिती आम्हांला चिनी प्राध्यापकांकडून घ्यावी व शिकावी न लागो म्हणजे झालें !

## तेंदूला आणि सुरवा ३

आज एका अवचित आणि असामान्य आनंदाचा अनुभव मिळाला.

शेजारच्या दोन गांवांत राष्ट्रीय ग्रामशिक्षण ( बेसिक एज्युकेशन ) सुरू करण्यासाठीं शिक्षक तयार करणाऱ्या एका संस्थेचें उद्‌घाटन करण्यासाठीं आम्ही वर्ध्याहून द्रुगला आलों आहोंत. पहांटे चार वाजतां द्रुगला येऊन पोहोंचलों. स्नान, नाश्ता आटोपून ‘बालोद’ला रवाना झालों.

द्रुगच्या थेट दक्षिणेस सदतीस मैलांवर बालोद आहे. बहुतेक रस्ता जणूं आंखून तयार केल्यासारखा अगदीं सरळ आहे. मैलच्या मैल एकाच रेषेंत धांवत राहण्यांत जसें एक प्रकारचें एकधारित्व आहे तसाच उन्माद पण आहे. बालोद जवळ आलें आणि कोणी तरी सांगितलें कीं, येथून जवळच तेंदूला बंड आणि कालवा आहे. लहान गोष्ट देखील स्थानिक लोकांच्या दृष्टीनें महत्त्वाची असते. श्री. तामसकरांनीं जेव्हां सांगितलें कीं, व्याख्यान संपल्यानंतर आपण तो बंड पहावयास जाऊं तेव्हां विशेष उत्साह नसतांहि मी होकार दिला. त्यांत कांहीं मजेशीर पहावयास मिळेल असें मला वाटलेंच नव्हतें. होकार दिला तो केवळ स्थानिक आतिथ्यांचा उत्साहभंग होऊं नये या सद्धेतूनेंच !

सदतीस मैलांचा जो खासा प्रवास आम्ही केला त्यांत रस्त्यांत खळगे, टेकड्या वगैरे कांहींच नव्हतें. जिकडे तिकडे सपाट जमीन. गुजराथसारखा ह्या जमिनींत कुंपणांचाहि अडथळा नाहीं. अशी सपाट जमीन पाहिल्या-नंतर एकादा नदीनाला पहावयास मिळेल, एकादा बांध दृष्टिपथांत आला तर मनाला विरंगुळा वाटेल असें समजून मी कबूल झालों. ज्यानें पुण्याच्या बंडगार्डनपासून भाटघरच्या प्रचंड बांधासारखीं अनेक धरणें पाहिलीं आहेत त्याचें कुतूहल असें सहजासहजीं थोडेंच जागृत होणार ?

बेझवाड्याचें कृष्णेचें भव्य धरण, गोकाकजवळचा घटप्रभेचा बाल्य-परिचित बांध, लोणावळ्याचीं दोन तीन आकर्षक धरणें, म्हैसुरांत वृन्दा-वनाचें पोषण करणारा कृष्णसागर, दिल्ली जवळचें यमुनेवरील रमणीय ओखल्याचें धरण आणि नाशकापासून मोटाररस्त्यानें पन्नास मैल दूर जाऊन पाहिलेलें प्रवरा नदीचें सुंदरतम आणि रोमांचकारी धरण—असे अनेक जलाशय ज्यानें पाहिले आहेत त्याला सिंहगडच्या पायथ्याशीं असलेल्या खडकवासल्यासारख्या धरणापासून संतोष हवा तर मिळो, पण त्याची जिज्ञासा बालकवत् आशुतोष नसणारच !

भावनगर जवळच्या बोर तलावाचें वर्णन मीं लिहिलें आहे. बेझवाड्याच्या कृष्णानदीला मी आपली श्रद्धांजलि अर्पण केली आहे. अितरांसंबंधीं अद्याप कांहीं लिहिलें नाहीं हें मनांत डांचतेंच !

असो. आज एकाद्या उत्तम जलराशीचें दर्शन घडेल अशी मात्र अपेक्षा नव्हती ! व्याख्यान, संभाषण आणि भोजन आटोपून आम्ही तेंदूला कॅनॉल पहावयास निघालों आणि बांधाच्या रस्त्याला लागलों. बांधावरून मोटार नेण्याची परवानगी घेण्यासाठीं एक मनुष्य पुढें गेला होता तो येण्याची वाट पाहण्याइतका धीर आम्हांला नव्हता. परवानगी मिळेलच या कल्पनेनें जोरांत चाललों आणि बांधापर्यंत पोहोंचलों. बांधावर चढलों आणि मी स्तिमित झालों.

केवढें लांब नि रुंद हें नदीचें पात्र ! आणि पाणी तरी किती स्वच्छ ! आकाशच आनंदातिशयानें द्रवीभूत होऊन जणूं खालीं उतरलें असावें ! आणि पाण्याचा रंग ? जांभळा, निळा, पिरोजी, चांदीवर्ण आणि गुलाबी ! अन् तो देखील स्थायी नाहीं. आकाशांतले ढग जसजसे पळतील तसतसे

हे पाण्याचे रंगहि आपलें रूप पालटणार. लहान लहान लाटांमुळें पाण्याची तरलता विकसित तर होत होतीच. शिवाय तिला ह्या रंगपरिवर्तनाच्या चांचल्याची जोड! मग काय विचारतां? जेथें पहाल तेथें काव्य डोलत होतें; चमत्कार नृत्य करीत होता. आपलें महत्त्व कोणावर अवलंबून आहे हें दोन्ही किनाऱ्यांना माहीत होतें. आणि म्हणून त्यांनीं अदबीनें जलराशींची खुशामत चालविली होती.

या धरणाचें वैशिष्ट्य त्याच्या विस्तारांत नसून दुसऱ्याच गोष्टींत आहे. तेंदुला आणि सुरवा या दोन जोडीदार नद्या आहेत. तेंदुला मोठी बहीण. ती तीस चाळीस मैल दुरून येते. तिच्या समोर सुरवा अगदींच बालिकेसारखी. तीन मैल वाहूनच ती येथें येऊन पोहोंचली आहे. या दोन नद्या जेथें थोड्याशा जवळ आल्या आहेत त्याच ठिकाणीं रमणीय धरण आहे. 'पुढें ज्याल तर माझ्या गळ्याची शपथ' असें म्हणून तें दोघींना आडवें आलें आहे. चांगला तीन मैल लांब बांध या दोन नद्यांना अडवितो; आणि आपल्या मर्जीप्रमाणें थोडें थोडें पाणी सोडून देतो. कच्च्या मातीचा एवढा मोठा बांध हिंदुस्थानांतच काय पण दुनियेंतहि दुसरा कोठें नसेल! धरणाखालची १५ मैल पर्यंतची जमीन हें उपकाराचें पाणी घ्यावयास तयार नाहीं. यामुळें तो कालवा त्यानंतरच्या साठ सत्तर मैल पर्यंतच्या दोन्ही कांठच्या शेतांचीच सेवा करतो. धरणामुळें बांधाच्या वरची किती जमीन पाण्याखालीं बुडाली आहे याची कल्पना डोळ्यांना कुठून येणार? तपासाअंतीं समजलें कीं जवळ जवळ तीनशें वीस चौरस मैल जमिनीचें पाणी येथें एकत्रित झालें आहे. पाण्याचा विस्तार सोळा चौरस मैल आहे. १९१० सालीं या बांधाचें काम सुरू झालें आणि पाऊण कोटीहून जास्त खर्च झाल्यावरच तो पुरा झाला.

पावसाळ्यांत या दोन नद्यांचें पाणी एकत्र होतें. आणि जिकडे तिकडे जलमय दृश्य पाहून मनुष्याला "सर्वतः संप्लुतोदके"चें स्मरण होतें. आणि मधलें बेट आपलें डोकें जरा वर उचलण्याचा प्रयत्न करतें तेव्हां त्याची ती दशा पाहून आपल्याला हंसें आल्यावांचून राहात नाहीं. आज या बेटावर किती तरी उंच झाडें "यद्भावि तद्भवतु" या वृत्तीनें त्या पुराची वाट पहात उभीं आहेत. त्यांना ती ढाल काठाची होडी घेऊन पळून

थोडेंच जावयाचें आहे ? असे पादप जोंपर्यंत टिकतां येईल तोंपर्यंत निश्चय-पूर्वक टिकाव धरतात आणि शेवटीं मुळें उघडीं पडलीं म्हणजे पाण्याला आत्मार्पण करतात.

उन्हाळ्यांत जेव्हां दोन्हीं नद्यांचीं पात्रें वेगळीं होतात तेव्हां उन्हामुळें तसेंच विरहामुळें त्या अधिक रोडावूं नयेत म्हणून दोघींच्यामध्यें एक कालवा खणून त्यांची जीवनभेट होईल अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

जाणणारे जाणतातच कीं, नद्यांना हृदय असतें, त्यांच्या ठिकाणीं वात्सल्य असतें, चारित्र्यहि असतें आणि उन्माद व पश्चात्तापहि त्यांना होत असतो. या दोन बहिणी येथें जें कार्य करतात त्यांत एकमेकींचा मत्सर जराहि नाहीं. बांधरूपी जबरदस्त संयमामुळें आपली शक्ति किती वाढली आहे याची त्यांना जाणीव आहे. वहात राहणें हाच एक नदीचा स्वधर्म नाहीं तर पसरणें आणि आशीर्वादरूप होणें हा देखील नदी-धर्मच आहे याची जाणीव साऱ्या नद्यांना करून देण्यासाठींच त्या येथें पसरल्या आहेत.

नदीच्या कांठीं झाडें असतात तेव्हां तेथें एक प्रकारची शोभा येत असते. आणि झाडें जेव्हां तिच्या पात्राला झांकण्याचा वृथा प्रयत्न करतात तेव्हां त्या विफलतेंतूनहि तीं एक प्रकारची शोभा निर्माण करीत असतात.

आम्हीं या झाडांची भेट घ्यावयास गेलों. दुपारची वेळ होती. झोपेनें पेंगणारीं झाडें नदीशीं हितगुज करीत झोपेंत मग्न होत होतीं. सगळीकडे गरमशीतल शांति पसरलेली होती. फक्त निरनिराळे पक्षी, मंदमंजुळ कलरव करून एकमेकांना हें काव्य अनुभवण्यास उत्तेजित होते. आणि झाडांचीं रुंद पानें एक तऱ्हेच्या चिकट जाळ्यानें चिकटवून वाघमुंग्या ( उंबिल ) हें काव्य भरून ठेवण्यासाठीं पिशव्या तयार करीत होत्या.

माझे डोळे देखील हृदयाची थैली बनवून त्यांत समोरचें सारें दृश्य भरून ठेवण्यासाठीं सारा प्रदेश चुंबीत होते.

नदीला त्यांत कांहीं हरकत नव्हती !

# शिवनाथ आणि ईब ४

—१—

बंगाल नागपूर रेल्वेनें कलकत्त्यास जातां येतां वाटेंत अनेक नद्यांची मुलाखत होते. ह्या प्रदेशाचा इतिहास मला माहीत नाहीं म्हणून लाज वाटते. इकडचे लोक किती सरळ आणि भले वाटतात! मनुष्यसंसाराची लीला जर त्यांनींहि केली असती तर त्यांचें नांव इतिहासांत अजरामर झालें असतें. कांहीं मरून अमर होतात तर कांहीं मारून अमर होतात. मलिक काफूर, काला पहाड इत्यादींची दुसरी श्रेणी!

या नद्यांच्या कांठीं लढाया झाल्या असल्यास त्या मला माहित नाहींत. त्यामुळें माझ्या दृष्टीनें या नद्यांचें पाणी आज तर अधिक पवित्र आहे. चर्मण्वतीनें यज्ञपशूंच्या रक्ताचा लाल रंग धारण केला आहे. शोण आणि गंगा यांनीं सम्राटांचीं महत्त्वाकांक्षी रुधिरें पचविलीं आहेत. या नद्यांनींहि असेंच केलें असल्यास नवल नाहीं. परन्तु जोंपर्यंत मला त्याचें ज्ञान नाहीं तोंपर्यंत अनिश्चयाचा फायदा त्यांना मीं कां देऊं नये?

या नद्यांच्या कांठीं अनेक साधूंनीं तप मात्र अवश्य केलें असावें. त्यांनीं कृतज्ञतापूर्वक त्यांचीं स्तोत्रें गायिलीं असतील. परन्तु हें देखील मला माहित नाहीं. आणि मी आपल्याला भारतवासी म्हणवितों.

—२—

द्रुगला गेलों होतों तेव्हां शिवनाथ नदीचा थोडासा परिचय झाला होता. गोंड, भिल्ल वगैरे पर्वतीय जातींची ती माता आहे. सबंध छत्तीसगड प्रांताची ती स्तन्यदायिनी आहे. तिची करुण कथा चित्ताला व्याकुळ करणारी आहे. पुण्यसलिला नदीची कहाणी अशी असावी? परन्तु त्याला तिचा काय इलाज? विजयी आर्यांनीं जर ती कथा रचिली असती तर त्यांत उल्लासमय तत्त्व आढळून आलें असतें. परन्तु ही तर पराजित, दबलेल्या

आणि संत्रस्त जातींचीं संस्मरणें वाहविणारी नदी! हिच्या गोष्टी अशाच उद्वेगजनक असायच्या.

—२—

काल आणि आज शिवनाथ नदीचें दर्शन घडलें. तसें म्हटलें तर कलकत्त्यास जातां येतां शिवनाथ एक दोन वेळां ओलांडावी लागतेच. परन्तु येथें या मोठ्या पुलावरून शिवनाथचा प्रवाह उंच उंच कांठांमधून जातांना दृष्टीस पडतो. काल सायंकाळीं बालोदहून आल्यावर अगदीं शिवनाथच्या कांठींच फिरावयास गेलों होतों.

पावसाळा तर सुरू झाला आहे. परन्तु अजून नदींत पाणी मात्र आलेलें नाहीं. त्यामुळें शिवनाथ एकाद्या विरहिणीसारखी म्लानवदना भासली. जी नदी श्रावणभाद्रपदांत आपले दोन्ही कांठ ओलांडून मैलच्या मैल पसरते, तिला आपल्याच पात्रांत एका कोपऱ्यांत अजगरासारखी पडलेली पाहून कोणालाहि विषाद वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

द्रुगच्या लोकांना शिवनाथविषयीं विचारलें, " नदीचा उगम कोठें आहे? लांबी किती आहे ? पुढें तिचें काय झालें आहे ? " परंतु कोणालाच निश्चित उत्तर देतां आलें नाहीं. या नदीचें माहात्म्य पुराणांत कोठें आहे काय ? तिच्याविषयींचें एकादें लोकगीत प्रचलित आहे काय ? कांहीं दंतकथा ऐकिवांत आहेत काय ?—यांपैकीं एकाहि प्रश्नाचें होकारार्थी उत्तर मिळालें नाहीं. नदीविषयीं माहिती ती काय ठेवायची ? रोज सकाळीं तिची सेवा घेतली कीं संपलें. यापेक्षां तिचा अधिक संसर्ग कशाला ?

शेवटीं मी द्रुग तहसिलीचें गॅझेटियर मागविलें. त्यांत वरील सामान्य प्रश्नांचीं उत्तरें तर दिलीं आहेतच परंतु त्याशिवाय शिवनाथविषयींची दंतकथाहि दिली आहे. तीच कथा आज येथें माझ्या शब्दांत देत आहें :

शिवा नांवाची एक गोंड मुलगी होती. जंगली जातीची असूनहि ती संस्कारी व रसिक होती. गोंड जातीचाच एक युवक तिजवर 'पिरीत' करीत होता. परंतु तिचें हृदय आकर्षूं शकेल असा एकहि गुण त्याच्यांत नव्हता. स्वच्छंद वर्तन आणि धाकदपटशा दाखवून काम करवून घेणें एवढेंच त्याला माहित होतें. शिवाचें ध्यान करावें आणि तिला प्राप्त कर-

ण्याचा मार्ग सांपडत नाहीं म्हणून कशीं व्हावें. शेवटीं आपल्या जाति-रिवाजाप्रमाणें संधि साधून त्यानें शिवाचें हरण केलें आणि राक्षसी-पद्धतीनें तिच्याशीं विवाह केला !

विवाह त्याच्या हातचा होता. सोपी गोष्ट होती ती. पण शिवाला आपलीशी करून घेणें सोपें नव्हतें !

शिवासारखी संस्कारी आणि भावनाशील तरुणी त्याच्याकडे ढुंकून तरी कशी पहाणार ? आणि त्या मूढाला अनुनय ही गोष्ट तरी कोठून माहित असणार ? त्यानें पतीचा हक्क गाजवायचा प्रयत्न केला. तिनें अबलेचें सामर्थ्य प्रगट केलें. शिवाला पळवून आणणारा युवक तिच्या हृदयासमोर पराजित झाला. त्याचा क्रोध उसळला. शरीरालाच ओळखणारी व्यक्ति शरीरापलीकडे कशी जाऊं शकेल ? शेवटीं त्यानें शिवाला ठार मारलें आणि तिच्या शरीराचे तुकडे एका खोल दरींत फेंकून दिले.

जेथें शिवाचें शव पडलें तेथूनच एक नदी वाहूं लागली तीच आपली ही शिवनाथ. पुढें जाऊन ती महानदीला आपला करभार सोंपविते.

आज सकाळीं उठून आम्ही बेनेतऱ्याला जावयास निघालों. वाटेंत एक अपघात घडला. आमच्या मोटरची एका बैलगाडीशीं टक्कर झाली. आणि एका बैलाचें शिंग उपटून पडलें. आम्ही थांबलों व मदतीला धांवलों. लोकगारें शिंग कापून काढण्याचा सल्ला मला द्यावा लागला. आणि जेथून रक्त वहात होतें तेथें पेट्रोलची पट्टी बांधावी लागली. सारें वातावरण करुण व विषादमय बनलें होतें. अशा स्थितींत शिवनाथ नदीचें पुन्हां दर्शन घडलें. येथें नदीचा पाट सुंदर आहे. आसपासचे दगड जांभळ्या लाल रंगाचे आहेत. नदीचें पात्र रमणीय आहे आणि प्रतिबिंब काव्यमय ! परंतु ती करुण घटना मनांत घोळत होती. त्यामुळें या दर्शनांतहि विषादाचीच छाया होती.

शिवनाथचें नशिबच असें !

कलकत्यास जातांना शिवनाथ पुनःपुन्हां दिसते.आणि म्हणते 'राजांच्या व साधूंच्या इतिहासानें संतुष्ट होऊं नका. विजेते आणि सम्राट यांच्या इतिहासांत तुम्हांला लोकहृदय सांपडणार नाहीं. ब्राह्मण आणि श्रमण, मुल्ला आणि मिशनरी यांपैकीं कोणालाच ज्यांच्या दुःखाची जाणीव नाहीं,

अशा या पहाडी लोकांच्या कष्टांचें अध्ययन करण्याची दीक्षा मी तुला देत्यें; घेण्याची कुवत आहे ?

हिंदुस्थानचें एकीकरण करण्याच्या उद्देशानें मी हिंन्दुस्तानीचा प्रचार करीत आहें. याच कामासाठीं मी नुकताच पुण्यास जाऊन आलों. याच कामासाठीं रामगडला जावयास निघालों आहे. तेथल्या कॉंग्रेसमध्यें सगळ्या प्रांतांतील लोक येतील. गांधीजींच्या आग्रहामुळें आतां कॉंग्रेस खेड्यांत भरूं लागली आहे. हें सर्व ठीक. पण रामगडला हे लोक येतील. बिहारचे संथाल आणि 'हो' कदाचित् आले तर येतील पण हे शिवनाथचे पुत्र येतील कीं नाहीं कोण जाणे !

—४—

आज सकाळपासून पुष्कळ नद्या पाहिल्या. मोठमोठीं शिलाखंडें अर्ध-लेल्या पाहिल्या आणि चिखल असलेल्याहि पाहिल्या. जिच्या कांठीं एकहि झाड नाहीं अशी नदी पाहिली आणि जिच्या कांठावर जणूं झाडांची एक भिंतच उभी आहे अशीहि नदी पाहिली. तिच्या पात्रांतील चिखलावर पांढरे शुभ्र बगळे आपल्या पायांनीं रांगोळ्या काढीत होते. परंतु या चरण लिपींतून मला कोणताच इतिहास सांपडला नाहीं. कोणतीच दंतकथा मी मिळवूं शकलों नाहीं. नदी आशेनें लिहिते आणि निराशेनें तो लेख पुसून टाकते व नव्या वाचकांची वाट पाहते !

आम्ही झरसूगुदा स्टेशनजवळ जात आहोंत. एक लहानसें स्टेशन आलें. इतक्यांत आमच्या रस्त्याखालून वाहणारी एक नदी पाहिली. नदी सुंदर ही असायचीच. परंतु या नदींत असाधारण सुंदर रांगोळी काढण्याची कला दिसली. प्रवाहांत भोंवरे उत्पन्न होत असावेत. शेवाळ चिकटल्यामुळें पाण्याला विशेष सौंदर्य प्राप्त झालें असावें. वरून ही सर्व रांगोळी पाहून मला 'रवीन्द्रनाथां'ची 'चिता' आठवली. या नदीची रांगोळी देखील निरहंकार, निनाबोल हृदयाला जाऊन भिडत होती. आणि आपला कायमचा ठसा उमटवीत होती. ही खरी कला !

परंतु या नदीचें नांव काय ? परिचय व्हावा आणि नांव कळूं नये ही किती विचित्र परिस्थिति ! अितक्यांत 'ईब' स्टेशन आलें, आम्हीं लोकांना

विचारलें कीं या नदीचें नांव काय? त्यानीं सांगितलें, 'ईब.' तरीच नदीच्या नांवावरून स्टेशनला नांव मिळालें! यांत औचित्य नाहीं असें कोण म्हणूं शकेल? परंतु मनांत शंका आली खरी. या ठिकाणीं 'भेडेन' नांवाची नदी ईबला येऊन मिळते. आणि स्टेशन तर भेडेनच्या कांठीं आहे. ईब थोडीशी मोठी आहे म्हणूनच भेडेनच्या बाबतींत अन्याय करून तिचें नांव स्टेशनला देण्यांत आलें नाहीं. भेडेन कांहीं लहानसान नदी नाहीं. चांगलीच रुंद आहे; दुरून वाहात येते पण कांहीं गर्व न करतां आपलें पाणी ईबला सोंपवून देऊन आपल्या नांवाचाहि आग्रह धरीत नाहीं.

मी ईबला म्हटलें, "पहा, औदार्याच्या बाबतींत ही भेडेन तुझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे कीं नाहीं?"

ईब थोडेंसें स्मित करून म्हणाली, "तें तुम्हां माणसांनाच माहित. भेडेननें आपल्या नांवाचा आग्रह न धरतां आपला करभार मला सोंपविला या औदार्याची वाखाणणी करण्यापेक्षां तिच्याकडून याच गोष्टीची दीक्षा घेणें आणि त्याला लायक बनणें हें मला अधिक चांगलें वाटतें. तिचें आणि माझें पाणी एकत्र करून महानदीला सोंपविण्यासाठीं ही पहा मी संबलपूरला चालल्यें. तेथें मी देखील माझें नांव टाकून देणार आहें. अशा-प्रकारें उत्तरोत्तर नामरूपाचा त्याग केल्यामुळेंच आम्हां सर्वांना महानदीचें महत्त्व प्राप्त झालें आहे. आणि तें देखील सागराला अर्पण करण्यासाठींच!"

जातां जातां ईबनें अनुष्टुप छंदांतील अेक ओळ म्हणून दाखविली.:—

'सर्वे महत्त्वं अिच्छन्ति कुलं तत् अवसीदति
सर्वे यत्र विनेतारः राष्ट्रं तत् नाशं आप्नुयात् ॥'

ईबचा हा संदेश घेऊन मी रामगडला गेलों.

—५—

वर्ध्याहून कलकत्त्याकडे जात होतों. गाडींत रात्रीं कांहीं न पांघरतां झोंपलों होतों. पांघरुणाची कांहीं आवश्यकता नव्हती. व पांघरुण घेतलें असतें तरीहि हरकत नव्हती. सकाळींच पांच वाजतां जागा झालों, तेव्हां हवेंत थोडासा गारवा होता. यामुळें चादरीची ऊब घेतली नाहीं म्हणून थोडासा पस्तावलोंच. पण त्याचें आतां काय? असें म्हणून उठून बसलों.

कवींना जितपत भविष्यकाळ दिसतो तितपतच बाहेर दिसत होतें. सारें दृश्य प्रसन्न होतें परन्तु अस्पष्ट !

इतक्यांत एक नदी आली. पुलाच्या दोन टोंकांमध्यें तिचा प्रवाह अनेक धारांनी वाहात होता. प्रत्येक नदीचें असेंच असतें. परंतु या नदीनें थोडेंसें विशेष सौंदर्य प्राप्त केलें आहे असें दिसत होतें. या पाण्याची चांदी बनवावी कीं प्राचीनकालीन लोखंडी आरसा बनवावा याचा निश्चय त्या अर्धवट अंधारांत आकाश करूं शकत नव्हतें.

आम्ही पुलाच्या मधोमध आलों. मी प्रवाहाचें सौंदर्य न्याहाळूं लागलों. इतक्यांत पाण्यावर कोणी तरी पांढरा रंग शिंपडावा आणि हळूं हळूं त्याची अबरी बनावी तसें तें दृश्य भासलें. तें पाहून मी अगदीं खुश झालों. नुकतेंच दिल्लीला 'जामिया मिलियां'त लहान मुलांना कागदावर अबरीचा रंग भरतांना पाहिलें होतें. मला हे नैसर्गिक आकार फारच आकर्षक वाटतात.

या नदीचें नांव कोण सांगूं शकेल? मी ठरविलें कीं दुसरें नांव मिळालें नाहीं तर मी हिला अबरी नदी म्हणेन.

नदी गेली आणि ही नदी कोणती हें जाणण्याची माझी उत्कंठा वाढली, कारण या नदीनंतर धूर सोडणाऱ्या एकदोन चिमण्या दिसल्या होत्या, आणि बाजूच्या वस्तींतून विजेचे दिवे देखील चमकले होते. रेल्वे टाइमटेबल काढून त्यास विचारलें, " आतां पांच वाजले आहेत. आपण कोठें आहोंत?" त्याचें उत्तर ऐकतांच तोंडांतून परिचयाचे आनंदोद्गार निघाले. 'अरे ही तर आपली ईब!' रामगडला जातांना हिनें किती सुंदर दृश्य दाखविलें होतें!! आपली कृतज्ञतेची अंजली देखील मी तिला अर्पण केली होती. ईबला मी कसा बरें ओळखूं शकलों नाहीं? अबरीचा या प्रकारचा कलाविकास काय वाटेल ती नदी दाखवूं शकेल?

तर मग ही ईब अबरीचें काम वर्धा योजनेच्या शाळेंतून शिकली असेल काय? छेः! जगानेंच पहिल्या प्रथम अबरीची कला हिच्याकडून मिळविली असावी!!

# वसईचा किल्ला

५

आजची वसई केवळ अति उत्कृष्ट केळ्यांसाठीं प्रसिद्ध आहे. चांगलीं पिकलेलीं, अमृतासारखीं केळीं सुकवून सोपटांतच त्यांना उत्तम रीतीनें बांधून टिकविण्याची कला वसईतच विकसित झाली आहे. या केळ्यांना इकडे सुकेळीं म्हणतात; आणि त्यांचे सुंदर पुडे दूरदूरपर्यंत विकले जातात. वसईचा इतिहास जर असाच जपून ठेवण्यांत आला असता तर तो देखील कांहीं कमी आकर्षक झाला नसता. वसईचा इतिहास जितका प्राचीन आहे तितकाच त्यांतील वैविध्याच्या दृष्टीनेंहि तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. तथापि अवघा इतिहास आज विस्मृतीच्या खाईंत जो पुरला जात आहे त्यापैकीं कांहीं गोष्टींचें स्मरण करून त्यांची ही विस्मरणयात्रा थोडीशी थांबवितां येईल.

तसें करण्याचा हा एक परिमित प्रयत्न आहे.

वसईचें पूर्व स्वरूप आपल्याला 'सोपारा' या नांवावरून मिळतें. हें 'सोपारा' म्हणजे आज वसईच्या उत्तरेस तीन साडेतीन मैलांवर असलेलें एक लहानसें खेडें. हाच या सोपाऱ्याचा अवशेष. प्राचीनकाळीं 'सोपारा' ही कोंकण प्रांताची राजधानी होती. येथून आपला व्यापार उत्तर व दक्षिण दोन्ही दिशांना दूरवर चालत असे. त्यावेळचें 'शूर्पारक' एकीकडे वसई-पर्यंत तर दुसरीकडे आजच्या आर्नाळ्यापर्यंत पसरलेलें असलें पाहिजे. वसईची खाडी आंत गेलेली असल्यामुळें लहानमोठीं गलबतें तऱ्हेतऱ्हेचा माल या वाटेनें शूर्पारकपर्यंत आणीत असत.

हें ठिकाण साधूंनीं प्रथम शोधलें व त्याला त्यांनीं तीर्थाचें पावित्र्य दिलें कीं, व्यापाऱ्यांनीं प्रथम शोध लावून त्याची बाजारपेठ बनविली याबद्दल सांगणें कठिण आहे. पण महाभारतांतील याचा उल्लेख मात्र एक तीर्थक्षेत्र असा आहे.

सम्राट् अशोकानें याच ठिकाणीं आपला एक शिलालेख खोदविला आहे. यावरून शूर्पारकाचें धार्मिक तसेंच व्यावहारिक महत्त्व सिद्ध होतें. सम्राट् अशोकानें अनेक ठिकाणीं शिलालेख खोदविले. आपल्या सद्-

भाग्यानें प्रत्येक ठिकाणीं ते सुस्थितींत आहेत. फक्त शूर्पारक येथील शिला-लेख वाचण्याच्या स्थितींत राहिलेला नाहीं. त्याचा नाश कुणी केला हें आज माहित नाहीं. पोर्तुगीजांनीं केला कीं दांडगेपणा करणाऱ्या खेड्यांतील पोरांनीं केला कोण जाणे ! आणि काळाचा प्रतिस्पर्धी असा जो महासागर त्यानें आपली खारी हवा फुंकून फुंकून त्याचा नाश केला नसेल हें तरी कोणी सांगावें ? मूळ कारणाचा शोध तरी कसा लागणार ? कोण सांगेल ? गांवें म्हणजे इतिहासाचे शत्रुच ! पोर्तुगीज आपलें वैभव व राज्यें गमावून बसलेलें व समुद्राला विचारूं म्हणावें तर कोणत्याहि प्रश्नांचें उत्तर तो एकच देणार !

सोपाऱ्याविषयीं जर कोठें थोडीशी माहिती उपलब्ध असेल तर ती म्हणजे प्लीनीच्या " पेरिप्लस ऑफ दी एरिथ्रियन सी " या सागरी पंचागांत ! ज्याला आपण पश्चिम समुद्र म्हणतों त्याला रोमन लोक ' एरिथ्रियन सी ' म्हणत असत. या समुद्राच्या कांठीं जितकीं बंदरें आहेत त्यांच्याविषयीं माहिती देणारें साठसत्तर कांडिकांचें एक पंचांग प्लीनीच्या वेळीं होतें. त्यांत सोपाऱ्याचें ' ओपारा' असें नांव दिलेलें आहे. सोपाऱ्याचा सुरती उच्चार ' होपारा 'आणि त्यावरून पंचाग-कारानें ' ओपारा ' बनविलें असेल. भृगुकच्छ ( भडोच ) आणि कल्याण यांच्यामध्यें हें बंदर असल्याचें त्यांत लिहिलें आहे. तळवसईचा उल्लेख फार उशीरा आला आहे. गुजरातचा नबाब बहादुरशहा यानें खाडीच्या तोंडाशीं असलेलें हें चांगलें स्थान पाहून आणि त्याचें आरमारी महत्त्व ओळखून येथें एक लहानसा किल्ला बांधला आणि किल्ल्याच्या बाहेर बहादुरपुरा नांवाची वस्ती वसविली. बहादुरशहाच्या कारकीर्दींत या ठिकाणाचें वैभव खूप वाढलें असेल. पण म्हणून त्याचा इतिहास कोण लिहून ठेवणार ! इतिहासांत महत्त्व कापाकापी व लूटमारी यांना. तें महत्त्व पोर्तुगीज लोकांनीं आणून दिलें. १५६४ मध्यें वसईचा किल्ला बहादुरशाहानें घेतला.

—२—

स्पेन आणि पोर्तुगाल आज लहान राज्यें बनलीं आहेत. परंतु एका काळीं त्यांची प्रतिष्ठा अलम दुनियेंत अग्रेसर होती. पोर्तुगीज लोकांनीं वसईचा

किल्ला हातीं येतांच त्याच्या आसपास एक मोठा विशाल किल्ला बांधला व त्याचा कोट थेट समुद्रापर्यंत नेऊन भिडविला. या देशांत पोर्तुगीजांनीं कांहीं कमी वैभव भोगलें नाहीं. व्यापार आणि मुलुखागिरीचाच केवळ यांना हव्यास नव्हता; मुसलमानांप्रमाणेंच यांचेंहि धार्मिक वेड ज्वलंत होतें. ते धर्म-प्रसाराला जीवनाचें मुख्य कर्तव्य मानीत. आणि त्यांतच वैभवाचें साफल्य समजत. वसईचा किल्ला तर सामान्य जनतेसाठीं नव्हताच. मोठमोठे अमीर उमराव तेथें राहून भोगविलास करीत. भव्य इमारती बांधण्यांत आणि शृंगारण्यांत त्यांची अहमहमिका सुरू असे. जहाजाच्या कप्तानाची हवेली मोठी कीं सेनापतीची मोठी याविषयीं वाद होत असत.

आणि अशा प्रकारच्या वैभवाच्याच वातावरणांत ख्रिस्ती संन्याशांचे भव्य मठ बांधलेले होते. येशु ख्रिस्त आणि मेरीच्या उज्ज्वल, भव्य मूर्ति, त्यांच्यासमोर असलेल्या दोन दोन हात उंचीच्या जळत्या मेणबत्त्या, पाद्यांचा नाटकी पण भव्य पोषाख, पूजेचा थाट, गंभीर आवाज आणि चोवीस तास अखंड चालणारा पूजेचा कार्यक्रम, या सगळ्यांचें स्मरण करतांच आज देखील त्या जमान्याची कल्पना होऊं शकते. गरीब प्रजेला लुटून आणलेल्या दौलतीचें हें प्रदर्शन, विलासी लोकांनीं दिलेल्या दानांतून बांधलेलीं हीं देवघरें (देवळें) आणि धर्मघरें (मठ), त्यांतून होणारी तपश्चर्या आणि पाळलें जाणारें ब्रह्मचर्य या सर्वांचा विचार करतां मानवी जीवनाची विचित्रताच समोर उभी राहते.

सन १९०९ मध्यें श्री. काका पाटील यांचे बरोबर एक वेळ वसईस गेलों होतों. त्यावेळीं तेथील किल्लाहि पाहिला होता. समुद्रकांठीं खाऱ्या पाण्यानें गंजलेलीं लोखंडाचीं कडीं व साखळ्या आणि मोडक्या देवळाच्या एकदोन कमानी पाहिल्याचें आठवतें.

आज ३१ वर्षांनंतर पुनः हा किल्ला पाहण्याचा योग आला. भाई तेंडुलकर विद्यार्थी–विद्यार्थिनींमध्यें राष्ट्रभाषेचा प्रचार करीत असतात. त्याचें निरीक्षण करण्यासाठीं गेलों होतों. मोटारींतून जाऊन किल्ला पाहून आलों. यावेळीं साऱ्या गोष्टी अधिक लक्ष घालून पाहिल्या. दुपारची वेळ होती. समुद्राच्या लाटा चांदीसारख्या चमकत होत्या. लहानमोठीं झोपा काढणारीं गलबतें दुपारची वामकुक्षी घेत होतीं. वारा त्यांना थोपटीत होता. तो जर थोडा अधिक जोरानें

वाहूं लागला असता तर सारीं गलबतें 'अरे, किती उशीर झाला!' असें म्हणून पळूं लागलीं असतीं. मोटारच्या रस्त्यानें आम्ही सगळा किल्ला पालथा घातला आणि समुद्रद्वाराजवळ गेलों. बंदर पूर्वीसारखें आकर्षक वाटलें नाहीं. आंत जाताच 'चिमाजी अप्पांनीं' बांधलेलें लहानसें हनुमान मंदिर दिसलें. इतकें लहान कीं, तें दोनशें वर्षांचें जुनें आहे याची कल्पनाच येत नाहीं. एक, दोन, तीन, गिरिजाघरें (चर्चेस) आम्ही नंतर पाहिलीं. प्रत्येक गिरिजाघराशेजारीं मोठमोठ्या कमानी असलेले खिस्ती मठ जुन्या शांतीचा भंग झाल्यानंतर नैसर्गिक शांति अनुभवीत असलेले दिसले. गिरिजाघरांचे दरवाजे आणि गोपुरें खूप उंच आणि भव्य आहेत. दगडांची कारागिरी आज देखील कलादृष्टीला तृप्त करते. टॉवरवर जाण्यासाठीं एक चक्राकार जिना आहे. तसा जिना आपण प्रत्येक मिनारामध्यें पाहतों. परंतु येथें त्याची खुमारी विशेष जाणवते. येथील जिना अगदीं कुतुबमिनारला शोभण्यासारखा आहे. बहादुरशहाचा जुना किल्ला हल्लीं बालेकिल्ल्यासारखा दिसतो. त्यांतच एक जुना तलाव आहे.

सर्वांत उत्कृष्ट कारागिरी जेसुअिट लोकांच्या सेंट पॉल चर्चची वाटली. परंतु भव्यतेच्या दृष्टीनें वसईच्या बाजूच्या मुख्य दरवाजाकडील फ्रॉन्सिस्कन अथवा ॲंथनी चर्च वरचढ होतें. या ठिकाणीं एक मोठें धर्मपीठ (थिऑलॉजिकल कॉलेज) होतें. विख्यात सेंट क्षेवियर केव्हां तरी या ठिकाणीं येऊन राहिला होता म्हणून या गिरिजाघरांचें पावित्र्य अधिक समजलें जातें. अगदीं खंडारें झालें असलें तरी या धर्मभुवनाची भव्यता कमी झालीशी वाटत नाहीं.

—२—

मंदिरें, मशिदी आणि गिरिजाघरें मला सारखींच पवित्र आणि आकर्षक वाटतात. कोसळलेलीं हीं गिरिजाघरें पाहून मला नेहमीं एकप्रकारचा संतोष वाटतो कीं याच्यामागें लाज वाटण्यासारखा हिंदु धर्मान्धतेचा इतिहास नाहीं. कोणत्याहि खिस्ती मित्राला बरोबर घेऊन या खिंडारांत फिरतांना माझ्या तोंडावर लज्जेचे भाव उमटणार नाहींत.

खिस्ती लोकांना आपल्या मंदिराची भव्यता राखतां येते. आणि आंतलें

वातावरण देखील ते भक्तिगंभीर असें निर्माण करूं शकतात. मुसलमानांच्या मशिदींत हजारों लोक एकाच वेळीं नमाज पढत असल्यामुळें तेथील जागा बरीच विस्तृत बनवावी लागते. आपल्याकडे सांघिक प्रार्थना नसल्यामुळें आणि पूजा देखील वैयक्तिक असल्यामुळें मंदिर कितीहि मोठें असो, आंत मोकळी जागा सांपडणार नाहीं आणि गर्दींहि पण असायचीच. पुजारी पुण्याचा बाजार मांडून बसतात. त्यामुळें वातावरण कोणत्याहि प्रकारें पवित्र किंवा पोषक बनत नाहीं. पंढरपूरला जा कीं द्वारकेला, डाकोराला जा कीं पुरीला, बनारस असो कीं गया—एवढेंच काय पण मदुरा आणि रामेश्वर यांसारखीं भव्यातिभव्य मंदिरें वातावरणाच्या दृष्टीनें अगदीं बाजारी असतात! तर मग अंबाजी आणि कामाख्याची गोष्टच कशाला?

वसईचीं गिरिजाघरें पाहतांच प्रथम स्मरण झालें मंगळूरच्या 'सेंट ॲल्यूशियस' च्या देवळाचें. नंतर लगेच लक्ष गेलें जुन्या गोव्याकडे. एके काळीं जुनें गोवें हें साऱ्या रोमन कॅथॉलिक लोकांचें आशियांतील मुख्य धर्म-पीठ होतें. सेंट झेवियरचें शव 'ममी' बनवून तेथें पुरून ठेवलें आहे. जेव्हां तें बाहेर काढून त्याचें प्रदर्शन करण्यांत येतें तेव्हां साऱ्या जगांतील कॅथॉलिक लोक तेथें लोटतात. एके काळीं जुन्या गोव्यानंतर वसईचा दुसरा नंबर लागत असावा. पण आज त्याचा अंश देखील राहिलेला नाहीं. चिमाजी आप्पांनीं पोर्तुगीजांकडून हा किल्ला जिंकून घेतला. उभय पक्षांच्या शौर्याचीं वर्णनें आज देखील ऐकावयास मिळतात. ३१वर्षांपूर्वी जेव्हां मी पहिल्यांदाच येथें आलों होतों, तेव्हां एका गृहस्थानें मोठ्या फुशारकीनें मला सांगितलें होतें कीं, पोर्तुगीज लोकांकडून हा किल्ला जिंकल्यानंतर चिमाजी अप्पांच्या लोकांनीं पोर्तुगीज मुलींचीं नाकें टोंचून त्यांना नथी घालावयास लावल्या आणि हिन्दु करून त्यांना आपल्या कुटुंबांत स्थान दिलें. मला ही गोष्ट खरी वाटत नाहीं. कारण आपल्या लोकांची ही वृत्ति नव्हे. खरें काय तें देव जाणे! प्राचीन रोमन इतिहास वाचणारा एकादा वाचक या गोष्टीचा जनक असावा. मी या गोष्टीचा उल्लेख एवढ्यासाठींच केला कीं, कांहीं लोक आपल्या पराक्रमाचें वर्णन करण्याच्या उत्साहांत स्वतःच इतिहास कसा

रचतात आणि त्यामुळें आपल्या जातीची सेवा घडण्याऐवजीं 'असेवाच' कशी होते याची वाचकांना कल्पना यावी.

—४—

वसईहून परतलों. मराठ्यांनीं ज्या ठिकाणीं पांढऱ्यावर काळें करून आपलें स्वातंत्र्य इंग्रजांच्या चरणीं वाहिलें तें ठिकाणहि पाहिलें. माझ्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. माझ्या नजरेसमोर वास्को–ड–गामाचा, आल्फांझो–द–अल्बुकर्क व सॅन् फ्रान्सिस झेविझरचाच काळ दिसत होता. त्यांनीं या देशावर कांहीं कमी हुकुमत गाजविली नाहीं. उभा पश्चिम किनारा त्यांचा होता. लूटमार करण्यांत आणि धर्मापायीं बळजबरी करण्यांत त्यांनीं कांहीं करावयाचें म्हणून ठेवलें नाहीं. तथापि आज देखील जुलूम वाढला म्हणजे आपल्या देशांतील गरीब लोक एकाद्या हिंदु राजाची किंवा हिन्दु देवाची प्रार्थना करण्याऐवजीं अल्बुकर्कच्या कबरेपाशीं जातात व त्याला प्रार्थितात कीं, आम्हांला यांतून सोडव; आमचा बचाव कर.

पोर्तुगीजांनीं येथें राज्य केलें, लोकांना लुटलें, पण आपला देश समृद्ध करण्यासाठीं हिन्दुस्तानचें रक्त शोषण करणाऱ्या जळवा बनण्याचें त्यांना सुचलें नाहीं. राज्यकर्त्यांची जात निराळी बनवून आपली श्रेष्ठता टिकविण्याची वृत्तिहि त्यांच्यांत नव्हती. त्यांना हा देश खिस्ती करावयाचा होता. मोठमोठ्या जाती, जमाती व सर्व समाज यांना जबरदस्तीनें खिस्ती केलें पाहिजे असें ते मानीत. त्यांचा हिशेब आणि अनुभव असा होता कीं आज जुलमानें खिस्ती झालेल्या लोकांची तिसरी पिढी खुशीनें खिस्ती बनते, उत्साहानें नवा धर्म मानते व त्याचा प्रसारहि करते. जबरदस्तीबरोबर धीर आणि दढता असेल तर ती सफल होते.

पोर्तुगीजांनीं पश्चिम किनाऱ्याची कोंकणी भाषा शिकून तिचें व्याकरण व कोश तयार केला. एकानें मराठींत खिस्ती पुराण लिहिलें. असेंहि म्हणतात कीं कोणी एका जेसुइटानें एका गुहेमध्यें पुष्कळ काळ घालवून आणि संन्याशाप्रमाणें राहून वेदांचें अध्ययन केलें आणि तसलाच पांचवा 'येसुवेद' रचला.

आज हें सगळें नष्ट झालेलें आहे. खुद्द पोर्तुगालमध्येंहि राजसत्तेचा

नाश झाला आहे. तेथल्या प्रजेनें धर्मसत्तेलाहि तिलांजलि दिली आहे. आणि इकडे वाटलेल्या भारतवासीयांचे वंशज मात्र भक्तिपूर्वक देवळात जातात व क्षमा मागून छातीवर क्रॉसचीं चिन्हें करतात; आपल्या उत्पन्नांत बचत करून नवीं देवळें बांधतात. तरीपण हे असे लोक आज देखील ४०० वर्षांनन्तर आपल्या खऱ्या कुलदेवतांना विसरलेले नाहींत. एकादशी किंवा शिवरात्रीच्या दिवशीं मंदिरांत जाऊन ते नवस करितात व प्रसाद मिळवून स्वतःला धन्य मानतात.

धर्म अनेक असतील पण धार्मिकता सर्वत्र सारखीच आहे. ही धार्मिकता जसजशी उदय पावेल तसतसे निरनिराळे धर्म वितळून जातील किंवा त्यांत माणुसकी येईल. धर्मांत जिथें माणुसकी नाहीं तिथें देव तरी कुठून येणार ? आसुरी त्वेषाच्या ठिकाणीं जर माणुसकी आढळेल तर मग शर्थच झाली म्हणायची.

## जुन्या महाराष्ट्राची पडकी राजधानी ६

—१—

पैठण म्हणजे महाराष्ट्राची वाराणशी; एके काळचें संस्कृत विद्येचें माहेरघर ! स्वधर्मीय राजाचें जेव्हां कृपाछत्र असतें तेव्हां समाजवृक्ष फळांफुलांनीं कसा बहरून येतो ह्याचें प्रत्यंतर शोधावयाचें झाल्यास इतिहाससंशोधक अजूनहि जुन्या ' प्रतिष्ठान ' चा इतिहास पहातात.

महाराष्ट्राच्या इतिहासाचा आरंभ शककर्ता शालीवाहन किंवा शातवाहन यापासून होतो. आज जसें गांधीजींविषयीं बोलतांना आम्ही म्हणतों कीं, गांधीनीं धुळींतून, मातींतून माणसें बनविलीं, प्रेतवत् पडलेल्या राष्ट्राचें संजीवन केलें, त्याचप्रमाणें शालीवाहनविषयीं म्हणतात. त्याच्यासंबंधीं अशी वदंता आहे कीं, त्यांचे जवळ संजीवनी विद्याच होती. माती भिजवून तो घोडे आणि घोडेस्वार करीत असे आणि त्यांना एका जीवनवापीमध्यें बुडवून सजीव करीत असे. आणि मग हे खरेखुरे झालेले घोडेस्वार

शत्रूशीं युद्ध करीत. पुतळे बनविण्याची कुंभाराची कला आणि त्यांच्यांत प्राण फुंकण्याची संजीवनी विद्या ही शालीवाहनाला माहित होती. त्यानें देशांत घुसलेली ग्रीकांची, यवनाची धाड परतविली. आणि स्वातंत्र्याची पुनः प्रतिष्ठापना केली. या शालीवाहनाच्या नांवाचा शक महाराष्ट्रांत अजून प्रचलित आहे. रेवा नदीच्या उत्तर तीरापलीकडे विक्रम संवत् आणि नर्मदेच्या दक्षिण तीराला खालीं शालीवाहन शक ही जुनी व्यवस्था आजहि पाळली जात आहे. अशा या शालीवाहन राजाची राजधानी प्रतिष्ठानीं होती. हेंच आजचें पैठण. देश-विदेशच्या पुष्कळ लोकांनीं या शहराच्या वैभवाबद्दल लिहिलेलें आढळून येतें.

गोदावरीचा किनारा अगोदरच सुपीक आणि पवित्र मानला जातो आणि त्यांतच नदीचें चांगलें वळण पाहून उंचशा भागीं पैठण वसविलें गेलें आहे.

जें ठिकाण राजधानी म्हणून उत्कर्ष पावलें होतें, तेथें विणकर, सोनार, गवई आणि पंडित जमा होणारच. त्यामुळें पैठण संस्कृतीचें मोठें केंद्र बनलें आणि सोपारा, भृगुकच्छ इ. पश्चिम किनाऱ्याच्या बंदरांतून त्याचा व्यापार चालूं लागला.

याच पैठण शहरीं संन्याशाचीं मुलें निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताबाई शुद्धिपत्र मिळविण्यासाठीं आणि मौजींबंधनाचा अधिकार मिळविण्यासाठीं आलीं होतीं. याच ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या मुखांतून वेद वदविला होता. आणि रेड्यासारख्या दशग्रंथी ब्राह्मणांचा माज, गर्वज्वर उतरविला होता. ब्राह्मणांनीं चकित होऊन त्यांना लिहून दिलें होतें कीं तुम्ही पवित्र आहांत, महान् आहांत, अलौकिक आहांत. परंतु मौंजीबंधनाचा आग्रह मात्र तुम्ही धरूं नका. नंतर त्या बहिणभावांनीं आचार आणि प्रचाराच्या मार्गांनीं धार्मिक जीवनाचा उद्धार केला, विस्तार केला आणि विकास देखील !

याच पैठणशहरीं धर्मात्मा एकनाथ स्वामींनीं आपला लीलाविस्तार सार्थ करून दाखविला. त्यांचा नातू म्हणजे कविश्रेष्ठ मुक्तेश्वर हे मराठीचे अद्वितीय असे कवि होऊन गेले. मराठी साहित्यांत सदाचाराचें सर्वोत्कृष्ट आणि सरस वर्णन वाचावयाचें असेल तर भागवताच्या एकादश स्कंदावरील एकनाथ

महाराजांची टीका वाचावी. आणि मराठीच्या काव्यगुणांचा उत्कर्ष पाहायचा असेल तर मुक्तेश्वराची कविता वाचावी. श्रीज्ञानदेवानंतर इतका मोठा कवि महाराष्ट्रांत झाला नाहीं असें म्हटल्यास हरकत नाहीं.

शिवादिन केसरीच्या कविताहि महाराष्ट्राच्या जिव्हाग्रीं आहेत. या शिवदिन-केसरीचा मठहि पैठणींच आहे.

आणि यांपैकीं कांहीं जरी नसतें तरी गोदावरीच्या तटीं वसलेल्या प्रतिष्ठानची पवित्रता तर होतीच आणि आहेच. तथापि प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास शोधला तर महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणांपेक्षां पैठणचें स्थानमाहात्म्य कमी नाहीं.

—२—

औरंगाबादेवरून पैठणला जाण्यासाठीं आम्हीं मोटारनें निघालों. दुपारचे दोन वाजले असतील त्यावेळीं. ३० मैलांचा हा प्रवास आम्ही दीड तासांत पुरा केला. स्टेशनवरून निघतांच एका लांबरुंद अशा पहाडानें आमच्याशीं गोष्टी सुरू केल्या. पुढचा रस्ता त्याच्या कडेनेंच होता. आणि म्हणून त्याच्या लांबीइतकीच त्याची रुंदीहि तितकीच मोठी आहे असें आमच्या ध्यानांत आलें. कदाचित् दोन पर्वतांचा हा समकोण झाला असेल. या बाजूची जमीन स्वभावतःच सुंदर आहे कीं पिकांचा मोसम असल्यामुळें सर्व दूर हिरवीगार आहे कोण जाणे! आणि हें जाणण्याच्या भानगडींत तरी कशाला पडा? जें दृष्टिसुख मिळेल तें घेऊन पुढें जाण्यांतच शहाणपण नाहीं काय?

पैठणजवळ पोंचतांच शहराबाहेर उजव्या बाजूला नदीकाठीं असलेल्या एकनाथ महाराजांच्या समाधीचें दर्शन झालें. त्या दिवशीं एकादशी होती व म्हणून वारकरी मंडळींचा समुदाय भगवा झेंडा घेऊन तिथें जमला होता. आम्हीं आंत गेलों. हृदयांत भक्ति घेऊन आंगणांत पाऊल घातलें. प्रवेश करतांना आम्हांला वाटलें कीं हरिजनांचें दुःख पाहून विरघळून जाणाऱ्या आणि एका अस्पृश्य मुलाला वाळवंटांतील दुपारच्या तापलेल्या वाळूंतून उचलून त्याला घरीं पोंचविणाऱ्या स्वामी एकनाथांच्या समाधीचें दर्शन घेऊन आम्हीं धन्य होऊं. पण आमचें दैवच उफराटें, तिथें अशी

पाटी लिहिलेली होती कीं हरिजन आणि म्लेंछ यांना आंत येण्याची मनाई आहे. आमच्या हृदयाला खूप यातना झाल्या. आंत प्रवेश न करतांच उलट्या पावलीं परत जावें असें वाटलें. पण मी संस्कृतीचा अभ्यासू ठरलों. भक्त या नात्यानें जरी नाहीं पण अभ्यासक म्हणून तरी मला सर्वत्र जायलाच हवें. मी आंत जो गेलों तो याच अभिनिवेशानें. माझा उत्साह पाहून तेथल्या पुजाऱ्यांना जरूर असें वाटलें असेल कीं, या भोळया भक्ताकडून कांहीं दक्षणा तर लाटूंच आणि दक्षणा जरी यानें दिली नाहीं तरी हा गद्गद् होऊन येथें लोटांगण तर घालीलच घालील. परंतु लोटांगण तर दूरच राहिलें, मीं नुसता नमस्कार पण केला नाहीं. मनोमन मात्र नुसती प्रार्थना केली कीं "नाथ महाराज ! अस्पृश्यता निवारण्याच्या ज्या धर्माचे तुम्ही प्रवर्तक झालांत, त्याचाच द्रोह करून मी आंत आलेला तुम्हांस दिसतोंच आहें. जिथें हरिजनांना बंदी आहे तिथें मलाहि प्रवेश नाहीं. म्हणून अशा या धर्मद्रोही अवस्थेंत मी पूजनाचा अधिकारी नाहीं. येथें मी जो आलों तो या इथें जमलेल्या पुष्कळशा भोळया भक्तांच्या दर्शनासाठीं. तसेंच या देवस्थानाचा कारभार कसा काय चालतो याची थोडी माहिती मिळविण्यासाठीं. कोर्टाच्या बेलिफाला किंवा शिपायाला जसें प्रत्येक ठिकाणीं जावें लागतें त्या भावनेनें मी इथें आलों आहें. मला क्षमा करा."

एकनाथांच्या द्वारीं हरिजनांना मज्जाव करणें म्हणजे नाथांच्या हृदयावर घाव घालण्यासारखें आहे, हें या सनातन्यांना कळत कसें नाहीं ?

आम्ही शहरांत गेलों. सर्व प्रथम नदीकिनारीं जाऊन गोदावरी मातेच्या शीतल जलांत पाय ठेवला आणि दाह शांत करून घेतला. घाटावर मांडी मारून गोदामाईचें ध्यान केलें. जीवनदर्शनाचें सुख अनुभवून आम्ही वर गेलों. एका बाजूला मातींत दबलेली जुनी वस्ती—आतां जी खणून काढली आहे ती—पाहून आलों. सिंधमध्यें "मूवन–जो–दडो" (मूवन=मृत, जो=ची, दडो=टेकडी) चा शोध लागल्यावर, बिहार पटन्याजवळ अशोकाच्या पाटलीपुत्र येथील राजवाडयाचा आणि काश्मीरची प्राचीन राजधानी जी अनंतपूर ही जमिनीच्या पोटांतून बाहेर काढल्यानंतर आतां हें असलें उत्खनन लोकांना जरुरीचें वाटूं लागलें आहे. पृथ्वीच्या पोटांत गडप झालेलीं प्राचीन स्मारकें खणून काढण्याचे प्रयत्न होत आहेत. पैठणची जुनी वस्ती

खोदून काढल्यानंतर ज्या वस्तू मिळाल्या त्या पुराणवस्तू संशोधन खात्यानें हैद्राबाद येथें नेलेल्या आहेत. त्यामुळें आम्हांला केवळ उत्खनन पाहूनच संतोष मानावा लागला.

पैठण शहरीं जुन्या काळच्या भव्य वाड्यांचे भग्नावशेष जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. त्या घरांची घडण, तिथलें लांकूडकाम, खोदकाम सगळें आकर्षक आणि अभ्यसनीय आहे. ऐश्वर्य म्हणजे काय आणि त्याचा विनाश झाल्यानंतर तें भग्नदृश्य कसें दिसतें याची कल्पना येण्यासाठीं तरी एकदां पैठणला जायला पाहिजे. "प्रतिष्ठान" हि शेवटीं "अप्रतिष्ठित" होऊं शकवें हें पाहूनच भगवान् बुद्धांनीं खालील उद्‌गार काढले असतील :—

"अनिच्या वत् संखारा उप्पादव्यय धम्मिनो"

जिथें जिथें मुसलमानांची राजवट अस्तित्वांत आली तिथें तिथें हिंदूंचीं मंदिरें आणि प्रासाद यांचा नाश दुर्दैवानें पाहावाच लागतो. शालिवाहन तर वीस शतकांच्या आरंभींच होऊन गेलेला. त्याचा राजवाडा मुसलमानांच्या हातीं पडण्याच्या अगोदरच पडून गेला असल्यास कांहीं मोठें नवल नाहीं. आणि पुण्यापासून ५० मैलांवर असलेल्या शिवराजाच्या जन्मभूमीचा जीर्णोद्धार करण्याचेंहि पेशव्यांना जिथें सुचूं शकलें नाहीं, तिथें शालीवाहनाच्या स्मृतीला कोणीहि उजळा दिला नाहीं ह्याबद्दल गाऱ्हाणें तरी कसें करणार ?

आम्ही शिवदिन केसरीची समाधि आणि कवि अमृतरायांचा मठ पाहून आलों. दोन्ही ठिकाणीं आमच्या पदरीं निराशाच पडली. शिवदिनकेसरीच्या मठाचें उत्पन्न पुष्कळ आहे. परंतु या मठांत आम्हांला त्या कवीचे हस्तलिखित किंवा छापील ग्रंथ मुळींच आढळले नाहींत. तिथें प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या पोथ्या तरी आहेत किंवा नाहीं यासंबंधीं आम्ही चौकशी केली तेव्हां आम्हांला समजलें कीं, कसली तरी एक पोथी कोणी भल्या माणसानें एका युरोपियन माणसाला तीन हजार रुपयांला विकली. पोथी कसली होती याबद्दल मात्र कोणाकडूनच कांहीं कळूं शकलें नाहीं. एका माणसानें कल्पना केली कीं त्या पोथींत शस्त्रास्त्रांची माहितीच असेल. माझ्या सनातनी मनानें चटकन् असा निर्णय घेतला कीं पोथी असेलच तर

शालीवाहनाच्या वेळचीच असली पाहिजे. कांहीं का असेना तीन हजार रुपये देऊन कोण्या तरी जर्मन माणसानें ती पोथी लाटली खरी. जर्मन पंडितांनीं तिचें भाषांतर केलें व हिटलरला दिलें. त्यांत जी माहिती दिलेली आहे तिच्या जोरावरच आज हिटलर प्राणघातक बॉंब बनवतो ! पॅराशूट-मधून आपलें सैन्य शत्रूच्या मुलुखांत उतरवितो. 'आर्योच्छिष्टं जगत् सर्वम् !'

ज्या प्रतिष्ठान शहरीं चौदा विद्यांचें आणि चौसष्ट कलांचें अध्ययन चालत असे, दशग्रंथी घोष चालू असे त्या ठिकाणीं महत्त्वाचे ग्रंथ मिळायलाच हवेत. सर्वच ब्राह्मण तीन हजार रुपयाच्या लालचेनें पोथी विकणाऱ्यांपैकीं नसतात. कांहीं धर्मनिष्ठ ब्राम्हणांनीं विचार केला कीं "आतां कलीचा संचार सुरू झाला आहे. धर्मभ्रष्ट लोकांच्या हातीं या पोथ्या पडल्यावांचून राहायच्या नाहींत. आमचें पवित्रतर धार्मिक साहित्य अनधिकारी लोकांच्या हातीं जाईल." हें संकट टळावें म्हणून त्यांनीं अगदीं चांगल्या चांगल्या पोथ्या गोदावरींत बुडवून टाकल्या आणि बुडता धर्म वांचविला. धर्मनिष्ठा ह्याचेंच नांव आहे ! प्राचीन ऋषींनीं जेव्हा :—'बिभेति अल्पश्रुतात् वेदो मा अयं प्रहरिष्यति' हें वचंन म्हटलें तेव्हां वरील प्रकारचा अर्थ – किंवा अनर्थ– त्यांच्या लक्षांत आला नसेल !

चौकशीअंतीं असें समजलें कीं आतां पैठण शहरीं विद्येची प्रतिष्ठा असलेला एक देखील ब्राम्हण राहिला नाहीं. गीतेचा अर्थ समजून ती वाचूं शकणारा एक ब्राम्हण शोधतां शोधतां काय आटापिटा करावा लागला याचें वर्णन करून एका महाशयांनीं आमची खात्री करून दिली कीं, आतां या ठिकाणीं धर्माची 'रक्षा' करणारेच फक्त राहिले आहेत.

परंतु पैठण शहरीं सौजन्यहि राहिलें नाहीं असा मात्र ग्रह करून घेऊं नये. मी किती तरी ठिकाणीं फिरलों आहें. प्रत्येक ठिकाणीं स्थानिक लोक माझें आगत स्वागत करतात. परंतु पैठणसारख्या तीर्थक्षेत्रींच्या मंदिरांत बसून जेव्हां मीं प्रवचन केलें व अस्पृश्यता निवारणाची अगदीं स्पष्ट भाषेंत चर्चा केली तेव्हां माझी अटकळ अशी कीं मला त्या ठिकाणीं मार जरी बसला नाहीं तरी कमींतकमी सभेंत गोंधळ तरी होईल. परंतु असें कांहींच झालें नाहीं. उलट लोकांनीं अगदीं शांतपणें आणि भलेपणानें माझें भाषण

ऐकून घेतलें आणि सभा संपल्यावर प्रश्नोत्तरें करून याविषयीं विचार करण्यासारखे मुद्दे उपस्थित केले.

शहरांत ज्या ठिकाणीं एकनाथ महाराज राहात होते तेथें एक देऊळ आहे. देवस्थानाच्या एका कोपऱ्यांत एक खोल विहीर आहे. वरून ती निरुंद असून आंत चांगली मोटी आहे. तिच्याबद्दल असें सांगतात कीं नाथ महाराजांच्या पुण्यतिथीच्या आठ पंधरा दिवस अगोदर लोक नदीचें पाणी घागरी घागरींनीं आणून विहिरींत रिचवितात. कितीहि पाणी टाकलें तरी विहीर भरत नाहीं. पण नाथषष्ठीचा दिवस आला कीं त्या दिवशीं मात्र एकदम विहीर भरून पाणी चमकूं लागतें आणि हजारों लोक जरी पाणी प्याले तरी पाणी कमी होत नाहीं.

याच देवळांत नाथ महाराजांच्या एका वंशजाची भेट झाली. त्यांच्याकडेच देवळाची मालकी असावी. त्यांचें धिप्पाड शरीर माझ्या डोळ्यांत भरलें. नाथांच्या समाधिस्थानीं अस्पृश्यांना प्रवेश नसल्यामुळे मला जें दुःख झालें होतें तें मी त्यांना सांगितलें. त्यांनीं सर्वार्थसाधक मौनानेंच माझ्यापासून स्वतःची सुटका करून घेतली.

आणि मी देखील पैठणचें विख्यात जरीचें काम पाहायला गेलों. आठ तास खपल्यावर ६ इंच रुंद काठ फार तर एखाद्या इंचानेंच वाढतो. सोन्याचांदीच्या दोऱ्यांनीं वेलबुट्टी, पोपट, मोर यांचें काठ हे विणकर लोक विणतात. येथें एक म्हण प्रचलित आहे. "ओटभर विणावें आणि पोटभर खावें."

येथली ही कारागिरी पाहून ह्या कलावंताबद्दल आपल्या मनांत अभिमान व दया दोन्हीहि एकदम उत्पन्न होतात. हे विणकर किती कौशल्यानें आणि शांततेनें विणतात आणि एकाहून एक सरस आकृति मुळींच चूक न करितां सजीव करीत जातात. पण इतक्या मेहनतीचें फळ त्यांना काय मिळतें? त्यांना बिचाऱ्यांना पैशाशीं काम. त्यांची ही कलाकुसर धुक्यासारख्या तलम आणि फुलासारख्या नाजुक साडीला कांठ म्हणून लावली जाते. मग ती साडी आपलें निरर्थक जीवन सुखांत किंवा दुःखांत घालविणारी एकादी अंतःपुरवासिनी राजकन्या नेसते. राणीवशातल्या तिच्या

क्र. ४९६९

सख्या त्या पातळाची प्रशंसा करतात आणि तिला जर विचारीला सवत असली तर ती मत्सरानें जळूं लागते.

आज कलेची जाहिरात जास्त होते पण कलाकृतीचा शोक मात्र समाजांत राहिला नाहीं. जर लोकांमध्यें कलेची कदर राहिली असती तर एकट्या गुजराथमध्यें दरवर्षी हजारों रुपयांचा माल येथून मागविला गेला असता. येथील कला अप्रतिम आहे याबद्दल शंकाच नाहीं पण ती आतां कालविसदृश झालेली आहे. गुजराथचे कारागिर येथला नमुना सहज उचलूं शकतात पण लोकांची अभिरुचि बदलली आहे त्याला काय करायचें?

बाळपणापासून पैठणबद्दल किती अद्भुत कथा मी वाचीत आलों होतों. त्यांतिल रस्त्यावरचीं किती तरी दृश्यें वेगवेगळ्या अवस्थेंत मी माझ्या कल्पनेनें उभविलीं होतीं. आणि आज अखेर ह्या वयांत पैठण पाहण्याचा योग आला. जुन्या वाड्यांचे भग्नावशेष आणि गोदावरीचा सजीव प्रवाह हें पाहिलें कीं जीवन आणि मृत्यु यांच्या विरोधाची आठवण येते.

या नगरीच्या जुन्या ऐश्वर्यासंबंधीं एक गोष्ट इथें आमच्या ऐकण्यांत आली. एक जुनी आख्यायिका म्हणून ती ग्रथित करण्याजोगी आहे. एकदां पेशव्यांची छावणी पैठणजवळ पडली होती. पैठणच्या एका व्यापाऱ्याला असें वाटलें कीं पेशव्यांच्या मुलीला हळद कुंकवाला बोलवावें. त्यानें आपल्या लहान मुलाकरवीं पेशव्यांकडे आमंत्रण दिलें. पेशव्यांनीं विचार केला कीं हा एक व्यापारी माझ्या मुलीला आपल्याकडे बोलावतो आणि स्वतः येऊन आमंत्रण न देतां आपल्या मुलाला पाठवितो. ह्याच्याजवळ अशी संपत्ति तरी किती असेल! तेव्हां पेशवे म्हणाले "आमच्या ह्या छावणीपासून तुमच्या घरांपर्यंत रस्ताभर रुपयांनीं भरलेल्या पिशव्या जर आंथरणार असाल तर माझी मुलगी तुमच्याकडे येईल. तिचा पाय जमिनीला मात्र लागतां कामा नये. हें कबूल असेल तर आमंत्रण द्या."

मुलगा बापाला विचारावयास आला. बापाला मुलाचा फार राग आला, आणि रागांतच तो म्हणाला, "येवढीशी गोष्ट विचारायला तूं परत कशाला आलास? तिथल्या तिथेंच तूं कबूल कां केलें नाहींस? बरें, अजूनहि हरकत नाहीं. पुन्हां जाऊन सांग कीं म्हणावें माझे वडील विचारतात, कीं वेगवेगळ्या छापाच्या रुपयांच्या थैल्या हव्यात कीं एकाच टाकसाळींतले सर्व

रुपये हवेत? एकाच टाकसाळींतले रुपये हवे असतील तर मला जरा थैल्यांची निवड करावी लागेल."

पेशव्यांनीं ताडलें कीं आसामी कांहीं सामान्य नव्हे. त्यांनीं आमंत्रणाचा स्वीकार केला.

ज्या थैल्या पेशव्यांच्या मुलीच्या पायाखालीं अंथरल्या गेल्या होत्या त्या घरांत आणल्या जाऊं नयेत म्हणून व्यापाऱ्यानें ते रुपये खर्च करून त्यांतून गोदावरीचा एक मोठा घाट बांधला आणि या प्रसंगाचें स्मारक केलें!

## गुरु गोविन्दसिंहाचा गुरुद्वारा ७

मराठ्यांच्या निःपातासाठीं ज्या वेळेस औरंगजेब बादशहा दक्षिणेंत येऊन आपला डेरा ठोकून बसला होता, त्याच वेळेस शिखांचे शेवटचे गुरु गोविन्दसिंह देखील महाराष्ट्रांतच औरंगाबादेजवळील नांदेडला एक गुरुद्वारा बनवून निवृत्तिपूर्ण आयुष्य व्यतीत करीत असावेत हा विलक्षण योगायोगच नव्हे का? देवगिरी (दौलताबाद), प्रतिष्ठान (पैठण), नंदागिरी (नांदेड) चा प्रदेश एके काळीं दक्षिणची राजधानी मानली जात होती. शिवाजी महाराजांचे आजोबा याच प्रदेशांत वसलेल्या वेरूळ या गांवचे पाटील होते. त्यांचे चिरंजीव शहाजी राजे अहमदनगरच्या दरबारांत राजपालकाच्या पदावर होते. आणि युवराजांना आपल्या कडेवर घेऊन सिंहासनीं बसून ते कारभार चालवीत. त्यांनीं आपला जहागिरीचा मुलूख दूर पुणें व जुन्नरच्या बाजूला ठेवला होता. आणि तिथेंच शिवाजी राजांनीं स्वराज्याच्या साधनेचा श्रीगणेशा केला होता. वसुदेव आणि देवकी मथुरेच्या दरबारीं असलीं तरी कृष्णाचें पालनपोषण वृंदावनींच व्हायचें आणि कंसवध झाल्यावर आपत्ती ओढविल्या तरी त्यानीं आपलें वास्तव्य दूर काटेवाडच्या शिखरावर 'Gate of India'—द्वारका वसवून करावयाचें.

मोंगल साम्राज्याविरुद्ध डोकें काढूं शकणाऱ्या तीन शक्ति त्या काळीं

होत्या—दक्षिणेंत मराठे, पंजाबच्या बाजूला शीख आणि या दोघांच्यामध्यें राणा प्रतापच्या नेतृत्वाखालीं आपल्या स्वातंत्र्यासाठीं झिजणारे रजपूत !

आरंभीं आरंभीं शीख संप्रदाय भक्तीचा संप्रदाय होता. परंतु मोंगल बादशहांनीं या गुरुभक्तांना मारून मारून वीर बनविलें. श्रीगुरु गोविंद-सिंगानें या भक्तामधून तळहातावर शीर घेऊन लढणारी एक खालसा फौज घडविली आणि निरुपद्रवी, अज्ञानी, पंजाबी जनतेला नरशार्दूल करून सोडलें.

पण यांत नवल तें कसलें ? औरंगजेबानें गुरु तेगबहादुरचा शिरच्छेद केला. गुरु गोविंदसिंगाच्या मुलांना मारविलें आणि अशाच रीतीनें शिखांना क्षात्रधर्माची दीक्षा दिली.

एका गोष्टीचें मात्र आश्चर्य वाटतें. गुरु गोविंदसिंगांचे पंजाबी शिष्य व समर्थ रामदासांचे महाराष्ट्रीय अनुयायी एक कसे होऊं शकले नाहींत ? महाराष्ट्रांत येऊन राहण्याचें गुरु गोविंदसिंगांना काय प्रयोजन ?

शिवाजीनें रजपुतांबरोबर संघटन करण्याचा प्रयत्न केला, याचा पुरावा सांपडतो. बुंदेलखंडाच्या छत्रसाल राजानें शिवाजीचा सल्ला घेतला होता, पेशव्यापासून कुमक घेतली होती याचाहि उल्लेख आहे. पण या सहाय्या-च्या मोबदल्यांत पहिल्या बाजीरावानें लागलींच वृद्ध छत्रसालाशीं बाप-लेकाचें नातें जोडून बुंदेलखंडाचें $\frac{1}{3}$ राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. त्या काळीं कुणी कुणाला निःस्वार्थ भावानें मदत करीतच नसत. देण्याघेण्या-चाच क्रम होता. महामति रामचंद्रपंत अमात्यासारखे प्रज्ञ देखील जहा-गिरीच्या लालसेपासून मुक्त नव्हते.

गुरु गोविंदसिंह दक्षिणदेशीं कां रहायला आले ? मोंगल बादशहाशीं त्यांचे संबंध कसे राहिले होते ? मराठ्यांशीं कसे होते ? याचीं उत्तरें शोधण्याचा यत्न केला जाणें जरूर आहे.

गुरु गोविंदसिंगाकडून लढाईत एकादा अफगाण ठार झाला असावा. त्या अफगाणाच्या मुलानें सूड घेण्याचा डाव मांडला. तो मुलगा गुरु गोविंदसिंगाजवळ आला आणि त्यानें त्यांची सेवाचाकरी आरंभिली. बाप युद्धांत मारला गेला यांत कांहीं वैयक्तिक द्वेषबुद्धि किंवा वैर असण्याचें कारण नाहीं. त्याच्या मुलाला जवळ करण्यांत काय हरकत आहे ? असें गुरु गोविंदसिंगानीं मनाशीं ठरविलें असावें आणि म्हणून त्यांनीं त्या

मुलाला आपल्याजवळ राहूं दिलें. मुलानें संधि साधली व निजलेल्या गोविंदसिंहाच्या पोटांत सुरा भोसकून सर्व गोष्टींचा निकाल लावला.

गुरु गोविंदसिंहानें क्षमेचा त्याग करून युद्धधर्माची दीक्षा घेतली होती. सबब घायाळ झाल्यावरहि त्यांनीं एकदम उठून त्या खुनी मुलाला लोळविलें व मग आपला देह टाकला.

आज नांदेड हें अखिल भारतांतील शिखांचें तीर्थस्थान झालें आहे. शीख येथील यात्रा करतात; व नांदेडच्या गुरुद्वाराजवळ आपल्या दानाचें नि भक्तीचें प्रदर्शन करतात.

सायंकाळच्या सभेनंतर आम्ही हा नांदेडचा गुरुद्वारा पहावयास गेलों. उशीर झाल्यामुळें आंतील दरवाजे बंद होऊन गेले होते. आमची फार निराशा झाली. रात्रीं दोन वाजतां नांदेडहून परतावयाचें होतें. इतक्या दूर आलों. पण देवळाचें दर्शन कांहीं झालें नाहीं. ‘तथापि देवळाच्या परकोटाच्या आंतली परिक्रमाच करून मग बाहेरची करावी व दिसेल तें बघावें’ असा विचार करून आम्ही पुढें होणार इतक्यांत अचानक विजेचा प्रवाह बंद पडला व चांदण्या रात्रींहि देवळाच्या आंतील मार्गी अमावास्या झाली. आमची अंतरप्रदक्षिणा अशाच स्थितींत आटोपली.

‘दहापंधरा मिनिटें थांबाल तर रात्रीच्या शेवटच्या प्रार्थनेसाठीं दारें उघडतील व तुम्हाला दर्शन घडूं शकेल’–असें कुणीतरी म्हणालें. आमची आंतली व बाहेरची प्रदक्षिणा संपली होती. गुरुद्वाराच्या स्थापत्यकलेचें आम्ही निरीक्षण केलें आणि दारें उघडतांच आंत शिरलों.

पट तर उघडले पण आंत काय दिसणार? कांहीं तरी आहे व त्यावर आमची दृष्टि स्थिर झालेली आहे एवढ्यावरच संतोष मानावा लागला. वेळ जात होता. लवकर परतायचें होतें म्हणून आम्ही निघणार तोंच विजेची आमच्यावर मेहेरनजर झाली व ती प्रगट झाली.

आतां आंतील दर्शन होण्यास कांहींच प्रत्यवाय नव्हता. गुरुद्वारच्या गाभाऱ्यांत मुख्य पुजारीच काय तो जाऊं शकतो. नियमान्वयें हा बालब्रह्मचारी असतो. चोवीस तासांत त्याला किती तरी वेळां पूजा करावी लागते. मध्यरात्रीनंतर सबंध मंदिर धुवावें लागतें. आंत जें जुन्या शस्त्रांचें आगर आहे त्याचीहि झाडपूस करावी लागते. इतर भक्तमंडळी गाभाऱ्याच्या

समोर असलेल्या मंडपापर्यंत जाऊं शकतात; आणि आमच्यासारखे ' इतरे-जन ' मंडपाच्या कडेस उभें राहून दर्शन घेऊं शकतात.

तेथून विजेच्या प्रवाहानें आंतील सर्व कांहीं दिसत होतें. समाधीवर दोहों बाजूंस अनेक तलवारी ठेवल्या आहेत. खालीं समाधीला टेकून गुरुगोविंद-सिंहांचें छाया चित्र ठेवलें आहे. त्यांत गुरु गोविंदसिंह राजवस्त्रें परिधान करून शस्त्रोद्यत असे अश्वारूढ झालेले दिसतात.

दर्शनाच्या वेळीं मनांत कोणकोणते भाव जागृत झाले हें सांगणें कठिण आहे. बिहारला गेलों होतों तेव्हां तेथें गुरु गोविंदसिंगाच्या जन्मस्थानीं अस-लेला गुरुद्वारा पाहिला होता. राजगृह-नालंदा येथें गेलों होतों त्यावेळींहि एक इतिहासप्रसिद्ध गुरुद्वारा बघितला होता. लाहोर येथें पांचवे बादशाह अर्जुनदेव यांचाहि गुरुद्वारा व त्या गुरुद्वाराची इंग्रजांनीं केलेली डागडुजी पहावयास मिळाली होती. अमृतसरचें प्रसिद्ध सुवर्णमंदिर तर शिखांची काशी किंवा मक्का आहे. त्याचें दर्शन दोनदां घडलें. फक्त नांदेडचा हा गुरुद्वारा पहावयाचा राहून गेला होता. या वेळेस तोहि पाहून कृतार्थ झालों. नानाकाना येथें जो गुरूचा बाग आहे आणि ज्याचें नांव सत्याग्रही शिखांनीं अजरामर करून ठेवलें आहे तो अजून पहावयाचा राहिला आहे.

नानक, अंगद, अर्जुनदेव, रामदास आदि शीख गुरूंनीं हिंदुस्तानांत प्रचलित असलेल्या प्राचीन भक्तिमार्गाचा उद्धार करून त्याला उज्ज्वल रूप दिलें. आणि जड व अज्ञ जनतेला उज्ज्वल धर्ममार्गाचे यात्रेकरू बनविलें. त्यांचा ग्रंथसाहेब म्हणजे हिंदुस्थानांत निर्माण झालेलें संतवाङ्मय आणि भक्तिवाङ्मय यांचें विशिष्ट रीतीनें काढलेलें सार आहे. धर्म आणि कर्म-कांडाच्या जंजाळांतून लोकांना वांचवून शुद्ध आचार व शुद्ध विचार यांच्या द्वारें ईश्वरपरायण बनविण्याची प्रवृत्ति म्हणजे शीखधर्म !

ईश्वरपरायण लोक रिकामटेकडे बनूं नयेत म्हणून शिखांच्या शेवटच्या गुरूनें त्यांना जीवाचें मोल देऊन आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याची दीक्षा दिली. त्यांच्या वेळेस जें जें करण्यासारखें होतें तें तें गुरु गोविंदसिंगांनीं केलें.

गुरुपरंपरा ही कोण्या एका कुळाची गादी नसून ती एक आध्यात्मिक परंपरा आहे. त्या परंपरेनें मानवस्वातंत्र्य संभाळलें गेलें पाहिजे. पण ही परंपरा कदाचित् एक बन्धनच न बनो, ही गोष्ट विचारांत घेऊन त्यांनीं

देह ठेवण्याच्या वेळीं असें जाहीर केलें कीं, 'ग्रंथसाहेबच शिखांना गुरु-स्थानीं आहे. यापुढें कोणत्याहि व्यक्तीला गुरु समजण्याची परवानगी नाहीं.'

मला असें प्रामाणिकपणें वाटतें कीं आध्यात्मिक क्षेत्रांत गुरु गोविंद-सिंहांनीं घातलेला हा पायंडा अपूर्व आणि अभिनंदनीय आहे. शुद्ध आध्यात्मिक वृत्तीवांचून असें पाऊल टाकण्याची कुणाचीहि हिम्मत झाली नसती.

## पुण्य तारा नगरी ८

पुण्याहून सिंहगड पाहाण्यांत कांहीं वैशिष्ट्य नाहीं. दक्षिणेकडे एक विशाल पर्वत व त्याच्या उजवीकडे काहीसें सपाट असें त्याचें उंच शिखर, एवढीच सिंहगडची कल्पना येते. किल्ल्याच्या डावीकडचा म्हणजे पूर्वे-कडचा भाग दबलेला व त्याची एक पायरी बनलेली. त्याच्या समोरच एका शिखरावर बटाट्यासारखा एक दगड आहे. फारच कल्पना चालविली तर म्हणतां येईल कीं महादेवासमोर ज्याप्रमाणें नंदी बसलेला असतो त्याप्रमाणें सिंहगडासमोर तो दगड बसलेला आहे.

परंतु सिंहगडावरून दिसणारें "पुण्याचें" दृश्य अनेक रीतींनीं आकर्षक आहे. 'मुठा' नदी उत्तरेकडलें संबंध खोरें धूत धूत पुढें जात असतें. "खडकवासल्याच्या" धरणामुळें तिचें कांहींच नुकसान झालेलें नाहीं. समृद्धशाली सरोवराप्रमाणें प्रसन्न चित्तानें ती चोहोंकडे संचार करते व तितक्याच सौम्यपणें आगे कूच करते. मूल घेतलेल्या एखाद्या मातेप्रमाणें पुण्याला कडेवर घेऊन 'मुळा' नदीला भेटायला तिला जायचें आहे. परंतु मीलनाची तिला घाई मुळींच नाहीं. संगमापाशीं 'मुळा–मुठा' भेटतात. कसलाच संभ्रम किंवा उन्माद दिसून येत नाहीं तेथें !

सिंहगडावरून पुणें सहज दिसूं शकतें. आणि दुर्बिणींतून तर अगदींच स्पष्ट दिसतें. पुणें शहर किती लांब रुंद आहे याची चांगली कल्पना इतक्या उंचीवरूनच होऊं शकते. 'पर्वती' आणि 'पर्णकुटी' एंजिनियरिंग कॉलेज' व 'शेतकी कॉलेज'—सगळें अगदीं स्पष्ट दिसतें. शपथेसाठीं

म्हणून तेथें ज्या एक दोन गिरण्या आहेत त्याहि अरसिकांसारख्या आपलें अस्तित्व भासवितात.

परंतु पुण्याचें खरें खरें दर्शन रात्रींच्या वेळीं घडतें. आकाश स्वच्छ असलें आणि चांदणें नसलें म्हणजे विजेचे असंख्य तारे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत चमचम चमकत असतात. मध्यरात्रीं उठून पाहिलें तरी ' पुण्याचे ' ते तारे झोंपत नाहींत. पहाटे उठून पहा, तीच स्थिति. पूर्वेकडे जेव्हां हंसत हंसत उषेचें आगमन होतें तव्हांच ते दिवे पुण्याला तिच्या हातात सोपवून विसावा घेतात. तोंपर्यंत ते " अविचल मंगल नत नयने अनिमेषे " प्रकाश देतच असतात.

सिंहगडावरून पुण्याचें तारानगर जेव्हां पाहतों तेव्हां तें किती शांत, प्रसन्न आणि पवित्र वाटतें. आवाज नाहीं, उत्पात नाहीं, धांदल नाहीं. फक्त विजेचे अगणित दिवे आपला सौम्य, मंगल प्रकाश अनंत आकाशांत फेंकत असतात. मेजावरील फुलदाणींत एकत्र झालेलीं फुलें जशीं सारखीं हंसतच असतात तसें विशाल अंधःकारांत हें दिव्यांचें संमेलन चमकत असतें. हे लक्षावधि प्रकाशबिंदु एकत्र होऊनहि रात्रींचा अंधःकार आणि रात्रीची शांति नष्ट करूं शकत नाहींत. निवांत प्रदेशांत वाऱ्याची एकादी झुळूक आसमंतांतील शांति जशी अधिक स्पष्ट, अधिक निबिड बनविते तसे हे दीपवृंद रात्रीच्या निवृत्तिलाच अधिक उत्कट करीत असतात.

पुण्याच्या रस्त्यावर जेव्हां आपण भटकतों तेव्हां हेच विजेचे दिवे आपल्या निर्लज्ज आत्मश्लाघेमुळें किती हास्यास्पद वाटतात ! तथापि इतक्या अंतरावरून हे दिवे मंदिरांतील दीपमालेप्रमाणें सौम्य आणि पवित्र भासतात. चहूंकडे पसरलेल्या ध्वांत सागरांत एक भलें मोठें जहाज नांगर टाकून पडलें आहे आणि वाटेल त्या क्षणीं पर्यटनाला निघण्याच्या तयारींत आहे असें दिसतें तें दृश्य !

त्यांतहि सगळे दिवे सारखे नाहींत. पुण्यांत ज्या प्रमाणांत संपत्ति उधळली आहे त्याच प्रमाणांत हे दिवेहि कमी अधिक प्रकाश पाडतात असें वाटल्या-वांचून रहात नाहीं.

स्टॉकलेच्या ज्योतिर्विषयक पुस्तकांत एक छायाचित्र आहे. त्यांत जगांतील सगळ्यांत मोठ्या वेधशाळेवरून 'पसादेना' ( Pasadena )

शहरांतील दिवे कसे दिसतात हें दाखविलें आहे. त्यांचेंहि पुण्याचे दिवे पाहिल्यावर स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं.

ह्या शांत प्रकाशाखालीं काय काय चालत असेल असा प्रश्न मनांत उठला आणि चित्त व्याकुळ झालें. पुण्यासारखी विराट नगरी. तेथें मौज शौक असणारच. हजार खटपटी असणार. एकाद्या ठिकाणीं खूनहि होत असेल; सट्टेबाज जुगार खेळत असतील; रेस्टारांमध्यें दारूच्या बाटल्या उडत असतील; विलासी लोक सिनेमांत 'धर्मात्मा' पाहून आपणहि स्वतः धर्मनिष्ठ आहोंत असें मानून घेण्याचा प्रयत्न करीत असतील आणि किती तरी विद्यार्थी झोपेचें खोबरें करून अरसिक चोंपड्यांतल्या काव्याच्या व्याख्या घोकत बसले असतील.

लाखाच्या वस्तींत एकादा धर्मात्मा नसेलच असें कसें म्हणावें? तो बिचाऱ्या गीतेंतल्या 'तस्यां जागर्ति संयमी 'प्रमाणें जागत राहून परमेश्वराचें ध्यान करीत असेल किंवा कळवळून प्रार्थना करीत असेल कीं, "दयाघन प्रभो मानव जातीचा इतका अधःपात शांतपणें तुला कसा पाहवतो? मनुष्याचा उद्धार करणें हें तुला कठिण कार्य वाटतें काय? इतके सगळे दिवे तुझी कृपा जाहिर करीत असतां त्यांतला एकहि किरण लोकांच्या हृदयापर्यंत कां बरें पोंहोंचूं नये!"

आणि यानंतर जेव्हां त्या दिव्यांकडे माझें लक्ष गेलें तेव्हां असेंच वाटूं लागलें कीं हा किरणांचा प्रकाश नसून त्या मानवप्रेमी भक्ताची प्रार्थनाच अंधारांत हृदयाला भेटण्याचा प्रयत्न करीत आहे.

गांधीजींनीं मला एकदां लिहिलें होतें कीं, "आकाशांतले असंख्य तारे असह्य रीतीनें धगधगत असोत परंतु इतक्या अंतरावर ते आपणांस अपार शांतीच देत असतात."

तेव्हां हेंच खरें कीं जगांतल्या प्रत्येक वस्तूचा विविध रीतीनें उपयोग होत असतो. सबंध पृथ्वीला वितळून टाकील इतकी गरम व लाखों मैल लांब अशी ज्वाला आकाशांत फेंकणारा सूर्य चंद्राकरवीं आपले किरण सौम्य बनवून पुष्करणींतल्या कुमुदांना हंसवितो. जी वस्तु भयानक दिसते तिच्यांतूनहि सौम्य आणि कल्याणदायी परिणाम होऊं शकत असतील तर!

एके ठिकाणीं अनुभव आला कीं तसलाच पूर्वी आलेला अनुभव ताजा

करणें आणि त्यांतील साहश्य शोधणें हा मनाचा स्वभावच आहे. पुण्याच्या ह्या रजनीदर्शनानें मुंबईच्या असल्याच एका दर्शनाची आठवण झाली. श्री. हिरालाल शाह बरोबर रात्रीचा मलबार हिलवर गेलों होतों. पितळेच्या पत्र्यावर खोदलेलें मुंबईचें चित्र जेथें आहे तेथून आम्ही मुंबईचे दिवे पाहिले. तें हश्य अद्‌भुत, भव्य आणि वैभवयुक्त वाटलें—पण काव्यमय वाटलें नाहीं. त्या विलासासमोर आपण अगदीं दबून गेलों आहोंत, उंच गेलों असलों तरी अपमानित झालों आहोंत असेंच वाटतें. मुंबईचा प्रकाश आकाशालाच निस्तेज करतो. बिचाऱ्या कावळ्यांनाहि अशी शंका वाटूं लागते कीं, ही रात्र कीं दिवस! एकादा कावळा दिवस आहे असें समजून आपला आलाप काढायला लागतो. परंतु त्यांतून आत्मविश्वासाचा निश्चित सूर निघत नाहीं. मुंबईत जिथून तिथून प्रकाशाचे झोतच निघत असतात. आणि लहानपणीं आग लागल्याचीं जीं दृश्यें पाहिलीं होतीं त्यांचें स्मरण होऊन कसेंसेंच वाटतें. त्यापेक्षां म्हैसूरच्या 'चामुंडा' टेकडीची अखंड दिवाळी पुरवते! 'चामुंडेची' चमकती किनार पाहून मनांत केवळ भक्तिभावच निर्माण होतो. त्या उत्सवांत आपण सामील झाल्यास भगवती कल्याण लक्ष्मी आपलें भलें करील ह्या श्रद्धेनें चित्त प्रसन्न होतें.

एके रात्रीं आम्ही चामुंडा टेकडीवर जाऊन मातेचें दर्शन घेतलें. वाटलें कीं इतके सगळे तारे कां बरें फेंकून दिले आहेत? कोहिनूरचा वंशवृक्ष कौटुंबिक संमेलन उजविण्यासाठीं येथें जागला आहे काय? टेकडीच्या दोहों बाजूंचें तमः-प्रकाशाचें तें सौंदर्य न्याहाळून व स्वतःला धन्य समजून आम्हीं परतलों. जीन्सच्या पुस्तकांत आकाशांत दूर दूर बसणाऱ्या ताऱ्यांचें वर्णन वाचलें होतें. आणि अनंत कोटी ब्रह्माण्डनायकाला उद्देशून आपल्या कवींनीं रचलेलीं स्तोत्रें लहानपणापासून तोंडपाठ केलीं होतीं. त्यामुळें ह्या सौंदर्याचा आनंद अनंत-पट वाढला होता. दुर्बिणींतून पाहिलेली वस्तु हजारपटीनें मोठी दिसते त्याप्रमाणें शास्त्रज्ञ आणि कवींच्या मदतीनें पाहिलेलीं दृश्यें अनुभवगंभीर, कल्पनाहढ आणि विशाल बनतात.

'चिकबल्लापूर' आणि 'दाड्डबल्लापूर' ह्या दोन खेड्यांत नवीनच प्रवेशिलेली वीज कशी चमकते तें नदीच्या टेकडीवरून पाहण्यासाठीं मी

तासन्तास बसत असें. तेथलें दर्शन निराळें आणि पुण्याचें निराळें. सिंहगड नदीपेक्षां अधिक उंच आहे ही गोष्ट खरी. पण सिंहगडावरून पुणें खूप दूर असल्यामुळें आपण अगदीं डोक्यावर उभें राहून पाहात आहोंत असें वाटत नाहीं.

सिंहगडावर शिवाजी महाराज आणि राजाराम राहात असतांनाच जर विजेनें पुण्यांत एकाएकीं प्रवेश केला असता तर त्यांना काय वाटलें असतें ? आपल्या राजधानीला आग लागली आहे, आतां ती कशी विझवावयाची ह्या विचारानें त्यांना धास्ती पडली असती का ?

पुष्कळ वेळां असाहि एक विचार मनांत येतो कीं, आपण इतकी वीज उत्पन्न करून वर्षभर दिवाळी साजरी करतों, त्याचा वातावरणावर, वनस्पति, सृष्टीवर, मनुष्याच्या आरोग्यावर आणि त्याच्या स्वभावावर कांहीं भयंकर परिणाम होत नसावा का ? आतषबाजीनें आणि तोफा डागल्यानें जर पाऊस पडूं शकतो; सूर्यावर डाग असल्यानें पीक नासून दुष्काळ पडूं शकतो तर इतक्या मोठ्या प्रमाणांवर वीज निर्माण झाल्यामुळें जगावर परिणाम हा घडत असलाच पाहिजे. त्यामुळें माणसामाणसांना एकमेकांची भीति वाटत असावी आणि त्यांतूनच युद्धें निर्माण होत असावींत.

पुण्यासारखीं कितीतरी शहरें रात्रभर सारखीं चमकत असतात तीं जगांत मोठी क्रांति निर्माण करतात. मनुष्यस्वभावांत दिवसेंदिवस फरक पडत चालला आहे त्याचें कारण जितकें आर्थिक परिस्थिति हें आहे तितकेंच किंवा त्याहूनहि अधिक अद्याप संशोधित न झालेलीं भौतिक कारणेंहि असूं शकतील.

ह्या विचारमालिकेंत मी जों गर्क होऊन गेलों आहे त्याचें कारण पुण्याचे हे दिवेच आहेत.

# एकाकी अश्वत्थ* ९

त्या चंद्राकार टेकडीच्या अंकावर तो वटवृक्ष किती उठून दिसतो! टेकडीच्या दोन्ही टोंकावर मनुष्यवस्ती असावी असें वाटतें. तेथें दगडाचें रुंद कुंपण बनविलेलें आहे. आंत उंच आणि विशाल वृक्ष आहेत. वरपर्यंत जाण्यासाठीं शांत गंभीर पायऱ्या आहेत. वर एखाद्या लक्ष्मीपुत्रानें एकांतासाठीं बांधलेलीं निवासस्थानें असावींत; अथवा शोकीन साधूंचे आखाडे असावेत असें वाटतें. पण याऐवजीं समजा मंदिर निघालें तर वर जाऊन तेथली घंटा वाजविल्याशिवायच रहावयाचें का? खालून वरचीं तीं ठिकाणें जर इतकीं सुंदर दिसतात तर वरून खालची शोभा किती रमणीय दिसत असेल!

टेकडीच्या उर्वरित भागावर एकहि झाड दिसत नसल्यामुळें कुंपणाच्या आंतील झाडें हेतुपूर्वक लावून वाढविलेलीं आहेत हें सिद्धच आहे.

आणि पायथ्याशीं देखील तो एक वटवृक्ष सोडल्यास इतर झुडपेंहि असतील किंवा नाहीं शंकाच आहे. मग काय तो वटवृक्ष कोणी लाविलेलाच असेल? जाऊन पाहायला हवें; पण शेती तुडवीत इतक्या दूर जाणार कोण? पाय म्हणतात, आम्ही जाणार! डोळे म्हणतात, त्या भव्य वटमूर्तीचें दर्शन जवळ जाऊनच घेतलें पाहिजे! हात म्हणतात, त्या स्थविराची लांब दाढी पकडल्यावांचून चैन पडणार नाहीं आम्हांला. अखेर मन कबूल झालें आणि जाण्याचा निश्चय ठरला. भाई अशोक आणि मी. आम्ही भराभर निघालों. अशोकानें माहिती दिली, 'अहो! त्या टेंकडीवर ज्याला तुम्ही निवासस्थानें म्हणतां तो म्हणजे पारशांचा टॉवर ऑफ सायलेन्स आहे.' मनांत चटकन् प्रकाश पडला. तें निवृत्तिस्थान आहे खरें पण शोकीनांचें नव्हे; थकलेल्यांचें शेवटल्या घडीचें! त्याला अंतिम स्वात्मार्पणाचें स्थान कां म्हणूं नये? जपलेलें शरीर निर्जीव झाल्यावर आपण जाळून टाकतों, पुरून टाकतों.

---

* पुण्याजवळच्या टेकडीवरील पारशांचें स्मशान— "टॉवर ऑफ सायलेन्स."

त्यापेक्षां पारशांसारखे जटायूच्या जातिबांधवांना तें अर्पण करणें काय वाईट ? जिवंतपणीं सेवा आणि मृत्यूनंतरहि सेवा हा आदर्श किती छान !

आम्ही रस्ता भराभर पायांखालीं घालूं लागलों. पायांखालीं शुभ्र आणि हिरव्या दगडांचे लहान लहान तुकडे इतस्ततः विखुरलेले असल्यामुळें भूमि आकर्षक वाटत होती. एखाद्या ठिकाणीं वाटायचें कीं हिरव्या खड्यांचें सम्मेलनच भरलें आहे. कित्येक ठिकाणीं चमचम करणारे दगड तर प्रसन्न बालकांच्या डोळ्यांप्रमाणें वाटत. पुढें निघालों. वटवृक्ष आतां अधिक मोठा दिसूं लागला. त्याच्या शेजारीं एक लहानशी विहीर होती. कुणी खणली असावी ही विहीर ? वाडी किंवा बाग बनविण्यासाठीं जर ती खणली गेली असती तर ती इतकी लहान बनविली नसती. प्रेत-यात्रेंत आलेल्या लोकांना विश्रांति घेऊन हातपाय धुण्यासाठीं कदाचित् ती बनविली असावी. हें स्थान हिंदूंचें असतें तर असेंहि म्हणतां आलें असतें कीं, प्रेतयात्रेबरोबर आलेल्या मंडळींच्या स्नानासाठीं ती सोय असावी. कसेंहि का असेना या विश्रामस्थानाभोंवतीं इतकी नीरव शांतता आहे कीं माणूस केवढाहि उद्विग्न झालेला असो, त्याला येथें शांतिच लाभायची !

एकाच मंत्राचें चिंतन, जप केल्यानें त्या मंत्रांत संकल्पसिद्धि यावी त्याप्रमाणें या वटवृक्षाखालीं केवळ स्मशानयात्रीच येतात म्हणून इथलें सगळें वातावरण मृत्यु म्हणजे काय याचेंच चिंतन करीत असतें. पूर्ण-विराम एक वाक्य संपवून दुसऱ्या वाक्याची सुरुवात करून देतो त्याचप्रमाणें मृत्यु देखील एका आयुष्याचा अंत करून नव्या जीवनाची प्रस्तावना करतो. माणूस वर्तमानकाळाकडे पाहतो, कवी आणि पैगंबर भविष्यकाळा-कडे पाहतात, पण सर्वगामी, सर्वंकष मृत्यु मात्र त्रिकालदर्शी आहे. हा अश्वत्थ या मृत्यूचें आसन म्हणून येथें विराजमान आहे. किती पवित्र आहे त्याची भूमिका ! किती उदात्त ! त्याच्या पारंब्यांचें गांभीर्य तरी किती ! याच्या फांद्याफांद्यावरून किती तरी पक्षी बसले आहेत. पक्षी म्हणजे प्रभा-तींचा कल्लोळ. पण ते देखील स्थानवैशिष्ट्य जाणतात असें वाटतें. किती जपून, किती दबत दबत, त्यांची किलबिल चालते येथें !

जर अशोक मजबरोबर नसता तर या वटवृक्षाच्या बुंध्याला आलिंगन दिल्याशिवाय माझ्यानें राहवलें नसतें. हिमालयामध्यें ही वृत्ति मीं संपादन

केल्यानंतर वृक्ष माझे स्वजन, प्रियजन झाले आहेत. त्यांचा आकार व त्यांच्या सालीवरील सुरकुत्या पाहून मी त्यांच्या सुखदुःखाशीं समरस होऊं शकतों. परत फिरतांना वडाच्या पारंब्या ज्या मी हातांत घेतल्या त्या निरोपाचें हस्तांदोलन म्हणून, त्या स्थविराचा अनादर करावा म्हणून खचित नव्हे ! हा वटवृक्ष माझ्या स्मरणमालेंत स्थान पावला आहे. कारण जीवन आणि मृत्यू या दोघांचाहि प्रतिनिधि असा हा अश्वत्थ आहे !

## कर्नाटक १०

तसा तर कित्येक प्रांतांविषयीं मी उदासीन असतों. पुढें त्या प्रान्तांतून जेव्हां जावें लागतें आणि तेथल्या लोकांत मिसळण्याचा प्रसंग येतो तेव्हां ती उदासीनता नाहींशी होते. तथापि कित्येक प्रान्तांविषयीं तेथें गेलों काय नी न गेलों काय मनांत प्रेमाचा उमाळा येतोच. यांपैकीं कर्नाटक एक प्रांत आहे. त्या प्रान्ताचा कांहीं अपराध नसतां त्याचे तुकडे पडले आहेत. यामुळेंहि कदाचित् माझ्या हृदयांत त्याला विशेष स्थान मिळालें असावें. तेथले लोक आपल्या लाभहानीचा फारसा विचार न करतां आपल्या आवडी-नावडीला वश होऊन जातात, हें एक किंवा तेथलें प्राकृतिक दृश्य विशेष काव्यमय आहे हेंहि कदाचित् माझ्या अनुकूल ग्रहाचें कारण असावें. कांहींहि असो. कर्नाटकाविषयीं नेहमीं माझ्या मनांत वत्सलभाव वसतो.

तसें पाहतां कर्नाटकाचे कांहीं स्वाभाविक तुकडे पडतात. पश्चिमगिरी-खालचा कानड्याचा प्रदेश मुळांतच निराळा आहे. तेथल्या निसर्गाचा स्वभाव देखील निराळा आणि माणसांचाहि निराळा. लोकांच्या स्वभावाचें वळण मुंबईकडे, कोंकणाकडे आणि केरळ प्रान्ताकडे विशेष आहे. आणि जर सामुद्रिक वाहतुकीचा धंदा वाढेल तर काठेवाड ते कन्याकुमारीपर्यंतचा सारा प्रदेश सहज एक होऊं शकेल. परंतु निसर्गापेक्षां भाषा अधिक प्रभावशाली असते. केवळ भाषेमुळेंच कुर्ग जणूं एक स्वतंत्रच भूमिभाग आहे असें वाटतें. आणि राज्यव्यवस्थेमुळें म्हैसूर देखील एक स्वतंत्र प्रांत आहे, पण जेव्हां आपण

तटस्थपणें विचार करतों तेव्हां जेथें जेथें कन्नड भाषा बोलली जाते तो तो सारा प्रदेश एक झाला पाहिजे असें मानण्याकडे कल होतो. कर्नाटकाची संस्कृति शेजारच्या प्रान्तांच्या संस्कृतीपेक्षां विशेष भिन्न आहे असें नाहीं. दक्षिण महाराष्ट्राच्या, कर्नाटकाच्या व तामीळनाडच्या लोकांची राहणी, करणी, राग, द्वेष आणि चेहरे देखील सारखेच वाटतात. कन्नड साहित्यांतलि कांहीं प्रकार मराठीहून निराळे आहेत. कर्नाटकी संगीतांत देखिल हृदयाला जागृत करण्याचें जास्त कसब आहे हें खरें. पण येवढ्यावरूनच सगळी संस्कृति निराळी आहे असें म्हणतां येणार नाहीं. तरीहि मला असें वाटतें कीं जे लोक एकच भाषा बोलतात त्यांचें जीवन स्वाभाविकरीत्या एक होतें. भाषेमुळेंच आपलेपणा उत्पन्न होतो.

कर्नाटकांत राहणारे लोक एका जातीचे आहेत असें नाहीं. एक भाषा असूनहि धर्मामुळें, जातीमुळें आणि राज्यतंत्रामुळें जीवन एक होऊं शकत नाहीं. ही तिन्ही तत्त्वें दाबून टाकून जेव्हां लोकांचें सामाजिक जीवन एकाच प्रवाहांत वाहविण्याची शक्ति उत्पन्न होईल तेव्हांच कन्नड भाषा बोलणारे लोक एकजीव होतील.

हिंदुस्थानांत लहान लहान राज्यें आणि लहान लहान जातींमुळें प्राचीन काळापासून एक संकुचित वृत्ति रूढ झाली आहे. जातिभेदाबरोबर भिन्न भिन्न जातींतलि द्वेषहि फार जुन्या काळापासून आपल्या देशांत चालत आला आहे. बिचाऱ्या राजा भर्तृहरीनें कळवळून म्हटलें आहे कीं, जेथें जाती आहेत तेथें समाजाला जाळण्यासाठीं दुसऱ्या अग्नीची जरूरीच नाहीं– " ज्ञातिश्चेत् अनलेन किम् " याच संकुचितपणामुळें प्रांतीय भेदाबरोबर प्रान्ताप्रान्तांतलि द्वेषाचें वातावरणहि आपोआप तयार होतें.

आपले तुकडे झाल्याबद्दल कर्नाटक दुःखी आहे. सबंध कर्नाटक जोंपर्यंत एक होत नाहीं तोंपर्यंत तो चिडलेला असणें स्वाभाविक आहे. जर त्यानें शेजारच्या प्रान्तांना दुखविलें तर त्याबद्दल त्याला क्षमा केली पाहिजे.

केवळ न्यायासाठीं देखील कर्नाटकाचें एकीकरण तावडतोब झालें पाहिजे. परंतु देशाकडून तसें करून घेण्यासाठीं सबंध कर्नाटकाचें सार्वजनिक जीवन अखंड आणि समृद्ध झालें पाहिजे. अखिल कर्नाटक ज्यांत समाविष्ट होऊं शकेल अशा अनेक संस्था तेथें निर्माण झाल्या पाहिजेत.

कोणतीहि शुभकामना सिद्ध करावयाची तर त्यासाठीं अधिकाधिक लोकांचे आशीर्वाद मिळाल्यास, चांगलें आणि हें कर्म जर " सर्वेषाम् अविरोधेन" होत असेल तर मग सर्वोत्तम !

कर्नाटकाच्या सरहद्दीवरील अमुक तालुके कर्नाटकांत मोडावे कीं मोडूं नये याविषयीं शेजारच्या प्रान्तांत मतभेद असतील, परन्तु कर्नाटकाच्या एकीकरणाविषयीं कोठेंच मतभेद नाहीं; कोणाचाहि विरोध नाहीं.

मंगळूर आणि बल्लारी हे दोन जिल्हे सोडून दिल्यास मद्रास प्रान्ताला कांहींच दुःख होणार नाहीं. कर्नाटक जर महाराष्ट्रापासून वेगळा झाला तर महाराष्ट्रीयांना कांहींच दुःख वाटणार नाहीं, निजाम राज्यांतील कानडी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या वाटणीबद्दल थोडीशी अडचण भासेल खरी. म्हैसूर राज्यांत तर सगळे कन्नड भाषा बोलतात. त्यामुळें कर्नाटकाच्या एकीकरणापासून म्हैसूरच्या लोकांचें नुकसान तर होणार नाहीं उलट फायदाच होईल.

कुर्गसारखा लहानसा टापू कर्नाटकांत मिळावा हें योग्य आहे. परन्तु हें जबरदस्तीनें होतां कामा नये. कुर्गच्या लोकांना जेव्हां वाटेल तेव्हां त्यांनीं मिसळून जावें अशी भूमिका तयार करून ठेविली पाहिजे. खालसा कर्नाटक, म्हैसूरी कर्नाटक, कुर्ग आणि निजाम राज्याचे कन्नड जिल्हे हे चार स्वतंत्र विभाग एक होणार नाहींत तोंपर्यंत कर्नाटकाचें एकीकरण झालें असें म्हणतां येणार नाहीं.

अनेक वेळां निरनिराळ्या कारणांमुळें जवळजवळ सबंध कर्नाटक मीं फिरलों आहें. आतां आतां धारवाड जिल्ह्यांत हिंडलों. त्यापूर्वीं मंगळूर आणि कारकळच्या आसपासचा प्रदेश पाहिला. म्हैसुरांतहि घाईघाईनें तीनचार वेळां गेलों आहें. बेळगांव धारवाड—धारवाडांत तर माझें बालपण गेलें ! बल्लारी-कडे फारसा फिरलों नाहीं. तरी हॉस्पेट हम्पीकडे जाऊन विजयनगरच्या साम्राज्याचे भग्नावशेष भग्न हृदयानें पाहिले आहेत. निजामी—कर्नाटक पाहिला आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं मला !

पूर्ण स्वराज्य स्थापन होईल आणि देशी संस्थानांचा प्रश्न सुटेल तेव्हांच कर्नाटकाचें संपूर्ण एकीकरण होईल. तोंपर्यंत कर्नाटकाला आंतरिक संघटना-

वाढविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. भाषा आणि साहित्यविकासाच्या बाबतींत म्हैसूर राज्य आणि त्यांचें विश्वविद्यालय कर्नाटकाचें पुढारीपण करूं शकेल.

हे कर्नाटकाविषयींचे माझे सामान्य विचार झाले. परंतु मला हा लेख कांहीं राजकीय उद्देशानें लिहावयाचा नाहीं. मला तर म्हैसूरराज्यांतील प्रवासाचा अहवाल द्यावयाचा आहे.

* * *

आम्ही पुण्यावरून तारीख ४ जुलै १९३९ रोजीं रात्रीं निघालों. महाराष्ट्रांत झोंपलों आणि कर्नाटकांत जागे झालों. त्यामुळें आमचा खरा प्रवास ५ जुलैपासून सुरू झाला असें म्हणतां येईल. बेळगांवला उतरावेंसें फार वाटत होतें. परंतु वेळेच्या अभावीं तसें करूं शकलों नाहीं. नऊ वाजतां धारवाडला पोंचलों आणि कर्नाटकच्या वातावरणांत मिसळून गेल्याचा आनंद झाला. बिहारप्रमाणें कर्नाटकचे लोक दिसण्यांत सौम्य आहेत. जेथें मतभेद असतील तेथें चर्चेच्या आखाड्यांत उतरण्यापेक्षां गोड गोड गोष्टी बोलून जर आपला मतभेद दर्शविण्याचें टाळतां येईल, तर तसा प्रयत्न ते जरूर करतील. पण याचा अर्थ असा नव्हे कीं कर्नाटकचे लोक भित्रे आहेत. त्यांचें सौजन्य किंवा त्यांची दूरदृष्टि आपला मतभेद स्पष्ट करण्यापासून त्यांना परावृत्त करते. मी तर कर्नाटकाचाच आहें. भाषेची थोडीशी अडचण वाटते, तरीहि मी त्या लोकांत सहज मिसळूं शकतों.

पुष्कळ वर्षांनीं धारवाडला आल्यामुळें लहानपणचीं संस्मरणें ताजीं झालीं. १८९९ चे दिवस असावे. धारवाडला आम्ही लाईन–बाजारांत राहात होतों. सरकारी हायस्कुलांत इंग्रजी चवथींत होतों. त्या वर्गाचें शिक्षण आणि तेथलें वातावरण यांच्या आठवणी फार चांगल्या नाहींत. माझा एक भाऊ तेथें प्लेगनें वारला. सरकारी नियमाप्रमाणें आम्हांला प्लेग कॅम्पमध्यें जाऊन रहावें लागलें. तेथीलहि वातावरणाची तुलना तुरुंगाशीं करतां येणार नाहीं. नरक उत्पन्न करण्याची जी शक्ति ईश्वरानें माणसाच्या हातीं दिली आहे, तिचा उपयोग तेथें बरोबर करण्यांत आला होता. नंतर आम्ही शहराबाहेर झोंपडी बांधून राहिलों. त्यावेळीं पाण्यासाठीं विहीरीविहिरीवर रखडावें लागत असे. ती याद येतांच आज देखील थोडक्यांत बचावलों असे भाव मनांत उठतात.

तरीहि धारवाडविषयींचें खोल प्रेम त्या वेळेपासूनच निर्माण झालें आहे. तेथली स्वच्छ, उंच-सखल जमीन, जेथें तेथें छाया पसरविणारे उंच उंच वृक्ष, कानाकोपऱ्यांत चमकणारे लहान लहान तलाव, लाटांचें अनुकरण करणारी शहराबोहरची उंचसखल भूमि, मोत्याच्या दाण्यासारखी बाजरी, मलईदार दूध, हत्तीसारख्या म्हशी आणि राक्षसासारखें काम करणारे तेथले महार आणि वडुर हे सारे त्या वेळेपासूनच माझे आवडते बनले आहेत.

यावेळीं धारवाडला आलों तें तेथली वर्धायोजना पाहण्यासाठीं. वर्धा योजनेचे शिक्षक तयार करण्यासाठीं मुंबई सरकारतर्फे धारवाडला एक केंद्र चालतें. श्री. तट्टी त्याचे मुख्य संचालक आहेत. धारवाड म्युनिसिपालटीतर्फें शहराच्या हद्दींतील एका गांवांत एक प्राथमिक शाळा चालते. ती शाळा नगरपालिकेनें शिक्षणानुभव घेण्यासाठीं वर्धा केंद्राला सोंपविली आहे. हीं दोन्ही केंद्रें आम्हीं पाहून आलों. परंतु आज पाहण्यासारखें असें नरेंद्र नांवाचें एक जुन्या खेड्यांतलें केंद्र. तेथें श्री. मुधोळकर आणि त्यांचे इतर मित्र एकत्र जमून त्यांनीं जवळ जवळ २५ शिक्षकांचें एक केंद्र तीन साडेतीन महिने चालविलें. तेथला उत्साह, तेथली प्रगति आणि राष्ट्रोद्धाराचें वातावरण पाहून आम्हांला खूप संतोष वाटला. बंगाल, महाराष्ट्र वगैरे प्रान्त आपापल्या संगीताच्या बाबतींत प्रसिद्ध आहेतच; तसाच कर्नाटकहि संगीताविषयीं प्रसिद्ध आहे. परंतु सामान्य समारंभांतहि मुलें मुली जेव्हां गातात तेव्हां कोणत्याहि प्रान्तापेक्षां कर्नाटकांत रागताल अधिक संभाळला जातो असें मला वाटतें. त्यामुळें संगीत कर्णकटु होत नाहीं. धारवाडांत आढळांत आलेली आणखी विशेष गोष्ट म्हणजे कानडी वक्ते लांब लांब भाषणें करून वेळ घेत नाहींत.

धारवाडचें काम आटोपून आम्ही हुबळीला गेलों. रस्त्यांतलें सामान्य दृश्य रमणीय होतें. आसपासची जमीन सपाटहि नाहीं आणि डोंगराळहि नाहीं. त्यामुळें दूर दूर पर्यंत शेती आणि बगीचे, झाडें आणि तलाव स्वच्छ सुंदर दिसतात, आणि लाल दगड तर इतके सुंदर असतात कीं, पुन्हां मुलें बनून त्यांनीं खिसे भरावे आणि ते कोवळे दगड तोंडांत टाकून चावावे असें वाटतें. हे दगड आहेतच इतके नाजुक !

माझ्या लहानपणीं धारवाड हुबळीच्या लोकांना फुलांचा फारसा छंद नव्हता. आज पहावें तर प्रत्येक बंगल्याच्या सभोंवार चांगलीं चांगलीं

फुलझाडें दिसतात आणि सृष्टिदेवी देखील विलकुल कार्पण्य न दाखवितां लोक मागतील तीं फुलें देत असते.

हुबळीहून बंगळूरचा रस्ता म्हणजे एक झोंप ताणण्याचा प्रवास. रस्त्यांत स्टेशनें येतात नि जातात. कानडीचे निरनिराळे शब्द कानावर पडतात. परंतु ते अर्धजागृति आणि स्वप्नसृष्टींत विलीन होऊन जातात. आल्मोऱ्याचें 'षष्टिखात' असें एक प्राचीन नांव आहे. कारण त्या प्रदेशांत साठ तलाव आहेत. म्हैसूर आणि कर्नाटकला 'लक्षखात' म्हणावें असें मला वाटतें. येथें जिकडे पहाल तिकडे वांकडी तिकडीं परंतु सज्जनांच्या हृदयासारखीं पारदर्शक तळीं सांपडायचींच. पाऊस पडला कीं इतकें पाणी लाल होतें कीं साऱ्या हिंदुस्थाननें संन्यासदीक्षा घेण्याचा निर्णय घेतला तर येथें त्यांचीं वस्त्रें भगवीं बनवितां यावींत!

धारवाड हुबळीप्रमाणें बंगळूरची माती देखील लाल आहे. त्यामुळें तेथील पुष्कळशा लहान मोठ्या घरांना लाल रंग देतात. पांढरा रंग दिला तर त्याच्यावर लाल माती बसून तो बिघडायचा म्हणून उघड उघड लाल रंग देण्यांतच शहाणपण असल्याचें लोकांना सुचलें असावें.

## सोन्याची खाण ११

आपण सोन्याची खाण पाहण्यासाठीं पृथ्वीच्या पोटांत जाणार आहोंत या विचारानें १९२७ सालीं जी उत्सुकता व रोमांचित करणारी भावना मनांत उठली होती ती पुनः उठणें शक्य नाहीं. अंडें एकच वेळ फुटूं शकतें तसें अज्ञानाचें काव्य एक वेळच अनुभवतां येतें.

गुजराथेंत महापुरानें हाहाकार मचला होता, आणि त्याच वेळीं जीवनाच्या कित्येक असाधारण प्रश्नांनीं माझ्या हृदयांत थैमान माजविलें म्हणून मी बोर्डीहून गांधीजींना भेटण्यासाठीं बंगळूरला आलों होतों. गांधीजींची प्रकृति चांगली नव्हती. कारावासाच्या यात्रेचीं सहा वर्षे पूर्ण होतांच आपली जीवनयात्राहि पूर्ण होणार आहे असा जरा विचित्रच विचार घेऊन बापू

बसले होते. तें दुःख बऱ्याच जणांना वाटत होतें. तशा स्थितींत व्यग्र चित्तानें आम्ही म्हैसूरची सफर करीत होतों. त्याच वेळीं देवदास गांधींच्या उत्साहामुळें आम्ही प्रथमच कोलारच्या सोन्याच्या खाणी पाहावयास गेलों. नंतर दुसऱ्यांदा गेलों ते १९३६ सालीं. गांधीजी वल्लभभाईसह नंदीच्या टेकडीवर राहिले होते. उन्हाळा संपत आला होता. नंदीवर शक्य तितकें अधिक रहावें आणि थंड हवेचा भरपूर फायदा घ्यावा या निश्चयानें आम्ही तेथें राहिलों होतों. शेवटीं जेव्हां नंदीवर वादळें व्हावयाला लागलीं आणि विजांमुळें घरातील दिव्यांचे गोळे फुटूं लागले तेव्हां आम्ही खालीं उतरलों. बंगळूरला जाण्यापूर्वीं 'हाऊक' नांवाच्या सोन्याच्या खाणी पाहून आम्ही आगे कूच केलें. त्यावेळीं आमच्या बरोबर दुसऱ्या अनोळखी बंधुभगिनी होत्या. प्रवासी मेळ्यांत जेव्हां अनोळखी लोक बरोबर असतात तेव्हां प्रवासाचा अर्धा आनंद विरून जातो.

यावेळीं आम्ही पूर्वीप्रमाणें सात हजार फूट खोल गेलों नव्हतों. आणि खालीं घेऊन जाणारी आमची खोली किंवा पाळणे पूर्वींच्या इतक्या वेगानें उतरतहि नव्हते. परंतु एक विशेष लाभ झाला. दगडाच्या भुग्यांतून एक वेळ सोनें धुऊन काढल्यानंतर त्याच धुळींत राहिलेलें सोनें सायनाइडच्या प्रयोगानें प्रवाही बनविण्याची कृति मी यावेळीं चांगल्या रीतीनें समजून घेतली.

सोन्याची खाण पहाण्याची अलिकडची माझी ही तिसरी खेप. बरोबर चि. सरोज नसती तर पृथ्वीच्या पोटांतून ही पिवळी चमकदार माती ओढून काढण्याचा हा वेडेपणा पाहण्यासाठीं एक दिवस मीं खर्च केला नसता.

प्रथम पाहतांनाच एक विशेष आनंद वाटतो. त्यापेक्षां कमी प्रतीचा परंतु जवळ जवळ तितकाच आनंद त्या वस्तूचा नवा अनुभव करणारी एकादी व्यक्ति बरोबर असल्यास मनुष्याला मिळूं शकतो. आपलें ज्ञान, आपली माहिती आणि अनुभव प्रकट करण्याची जेव्हां मनुष्यास संधि मिळते त्यावेळचा त्याचा आनंद कांहीं कमी नसतो. नवीन माणसाच्या उत्सुकतेंत भागीदार होण्यांत देखील स्वतंत्र आनंद मिळत असतो, कारण त्यामुळें जुन्या अनुभवाचें शिळेपण पुष्कळ अंशीं नाहींसें होतें.

पहिल्यांदा आम्ही आगगाडींतून गेलों होतों. यावेळीं बंगळूरहून मोटारनें

सोन्याच्या खाणींपर्यंत जाऊन त्याच दिवशीं परत आलों. ६० मैलांचा रस्ता आहे, परंतु आम्ही तर जातां येतां मिळून जवळ अवळ १५० मैलांचें अंतर कापलें.

'अिष्टैः सह भुज्यताम्!' या न्यायानें आमचे यजमान श्रीनिवासराव यांना आपल्या लहान मुलीला आमच्या बरोबर पाठविण्याविषयीं मीं सुचविलें. मग न्याय म्हणून तिच्या भावाला बरोबर घ्यावें लागलें. आणि दोघांबरोबर दया म्हणून किंवा कमिशन म्हणून धाकट्या ललितेला आम्हीं बरोबर घेतलें. अशा प्रकारें कानडी भाषा बोलणारीं तीन मुलें बरोबर असल्यामुळें मीं त्यांच्याशीं गप्पा मारून आपलें कानडी भाषेचें भंडार उजळलें. वाटेंतील दगडांच्या टेकड्यांनीं **हाम्पीच्या मातंग पर्वताची** आठवण दिली. आकाशांतील ढगांनीं 'नंदिदुर्गचें' स्मरण करविलें आणि रस्त्यालगतच्या लांब लांब तलावांनीं 'इंद्रायणी' नदीचें सौंदर्य दाखविलें. याप्रमाणें स्मरणांच्या भारानें भारावून आम्ही सोन्याच्या खाणीपाशीं पोहोंचलों. जिकडे तिकडे बांबूच्या टोपलींत आगपेटी खोंचून टोपली डोक्यावर घेतलेले व हातांत कार्बाइडचें कणिस घेऊन इकडे तिकडे फिरणारे मजूर नजरेस पडले.

सोन्याच्या खाणीचे सरकारी कमिशनर श्री. डोरायस्वामी यांना आम्ही अल्पसायासांनीं शोधून काढलें. त्यांच्या बरोबर 'कोलरचे' मारवाडी शेट श्री भैरवलालजी पण होते. दोघांनाहि बंगळूरहून आमच्या विषयीं तार गेलेली असल्यामुळें ते आमची वाट पहात होते. माझ्या जेवणाविषयीं चार-दोन सूचना दिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. त्या देऊन आम्ही खाणी पाहावयास निघालों.

येथली जवळ जवळ २५ मैलांची भूमि सोन्याच्या दगडांनीं भरलेली आहे, असें भूस्तर विद्येच्या तज्ज्ञांनीं निदान केलें आहे. त्यापैकीं सुमारें चार मैल जमीन खोदण्याचें काम चाललें आहे, "ही एक खाण आतां संपत आली" असें या लोकांनीं म्हणावें कीं ताबडतोब खाणींतून त्याच्याहि-पेक्षां चांगले दगड निघायचे. येथल्या खाणी सबंध जगांत सर्वांत खोल सम-जल्या जातात. हे लोक जवळजवळ आठ हजार फूट खोल गेले आहेत. आंत उतरण्याच्या मुख्य विवराला इंग्रजींत शॅफ्ट म्हणतात. या शाफ्टमधून पाळण्यांत बसून लोक खालीं उतरतात. प्रत्येक वेळीं ३५+३५=७० माणसें

पाळण्यांत भरून खालीं पाठविण्यांत येतात. एका पाळण्याच्या दोरीला दुसरे पाळणे अडकविले असल्यामुळें एक खालीं जातांच दुसरा वर येतो, आणि प्रत्येक पाळण्यांत वरचा आणि खालचा असे दोन मजले असल्यामुळें प्रत्येक वेळीं १४० लोकांचे जीव या विजेच्या यंत्राच्या हातांत असतात. दोन पाळणे समोरासमोर ठेवल्यानें जोखीम बरीच कमी होते आणि पाळण्याचा वेग ताब्यांत ठेवतां येतो.

ह्या खाणींत काम करणाऱ्या वीस पंचवीस हजार मजुरांपैकीं १२-१५ हजार मजूर पृथ्वीच्या पोटांत अहिरावण-महिरावणासारखें काम करीत असतात. त्यांना आंत जाण्यास मिनिटभर जरी उशीर झाला तरी शेंकडों रुपयांचें नुकसान होत असल्यामुळें विजेच्या वेगानें मजुरांना आंत नेतांना आणि बाहेर पोंचवितांना मानवी बुद्धीचा चांगलाच उपयोग करण्यांत आला आहे. कोणत्याहि प्रकारें अपघात होऊं नये म्हणून इतक्या युक्त्या येथें योजण्यांत आल्या आहेत कीं मानवी जीवनाची किंमत येथें सर्वांत जास्त मानली जाते याविषयीं खात्री पटते. हजारों रुपयांचें नुकसान झालें तरी हरकत नाहीं, परंतु एकाहि मनुष्याचें जीवित धोक्यांत राहूं नये हें येथलें सूत्रवाक्य आहे. परंतु दर सेकंडास दोनचार लोकांना तरी अपघात होतोच. ह्या वर्षीं म्हणजे गेल्या कांहीं महिन्यांतच खालीं पृथ्वीच्या पोटांत उतरत असतांना तीस चाळीस जण वर स्वर्गीं पोहोंचल्याचें दोरायस्वामींनीं सांगितलें. आम्हीं जेव्हां दुःख प्रदर्शित केलें तेव्हां ते म्हणाले,

"पृष्ठभागांतलि मोकळ्या हवेंत जीवन जितकें धोक्याचें असतें तितकें आंत नसतें. आंत जर दोन टक्के धोका म्हणायचा तर तुमच्या वरच्या दुनियेंत चार टक्के समजायला कांहीं हरकत नाहीं. आगगाडीखालीं किंवा मोटारखालीं सांपडून लोक मरतात, बोटी बुडतात, घरें कोसळतात-हीं संकटें काय कमी आहेत ? या दृष्टीनें आंतला धोका पुष्कळच कमी आहे. भूकंपाचें भय जितकें पृष्ठभागावर आहे तितकें आंत नाहीं. वर तर घरें कोसळून ढीग होतात. तसला कांहीं प्रकार आंत नाहीं."

खरें पाहतां बाहेर येण्यास मनुष्यानें घाबरलें पाहिजे. कारण बाहेर तो कमी सुरक्षित असतो. जन्मभर बोटींत वावरणारे लोक जमिनीवर चाल,

तांना घाबरतात आणि आपणांस कमी सुरक्षित मानतात. असें मी कोठेंतरी वाचल्याचें आठवतें.

वर पाहण्यालायक सर्व गोष्टी आधीं पाहून घेऊं, असें श्री. दोराय-स्वामींनीं सुचविलें. सोबतच्या मुलांनाहि त्यांत मौज वाटेल. मग आंत उतरूं. कायद्याप्रमाणें लहान मुलांना आंत नेऊं देत नाहींत हें मला माहित होतें, म्हणून मी जयम्मा, चंद्रशेखर व छोटी ललिता यांना हें सगळें समजावून देऊन त्यांनीं आंत येण्याचा हट्ट धरून रडूं नये ह्या अटीवरच सोबत आणलें होतें. आंत उतरतांना प्रत्येकाला लिहून द्यावें लागतें कीं आपण आपल्या जबाबदारीवर आंत जात आहों. आणि कांहीं अपघात झाला तर त्याची जोखीम आपणांवरच, कंपनी किंवा सरकारवर नाहीं. असें लिहून देण्याच्या वयाचे जे नसतात त्यांना आंत घेऊन जाण्याची मनाई आहे. कांहीं लोक असें लिहून देतांक्षणींच गंभीर बनतांना मीं पाहिले आहेत. जणूं काय आपण एकादें वीरकर्म केलें आहे. लष्करांत भरती होतांनाहि माणसाला अशाच प्रकारच्या बहादुरीचा अनुभव येत असावा.

पहिल्या प्रथम खाणींतून बाहेर येणाऱ्या दगडांपासून आम्हीं सुरुवात केली. खाणींतून येणारे दगड मोठमोठ्या त्रिकोणी घमेल्यांतून वर येतात. ह्या घमेल्यांना ट्रॉलीसारखीं चाकें असल्यामुळें तीं खाणींत नेणेंहि सोपें जातें. वर आणलेल्या घमेल्यांच्या गाड्या ओढण्याचें काम बैल करतात. अगोदर हें विजेच्या यंत्रानें होत असे. परंतु विजेपेक्षां नंदीश्वरांची मेहनत स्वस्त पडूं लागल्यामुळें उदार अंतःकरणानें हें काम त्यांच्याकडेच सोंपविण्यांत आलें आहे. प्रत्येक घमेल्यांत चार चार टन दगड भरलेले असतात. त्यांतून फार फार तर दोन तोळे सोनें निघतें. म्हणजे ( त्यावेळच्या किंमतीनें ) सुमारें पन्नास रुपयांचें.

दगड वर आले कीं सोनें नसलेले काळे दगड वेंचून फेंकून देण्याचें काम अगोदर सुरू होतें. हे सगळे दगड कुटल्यास खर्च फार होईल. म्हणून त्यांना वेंचून काढून बाकीचे दगड दळायला पाठविणें अधिक सोईस्कर असें मानवानें ठरविलें. यासाठीं लोखंडाचें एक मोठें वलयाकार टेबल गरगर फिरत असतें. त्यावर हे दगड येऊन पडतात आणि मजूर त्यांतून वेंचत जातात. पांढऱ्या दगडांतच सोनें असतें, म्हणून ते

ठेवण्यांत येतात. हे 'कुबेर-दगड' पुनः 'भगाऱ्यांत' भरून कारखान्यांत पोहोंचविले जातात. तेथें सर्वांत आधीं त्यांचें सामाजिक जीवन सुरू होतें. एका मोठ्या यंत्राच्या तोंडांत ते भरडले जातात आणि त्यांचे बारीक बारीक तुकडे होतात. हे तुकडे एका राक्षसी सिलिंडर पेल्यांत ओतले जातात. तेथें त्यांचें एकमेकाशीं घर्षण होऊन अमुक इतक्या प्रमाणांत ते गुळगुळीत बनतात. चेष्टेखोर लोकांच्या संगतीनें चिडखोर माणसें ठिकाणावर येतात तीच गत ह्या दगडांची होते. भलेपणा मिळवला कीं सुटलों असें जगांत नाहींच नाहीं. भले आहेत म्हणूनच ते कुटले जातात.

ही कुटण्याची क्रिया पाहून दया येते. प्रत्येक उखळांत चार चार अवाढव्य मुसळें सारखीं कुटीतच असतात. आणि जसजशीं कुटतात तसतशीं आपणांभोंवतीं गोल फिरत असतात—जणूं 'चक्रं भ्रमति मस्तके!' दगड कुटून कुटून हीं मुसळें त्यांचा इतका भुगा बनवितात कीं त्या बारीक रेतीला पाण्याशीं मिसळून प्रवाही बनण्यास वेळ लागत नाहीं.

आतां ह्या प्रवाही रेतींतून सोन्याचे कण गाळून घ्यावयाचेंच काम फक्त बाकी राहतें. प्राचीनकाळीं मेंढ्या बकऱ्यांना मारून व त्यांचीं केसाळ कातडीं पसरवून त्यावरून हें रेतीमय पाणी वहाविण्यांत येत असे. सोन्याचे कण जड असल्यामुळें चामड्याच्या केसांत अडकून रहात व बाकीची रेती पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जाई. दोरायस्वामींनीं सांगितलें कीं ग्रीक लोककथांतून 'गोल्डन फ्लीस'चा जो उल्लेख आहे त्याचें कारण हेंच आहे. (फ्लीस म्हणजे केसाळ चामडें) त्याच्या रंगावरून त्याला हें नांव मिळालें असावें असें मला वाटतें. एकाद्या कारणाप्रमाणें तें सोन्याचे कण पकडून ठेवतें. येवढ्यावरूनच त्याला असें नांव मिळालें आहे हें आम्हांला समजलें.

हल्लीं ह्या केसाळ चामड्याऐवजीं लोंकरीचीं कांबळीं वापरलीं जातात. त्यांत जे सोन्याचे कण अडकतात ते एका चौकोनी तपेल्यांत झाडले जातात. आणि नंतर त्या तपेल्यांतलें पाणी एका तांब्याच्या पत्र्यावरून वहाविण्यांत येतें. तांब्याच्या पत्र्याला पाऱ्याचा थर दिलेला असल्यामुळें त्याला सोन्या-चांदीच्या तुकड्यांची भूक लागलेली असते. सोन्याचे कण असलेलें पाणी त्याच्यावरून वाहूं लागलें कीं, पारा हे कण पकडून घेतो. नंतर हा सगळा

पारा एकत्र करून गरम करतात. त्यामुळें पारा निराळा आणि सोनें निराळें होतें. पोटांतून पारा निघून गेल्यामुळें सोन्याचे कण शेवाळासारखे बनतात. हें शेवाळ पुनः वितळवून त्यांचा रस बनविण्यांत येतो आणि नंतर त्याच्या विटा बनवून मुंबईस पाठविण्यांत येतात. खाणींतून निघालेल्या दगडांचें वजन करूनच ते कारखान्यांत पाठविण्यांत येतात. ह्या वजनांवरून एकंदर किती सोनें उतरेल ह्याचा अंदाज काढण्यांत येतो. बहुतेक हा अंदाज बरोबर निघतो. पण जरा कुठें जास्त फरक पडला तर मग काय विचारतां? सबंध कारखान्यांत हाहाकार उडतो आणि कोठें चूक झाली, कुठें चोरी झाली ह्या सगळ्यांचा तपास करण्यांत येतो. कारखान्यांत फिरता फिरतां दोराय-स्वामी म्हणाले कीं, येथें प्रत्येक मनुष्य फक्त आपणा स्वतःला सावकार समजतो आणि बाकी सर्वांची चोराप्रमाणें झडती घेण्यांत येते. सोन्याची खाण न पाहतांच शंकराचार्यांनीं लिहिलें होतें कीं,

'पुत्रात् अपि धनभाजां भीतिः'

दगडाच्या पोटांतून सोनें काढून घेतल्यानंतर बाकीचा भुगा कचरा म्हणून फेंकून देण्यांत येतो. त्याच्या मोठमोठ्या टेकड्या चहूंकडे दृष्टीस पडतात. ही रेती ना सिमेंट बनविण्याच्या कामीं येत कीं कांच बनविण्याच्या. म्हणून बिचारी ही वाळू आपला उपयोग शोधून काढील अशा भविष्य-कालीन मनुष्याची वाट पहात शिळा बनलेल्या अहिल्येप्रमाणें तपश्चर्या करीत येथें पडली आहे!

ह्या रेतींतून केवळ ९८ टक्केच सोनें आपण काढूं शकलों आहोंत, असा मानवानें पुनः एक शोध लाविला. दोन टक्के सोनें कांबळ्याच्या चाळणींतून सुटून जाऊन रेतींतच वाहून जातें. मनुष्य सोन्याचा दास बनेल पण सोन्याकडून स्वतःस अशा प्रकारें फसवून घेणार नाहीं. त्यानें हा रेतीचा ढीग पुनः पाण्यांत भिजवून त्यांत सायनाईड टाकून सोनें प्रवाही बनविलें आणि अशा रीतीनें रेतींतून सोनें काढून घेतलें. हें पाणी नंतर फिल्टर करून जस्ताच्या पातळ चाळणींवर ओतण्यांत येतें. कमजात सायनाईडचा जस्ताशीं संयोग होतांच तें सोन्याला सोडून देऊन जस्ताला चिकटतें. आणि अशा प्रकारें सोन्याचा काळा ढीग निराळा तयार होतो. सायनाईड म्हणतें, 'तुम्हांला जस्ताची खुबी काय माहित? त्याच्यासमोर सोन्याचा सहवास काय!' खरोखर

'तत् तस्य किमपि द्रव्यं योहि यस्य प्रियो जनः।'

सोनें महाग व जस्त स्वस्त असें मनुष्यानेंच ठरविलें आहे ना? गाईला मानवी बालकांपेक्षां आपलीं वासरें चाटण्यांतच अधिक संतोष वाटतो.

हें सायनाईडनें टाकून दिलेलें सोनें गरम केल्यावर 'सुवर्ण' झालेलें पाहून कष्टाळू माणसाच्या आनंदाला सीमा रहात नाहीं. पाऱ्याच्या मदतीनें जेव्हां सोनें एकत्र करण्यांत येतें तेव्हां त्यांत सोन्याबरोबर चांदीहि मिसळते. पारा कितीहि गुणग्राही असला तरी तो थोडासा "कलर ब्लाइंड" (वर्णांध) आहे. सोनें कोणतें, 'रजत' कोणतें हा विवेक त्याला नसतो. यामुळें येथल्या खाणींत तयार झालेल्या सोन्यात सुमारें दहा टक्के चांदी असते. ती निराळी करण्याचें काम मात्र येथें होत नाहीं.

शनिवार असल्यामुळें आम्हीं सोन्याचें दर्शन घेऊं शकलों नाहीं. पहिल्या वेळीं जेव्हां आम्हीं गेलों होतों तेव्हां आम्हांला एक वीट पहावयास मिळाली होती. एका विटेची किंमत लाख सव्वा लाख रुपये होती. विटांच्या तिजो-रीला दोन कुलुपें होतीं. प्रत्येक कुलुपाची किल्ली निरनिराळ्या दोन गोऱ्या अधिकाऱ्यांकडे होती. हे दोन अंमलदार जेव्हां आपापल्या कचेरींतून आले तेव्हां कोठें तिजोरी उघडली आणि आंतली एक वीट टेबलावर ठेवण्यांत आली. मुख्य व्यवस्थापकानें आम्हांला आव्हान दिलें कीं,

"एका हातानें तुम्ही ही वीट उचलूं शकलां तर आम्हीं ती तुम्हांला बक्षीस देऊं."

सगळ्यांनीं प्रयत्न केला. परंतु कोणालाच यश आलें नाहीं. दोन्ही हातांनीं उचलणें देखील सोपें नव्हतें. आम्हीं दुसऱ्यांदा गेलों तेव्हां याहिपेक्षां अधिक आकर्षक दृश्य आम्हांला पाहतां आलें. आठ दिवसांचें सोनें भट्टींत टाकून त्याची वीट बनविण्याची तयारी होत होती तेव्हां आम्हीं तेथें जाऊन पोंचलों. मोठ्या कढईतलें धगधगणारें सोनें साऱ्या मानव जातीला शाप देत होतें. चार मजुरांनीं लांब लांब सांडसांनीं ती कढई उचलून वीट बनवि-ण्याच्या चौरस द्रोणांत तो रस ओतला आणि वर गार पाणी ओतलें. द्रोणांतून वीट चटकन् निघून यावी म्हणून तो वरून जरा रुंद व खालून किंचित् अरुंद असा बनविलेला असतो. विटेलाहि त्यामुळें तसलाच आकार प्राप्त होतो. वीट धरण्याची इतकी चांगली सोय असल्यामुळें मला वाटलें

होतें कीं आपण ती जोरानें पकडून उचलूं शकूं. परंतु तो प्रयत्न विफलसिद्ध झाला. वीट धरणें सोपें आहे उचलणें मात्र अशक्य.

रेतींतुन सायनाईडच्या मदतीनें सगळें सोनें पाण्यांत घेण्याची क्रिया किचकट आहे. सोन्याचे कण आणि रेती एकत्र झालेली असतात तेव्हां भांड्यांत घालून हवेच्या प्रवाहानें पाण्यांत मोठा खळखळाट उत्पन्न करण्यांत येतो. हीं भांडीं उंच उंच टॉवरसारखीं असतात. आणि त्यांचें चळवळे ( Agitators ) असें नांव असतें. ह्या ॲजिटेटर्सवर तुम्हीं राजद्रोहाचा आरोप ठेवीत नाहीं का ? त्यांना हद्दपार करीत नाहीं तर मग कोणती शिक्षा त्यांना देता ? असें मी दोरायस्वामींना विचारलें.

दोरायस्वामी उत्तरले, ‘ हे लोक ॲजिटेशन करीत नसतात तेव्हांच मला त्यांना शिक्षा द्यावी लागते. त्यावेळीं मी त्यांची दयामाया करीत नाहीं. ’

मोठमोठ्या हौदांत हें पाणी गोल गोल फिरतें. जणूं काय डोकें फिरतें आहे त्यांचें !

दगडाना वाटत असेल, आमचा खरोखर अपराध काय ? पोटांत थोडीशी पिवळी माती आहे त्यासाठीं किती कष्ट आम्हांला सहन करावे लागतात. हें जर त्याना माहित असतें तर त्यांनीं परमेश्वराची प्रार्थना केली असती कीं, देवा, ही ‘ कृत्या ’ आमच्यांत नको !

असें सांगतात कीं नादिरशहा जेव्हां हिंदुस्थानांत आला तेव्हां शाहसूजाकडून कोहिनूर हिरा घेण्यासाठीं त्यानें त्या बादशहाचा अमानुष अपरिमित रीतीनें छळ केला. माणूस माणसाला छळतो तेव्हां त्याला आपण नृशंस, घातकी, नराधम म्हणतों. परंतु मनुष्य सोन्याचा दगड, सुगंधी फुलें किंवा धूप कुटतो, उकळतो किंवा जाळतो तेव्हां कोणाला त्याचें कांहींच वाटत नाहीं !

पृथ्वीच्या पोटांत सरळ उतरून दर ५०० किंवा हजार फुटांखालीं इकडे तिकडे कपारी खणून माणूस तिचीं आंतडीं खातो आणि त्याला म्हणतो मानवाची बहादुरी, त्याचा निसर्गावर विजय ! आणि असें करतांना माणसासारखा माणूस आपल्याच बंधूंना आठ आणे रोजींची लालूच दाखवून पृथ्वीच्या पोटांत ढकलून देतो आणि तेथें जर एखाद्याचा हात तुटला, डोकें फुटलें, प्राण गेला आणि त्याहिपेक्षां अनिष्ट म्हणजे एखाद्याचें

डोकें फिरलें तर स्वस्थ चित्तानें विचार करतो की हें कांहीं फार नाहीं! खरोखर शहाणी समजल्या गेलेल्या मानव जातीचें डोकेंच फिरलें आहे. म्हणून अशा नरकाला नेणारी प्रवृत्ति त्याला सुचते. प्राचीन काळीं हें सारें पाहून गुदमरलेल्या कवीनें आक्रोश केला होता कीं,

" स्वापतेयकृते मर्त्याः किं किं पापं न कुर्वते ! "

—२—

संन्याशाविषयीं असें म्हणण्यांत येतें कीं त्यांनीं सोन्याचांदीला स्पर्श करतां कामा नये. स्वामी दयानंद सरस्वतींच्या कमंडलूला चांदीची लहानशी नळी होती. त्यावरून सनातन्यांनीं त्यांच्याबद्दल केवढा गहजब केला होता. कांता आणि कनक हीं कलियुगाचीं ठेव आहेत, अधःपाताचीं साधनें आहेत; असा महिमा जिकडे तिकडे गायला गेला आहे. स्त्री हेंच पापाचें मूळ आहे, कनकांतूनच लोभ पैदा होतो असेंहि पुष्कळ लोकांनीं प्रामाणिकपणें नमूद करून ठेवलें आहे. परन्तु ही दृष्टि मला कधींच खरी वाटली नाहीं. एकानें पक्षपाताचा आरोप टाळण्यासाठीं म्हटलें आहे कीं कान्त आणि कान्ता दोघेहि पापाचीं साधनें आहेत—पुरुष आणि स्त्री दोघेहि अधः-पाताचीं बीजें आहेत. कॅथालिक साधूंच्या मतें आपला जन्मच पापांतून झाला आहे म्हणून ह्या दुनियेंतून निभावणें, सहीसलामत निघून जाणें ह्यांतच जीवनाचें साफल्य आहे. आणि स्वामी विवेकानंद म्हणतात, 'स्त्री पापाचें मूळ नसून मनाचे विकारच पापाचें मूळ आहेत; ते टाळतां आले पाहिजेत.'

लोकांतील धनलोभ पाहून आणि त्या लोभामुळें लोकांना आपलें जीवन निःसत्त्व आणि नीरस बनवितांना पाहून मला गुदमरल्यासारखें होतें. परन्तु सोन्याविषयीं मला मुळींच तिटकारा वाटला नाहीं. लहानपणीं मी किती-तरी अलंकार वापरले आहेत. परन्तु माझें लक्ष त्यांच्या सौंदर्याकडेच असे.

सोन्याचा नाजुकपणा, त्याचा रंग, त्याची सौम्य चमक हें सगळें मला आवडत असे. परन्तु अमुक वस्तु इतक्या किंमतीची आहे आणि मी त्याचा मालक आहें ह्या भावनेनें आपलें वर्चस्व माझ्यावर कधींच बसविलें नाहीं. चकमकीचे पैलूदार दगड आणि हिरे माणिकें मला सारखींच आकर्षक

वाटत असत. आणि आजहि तसेंच वाटतें. फुकट मिळणाऱ्या फुलांची जितकी कदर मला वाटतें, त्यापेक्षां हिरे माणकांची अधिक वाटत नाहीं.

हिऱ्याची आंगठी वापरण्याची मला लहानपणीं फार इच्छा होती. परन्तु ती कधींच तृप्त झालेली नाहीं. नंतर जेव्हां आकाशांतील ताऱ्यांशीं मैत्री जडली तेव्हां आपणांजवळ इतके हिरे आहेत हें पाहून मन तृप्त झालें. हे हिरे सांभाळावे लागत नाहींत; कोणी काढूनहि घेऊं शकत नाहीं. रात्र झाली रे झाली कीं आलेच चमचम करीत ! त्यांना पाहिल्यावर हिऱ्याची आंगठी घालण्यांची इच्छा हळू हळू विरून गेली.

उषेचे रंग आणि फुलांचे रंग मनसोक्त पाहिल्यानंतर रंगीत कपड्यां-विषयींचें आकर्षण कोण जाणें कोठें लोपून गेलें तें ! आज जेव्हां दुसरे लोक रंगीत कपडे घालतात तेव्हां त्यांच्याकडे फुलांच्या नजरेनें पाहून मी खुष होतों. आणि त्यामुळें एक सुंदर दृश्य उपस्थित झालेलें पाहून त्यांच्याविषयीं मला कृतज्ञता वाटते. परंतु रंगीत कपडे घालून इतरांसाठीं प्रदर्शन बनण्याची मला स्वतःला इच्छाच होत नाहीं. आपण अभद्र दिसूं नये आणि केवळ आकर्षकहि बनूं नये म्हणजे लोकांचें लक्ष कमींत कमी आपण खेचावें आणि केवळ मनुष्यच बनून राहावें असेंच नेहमीं वाटत असतें.

सोनें आहेच सु-वर्ण. चांदीपेक्षां वर्णानें सौम्य, कमी दिपविणारी चमक असलेलें आणि टणत्कारांत अधिक सात्त्विक. कोणत्याहि सोनाराला विचारा. सोनें इतकें सौम्य आणि आज्ञाधारक आहे कीं त्यांतून तऱ्हेतऱ्हेचे अलंकार तयार करण्यांत त्याला उत्साहच वाटतो. सोन्याला जर मौल्यवान पदार्थ बनविण्यांत आलें नसतें, त्याचें नाणें पाडून संग्रहाचें साधन बनविलें गेलें नसतें तर सोन्याचे इतके हाल झाले नसते. सोनें कुजत नाहीं, बिघडत नाहीं, कमी जागा व्यापतें. सामान्य तेजाबाचा त्याच्यावर परिणाम होऊं शकत नाहीं. वगैरे वगैरे त्याचे जे गुण आहेत तेच त्याला मारक झाले आहेत. लोभी मनुष्यानें त्याला आपल्या लोभाचें प्रतीक बनविलें. मी सोनें असतों तर आत्महत्या करून परमेश्वराकडे गेलों असतों आणि त्याला म्हटलें असतें,

" माझा एकादा गुण कमी करा, उषेप्रमाणें मला क्षणजीवी बनवा. कापराप्रमाणें उडून जाणारा, साखरेसारखा विरघळून जाणारा बनवा. किंवा ताऱ्यासारखा अग्राह्य बनवा; परंतु माणसाच्या हातून मला सोडवा. सत्य

युगाचा मु—वास कोठें आहे? मला कलियुगाचें प्रतीक आपण कां बनविलेंत? मला पाहून माणसाची नजर फिरते; त्याची मति बिघडते. भाऊभाऊ माझ्यासाठीं आपापसांत लढतात. मला पाहून स्थैर्य नष्ट होतें. माझ्या नांवावर राष्ट्राराष्ट्रांत रणकंदनें माजतात. समृद्धि असूनहि देशांत दुष्काळ संचरतो. सामाजिक प्रतिष्ठा चारित्र्यावर स्थित असली पाहिजे, परंतु जो मला गुलाम बनवितो तो सर्वांत मोठा असें लोक म्हणूं लागतात. मी असा काय गुन्हा केला आहे, हे प्रभो, कीं माझा भलेपणाच माझा वैरी बनावा?"

किरीटकुंडलधारी हिरण्मयवपु भगवानानें उत्तर दिलें नाहीं, म्हणून सोनें धरणीमातेकडे गेलें आणि म्हणालें, 'भगवति वसुंधरे, देहि मे विवरम्' आईनें आपल्या मुलाला आपल्या हृदयांत स्थान दिलें नाहीं असें कधीं झालें आहे? सोन्यानें विवरांत प्रवेश केला तेव्हांपासूनच लोभी मानवांनीं पृथ्वीच्या पोटांत विवरें खणून खणून तेथून सोनें बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याला म्हणतात सोन्याची खाण. ती आम्हीं पाहून आलों म्हणून मनुष्य प्राणी कसा आहे हें समजूं शकलों.

स्वतःला ओळखणें हीच सर्वांत मोठी साधना आहे.

## नंदीदुर्ग १२

(एक पत्र)

गुजरातच्या महापुराचेच ते दिवस. मी बंगलोरला गेलों होतों. गांधीजी नंदीहून कुमारपार्कांत रहावयास गेले होते. म्हणून या प्रदेशाचें भूषण असलेलें हें ठिकाण मला पाहतां आलें नव्हतें. आपलें घराणें मूळ किल्लेदाराचें हें तुला ठाऊक आहेच! आपल्या पूर्वजांनीं शिवाजीच्या वेळीं किल्ले लढविले असावेत. आपणाला गिरि-प्रवासाची इतकी हौस त्यामुळेंच असेल. एकादा उंच पहाड किंवा मोठा पर्वत मी पाहतों तेव्हां त्याच्या शिखरांवर चढून जाण्यास माझे पाय उत्सुक होतात. पर्वत उंच आहे आणि मी मात्र खालीं आहें हें माझ्यानें सहन होत नाहीं.

परंतु ही माझी वृत्ति विजेत्याची नसून जिज्ञासूची आहे. जितकें वर जाऊं तितकें अधिक दिसेल, दूरवरचें दिसेल आणि तितका आत्मीय भाव वाढेल, हाच त्यांतला आल्हाद ! स्वदेशभक्ति म्हणजे स्वजन-सेवा, स्वदेशांत राहणाऱ्या लोकांची सेवा हें मला माहित आहे तरीहि हिंदुस्थानच्या नुसत्या भूमीचेंहि स्वतंत्र आकर्षण मला कांहीं कमी नाहीं. माझ्या देशाचा मोठ्यांत मोठा भाग एकाच वेळीं पर्वतावरून नजरेला जेव्हां दिसतो तेव्हां माझें हृदय भरून येतें. लाडवाचा मोठा तुकडा तोंडांत घातल्यानें लहानपणीं तुला जितका आनंद वाटत असे तितकाच आनंद आपल्या या लहान डोळ्यांत माझ्या देशाचें मोठें दृश्य भरून घेतांना मला होतो. हिमालयांतील किंवा इतर पर्वतांवरील उंच शिखरांवर उभें राहून शेंकडों मैल पसरलेला हिमाच्छादित किंवा साधा भूमिभाग मी पाहिला तेव्हां मला काय आनंद झाला होता ! सिलोनच्या दक्षिणेकडे देवेन्द्र येथें आपली दुनिया खलास होते तेथें दीपगृहावर उभें राहून उत्तरेकडे उसळणारा नारळीच्या झाडांचा समुद्र पाहिला होता तेव्हां त्याच आनंदाचा प्रत्यय आला होता. दक्षिणेकडे हिंदी महासागर आणि उत्तरेकडे विश्वामित्राच्या अपूर्व सृष्टीचा सागर या दोहोंचें मीलन पाहून माझ्या मानस सागरांत अक्षय तृतीया झाली असेल तर त्यांत आश्चर्य तें कसलें ? त्रिवेणी संगम नद्यांचाच असतो असें नाहीं. सागरांच्याहि बाबतींत अशा संगमाची कल्पना करतां येईल ! कुर्गची राजधानी मर्करा येथें असें एक स्थान आहे कीं जिथें प्रकृति माता एकाद्या सम्राज्ञीप्रमाणें आपलें अतुल वैभव प्रगट करते !

सिलोनांत जेव्हां अनुराधापुराजवळील महेंद्र पर्वताच्या शिखरावर एका सायंकाळीं जाऊन पोहोंचलों तेव्हां दूरवरचा प्रदेश तर दिसलाच पण सम्राट अशोक, महेंद्र आणि संघमित्राच्या काळापर्यंतचा आपला इतिहासही माझ्या मनाच्या डोळ्यांना दिसला. हृदय विशाल करून या विश्वाशीं ज्याला एकत्व अनुभवावयाचें आहे त्यानें वरवरच चढत राहिलें पाहिजे. हें धर्मराज युधिष्ठिरालाहि माहीत होतें. गिर्यारोहण ही जन्मभूमीच्या उपासनेची एक उत्तम साधना आहे !

तुला वाटेल कीं नंदी येथें वर्णन करण्याजोगें कांहीं नसावें म्हणून ही इतर पर्वतांची जुनी कथा लिहिली आहे. पण तसें नाहीं, कोणतीहि प्रवृत्ति

सुरू करण्यापूर्वी तिच्या पूर्वाचार्यांचें स्मरण करणें स्वाभाविक व शास्त्रविहित आहे. नंदीच्या ह्या पर्वतांचा जुना इतिहास मी येथें लिहिणार अशी तुझी अपेक्षा असेल तर तुला निराशच व्हावें लागेल. आपण स्वतः संशोधन तर करीत नाहीं गॅझेटियर मागवितों व त्यांत जी माहिती सांपडेल ती निरनिराळ्या रीतीनें लिहितों. मला तसें करावयाचें नाहीं. मी एवढेंच सांगेन कीं नंदीचें सवंध नांव नंदीदुर्ग आहे. प्राचीनकाळीं या ठिकाणाला नंदगिरि म्हणत असत. नंद म्हणजे आनंद. आजहि या पर्वतावर आनंदाचा सागर ओसंडत आहे. या पहाडाच्या पायथ्याशीं लहानमोठ्या अनेक शिळां-मध्यें कोरलेले नंदी विराजमान आहेत आणि पर्वत एकाद्या मोठ्या सांडा-सारखा दिसतो. संस्कृत कवींना शाब्दिक साम्यावरूनहि कल्पना सुचत. शृंग म्हणजे शिंग आणि शृंग म्हणजे शिखर यावरून नंदी आणि पहाड दोघेही ' शृंगी ' आहेत. म्हणून या पर्वताचें नांव कोणीतरी नंदाच्या ऐवजीं नंदी केलें असावें पर्वताच्या पायथ्याशीं भोज नदीचें मंदिर आहे तर पर्वतावर योग नदीचें. भोग सोडून मनुष्य जेव्हां वर चढतो तेव्हांच तो योगारूढ होऊं शकतो !

नंदी स्टेशनावर अजमासें १०॥ वाजतां जाऊन पोहोंचलों. स्टेशनवरून पर्वत कांहीं आकर्षक दिसत नाहीं. मुंडण केलेला एकादा साधु उभा असावा तसें त्याचें माथें दिसतें. दुरून त्या माथ्यावर महादेवाच्या देवळासारखें कांहीं तरी दिसतें. तितकेंच त्याचें सौन्दर्य. पायथ्यापर्यन्त मला नेण्यासाठीं एक रिक्षा आली होती परंतु माणसासारखा माणूस पशू बनून त्यानें आपणांस ओढून न्यावें हें मला पसंत नव्हतें. आणि पर्वत चढण्यापूर्वीं दोन मैल चालत जाणें हाहि कांहीं मोठा कठिण प्रश्न नव्हता. म्हणून रिक्षेंत सामान ठेवलें व पायीं चालण्याचें पुण्य मिळविलें.

पर्वताच्या पायथ्याशीं तुम्हांला जीवंत उचलून नेण्यासाठीं चार माणसें तयार असतात. बसण्यासाठीं वेताची आकर्षक खुर्चीहि असते. परंतु पर्वत चढण्याचा आनंद आणि खुर्चीच्या २॥ रुपयांची बचत दोन्हीकडून फाय-दाच होता. पण मी एक चूक केली. एक स्वयंसेवक माझ्यासाठीं वरून फळें घेऊन आला होता. तीं मी पोटभर खाल्लीं. मला वाटलें कीं एंजीन पर्वता-वर चढतांना त्याच्यापाशीं पुरेसा कोळसा पाणी असलें पाहिजे. पर्वत चढ-

णारे आम्ही तिघे चौघेजण होतों. आम्हांला वर जातांना पाहून खालच्या खेड्यांतील एका अनोळखी मुलाला वाटलें कीं आपणहि जावें. गाडी पाहून तिच्याबरोबर पळत जाण्याची निष्कामवृत्ति एकट्या ग्रामसिंहालाच असते असें नाहीं. माणसांमध्येंहि सामाजिक वृत्ति मूळचीच आहे. मनुष्यानें विचारपूर्वक ती टाकून देण्याचा प्रयत्न केला आहे. परन्तु मरण आणि 'परण' (लग्न) प्रसंगीं तर ती दिसूनच येते. मुलाला मी भरपूर न्याहारीला दिलें. तेव्हां त्यानें माझी एक लहानशी टोपली घेण्याचें ठरविलें. थोडासा भार पोटांत आणि थोडासा पाठीवर ही व्यवस्था त्याला अनुकूल झाली आणि मी दुहेरी ओझ्यांतून मुक्त झालों.

नंदी चढण्याचे मुख्य रस्ते दोन आहेत. एक जुना पायऱ्या असलेला आणि दुसरा दूरचा परन्तु सोपा. इंग्रजींत त्याला 'ब्राइडल् पाथ' म्हणतात. आपण त्याला घोडरस्ता किंवा तट्ट्रस्ता म्हणूं. गांधीजी ह्या रस्त्यानें चालत आले. पांच मैलांचा हा रस्ता चढायला आम्हांला अडीच तास लागले.

जवळच्या रस्त्याला खालपासून वरपर्यंत मोठमोठ्या पायऱ्या आहेत. पन्नास पन्नासच्या अंतरानें पायऱ्यांवर आंकडे खोदलेले आहेत. अगदीं वरच्या फाटकावर १६५० चा आंकडा वाचायला मिळतो. हा आकडा पायऱ्यांचा आहे कीं फुटांचा आहे ह्याविषयीं आमच्यांत मतभेद आहे. महादेव भाईंना वाटतें कीं तो फुटांचा आहे आणि मला वाटतें तो पायऱ्यांच्या संख्येचा निदर्शक आहे. मध्यें मध्यें मी मोजून पाहिलें तेव्हां दोन आकड्यांमध्यें ५० पायऱ्या होत्या. परन्तु महादेवभाईंना ५३ पायऱ्या सांपडल्या. गॅझेटियरमध्यें लिहिलें असावें कीं पायथ्यापासून शिखर १६५० फूट आहे आणि पायथा समुद्रसपाटीपासून ३००० फूट आहे. म्हणजे ह्या पर्वताची उंची अल्मोऱ्याइतकी आहे. ज्यानें पर्वतावरचा प्रवास केलेला नाहीं त्याच्या दृष्टीनें ही उंचीची चर्चा आणि बारकाई अर्थहीन वाटेल. परन्तु पर्वतांच्या रसिकांना तर ह्यांत क्रिकेट मॅचच्या स्कोअरपेक्षां अधिक रस वाटेल.

मी पायऱ्या चढायला सुरुवात केली. आणि पोटांतल्या फळांनीं तक्रार करायला सुरुवात केली. पोटांत उजवीकडे दुखायला लागलें. मनांत भीति वाढायला लागली कीं वाटेंतच कदाचित् मुक्काम ठोकावा लागेल. परन्तु

पुष्कळ वेळां अशा प्रकारची भीति अस्थानीं असते. जो कच्च्या दिलाचा असतो त्यालाच तिची तमा. इतका उंच पर्वत चढायचा आहे असा विचार मनांत आणून माझे सोबती भरभर चालूं लागले. मी अशी चूक कसा बरें करीन ? रस्त्याची उंची आणि चालण्याची गति यांचें प्रमाण राखण्याची कला माझ्या हातांत, खरें म्हटलें तर माझ्या पायांत आहे. मी आस्ते आस्ते कदम दर कदम चालूं लागलों आणि कोणत्याहि ठिकाणीं विसावा घेण्यासाठीं किंवा गप्पा मारण्यासाठीं न थांबतां शेचाळीस मिनिटांत टिपुसुलतानाच्या ग्रीष्म विहारांत येऊन दाखल झालों. हा रस्ता सव्वा तासाचा आहे म्हणतात. परंतु मला खात्री वाटते कीं कोणीहि सामान्य मनुष्य माझ्या पद्धतीनें चालल्यास ४'९ मिनिटांत पोंचलाच पाहिजे.

दुसरीं पंधरा मिनिटें ! आणि ओक लॅण्डस्मध्यें पोंचून मी गांधीजींना नमस्कार केला. हवा उत्तम होती. जसजसें वर चढावें तसतशीं दूरचीं शेतें, डोंगर, खेडीं आणि तलाव दिसूं लागले. तांबडी लाल जमीन आणि त्यात चांदीच्या रसाप्रमाणें चमकणारे तलाव ! असलें दृश्य निर्माण करूं म्हटलें तर कठिण. आणि ह्या विस्तीर्ण प्रदेशांतले अनेक रस्ते मनुष्यवस्ती शोधत शोधत दूरवर जात होते. माणसाला जर यात्रेचें पुण्य मिळत असेल तर यात्रा करविणाऱ्या ह्या रस्त्यांचें पुण्य किती ! दूर दूर जाणारे आणि दोहो-कडच्या झाडांमुळें दिसून येणारे रस्ते पर्वतावरून पाहून किती तरी विविध विचार मनात उठतात. रस्त्यांची जात वणजाऱ्यांची आहे. जनता जनार्दनांत ते संस्कृतीच्या वकिलाचें काम करतात. जंगलाचें हृदय भेदून माणसांना तीं हृदयें उघडीं करून देतात. सगळ्या तऱ्हेच्या खाणाखुणा पुसून टाकणाऱ्या वाळवंटावरहि ते विजय मिळवितात. वाटेल तसे वाकडे, तिकडे जाऊन कधीं पर्वतांची खुशामत करून ते त्यांच्या डोक्यावर चढून बसतात. नदी-नालेहि त्याला अटकाव करूं शकत नाहींत. मनुष्याच्या दुर्दान्त परिव्राजक इच्छाशक्तीचा तो प्रतिनिधी आहे !

नंदीचा रस्ता सिंहगडच्या रस्त्याप्रमाणें लांब किंवा कठिण नसल्यामुळें मी जर त्याचें विस्तृत वर्णन लिहूं लागलों तर तो औचित्यभंग होईल. सिंह-गडच्या रस्त्याला रात्रींची वाघोबाची स्वारीहि भेटायची. परंतु येथें ससा सुद्धां आढळायचा नाहीं. ज्या रस्त्यावर विजेचे दिवे आहेत त्याला कोणी जंगली

रस्ता कसें म्हणेल ? येथें तर ठिकठिकाणीं पाट्या लावल्या आहेत कीं येथें संस्थानातर्फें इतकीं पेरूचीं झाडें लावलेलीं आहेत, इतकीं मोहोगनीचीं आहेत. इतकीं करंजीचीं आहेत इ. सर विश्वेश्वरैयांनीं नंदीला शृंगारायला सुरुवात केली आणि सर मिर्झा इस्माइलनीं तें कार्य पुरें केलें. आतां खालून वर मोटारी जाऊं शकतील असा रस्ता झाला कीं संपलें ! म्हणजे मग नंदीची शांति आणि सात्त्विकता आसपासच्या टेंकड्यांकडे धूम ठोकील. आणि येथें हॉटेलें, मौज, शौक आणि रेडीयो येतील. मुंबईनें मलबार हिलची जी दशा करून टाकली तीच बंगलोर नंदीची करील. भोगलोलुप माणसाला प्राकृतिक सौंदर्य बिघडविणें चांगलेंच साधत असतें !

थकले भागलेले तुम्ही वर आलांत कीं येथला पहिला आनंद म्हणजे झाडी ! राजपुरुषाप्रमाणें उभे असलेल्या, विशाल खोडें असलेल्या युकॅलिप्टसच्या उंच सरळसोट वृक्षांचें तें वन ! जिकडे दृष्टि टाकाल तिकडे हीं झाडें आणि यांची चिल्लीं पिल्लीं काळजीपूर्वक लावलेलीं दिसतील; मधून मधून कापराचीं झाडेंहि आहेत. सरूचीं पण आहेत !

दुर्गाच्या मधोमध एक विशाल पुष्करणी आहे तिचें नांव 'अमृतसरोवर.' चहुंकडल्या उतरत्या पायऱ्या माणसाला पाण्यापर्यंत धांवत जाऊन हात, पाय, मस्तक आणि पोट शांत करण्याचें निमंत्रण देत असतात. परंतु संस्थानचे नियम फारच उपयोगी आणि कडक असल्यामुळें आंत कोणीहि मनुष्य किंवा जनावर उतरण्याचें धाडस करीत नाहींत. कायद्याला न जुमानणारीं कांहीं पानें वाऱ्याच्या मदतीनें आंत उतरून जलविहार करूं लागतात. पण त्यांची ती क्रीडा दीर्घ कालपर्यंत कोणी चालूं देत नाहीं. इतकें स्वच्छ राखलेलें पाणी आरोग्यप्रद असेल हें वेगळें सांगण्याची जरूर नाहीं. तरीहि दर महिन्याला डॉक्टरांकडून ह्या पाण्याचें रीतसर रासायनिक पृथक्करण करविण्यांत येतें. हल्लीं तर दर पंधरा दिवसांनींच होतें.

आपल्या तीर्थस्नानांतील पाणी स्वच्छ राखण्याच्या बाबतींत शास्त्रांनीं दंडक घालून दिलेले आहेत. परंतु आमच्या लोकांनीं प्रत्येक ठिकाणीं इतकी घाण करून ठेवली आहे कीं, तीं तीर्थस्थानें अनाचाराचें आगर आणि कॉलऱ्याचें माहेरघर बनतात !

दुर्गाच्या दक्षिणेकडे महादेवाचें मंदिर आहे. त्यांत महादेवाबरोबर नंदी,

अंबिका, कालभैरव इत्यादि अनेक कल्पिलेल्या मूर्ति ह्या असणारच. परंतु येथें येऊन राहिलेल्या पहिल्या वहिल्या ऋषीची पण मूर्ति येथें आहे. उष्माण्ड ऋषि हें त्याचें नांव.

पश्चिमेकडे एक तुटलेला कडा आहे. टिपूच्या काळीं ज्याला देहदंडाची शिक्षा होत असे त्याचा येथून कडेलोट करीत असत. महाराष्ट्रांतील प्रत्येक किल्ल्यावर अशाप्रकारचें स्थान असतेंच. सिंहगडचा कडेलोट तूं पाहिला आहे-सच. येथल्या कडेलोटाला ' टिपूज ड्रॉप ' म्हणतात. विजेच्या खुर्चीत बसवून माणसाला मारण्यापेक्षां ही पद्धति कमी खर्चाची आणि अधिक माणुस-कीची आहे असें म्हणावें लागेल. माणसाला हवेंतली मुशाफरी करायला सोडून दिलें कीं तो भीतीनें अर्धमेला व्हायचा. निदान बेभान तरी व्हायचा. खालीं जाऊन आदळला कीं क्षणांत चक्काचूर, प्रेताची व्यवस्था लावायचें कारण नाहीं. वाघ लांडगे कोल्हे वारी ती मेजवानी झोडायला उमेदवार !

आम्ही रोज सकाळ संध्याकाळ खूप फिरतों. हवा तर सुरभित झालेली. वारा मोठमोठ्यानें वातावरणाचा रिपोर्ट देत असतो. पांढरीं आणि लाल फुलें आपल्याच उन्मादांत डुलत असतात. आणि हरतऱ्हेचे " गगनविहारी खगवैतालिक " आपापल्या निवडक लकेरी हवेवर सोडत असतात. अशा-वेळीं भटकण्याचा कोणाला थकवा यावा ! आणि थकवा आलाच तर ठिकठिकाणीं दगडी बाकें ' या महाराज, बसा महाराज ' म्हणून खुशामत करीत असतातच.

पण खुशामत करण्याचा खरा ठेका तर येथल्या सूर्याच्या सोनेरी किर-णांनींच घेतला आहे. हल्लीं सगळीकडे अभ्रें असतातच. त्यामुळें सूर्योदयाच्या वेळीं त्यांचा लपंडाव आणि सूर्यास्ताच्या वेळींहि तीच क्रीडा. आणि सूर्याचे किरण पसरले म्हणजे आसपासचे आणि दूरदूरचे असंख्य जलाशय एकदम चमकूं लागतात. घटकेंत वाटतें कन्हईचा रस ओतला गेला असावा तर घटकेंत वाटतें नभींच्या चांदव्याचें झुंबर तुटून त्याचे तुकडे इतस्ततः विखुरलेले आहेत. कधीं मयासुराला इंद्राचा राजमंडप उभारायचा आहे त्याची ही पूर्वतयारी आहे असा भास होतो, तर कधीं लोकांकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून पृथ्वीमातेनें आपलें सोनें आणि चांदी सगळीच पोटांतून ओकून टाकली असावी असें वाटतें. वनस्पतिसृष्टि आणि प्राणिसृष्टीच्या

उपासमारीना विचार मनांत येऊन धरणी मातेनें ही स्तन्यधारा सोडली नसेल हें तरी कशावरून? कसेंहि असो, परंतु पहाल तिकडे जलाशय हें येथल्या दृश्याचें वैशिष्ट्य आहे. आणि इतकें असूनहि ही भूमि बंगालच्या भूमीप्रमाणें दलदलीची नाहीं. चांगली तीन हजार फूट उंचीची खडबडीत जमीन आहे. चिखलाचें नांव नाहीं!

काल रात्रीं मोठें वादळ झालें. सोसाट्याचा वारा सुटला होता. बोरा-एवढाले थेंब पडूं लागले. आम्ही दारें खिडक्या लावून पक्षांची पिल्लें घरट्यांत बसतात तसे बसलों. इतक्यांत कडाड्–कड करीत वीज पडली आणि घरांतले विजेचे दिवे मालवले. अशा वेळीं अंधाराची खुमारी कांहीं औरच असते. अंधार हें कांहीं दारिद्र्य नव्हे, उलट समृद्धि आहे. पृथ्वी-पेक्षां आकाश ज्याप्रमाणें अनंतपट विशाल आहे, वाणीपेक्षां मौन जसें अनंतपट मोठें आहे, त्याचप्रमाणें प्रकाशापेक्षां अंधार, तुलना न करतां येण्याइतका वैभवशाली आहे.

अवसेच्या रात्रीं कोट्यवधि तारे चमचम करीत असतात. परंतु ते सगळे मिळून आकाशांतली पोकळी तसूभरहि कमी करूं शकत नाहींत. जगांतल्या साऱ्या ज्योती एकत्र झाल्या तरी 'सगळीकडे अंधारच आहे' इतकेंहि जाहिर करण्याची शक्ति त्यांच्यांत नाहीं. सबंध हिंदुस्थानांत जर दोन तीनच झाडें असतील तर त्याला कोणी वन किंवा जंगल म्हणणार नाहीं. तसे आकाशांतले नव लाख तारे एकत्रित केले तरी त्याला कोणी वस्ती म्हणणार नाहीं.

आमच्या पूर्वेला सुलतान पेठ, नंदी आणि चिकबल्लापूर हीं तीन खेडीं आहेत. तिहींत विजेची सोय आहे. त्यामुळें आकाशातील तारानगरी-प्रमाणें हीं तीन्हीहि खेडीं सारी रात्र चमचमत असतात. ताऱ्यांत आणि दिव्यांत प्रमाणभेद असला तरी साम्य आहे. सोसाट्याच्या वाऱ्यानें जर आम्हांला बंगल्यांत पळवून लावलें नसतें तर सारी रात्र मी ह्या दोहोंचें ध्यान करीत बसलों असतों!

# बाहुबली १३

## १ श्रेष्ठ कीं ज्येष्ठ ?

बाहुबली अथवा गोमटेश्वराचें जीवनचरित्र एकाद्या महाकाव्याचा विषय होण्याजोगें आहे. वाल्मीकीचा रावण, व्यासाचा दुर्योधन, मिल्टनचा सैतान —तिन्हीहि भव्य विभूति आहेत. आपल्या दुष्टपणांतहि औदार्य दाखविल्या-शिवाय त्या राहूं शकत नाहींत. तिघेहि आपला रजोगुण सोडीत नाहींत. बाहुबली यांच्याहून अगदीं वेगळ्या कोटीचा वीर पुरुष आहे. आपल्या सामाजिक आणि मानसिक शक्तीचा रजोगुणी उत्कर्ष दाखविल्यानंतर तो त्याहिपेक्षां उंच उड्डाण करून सत्त्वगुणांत प्रवेश करतो व आपलें कल्याण करून घेऊन मानवजातीच्या आदरासहि पात्र होतो.

महाराजा ऋषभदेवाला शंभर पुत्र होते. भावाभावांत भांडणें होऊं नयेत त्यांचे परिणाम प्रजेला भोगावे लागूं नयेत म्हणून अशी व्यवस्था सुचवि-ण्यांत आली कीं, वडील मुलानें गादीवर बसावें आणि बाकीच्या सगळ्या भावांनीं गृहसंसाराचा त्याग करून परलोकप्राप्तीची साधना करावी.

या व्यवस्थेप्रमाणें अठ्याण्णव भावांनीं दीक्षा घेतली आणि इहलोकांतील महत्त्वाकांक्षा सोडून दिल्या. ज्येष्ठ पुत्र भरत गादीवर बसला. पण त्याचा धाकटा भाऊ बाहुबली हा ठरलेल्या योजनेप्रमाणें वागायला तयार-च होईना. त्यानें असा प्रश्न उपस्थित केला कीं, जो ज्येष्ठ व श्रेष्ठ असेल त्यानेंच गादीवर बसावें हें खरें परंतु ज्येष्ठ जर श्रेष्ठ नसेल तर केवळ वयाला महत्त्व न देतां योग्यता पाहिली पाहिजे. कारण राज्य हें प्रजेच्या हितासाठीं असतें, सुखोपभोगासाठीं नव्हे. भरत ज्येष्ठ असेल पण आपण त्याच्यापेक्षां प्रत्येक गोष्टींत श्रेष्ठ आहों. राज्यगादी आपणालाच मिळाली पाहिजे.

वाद सुरू झाला. प्रत्येकाला आपली योग्यता सिद्ध करणें भाग पडलें. राजांत कणखरपणा असणें हें सर्व दृष्टींनीं आवश्यक म्हणून या बाबतींत दोघांची कसोटी पाहण्यांत आली. त्यांत बाहुबली श्रेष्ठ ठरला, आपल्या वाक्-पटुतेनें जनतेची आराधना करण्याची शक्ति राजाच्या ठिकाणीं असणें आव-

श्यक आहे. या परीक्षेंतही बाहुबली श्रेष्ठ ठरला. बुद्धिशक्ति आणि सूचकशक्ति हे गुण राजांत असले पाहिजेत. या चढाओढींत देखील बाहुबलीच जिंकला. सामंतांना अनुकूल करून घेऊन आपलें 'चक्र' स्थापन करणें हें चक्रवर्तीचें खास लक्षण होय. यांतहि चक्रवर्ती भरतापेक्षां बाहुबलीच जिंकला. राजांत दीर्घ दृष्टि असली पाहिजे. या गुणाच्या बाबतींत बाहुबलीनें आपली योग्यता सिद्ध करून दाखविली. अखेर युद्धाची पाळी येऊन ठपली. राजाराजांतील ईर्ष्येमुळें प्रजेला मरावें लागणें हें न्यायसंगत नाहीं असें सांगून सगळ्या मुत्सद्यांनीं सेनायुद्ध करण्यास नकार दिला. दोन भावांचे पक्ष बनून प्रजेंत जेव्हां दोन तट पडतात तेव्हां सबंध जातीचा संहार होतो, हें समजण्याइतकी बुद्धि त्या काळच्या सगळ्याच लोकांत होती. म्हणून द्वंद्वयुद्ध करून निर्णय करावा असें ठरलें. मग काय? बाहुयुद्ध, दंडयुद्ध, मल्लयुद्ध इ० अनेक प्रकारचीं युद्धें झालीं. बाहुबलीला सहज विजय प्राप्त झाला. सर्व प्रकारें बाहुबलीची श्रेष्ठता सिद्ध झाली. लोक त्याचा जयजयकार करूं लागले. यामुळें भरत चिडला आणि त्यानें अहंश्रेयस् टाकून देऊन भावाला ठार करण्याचा कट रचला. बाहुबलीवर अचानक प्रहार केला. भरताचा राज्यलोभ या कोटीला पोहोंचेल ही कोणाला कल्पना नव्हती. तेजस्वी बाहुबली याचा प्रत्याघात केल्याशिवाय कसा राहील? त्यानें आपली मूठ आवळली आणि एकाच प्रहारांत भरताला खतम करण्यासाठीं हात उगारला. लोकांच्या हृदयांत हाहाःकार माजला. आतां भरत मरणार, असें सर्वांना वाटलें. बाहुबलीला खात्रीच होती. त्या विजयानें बाहुबलीला धुंदीहि चढलेली होती.

त्याच्यांत दुर्बलता असती तर तो क्रोधानें आंधळा झाला असता. पण आपल्या शक्तीची पूर्ण जाणीव असल्यामुळें त्यानें तत्क्षणीं क्रोधावर विजय मिळविला. त्यानें असा विचार केला कीं आपली योग्यता तर सिद्ध होऊन चुकली आहे. केवळ राज्यलोभानें माझा भाऊ पामर बनला आहे. या पामरतेच्या चढाओढींत मी काय म्हणून भाग घ्यावा? भावाला मारून राज्य चालविण्यांत मी प्रजेपुढें कोणता आदर्श ठेवूं शकेन? जाऊं दे तें राज्य आणि जाऊं दे ती बंधुहत्या!

ज्या जोरानें त्यानें मूठ आवळली होती तोच जोर वापरून त्यानें आपलें

केशलुंचन केलें. आणि त्यागाची दीक्षा घेतली. अकुतोभय होऊन भरत राज्य चालवूं लागला. बाहुबलीनें वैराग्याचा मार्ग पत्करला. रजोगुणांतून सत्त्वगुण प्रकट झाला. महत्त्वाकांक्षेपेक्षां बंधुप्रेम, स्वजनवात्सल्यता आणि विरक्ति श्रेष्ठ ठरली.

भरत निर्भय होऊन राज्य करूं लागला आणि बाहुबलीनें परम पुरुषार्थाचा मार्ग धरला!

आध्यात्मिक मार्गांत गुरूला शरण गेल्यानें मार्ग सोपा होतो. अठ्याण्णव भावांनीं जो मार्ग धरला तो मार्ग धरणें आणि भगवान ऋषभदेवांना शरण जाणें हाच स्वाभाविक मार्ग होता. परन्तु मानधन बाहुबलीला त्यांत अडचण भासली. धाकट्या भावांनीं आधीं दीक्षा घेतली असल्यामुळें दीक्षामार्गांत ते वडील होते. आपण उशीरा दीक्षा घ्यावयाची म्हणजे अठ्याण्णव भावांना वंदन हें करावें लागणारच. हें कसें व्हावें? श्रेष्ठत्व फुकट गेलें आणि ज्येष्ठत्वहि घालवून बसणार. हें कसें सहन व्हावयाचें? त्यापेक्षां आपल्याच तपाच्या जोरावर ज्ञान प्राप्त करून घेणें अधिक चांगलें असें बाहुबलीनें ठरविलें. अशा प्रकारें साधनेच्या मुळांतच दर्प आणि अहंकार आला. या पायावर बाहुबलीनें घोर तपश्चर्या उभारली. स्वतः जेथें उभा होता तेथें वारुळें निघालीं. त्यांत मोठमोठे नाग आणि कृष्णसर्प येऊन राहिले. माधवीलतेनें या वारुळांना भरून टाकलें आणि बाहुबलीचे पाय व बाहू यांवर ती चढली. चराचर जगत् हें अतुल तप पाहून चकित झालें. परंतु बाहुबलीला केवल-ज्ञानाची प्राप्ति झाली नाहीं. तो चिडत गेला व आपलें तप वाढवीत गेला. अखेर त्या शंभर भावांच्या दोन लाडक्या बहिणी ब्राह्मी आणि सुंदरी (त्यांनींहि त्यागदीक्षेचा स्वीकार केला होता.) तेथें येऊन पोहोंचल्या. परिस्थितीचें हार्द स्त्रीहृदय चटकन् ओळखूं शकतें. बहिणीनें भावाला गोड संकेत केला, "बंधुराया, हत्तीवरून खालीं उतरा." बाहुबलीला आश्चर्य वाटलें कीं आपण उभ्यानें कितीतरी काळ तप करीत आहोंत आणि बहिणी आपणाला हत्तीवरून खालीं उतरायला सांगतात हें कसें? क्षणार्धांत बाहुबलीला भान झालें कीं आपण अभिमान अहंकाराच्या हत्तीवर बसलों आहोंत. सगळेच संस्कार नष्ट करण्याचा संकल्प आपण करीत आहोंत तेथें हा श्रेष्ठ कीं ज्येष्ठ

होण्याचा अभिमान कसला? सबंध विश्वाशीं जेथें ऐक्य साधायचें आहे तेथें अठ्याण्णव भावांशीं ईर्ष्या काय कामाची? बाहुबलीच्या बहिणीच गुरूसमान बनल्या. बाहुबलीचा अहंकार नष्ट झाला. आणि धाकट्या भावांना तो वंदन करायला निघाला. ज्या ठिकाणीं तो उभा होता तेथून पाऊल उचलण्यापूर्वींच त्याला केवल—ज्ञान झालें आणि तो वीर पुरुष सर्वप्रकारें कृतार्थ झाला!!

मानवोचित रजोगुणांचें संपूर्ण बल दाखवून आणि आपलें तेज प्रकट करून त्यांतील आपली उणीव ओळखून बाहुबलीनें सात्विकतेचें अत्युच्च शिखर गाठलें. अगदीं खालच्या पायऱ्यापासून सुरुवात करण्यांत कमीपणा नाहीं. परंतु शिखराची यात्रा करतां करतां मध्येंच थांबणें हें दुर्दैव होय. प्रत्येक प्रतापी मनुष्य बाहुबलीच्या जीवनाकडे आकर्षिला हा जाणारच. करणी करून नराचा नारायण बनल्याचें हें उदाहरण प्रत्येक मनुष्याला उच्च स्थितीप्रत नेणारें आहे. मोठमोठ्या कारागिरांनीं बाहुबलीच्या विशाल मूर्ति बनविण्याची महत्त्वाकांक्षा धरली. बाहुबलीच्या जीवनांतील एकूण एक प्रसंग खोदून काढण्यांत कारागिरांनीं आपली सर्व शक्ति ओतली आहे. ह्या नमुन्याचे परम उद्बोधक असे दोन प्रकार दक्षिण भारतांत आहेत. ह्या मूर्तींच्या सौंदर्यावरून त्याचें नांव ‘गोमटेश्वर’ असें पडलें आहे.

१९२५ मध्यें मी कारकलला गेलों होतों. तेथील टेकडीवर बाहुबलीची पंचेचाळीस फूट उंच मूर्ति पाहिली. यंदा जुलै महिन्यांत श्रवण बेळगोळ येथील साठ फूट उंचीची मूर्ति पाहून आलों आहे. पश्चिम किनाऱ्यावर मंगलूर आणि उडपीमालपेच्या काटकोनांत कारकल वसलें आहे. तर श्रवण बेळगोळ म्हैसूर संस्थानांतील हसन जिल्ह्यांत चंद्रगिरी आणि विंध्यगिरीच्या मध्यें आहे. श्रवण बेळगोळयाची मूर्ति विंध्यगिरीच्या शिखरांतूनच कोरून काढलेली आहे, तर कारकलची मूर्ति टेकडीच्या दगडाहून भिन्न प्रकारच्या दगडाची दुरून बनवून आणून टेकडीवर चढवून उभी करण्यांत आली आहे. हें सर्व कसें केलें गेलें असेल ह्याचा विचार करणेंहि आज कठिण आहे. श्रवण बेळगोळच्या दर्शनाचा आनंद ताजा आहे. तेव्हां तो शब्दबद्ध करून वाढविण्याचा विचार आहे.

## २ श्रवण–बेळगोळ

हिंदुस्थानांत म्हैसूर संस्थानला एका विशिष्ट अर्थानें सुवर्णभूमि म्हणतां येईल. उरगाम कोलारच्या सोन्याच्या खाणींतून दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें सोनें निघतें. यावरून ती सुवर्णभूमि आहे असें म्हणतां येईलच. पण तेथील उत्तम सुपीक जमीन, ठिकठिकाणचे चमकणारे तलाव, मध्यें मध्यें पावसाला पकडून आणणारे मोठमोठे डोंगर आणि त्यातलें अमृतजल पाजणाऱ्या नद्या; सांजसकाळ अनेक रंग आणि आकार धारण करणारे ढग आणि सुदृढ शरीरें असलेले व आतिथ्यशील हृदयांचे तिथले शेतकरी, या सर्वांना पाहून म्हैसूर संस्थानला सुवर्णभूमि हेंच नांव यथार्थ वाटतें. म्हैसूर संस्थानचे दोन मोठे विभाग आहेत. पश्चिमेकडील भागाला मालनाड म्हणजे डोंगरी मुलूख असें म्हणतात आणि पूर्वभागाला मैदानाचें नांव देण्यांत आलेलें आहे. दोन्ही भागांत लहानमोठीं सुंदर मंदिरें आणि तीर्थस्थानें विखुरलेलीं आहेत. प्राचीन काळची समृद्धि, सुव्यवस्था, सात्त्विक पुरुषांची भक्ति आणि जनतेचे धार्मिक उत्सव या सर्वांची साक्षी बनलेलीं हीं ठिकाणें म्हैसूर प्रदेशाचें इतिहासधन आहेत. परंतु त्यांतहि हसन जिल्ह्यांतील तीन ठिकाणें म्हैसूरला भारतविख्यातच काय पण जगद्विख्यातहि बनविणारीं झालीं आहेत. उत्कल प्रांतांत पुरी, भुवनेश्वर, कोनार्क इत्यादि ठिकाणें, अबू पर्वतावरील देलवाड्याचीं मंदिरें, नर्मदाकांठचीं असंख्य देवालयें, तामीलनाड मधील आजहि भरभराटींत असलेलीं भव्य मंदिरें,– या सर्व हिंदुस्थानच्या स्थापत्य-समृद्धीमुळें जगाचें लक्ष आपल्या देशाकडे दिवसेंदिवस अधिकाधिक आकर्षिलें जात आहे. अजिंठ्याची चित्रकला आणि बेलूर हेळबिडचें मूर्तिविधान सबंध जगांत अजोड आहे असें कलारसिक म्हणूं लागले आहेत. बेलूर व हेळबिड हसन शहराच्या उत्तरेस एकमेकांपासून दहाबारा मैलांच्या अंतरावर आहेत. एका काळीं हीं दोन्हीं ठिकाणें राजधानी म्हणून प्रसिद्ध होतीं. आज तीं मोडकळीस आलीं असलीं तरी भारत वर्षाची कलाधानी म्हणून वर्धमान ख्याति मिळवूं लागलीं आहेत. दोन्हीं ठिकाणच्या आसपास जैन मंदिरें आहेत. त्यांना तेथें 'बस्ती' असें म्हणण्यांत येतें. सगळ्या बस्ती दिगंबर संप्रदायाच्या आहेत. आणि त्यांतील कारागिरी उच्च कोटीची आहे. या प्रदेशांतील गांवोगांव पडलेल्या मूर्ति आणि कारागिरीचे

खंडित झालेले दगड जर एकत्र करून ठेवण्यांत येतील, तर राष्ट्राला अभिमान वाटण्यासारखें एक अद्‌भुत संग्रहालय तयार होईल. परंतु हें काम इतकें दुर्घट आणि खर्चाचें आहे कीं साध्यासुध्या संस्थानाला तें झेपणें शक्य नाहीं. बेलूरच्या मंदिरांत म्हैसूर संस्थानातर्फे विजेची सोय झाल्यामुळें तेथील कारागिरी डोळे भरून पाहण्याची सोय झाली आहे. या मंदिराविषयीं थोडक्यांत लिहितांच येणार नाहीं. आज हसनच्या पश्चिमेला चार तासांच्या मोटारच्या रस्त्यावर श्रवण बेळगोळ म्हणून जें गांव आहे त्याविषयीं मला लिहावयाचें आहे. आणि विशेषतः विंध्यगिरीवरील श्रीगोमटेश्वराच्या प्रचंड मूर्तीविषयीं!

महिषमंडळ किंवा म्हैसूरचा उल्लेख अशोकाच्या शिलालेखांत आहे. असें म्हणतात कीं अशोकाचे आजोबा चंद्रगुप्त आपले गुरु भद्रबाहु यांना बरोबर घेऊन आपल्या आयुष्याचे अखेरचे दिवस घालविण्यासाठीं येथें आले होते. आपल्या राज्यांत पडलेल्या बारा वर्षांच्या दुष्काळांतून आपण आपल्या प्रजेला वांचविण्यास असमर्थ आहोंत असें पाहून त्यांनीं राज्यत्याग केला आणि आपल्या मुलास गादीवर बसवून आपल्या गुरुसह जैनांच्या या तपोभूमींत राहण्याचें ठरविलें. गुरूनें आपला वृद्धापकाळ आलेला पाहून संमलेखना करून चंद्रगिरीवर देहत्याग केला. चंद्रगुप्तानें आपल्या गुरूच्या पादुकांची बारा वर्षें पूजा केली आणि शेवटीं आपणहि संमलेखना करून इहलोकींचें कार्य संपविलें!

कांहीं असें म्हणतात कीं येथें आलेला चंद्रगुप्त अशोकाचा आजा मौर्यवंशी चंद्रगुप्त नसून समुद्रगुप्ताचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त होता. या समजुतीमागें सबळ ऐतिहासिक पुरावा असला तरीहि चंद्रागिरीवरील शिलालेखावरून असें वाटतें कीं, तो मौर्यच होता. हें खरें असल्यास अशोकाच्या शिलालेखांत आपल्या आजोबाचा उल्लेख कां नसावा असा एक मोठा प्रश्न निर्माण होतो. चंद्रगुप्तानें जैन धर्माची दीक्षा घेतली असावी. यामुळें अशोकानें त्याची उपेक्षा केली असेल; किंवा मौर्य चंद्रगुप्त येथें आलाच नसेल हें कोणी सांगावें?

चंद्रगिरी आणि विंध्यगिरी या दोन टेकड्या इतक्या जवळ जवळ आहेत आणि त्यांच्या आसमंतातला प्रदेश इतका रमणीय आहे कीं, कवींना येथें येऊन बसल्याशिवाय कसें राहवेल? परंतु या जगाला कंटाळून विरक्त

बनून संमलेखना करण्यासाठीं वैरागी साधूंनीं असें रमणीय स्थान पसंत करावें हें एक आश्चर्यच आहे. आत्महत्या करण्यासाठीं ज्याप्रमाणें भैरव-घाटी निवडतात त्याचप्रमाणें असंख्य जैनांनीं संमलेखनासाठीं चंद्रगिरी पसंत केलें होतें. आजदेखील कितीतरी दिगंबर साधु या गिरीवर येऊन आपले अखेरचे दिवस पुरे करतात.

या दोन टेंकड्यांमध्यें एक सुंदर, स्वच्छ व चौरस असा तलाव आहे. त्याचेंच नांव ' बेळगोळ ' किंवा ' धवल सरोवर. ' श्रमण येथें येऊन रहात असल्यामुळें त्याचें नांव श्रमण–बेळगोळ पडलें असावें. आणि पुढें पुढें लोकांनीं त्याचें श्रवण बेळगोळ असें रूपांतर केलें असावें. बेळगोळ म्हणजे सफेत वांगें असाहि अर्थ होतो. गोमटेश्वराच्या अभिषेकाशीं संबंध असलेल्या एका भक्त म्हातारीच्या नांवाशीं वांग्याचा संबंध आहे. कांहींहि असो; श्रवणबेळगोळ जैनांचें एक मोठें तीर्थस्थान आहे.

हसनहून आम्ही दुपारीं निघालों. पांचसहा जणांना बरोबर घ्यावयाचें होतें. त्यामुळें निघतां निघतां बराच वेळ फुकट गेला. तेवीस मैलांची दौड मारून आमची बस चन्नरायपट्टणाला आली. तेथून आठ मैल अंतर कापून आम्ही विंध्यगिरीच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचलों.

गोमटेश्वराच्या प्रचंड मूर्तीविषयीं पूर्वींच ऐकलेलें असल्यामुळें माझे डोळे तर हसनपासूनच विंध्यगिरीच्या शोधांत होते. चौदा मैल बाकी राहिले असतील तों चंद्रगिरी विंध्यागिरी दिसूं लागले आणि उंच विंध्यगिरीच्या शिखरावर एकाद्या लहानश्या ठिपक्यासारखा किंवा निशाणाच्या काठीसारखा एक दगड दिसूं लागला. मी खात्री करून घेतली आणि दोन्ही हात जोडून तत्क्षणीं गोमटेश्वराला प्रणाम केला.

कारकल येथें देखील बाहुबलीची मूर्ति आहे तिची उंची सत्तेचाळीस फुटांपेक्षां कांहीं कमी नाहीं. तिच्या आसपास कोणतेंच बांधकाम नसल्यामुळें ती मूर्ति खूप दुरूनहि दिसते. श्रवण बेळगोळच्या जवळपास पाहण्यालायक पुष्कळ ठिकाणें आहेत. आमच्यापाशीं भरपूर वेळ असता तर तीं पाहिल्याशिवाय आम्ही राहिलों नसतों. परंतु सूर्यनारायण विश्रांतीची तयारी करीत होता. सगळेंच पाहण्याचा लोभ धरला तर कांहींच लक्षपूर्वक पाहतां येणार नाहीं असा विचार करून आम्ही फक्त गोमटेश्वराचें दर्शन घेऊन परत फिरावें असा

निघतांना निश्चय केला होता. सहाशें पायऱ्यांच्या मदतीनें चारशें सत्तर फूट उंचीची सोपी चढण चढून आम्ही वर पोहोंचलों. पायऱ्यांच्या सुरुवातीलाच एक सुंदर महाद्वार आहे. त्याचें नांव "गुल्लकायजी बागलू" कानडींत बागलू म्हणजे दरवाजा आणि गुल्लकायजी म्हणजे वांगेताई.

या गरीब वृद्ध वांगेताईचा थोडासा इतिहास आहे. चामुंडरायानें गोमटेश्वराची मूर्ति खोदविली, आणि १०२८च्या मार्च महिन्याच्या २ तारखेस रविवारीं त्या मूर्तीला अभिषेक करण्याचें ठरवलें. त्यावेळीं गुल्लकायजी नांवाची अेक वृद्धा अेका फळाच्या सालींत अभिषेकासाठीं गायीचें थोडेंसें दूध घेऊन आली. आणि जाणाऱ्या येणाऱ्यांना विनवूं लागली कीं अभिषेकासाठीं मला एवढें दूध नेऊं द्या. त्या बिचाऱ्या म्हातारीकडे कोण लक्ष देणार? तिनें रोज सकाळीं गायीचें दूध घेऊन यावें आणि सायंकाळीं अंधार पडल्यावर निराश होऊन परत जावें. असे कित्येक महिने लोटले. अभिषेकाचा दिवस उगवला. लांकडें आणि बांबूचा उंच माचा बांधण्यांत आला. चामुंडरायाचा आवडता सेनापति म्हणजे लोकांच्या कृतज्ञतेचें केन्द्र! स्वतः भक्तीची मूर्ति. त्याला दुधाचा तोटा कसा पडेल? परन्तु दुधाचे घडेच्या घडे ओतले गेले तरीहि दूध आणि पंचामृत मूर्तीच्या कमरेपर्यंतहि पोहोंचूं शकलें नाहीं. सगळे घाबरले. कोठेंतरी दैव आडवें आलें असलें पाहिजे. अखेर ज्ञात्यांनीं चूक शोधून काढली. वांगेताईला आपलें दूध घेऊन येण्याचें फर्मान निघालें. त्या सालींतलें दूध मूर्तीच्या डोक्यावर ओतण्यांत आलें. आणि किती आश्चर्याची गोष्ट! १० तोळे दूध असेल नसेल, पण तें डोक्यावरून पायापर्यंत पोहोंचलें. इतकेंच काय पण तें खालीं वाहूंहि लागलें. लोक म्हणूं लागले, "या गुल्लताईचें हृदय खरें भक्तहृदय आहे." मानसन्मानाची भावना तिला शिवली देखील नाहीं. चामुंडरायानेंहि जाणलें कीं अखेर इतकी मेहनत, एवढा खर्च आणि हें वैभव एका शिंपलीभर भक्तीसमोर कांहींच नाहीं. त्यानें गुल्लकायजीची एक मूर्ति त्याच टेकडीवर स्थापिली आणि अशा प्रकारें आपली नम्रता जगजाहीर केली. अर्धाअधिक रस्ता आम्ही चढून गेलों आणि 'अखंड बागलू' दरवाजा आला.

हा दरवाजा एका अखंड दगडांतून कोरून काढलेला आहे कीं एकादा अवाढव्य दगड ह्या पायऱ्यांच्या मार्गांत व्यत्ययरूप झाल्यामुळें त्याचें तेथून

उच्चाटण करण्यापेक्षां त्याला खोदून त्यांतूनच दरवाजा तयार करण्यांत आला आहे ! ह्या दिंडीवर गजान्तलक्ष्मी कोरलेली आहे. पद्मासनावर बसलेली लक्ष्मी आणि तिच्या दोहों बाजूंना पाण्याचे घडे भरभरून तिच्यावर अभिषेक करणारे दोन हत्ती. दुसऱ्या एका ठिकाणीं लक्ष्मीच्या एका बाजूला हत्ती आणि दुसऱ्या बाजूला सवत्स धेनु काढलेली आहे. ह्यांतलें पौराणिक रहस्य समजावून घेणें जरूर आहे.

आम्ही पायऱ्या चढून गेलों आणि भिंतीपाशीं येऊन पोहोंचलों. आतां झटकन् आंत जाऊन बाहुबलीच्या दिगंबर मूर्तीचें दर्शन घ्यायला आम्ही अगदीं उतावीळ झालों होतों. तरीहि वरून मागल्या तलावाचें आणि समोरच्या चंद्रागिरिचें दर्शन घेण्याची इच्छा आम्हांला दाबतां आली नाहीं. वारा अगदीं सोसाट्याचा सुटला होता. आम्हांला स्थानभ्रष्ट करण्याची संधि मिळाली असती तर तसें करण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नसतें. सूर्यजी भास्कर ढगांच्या आडून आपले हात लांबवून आम्हांला गोंजारतां येईल कीं नाहीं तें अजमावित होते. आणि खुद्द पर्जन्याची स्वारी समोर उभी राहून स्वमुखानें आश्वासन देत होती कीं, " घाबरूं नका, तुम्ही दर्शन घेऊन परत आपल्या मोटारींत बसेपर्यंत मी कांहीं कोसळत नाहीं. "

आम्ही पुन्हां वर चढूं लागलों, तों गुल्लकाय बागलू( दरवाजा )नें आम्हांला बजावलें, " केवळ दर्शक म्हणून, टूरिस्ट म्हणून वर जाऊं नका; हिंदु आहांत, आत्मार्थी आहांत, श्रद्धावान आहांत, भक्त आहांत ! यात्रेकरू म्हणून जा, मूर्तींत व्यक्त होणाऱ्या चैतन्याचें दर्शन घ्यायला जा ! "

अर्ध्या रस्त्यावर पोहोंचलों तों ' अखंड बागलू ' म्हणतो, " शैव आणि वैष्णव, शाक्त आणि जैन सगळे भेद नांवाचेच आहेत. व्यर्थ आहेत. भारताची संस्कृतिलक्ष्मी एक आहे, अखंड आहे, बलशाली आहे. त्या एकत्वाचा जेव्हां साक्षात्कार होईल तेव्हां भरतपुत्र बाहुबली बनतील आणि आत्मविजयाच्या द्वारें विश्वविजय मिळवून विश्वकल्याणाची मुहूर्तमेढ रोवतील. "

हा संदेश मिळाल्यावर प्रेरणेचे पंख लावून आम्ही वर चढूं लागलों आणि त्यामुळेंच कठिण चढावाचा आम्हांला शीण वाटला नाहीं.

## चामुंडरायाचा शोध

एका राजपुरुषाची माता धर्मनिष्ठ होती. तिनें बाहुबलीची कथा ऐकली. रजोगुणांतून सत्त्वगुणाचा उदय कसा झाला, अभिमानाच्या फत्तरांतून आत्मपरिचयाची अभिव्यक्ति कशी आली ह्याची कथा ऐकून तिच्या हृदयांत श्रद्धेचा झरा फुटला. तिला वाटलें, बाहुबलीचें दर्शन घडलें नाहीं तर हें जीवन व्यर्थ आहे. कोणीतरी तिला सांगितलें कीं कोठेंतरी बाहुबलीची हजार हात उंच आणि सुवर्णमयी अशी मूर्ति आहे. तिनें त्या मूर्तीच्या दर्शनाचा ध्यास घेतला. मुलाला समजून चुकलें कीं जर आई आपणाला जिवंत रहायला हवी असेल तर बाहुबलीच्या मूर्तीचा शोध लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. राजपुरुष क्षत्रिय होता; चतुरंग सेना घेऊन निघाला. चारी दिशा पालथ्या घालायचें त्यानें ठरवलें. माझे लाखों सैनिक आहेत. चारी दिशांना व्यापून टाकतील. मग हजार हात उंच मूर्ति कोठें दडी मारून बसणार? केव्हां तरी ती सांपडणारच! माझ्या मातेचे डोळे कृतार्थ होतील. आणि मी सुपुत्र म्हणविला जाईन.

सैन्यासह फिरत फिरत तो दक्षिण दिशेस आला. तेथें एका जैन मुनीनें त्याला हटकलें, "हे शूरवीर, इतकी सेना घेऊन तूं कशासाठीं निघाला आहेस? कोणता देश पादाक्रांत करावयाचा आहे? किती घरांत हाहा:कार माजवावयाचा आहे? करभाराबरोबरच किती हृदयांचे शाप वसूल करायचे आहेत?"

राजपुरुष उत्तरला, "मला यांपैकीं कांहींहि करावयाचें नाहीं. मी गोमटेश्वराचें दर्शन घ्यायला निघालों आहे. माझ्या मातेला त्याच्या दर्शनाचा ध्यास लागला आहे."

साधु म्हणाला, "ती मूर्ति आहे खरी, पण इहलोकांत नाहीं. लाखलाख यक्ष तिचें रक्षण करीत आहेत. कोणत्याच मानवाला तिचें दर्शन घडूं शकलेलें नाहीं. परंतु बाहुबली तुला गोमटेश्वराचें दर्शन करवील. ह्या चंद्रगिरींत बरेच जैन साधु तप करीत आहेत. त्यांच्यासमोर तो विन्ध्यगिरि आहे. त्याच्या शिखरावर बाहुबली उभा राहून तप करीत आहे. दुनियेंतलि दु:ख पाहून तो कारुण्यपूर्ण नजरेनें म्हणत आहे,

'कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम्'

ह्या चंद्रागिरीच्या शिखरावरून जर तूं सोन्याचा एक बाण सोडशील तर बाहुबलीची मूर्ति दृग्गोचर होईल."

राजपुरुषानें रत्नखचित धनुष्य हातीं घेतलें. तीन हात लांब सोन्याचा बाण धनुष्यावर चढवला. टणत्कार करीत बाण हवा कापीत निघाला. विंध्यगिरीचें शिखर हाललें. दगडाचे पट गळून पडले. आणि मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा यांचा ब्रह्मविहार दर्शविणारें गोमटेश्वराचें मस्तक प्रकट झालें. राजपुरुष आनंदानें देहभान विसरला. त्याच्या मातेच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागले. तत्क्षणीं असंख्य मूर्तिकार तेथें येऊन पोहोंचले. प्रत्येकाच्या हातांत हिऱ्याची छिनी होती. ते बाहुबलीच्या मस्तकाचें दर्शन करीत आणि आजूबाजूंचे दगड फोडीत जात. खांदे उघडे झाले; छाती उघडी पडली; बाहूंवर, विशाल बाहूंवर लपेटलेली माधवीलता स्पष्ट दिसूं लागली. ते पायांपर्यंत येऊन पोहोंचले. तेथें प्राचीन वल्मीक (वारूळ) होतें. त्यांतून महाभुजंग बाहेर पडूं लागले. परन्तु अगदीं अहिंसक मूर्तिकार अगदीं पावलापर्यंत आले. पावलांचीं नखें चमकूं लागलीं. त्यांच्याखालीं एक कमळ उगवलें. तें पाहून सगळ्यांचीं वदनकमळेंहि विकसित झालीं. भक्तमातेचें हृदयकमळ प्रफुल्लित झालें. आतां तिला अधिक जगण्याची लालसा उरली नाहीं. तिनें कृतार्थ होऊन आपलें जीवनकमल तेथल्या तेथेंच प्रभूच्या चरणकमलीं अर्पण केलें.

आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. सगळेच धन्य धन्य म्हणूं लागले. काय त्या मूर्तीची अंगकांति! दिगंबर आणि पवित्र, मोहक आणि पावक, तारक आणि उद्धारक!! जितक्यांनीं त्या मूर्तीचें दर्शन घेतलें, जणूं त्या साऱ्यांचा पुनर्जन्मच झाला. ते नव्या नजरेनें जगाकडे पाहूं लागले. त्यांचे राग द्वेष जणूं वितळून गेले. त्यांच्या हृदयांत नव्या सात्त्विक आनंदाचा झरा फुटला. आणि ते सारे 'जय गोमटेश्वर; जय गोमटेश्वर' चा जयध्वनि करूं लागले!

## गोमटेश्वर

आम्ही जेव्हां बाहुबलीच्या दर्शनाला गेलों. तेव्हां शास्त्रमर्यादा ध्यानांत

धरून मूर्तीचें आपादमस्तक पुनःपुनः दर्शन घेतलें. मूर्तीच्या चरणांच्या दोन बाजूंना दोन लेख कोरलेले आहेत. एकीकडे जुन्या नागरी लिपींत आणि दुसरीकडे कानडी लिपींत. परन्तु दोन्ही ठिकाणीं एकच मराठी वाक्य आहे. 'चामुंडरायें करविलें.' मराठी भाषेचे इतिहासकार म्हणतात कीं मराठी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांत आणि शिलालेखांत हें वाक्य जुन्यांत जुनें आहे. आजच्या माहितीप्रमाणें मराठीचा प्रारंभ झाला तो याच वाक्यानें. चामुंडरायांचे वडील देवीभक्त असावेत. कारण आपल्या मुलाचें नांव त्यांनीं चामुंडा देवीवरून ठेवलें. एका शाक्ताचा मुलगा अहिंसामार्गी जैन धर्माचा उपासक झाला, असेंहि त्या काळचा इतिहास सांगतो. मराठी भाषेच्या बालपणीं लिहिण्यासाठीं दोन लिप्यांचा उपयोग होत असावा. मराठी आणि कन्नड, ज्या काळीं सख्ख्या बहिणींप्रमाणें राहात होत्या त्या काळींच हा शिलालेख तयार करण्यांत आला असावा.

चामुंडराय राजपुरुष होता. त्याची भाषा मराठी असूनदेखील प्रजेंतील दोन्ही लिप्यांचा तो पुरस्कर्ता होता. माझ्या मधुर, भोळ्या 'मऱ्हाठी' भाषियेचें हें द्विविध दर्शन घेऊन मी सद्‌गदित झालों. आणि मराठी भाषेचा उगम येथें झाला या विचारानेंच महाराष्ट्री गिरेच्या या गंगोत्रींत न्हाऊन मी पावनहि झालों.

मग माझें लक्ष वारुळांतून निघणाऱ्या मोठमोठ्या नागांकडे गेलें. पोलादी तलवारीला पारसमण्याचा स्पर्श झाल्यावर बनलेल्या सोन्याची तलवार आकारानें तलवारच राहते. पण कोणाची हत्या करण्याची शक्ति तिच्यांत राहात नाहीं. उलट कोणावर प्रहार करूं गेल्यास स्वतःच खंडित होऊन आपलें सुवर्णपण जाहीर करते. तसें कारुण्यमूर्ति अहिंसाधर्मी बाहुबलीच्या चरणाशीं स्थान पावलेले ते महाव्याळ अगदीं अहिंसक बनले आहेत. आणि आपली फणा पसरून जणूं साऱ्या जगाला अभयदान देत आहेत.

नजर थोडी वर वळली तों दोन्हीकडून दोन माधवीलता महापराक्रमी बाहुबलीच्या आधारानें आपली उन्नति साधत असलेल्या दिसल्या. एकाद्या धीरोदात्त नायकाला लतेसारख्या नायिकेनें आलिंगन द्यावें तसें ह्या माधवी-लतांनीं त्या साधनवीराला वेष्टून टाकलें आहे. त्या लतांनीं म्हटलें असावें, "ह्या तपोवीराची मी काय सेवा करूं शकेन ? माझें काम केवळ त्याची

कठोर तपस्या झांकून टाकून त्यांतून जगाप्रीत्यर्थ प्रकट होणारी कोमलता व प्रसन्नता व्यक्त करणें हेंच आहे. बाहुबलीला मी वेढून टाकलें आहे खरें परंतु मी त्याचें बंधन नाहीं. बंधमुक्त झालेल्या ह्या मुक्तात्म्याचें हृदय किती कोमल आहे याचा अंगुली-निर्देश करण्यासाठीं मी त्याच्या पायापासून हृदयापर्यंत चढलें आहे. ”

लौकिक शिष्टाचारांत मुरलेल्या आपणांला ह्या मूर्तीकडे पाहतांच असें वाटूं लागतें कीं ही मूर्ति नग्न आहे. आपल्या मनांत आणि समाजांत आपण अनेक प्रकारच्या घाणेरड्या गोष्टींचा संग्रह करीत असतों. परंतु आपणांला त्याची चीडहि येत नाहीं किंवा लाजहि वाटत नाहीं. परंतु नग्नतेचें दर्शन घडलें कीं आपला जीव घाबरतो आणि आपणास वाटूं लागतें कीं नग्नतेंत अश्लीलता आहे, त्यांत सदाचाराचा द्रोह आहे. ती लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. आपली नग्नता टाळण्यासाठीं कांहीं लोकांनीं आत्महत्याहि केलेली आहे. पण नग्नता खरोखरच इतकी अभद्र आहे काय ? खरोखरीच वाईट आहे काय ? तसें असतें तर निसर्गालाच त्याची लाज वाटली असती. फुलें नग्न असतात, पशुपक्षीहि नग्न राहतात. निसर्गाशीं असलेलें आपलें एकत्व ज्यांनीं गमावलेलें नाहीं अशीं बालकेंहि उघडीनागडीं हिंडतात. त्यांना त्याची शरम वाटत नाहीं. आणि त्यांच्या निर्व्याजतेमुळें आपणांलाहि त्यांत कांहीं लाज वाटण्यासारखें वाटत नाहीं. लज्जेचें एक वेळ राहूं द्या; पण त्यांत कांहीं अश्लील, बीभत्स, जुगुप्सित, कुरूप आहे असा कोणाचाच अनुभव नाहीं. याचें कारण काय ? कारण हेंच कीं नग्नता प्राकृतिक स्थिति असल्यामुळें स्वभावसुंदर आहे. माणसानें विकृत ध्यान करकरून आपल्या मनाचे विकार ह्या स्थितीला नेऊन पोहोंचविले आहेत आणि त्यांना उलट्या मार्गानें वळविलें आहे; म्हणून स्वभावसुंदर नग्नता त्याला सहन होत नाहीं. दोष नग्नतेचा नसून आपल्या कृत्रिम जीवनाचा आहे. आजारी मनुष्याजवळ परिपक्व फळें, पौष्टिक मेवा आणि सात्त्विक आहार ठेवतां येत नाहींत यांत दोष खाद्य पदार्थांचा नसून मनुष्याच्या आजाराचा आहे. नग्नतेवर आपण पांघरूण घालतों तें नग्नतेच्या दोषामुळें नव्हे तर माणसाच्या मानसिक रोगामुळें. नग्नता लपविण्यांत तिच्याविषयीं वाटणारी शरम नसून त्याच्या मुळाशीं विकारी

माणसाविषयींचा दयाभाव आहे—रक्षणवृत्ति आहे. तसें करण्यांतहि आर्यवृत्ति नसेल तर तेथें केवळ दंभच भरलेला असतो.

परंतु ज्याप्रमाणें नराधमहि बालकांपुढें सौम्य आणि निर्मळ बनतो त्याप्रमाणें पुण्य पुरुषांसमोर, वीतराग विभूतींसमोर तो शमान्वित बनतो. जेथें भव्यता आहे, दिव्यता आहे, तेथें मनुष्यहि विशुद्ध बनत असतो. मूर्तिकारांच्या मनांत असतें तर माधवीलतेची एक शाखा कमरेपर्यंत नेऊन नग्नता झांकून टाकणें कांहीं त्यांना अशक्य नव्हतें. पण मग त्यांना आपल्या सर्व तत्त्वज्ञानाचा अस्वीकार करण्यासारखें झालें असतें. नग्न मुलें जेव्हां तुमच्यासमोर येऊन उभीं राहातात तेव्हां कात्यायनी व्रत करणाऱ्या मूर्तीप्रमाणें हातांनीं तीं आपली नग्नता झांकून घेत नाहींत. त्यांचा निःसंकोचच त्यांच्या नग्नतेला पवित्र बनवितो. दुसरीं आवरणें त्यांना काय कामाचीं ?

जेव्हां मी गोमटेश्वराची मूर्ति पाहायला गेलों होतों त्यावेळीं माझ्याबरोबर स्त्रीपुरुष, मुलें, वृद्ध सर्व होते. त्या मूर्तीचें दर्शन घेतांना आम्हांपैकीं कोणालाहि अस्वस्थता वाटली नाहीं. अनुचित वाटण्याचा प्रश्नच नव्हता. मी अनेक नग्न मूर्ती पाहिल्या आहेत. परंतु त्यामुळें मन विकारी बनण्याऐवजीं त्यामुळेंच तें निर्विकारी झाल्याचा अनुभव मला आला आहे आणि मी अशाहि मूर्ति आणि चित्रें पाहिलीं आहेत कीं, तीं वस्त्राभूषणांकित असूनहि केवळ विकारप्रेरक आणि उन्मादक वाटलीं आहेत. औपचारिक म्हणून फक्त एकादी लंगोटी नेसणारे साधू आपल्याभोंवतीं वैराग्याचें वातावरण निर्माण करूं शकतात. उलट नखशिखांत वस्त्राच्छादित एकादी व्यक्ति डोळ्यांच्या एका कटाक्षानें किंवा एकाद्या हावभावानें माणसाला अस्वस्थ करून सोडते व पतित बनविते.

आपली नग्नतेविषयींची दृष्टि आणि विकाराबाबतचें वळण हीं दोन्हीं बदललीं पाहिजेत. आपण एकीकडे विकारांचें संवर्धन करीत असतों तर दुसरीकडे शिष्टाचाराचें रक्षण करूं पहात असतों.

बाहुबली बाहुबलि आहे. परंतु त्याचें शरीर एकाद्या मल्लाप्रमाणें कसलेलें दाखविलेलें नाहीं. तशी हौस यावनी मूर्तिकारांत आढळते. आपले मूर्तिकार जडद्वारा चैतन्य प्रकट करूं इच्छित असत. माणसाच्या पाशवी शक्ति व्यक्त करण्याऐवजीं त्यांच्यावर विजय मिळविणाऱ्या वैराग्याची आणि

प्रशमाची प्रसन्नता व्यक्त करून [illegible]विश्वाच्या त्यांचा प्रश्न असे. बाहुबलीच्या कमरेंत दृढता आहे. त्याची छाती विशाल आहे; त्याचे खांदे रुंद आहेत. सबंध जगाचा भार वाहणें त्याला पोरखेळ आहे. तो कंबुग्रीव असता, गूढ-जत्रु असता तर सबंध मूर्तीचें सौंदर्य अधिक खुललें असतें ही गोष्ट जरी खरी आहे तरीहि रुंद आणि पुष्ट कंठ अनायासें अधिक सौंदर्यवान् वाटतो. आणि त्याच्यावर विराजमान झालेल्या मस्तकाचें कौमार्य अधिक चांगल्या रीतीनें व्यक्त करून दाखवितो.

मूर्तीचें सबंध शरीर बांधेसूद, यौवनपूर्ण, नाजुक, आणि कांतिमान आहे. अेवढ्या मोठ्या मूर्तीत प्रमाणबद्धता राखणें फारच कठिण. एकाच दगडांतून कोरून काढलेली एवढी भव्य मूर्ति सबंध जगांत कोठेंच नाहीं. मिसर देशांत मोठमोठ्या मूर्ति आहेत. पण त्या इतक्या भावनाशून्य दिसतात कीं राजत्वाचीं सगळीं लक्षणें आणि चिन्हें त्यांच्यावर असलीं तरी कोठून तरी पकडून आणून बळेंच बसविलेल्या आणि नाइलाजानें बसावयास तयार झालेल्या भासतात. तसें येथें नाहीं. एवढी मोठी मूर्ति इतकी स्नेहार्द्र आहे कीं, भक्तीबरोबर ती प्रेमाचीहि अधिकारी आहे असें वाटतें.

पुष्कळ वेळां असेंहि होतें कीं मूर्तिकार मूर्ति प्रमाणबद्ध बनवितात. परंतु ज्यामुळें व्यक्तित्व उठून दिसतें ती मुखमुद्रा बनविण्यांत असमर्थ ठरतात. त्यामुळें कोणत्याहि मूर्तीकडे पाहतांना मी तिच्या चेहऱ्याकडे निराशेच्या अपेक्षेनें भीतभीत नजर टाकतों. उत्तम उत्तम मूर्तीत कोठें ना कोठें दोष राहूनच जातो. आणि क्षीरसागरांत अेकादा मिठाचा खडा पडतो. या मूर्तीचा थोडासा पुढें आलेला अधरोष्ठ पाहून आपला उत्साहभंग होतो कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. म्हणून अधिक लक्षपूर्वक पाहूं लागलों. समोरून पाहिलें, बाजूला जाऊन पाहिलें. चिकित्सेच्या नजरेनें पाहिलें. भक्तिभावानें पाहिलें. कोणत्या तरी निश्चयावर पोहोंचण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. जोंपर्यंत मी मूर्तीचें सौंदर्य न्याहाळीत होतों तोंपर्यंत मला कांहींच निर्णय करतां येईना. चित्तांत अनिश्चिततेची अस्वस्थताच पसरूं लागली. परंतु लागलींच मी भानावर आलों. वेड्या मनाला मी म्हटलें, "सौंदर्याचा तर येथें पूर आला आहे. पण सौंदर्य शोधत बसण्याचें हें स्थळ नव्हे. मुखमंडलावर जर नुसतेंच रूपलावण्य असेल, भाव नसतील तर ती पूजा-

मूर्ति बनूंच शकत नाहीं. तिच्यापासून कोणतीच प्रेरणा मिळूं शकणार नाहीं. ही मूर्ति येथें लौकिकाची दीक्षा देण्यासाठीं उभी ठाकलेली नाहीं. ती स्वतःच तुला सारें कांहीं निवेदन करील."

दृष्टि बदलली आणि त्या मूर्तीच्या भावांकडे ध्यान वेधलें. मग काय विचारावें? क्षणांत वैराग्य आणि कारुण्याचा भाव जागृत झाला. छेः! वैराग्य आणि कारुण्याची गंगा दुथडी वाहूं लागली. आणि चित्त त्यांत पावन होऊन क्षणाक्षणाला त्या भव्यतेच्या उच्चतेप्रत चढूं लागलें. एका आचार्यांनीं अशाच एकाद्या भव्य मूर्तीचें वर्णन करतांना म्हटलें असेल,

यत्कारुण्यकटाक्षकान्तिलहरी प्रक्षालयत्याशयम्* ।

या वर्णनाच्या यथार्थतेचा आम्हांला येथें अगदीं पुरापुरा अनुभव येऊं लागला. मूर्तीच्या तोंडावर थोडासा विषाद आहे. मनुष्याची दुर्बलता, त्याची आसक्ति, आणि दीर्घकाल पाहात राहिल्यानें दिसणारें मनुष्यजातीविषयींचें पारावार दुःख त्या डोळ्यांत आणि त्या ओठांत सामावलेलें आहे. आणि इतकें असूनहि जरा देखील निराशा किंवा चीड नाहीं. दुनिया तर अशीच आहे आणि अशी आहे म्हणूनच तिच्या उद्धाराचा प्रश्न उत्पन्न होतो. मानवाची पापप्रवणता अधिक बलवान आहे कीं महापुरुषांची, बोधितत्त्वाची, तीर्थंकरांची आणि अवतारांची क्षमावृत्ति व कारुण्यवृत्ति अधिक आहे या प्रश्नाचें उत्तर माणसाला सदा एकाच रीतीनें मिळालें आहे. आणि तेंच उत्तर या मूर्तीच्या मुखमुद्रेवरून आपणांस मिळतें.

मूर्तीचे कान शरीररचनेशीं प्रमाणबद्ध नाहींत परंतु ते मूर्तीची प्रतिष्ठा वाढवायला कारणीभूत झाले आहेत, इतकेंच नव्हे तर सौंदर्यसिद्धीचें प्रमाण ते आपणाला शिकवितात. मला तर या मूर्तीचे डोळे, तिचे ओंठ, तिची हनुवटी, भुंवया, तिच्या ओंठावरचें कारुण्य–सगळेंच कांहीं असाधारण वाटलें! ज्याप्रमाणें आकाशांतील तारे लाखों वर्षें चमकत आहेत तरीहि त्यांच्यांतली 'नित्यनूतनता' नष्ट झालेली नाहीं; ज्याप्रमाणें उषा वेदकालापासून आजतागायत आपलें लावण्य आणि आपलें तारुण्य संभाळीत आली

* जिच्या कारुण्यपूर्ण कृपादृष्टीच्या जल-प्रवाहानें हृदयाचे भाव धुवून जाऊन शुद्ध होवाव.

आहे, तशी ही मूर्तिहि आज जवळ जवळ एक हजार वर्षें येथें उभी असूनहि जशीच्या तशी, ताजी तवानी, तितकीच द्युतिमति आणि सुभग आहे. ऊन, हवा आणि पाण्याच्या प्रभावामुळें मागील बाजूचे थोडेसे लहान लहान पोपडे निघाले आहेत खरे; परंतु तेवढ्यानें तिचें लावण्य खंडित झालेलें नाहीं. असें म्हणतात कीं अमेरिकेंतील एका फंडाच्या ट्रस्टींनीं या मूर्तीचा दगड अधिक जीर्ण होऊं नये म्हणून त्याच्यावर कांहीं औषधि पुट चढविण्याचा प्रयत्न चालविला होता. परंतु जैन लोकांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. हजार वर्षें जी मूर्ति जशीच्या तशीच आहे ती ईश्वराची इच्छा असेल तर आणखी हजार वर्षें जशीच्या तशीच राहील आणि तशी राहिली नाहीं तर ती ज्या स्थितींत राहील त्या स्थितींत आम्ही तिची पूजा करूं, असें त्यांचें म्हणणें आहे.

विरुद्ध पक्षाचे रक्षणवादी लोक म्हणतात कीं, 'ह्या मूर्तीची मालकी जैन लोकांची का असेना परंतु तें साऱ्या जगाचें अलौकिक धन आहे; शिल्पकलेचें अतुल रत्न आहे, अशेष मानव जातीचा अमूल्य वारसा आहे. हजार वर्षें तो टिकला ही ईश्वराची कृपा. परंतु निसर्गापासून त्याचें रक्षण करून हजारच काय लाखों वर्षें तो संभाळला पाहिजे. आणि भविष्यकालीन अगणित कोटी मानवांना त्यापासून प्रेरणा मिळूं शकेल ह्या स्थितींत तो राखणें हा आमचा धर्म आहे. तिच्यावर वार्निश चढवून तिला बिघडविण्याचें निंद्य कर्म आम्हांस करावयाचें नाहीं. मूर्ति आहे तशीच दिसावी, तिच्या हावभावांत जरासुद्धां उणीव न दिसावी, तिच्यांत थोडें देखील परिवर्तन न व्हावें ह्या सर्व गोष्टी संभाळून आम्ही तिचें आयुष्य वाढवूं इच्छितों. विज्ञानाचे शोध ज्या मर्यादेपर्यंत जाऊं शकतात. तेथपर्यंत जाऊन आपण अशा अलौकिक मूर्तीचें रक्षण केलें पाहिजे. बुद्धिदात्या जगत्प्रभूनें आपणांस जें विज्ञान दिलें त्याचा उपयोग काय? एकवेळ तरी विज्ञानाचा सदुपयोग होऊं द्या!'

दोन्ही पक्षांच्या वतीनें अनेक गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत. दोन्ही कडचे मुद्दे जोखतां तपासतां दृष्टि पुनः एकदां गोमटेश्वराकडे लागली. आणि पाहतों तों मूर्तिरूप राहिलेंच नव्हतें. गोमटेश्वर स्वतःच मूकवाणींत म्हणूं लागले :

**" किती पामर आहेत हे मानव! मीं वैराग्याचें तप सुरू केलें आहे,**

आणि तुम्ही माझ्या या मूर्तीकडे कृपेच्या नजरेनें पाहतां ? तिच्या लावण्यावर मोहित होतां ? अलम दुनियेचें चक्रवर्तित्व मीं एका क्षणांत फेंकून दिलें आणि तुम्ही या दगडाच्या दौलतीचा वारसा भविष्यकालीन पिढ्यांसाठीं जपून ठेवूं पाहतां. तुम्ही जडवादी आधुनिक लोक ह्या फत्तरांच्या रूपलावण्याची उपासना करितां आणि ते सनातनी जैन माझ्या जीवनकथेवर मोहित झाले आहेत आणि माझ्या नांवावर रचल्या गेलेल्या शास्त्रवचनांच्या शब्दार्थांना चिकटून रहात आहेत ! माझ्या जीवनाचा बोध तुम्हांला आपल्या आवांक्याबाहेरचा वाटतो म्हणून पूजेची लालूच दाखवून मलाच तुम्ही आपल्या पातळीवर आणूं पहातां. दोघेहि एकाच माळेचे मणि ! तुमची ती चर्चा राहूं दे. वैराग्याचा संदेश देत, प्रशमाचा बोध करीत नऊशें एकवीस वर्षें मी येथें तपश्चर्या करीत उभा आहें, त्याचा तुमच्यावर कांहींच परिणाम कसा होत नाहीं ? दिवसेंदिवस तुम्ही कल्याण मार्गापासून दूर दूर जात चालला आहांत त्यामुळें माझ्या चर्येवर विषादाचा जो भाव उठत चालला आहे तो तुम्हांला दिसत नाहीं काय ? थंडी, ऊन, हवा आणि पाऊस यापासून तुम्ही माझें रक्षण करूं पाहतां आहांत परन्तु तुमच्या मूढतेची आणि वेडेपणाची वाढती माला पाहून माझ्या मुखकांतीवर जें दुःख, जी ग्लानि आणि जो विशाद अधिकाधिक पसरत चालला आहे त्यापासून माझें रक्षण करण्यासाठीं तुम्ही काय करायला तयार आहांत ? या गोष्टीची चर्चा करा; मनन करा. दगडाचा एक ना एक दिवस चुरा होणारच आहे. परन्तु तुम्हांला आजपर्यंत जी संधि मिळाली तिचा तुम्ही काय उपयोग केलात ? या दगडाच्या मूर्तीचें जतन करावयाचें असेल तर खुशाल करा; ती तयार करणाऱ्या प्राचीन कलाकारांच्या बाबतींत तो तुमचा धर्म आहे. परन्तु तुमचाहि मुख्य धर्म हा आहे कीं जो बोध मला मिळाला आणि ज्यामुळें माझें जीवन सफल झालें त्या बोधाची परंपरा तुम्ही अबाधित राखा आणि हजारों नि लाखों वर्षेंपर्यंत जर तुमच्या मानवी जीवनाची परंपरा चालली तर त्या सर्वांना—अशेष सत्त्वांना—कल्याणप्रद बोध आणि कल्याणप्रद साधना प्राप्त होईल अशी परंपरा राखा ! "

असें झालें तर प्रत्येकाचें जीवन कलामय, लावण्यमय, आशीर्वादरूप बनेल यांत संशय नाहीं ! !

# जोगकडे १४

( एक पत्र )

—१—

रेशमी कपडे जों जों जुने होतात तों तों ते कमजोर होत जातात. परंतु त्यांची चमक वाढते. प्रवास-स्मरणांच्या बाबतींत हीच गोष्ट लागू आहे. स्मरणें जितकीं जुनीं तितका त्यांचा अद्भुत रस अधिक आणि तपशील कमी. या दोषांतून मुक्त होण्यासाठीं प्रवासांतील मौजा लवकर पाठवाव्या असें वाटतें. परंतु रेल्वेचा प्रवास म्हणजे चक्रम् भ्रमति मस्तके ! . .

—२—

एकदां एक इंग्रज, एक स्कॉचमन आणि एक आयरिश माणूस असे तिघे फ्रान्समध्यें प्रवास करीत होते. फ्रान्समधील आगगाड्या फार हळू चालतात अशी तिघांची तक्रार होती. इंग्रज म्हणे, " इंग्लंडांतल्या आगगाड्या इतक्या वेगांत धांवतात कीं एक एक फर्लांगावर पुरलेले रेल्वेचे खांब जवळजवळ येऊन त्यांचेंच एक मोठें जंगल बनतें. "

स्कॉचमन म्हणे, " इतकेंच ? आमच्याकडे मी एकदां एक्सप्रेसमध्यें बसून जात होतों तेव्हां एकामागून एक गांवें झपाट्यानें येत होतीं. तीं इतकीं सरमिसळ होऊन गेलीं होतीं कीं त्यांचें एक मोठें शहर बनलें होतें ! "

आयरिशमनची कल्पना सर्वांत पुढें धांवली. त्यानें म्हटलें, " अरे जा, जा ! त्यांत काय मोठेंसें ? आमच्याकडे एकादी साधी मालगाडीहि इतकी झपाट्यानें पळते ! एक दिवस आम्ही एक कोबीचें शेत पार करीत होतों. तोंच एक तलाव आला आणि त्यानंतर जंगलांत दावानल पेटला होता. गाडीच्या वेगामुळें तिन्ही एकत्र झाले आणि कोबीची उत्तम भाजी शिजून तयार झाली ! "

गिरसप्पाच्या धबधब्यापासून धनुष्कोटीच्या सेतूपर्यंतचा आमचा प्रवास इतका झपाट्यानें झाला आहे कीं त्यांतून डोक्यांत कोणतें पक्वान्न तयार होईल हें सांगणें कठिण आहे. लहानपणीं आपल्याकडे तूं ‘ खतखतअ ’ खाल्ले असशील; परंतु तूं तें विसरूनहि गेला असशील. अमुक एका ऋतूंत जितक्या प्रकारची भाजी मिळेल ती एकत्र करून उकडतात. अशा भाजीला कोंकणींत ‘ खतखतअ ’ म्हणतात. अशा प्रकारचें खतखतअ डोक्यांत तयार झालें आहे. स्मरणशक्तीला ताण देऊन हे सारे अनुभव जर पिंजून काढले तर त्यांतले तंतू कांहींसे मोकळे पडतील. परंतु जास्त पिंजूं म्हणेन तर त्या तंतूंत कणि पडेल.

—३—

परंतु तुला प्रवासाचा इतिहास नको असतो. प्रवासांतील मौजा हव्या असतात. म्हणून इकडच्या मंदिरांतून चित्रविचित्र प्राणी कोरलेले असतात. सिंहाला हत्तीची सोंड आणि मगरीचे दांत व बैलाचे डोळे आणि शिंगें—अशाप्रकारचें जर माझें वर्णन उतरलें तर तूं तक्रार करणार नाहींसच.

—४—

बंगळूरला कुमारपार्कमध्यें रहावयास गेलों. तेथें मी एक मोठा शोध लावला. आणि तो हा कीं दाक्षिणेकडे लोक पूर्वजन्मीं शहामृग होते. शहामृग आपलें खाद्य खाल्ल्यानंतर खडे टिपून खातो हें तुला माहित आहे. आंतड्यांत खडे जसजसे घासले जातात तसतसें अन्न अनायास पचतें. बंगळूरला प्रत्येक जेवणांत खडे हे असायचेच. भातांत खडे, भाजींत खडे, इडली, डोशा, उपमा यांच्यांतहि खडे. इडली म्हणजे आपलीं ‘ सान्नें ’, डोशा म्हणजे घावन आणि उपमा म्हणजे उप्पिट. डाळ जर वरवरची प्याली तर मिरच्याबरोबर खडे येण्याची भीति कमी. थोडेंसे खालीं उतरा कीं एखादा खडा तोंडापर्यंत येऊन पोहोंचायचाच. दातांनीं चावून खायची संवय इकडील लोकांना कमी. त्यामुळें दांत आणि खडे यांचें युद्ध होत नाहीं. मिरच्याशिवाय स्वयंपाक तर होतच नाहीं. आणि खूप आग्रह करून मिरच्या टाकूं नका म्हटलें तर मग मीठहि टाकीत नाहींत ! मीठ आणि मिरच्या बरोबरच

असल्या पाहिजेत ना ? परंतु आपण येथें कांहीं खाण्यासाठीं किंवा आपल्या कर्नाटकाची निंदा करण्यासाठीं आलों नाहीं.

आमची पहिली सफर गिरसप्पाचा धबधबा पाहण्यासाठीं होती. म्हणून गांधीजींना खादी फंड गोळा करण्यासाठीं जाऊं देऊन आम्हीं सरळ शीमोग्याला पोहोंचलों. शीमोगा म्हणजे तुंगानदीचा प्रदेश. पुढें गेल्यावर भद्रा नदीशीं तुंगाचा संगम होऊन तुंगभद्रा नदी बनते. आपण ती विजयनगरला पाहिली होती. पण तूं शीमोगाहि पाहिलें आहेस हें मी विसरलोंच कीं ! शीमोग्याहून आम्ही सागरला गेलों. पंचेचाळीस मैलांचा प्रवास होता. प्रवासांत मोठ्यांत मोठी अडचण पाहुणचाराची. कोणाकडे पाहुणे म्हणून गेलों कीं कैदी बनलें. वेळापत्रकानुसार चालण्याची आशाच सोडली पाहिजे. हासपेटचा अनुभव तुला आहेच.

यामुळें सागरला आम्ही मोटारींतून उतरण्याचेंच नाकारलें. "आधीं धबधबा पाह्यला जाऊं; परत आल्यावर खाण्याची गोष्ट !"

जोगचा धबधबा सागरहून अठरा मैल आहे. रस्ता तर आगुंबा घाटांतील जंगलासारखाच ! वळणें घेत घेत शेवटीं एका शांत सरोवराप्रमाणें दिसणाऱ्या नदीच्या कांठीं आलों. तिचें नांव शरावती. शरावतीच्या दोन्ही कांठांवरची झाडी अगदीं झुकलेली होती. आसपासच्या टेकड्या एकावर एक अशा चहूंकडे न्याहाळीत होत्या. पावसाळी ढग टेकड्यांच्या माथ्यावर विराजमान होते. आणि पावसाचे थेंब प्रत्येक पानावर लाल, पिवळे, निळे किरण दाखवीत होते. झाडाचें खोड कोरून बनविलेल्या एका होडींतून आम्ही पलीकडे गेलों. समोरच्या कांठावरील झाडींत लहान लहान जळवा माणसांच्या रक्तावर ताव मारण्यासाठीं टपून बसलेल्या होत्या. पानावर माणसानें पाऊल टाकलें कीं तत्क्षणीं ह्या जळवा उडून पोटऱ्यांना चिकटल्याच. आणि एकदां चिकटल्या कीं तावडतोब लागल्या रक्त शोषायला—आपणांला कळतहि नाहीं कीं त्या रक्त शोषीत आहेत म्हणून. दादाभाई नौरोजींनीं इंग्रजांना ह्या जळवांची उपमा उगीच नव्हती दिली ! एक मैलावर कोसळणाऱ्या धबधब्याचा आवाज येथून थोडासा ऐकूं येत होता. परंतु अशा शांत पाण्यांतून धबधब्याचा आवाज कसा येत असेल याची जरा सुद्धां कल्पना येत नव्हती. आदल्या दिवशीं शरावतीला मोठा

पूर आला होता. त्यामुळें कांठावर साठ फुटांपर्यंत रेती पसरली गेली होती. उंच उंच वृक्षांतून आमचा रस्ता जात होता. एका एका झाडाच्या बुंध्याचा आकार पाहण्यासाठींच इतका प्रवास केला असता तरी तें अस्थानीं किंवा अयोग्य समजलें गेलें नसतें.

शेवटीं आम्ही नदीच्या डावीकडे असलेल्या महिसुर राज्याच्या धर्मशाळेंत जाऊन पोहोंचलों. तेथें दरींत इतके ढग जमले होते कीं आकाश, डोंगर, दरी, झाड—कसलाच भेद उरला नव्हता. श्रीविष्णूच्या क्षीरसागरांत प्रवेश केल्याप्रमाणें जिकडे तिकडे दूधच दूध दिसत होतें. मात्र जोगच्या प्रचंड प्रपाताचा मेघगंभीर ध्वनि एकसारखा कानांवर पडत होता. आम्हांला वाटलें कीं इतकें दूर येऊनहि जोगचा धबधबा पाहण्याचें नशिबीं नाहीं. डोळे ताणताणून आम्ही दरीकडे पाहूं लागलों. इतक्यांत आमच्या भाग्योदयाबरोबर ढग वितळले आणि मानवी सृष्टींत ज्याची आशाहि करतां येणार नाहीं असें दिव्य दृश्य एकाएकीं आमच्या नजरेसमोर प्रगट झालें. आमच्या आनंदाला पार राहिला नाहीं.

परंतु ह्या दिव्य दृश्याचें वर्णन लांबलेल्या पत्राच्या अखेरीस देतांच येणार नाहीं. त्यासाठीं नवें पत्रच लिहिलें पाहिजे. निराशा, औत्सुक्य आणि हुरहूर यांमध्यें जो ताण आम्हांला अनुभवावा लागला त्याचा कांहीं अंशीं तुलाहि अनुभव आला पाहिजे. म्हणून पुढील पत्रापर्यंत गिरसप्पाच्या जोग धबधब्याचें तूं नुसतें ध्यानच कर.

## जोगचा धबधबा १९

हिमालय, विंध्य, आणि सह्याद्रि सारखे उत्तुंग पर्वत; गंगा, सिंधू, नर्मदा, ब्रह्मपुत्रेसारख्या सुदीर्घ नद—नद्या; चिलका, वूलर, मंचर सारखीं प्रसन्न सरोवरें ज्या देशाचें भूषण वाढवीत आहेत त्या देशांत एकादा महान् भीषण आणि रोमांचकारी जलप्रपात नसावा हें निसर्गदेवतेला कसें सहन होईल ?

कारवार जिल्हा आणि म्हैसूर संस्थान यांच्या सरहद्दीवर असा एक धबधबा आहे कीं ज्याला जगांतील अद्वितीय किंवा सार्वभौमपदाचा एकमात्र भोक्ता म्हणतां आलें नाहीं तरी अशा सर्वश्रेष्ठ धबधब्यांपैकीं तो एक आहे हें निःसंशय. इंग्रजींत त्याला गिरसप्पाचा धबधबा म्हणतात. त्याचें देशी नांव ' जोग ' आहे.

लॉर्ड कर्झन जेव्हां हिंदुस्थानांत आला तेव्हां जोगचा धबधबा पाहण्यासाठीं तो इतका उत्सुक झाला होता कीं अगदीं पहिल्याच संधीचा फायदा घेऊन तो जोग पाहायला गेला. तेथल्या अद्भुत सौंदर्याचें दर्शन घेऊन त्यानें आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें. त्या दिवसापासून आपल्या देशांत या धबधब्याची प्रतिष्ठा वाढली. लॉर्ड कर्झन जेथून धबधबा पाहून कृतकृत्य झाला तेथें म्हैसूर सरकारनें एक बांक बसविलें आहे. त्याला ' कर्झनसीट ' असें म्हणतात.

धबधब्याच्या जवळच म्हैसूर सरकारनें एक ' अतिथिशाळा ' बांधली आहे. तेथल्या प्रवाशांच्या ' टिपणवहींत ' ( Visitor's Book ) देशविदेशच्या निसर्गप्रेमी प्रवाशांनीं वेळोवेळीं आपले आनंदोद्गार टिपून ठेवले आहेत. त्या उद्गारांचा जर एकादा संग्रह प्रसिद्ध करण्यांत आला तर तो निसर्गकाव्याचा एक अद्वितीय गुच्छ बनेल. पण तें काव्य कितीहि उच्चकोटीचें असलें तरी जोगचें प्रथमदर्शन घेतल्यावर त्याची अपूर्णताच प्रत्ययास येते, आणि मुखावाटे एकाएकीं उद्गार निघतात,

एतावान् अस्य महिमा अतो ज्यायांश्च पूरुषः ॥

शरावती एक लहानशी नदी पण तिचीं तीन तीन नांवें कां बरें पडलीं असावीं ? सुरुवातीला ती **बारंगी** किंवा **बारगंगा** या नावानें ओळखली जाते. मधल्या भागाला **शरावती** म्हणतात आणि जेथें ती प्रौढ बनून सागरांत विलीन होते तेथें तिचें नांव **बाळनदी**! शरावतीच्या या प्रवाहानें हें रोमांचकारी प्रपाताचें रूप धारण केलें नसतें तरीसुद्धां आपल्या निसर्गरम्य सौंदर्यानें तिनें माणसाचें मन आपल्याकडे ओढून घेतलें असतें व ती हिंदुस्थानांतील अनेक सुंदर नद्यांपैकीं एक ठरली असती.

पण या धबधब्यामुळें लहानगी शरावती भारतवर्षांतील एक अद्वितीय सरिता बनली आहे !

कारवार येथें असतांना ' गिरसप्प्या ' विषयीं बाळपणींच ऐकलें होतें कीं, कावेरी नदी पर्वतावरून खालीं उडी घेते तेव्हां एवढा मोठा आवाज होतो कीं, दोन मैलांवर घागरींची उतरंड रचिली असली तरी ती हादरा बसून कोसळून जाईल! मग या धबधब्याचा आवाज कोठवर ऐकूं येत असेल ?

पुढें जेव्हां मीं भूगोल शिकलों तेव्हां शंका आली कीं, कावेरी तर कूर्ग प्रांतांत उगम पावून पूर्वसमुद्राला मिळते. ती पश्चिम घाटाच्या कड्यावरून खालीं पडणें शक्यच नाहीं. म्हणून गिरसप्प्यांत पडणारी नदी दुसरी असावी. तिला होईल तितकी घाई करून होन्नावर जवळ पश्चिम समुद्राला मिळायचें होतें. एवढ्याचसाठीं तिनें सवाशें–दीडशें पुरुष उंचावरून उडी घेतली आहे. या नदीचें नांव काय ?

अमेरिकेंतील नायगाराच्या धबधब्याचीं कितीतरी वर्णनें माझ्या वाचनांत आलीं होतीं. प्रकृतिमातेनें या देशाला दिलेला हा एक अद्‌भुत अलंकार आहे. सर्व पृथ्वीवरील लोक त्याची यात्रा करण्यासाठीं येतात. मोठ्या मजबूत पिपांत बसून त्या धबधब्यांतून पार होण्याचे कित्येक लोकांनीं प्रयत्न केले होते. असलीं वर्णनें जसजशीं अधिक वाचावीं तसतशी उत्सुकता बळावतच जाई. निरनिराळ्या बाजूंनीं घेतलेलीं चित्रें व त्याचे अक्षिपट ( बायस्कोप ) यांमुळें नायगारा अगदीं डोळ्यांसमोर दिसूं लागे, आणि जसजसा त्याचा दृक्‌प्रत्यय स्पष्ट होऊं लागला तसतशी लहानपणीं ऐकलेल्या गिरसप्प्याच्या धबधब्याची मानसपूजा वाढत गेली आणि जेव्हां कळलें कीं नायगारा केवळ १६४ फूट उंचीवरून खालीं पडतो आणि गिरसप्याची उंची ९६० फूट आहे तेव्हां मला केवढा तरी अभिमान वाटला.

सर्वप्रमुख व जगांत सर्वांत उंच असा पर्वत आपल्या हिंदुस्थानांत आहे. नद्यांचेंहि तसेंच. सिंधु, गंगा व ब्रम्हपुत्रा यांच्यासारख्या नद्यांचा कोठल्याहि देशाला अभिमानच वाटेल. सर्वांत लांब नदी आमच्या देशांत आहे हें सिद्ध करण्यासाठीं अमेरिकेला दोन नद्यांच्या लांबीची बेरीज करावी लागली आहे. मसूरी व मिसिसिपी यांना वेगळ्या करून त्यांची लांबी मोजली तर ती कितीशी भरेल ? हिंदुस्थानचा इतिहास जसा पृथ्वीतलावर सर्वांत जुना आहे तशीच हिंदुस्थानची भूरचनाहि साऱ्या जगांत अद्‌भुत आहे!

मग हिंदुस्थान काय एका धबधब्याच्या बाबतींत कमी भरेल ? अशोका-सारखा दुसरा सम्राट झाला नाहीं हें साऱ्या जगानें मान्य केलें आहे. भूगोलाच्या बाबतींत देखील त्याला हें मान्य करावें लागेल कीं गिरसप्प्याच्या तोडीचा भव्यतेंत बरोबरी करणारा दुसरा धबधबा नाहीं !

कारकळ राजकीय परिषदेसाठीं मी दक्षिण कानड्यांत गेलों होतों तेव्हां अगुंबा घाट चढून शिमोग्यावरून गिरसप्पा पाहण्यास जाऊं अशी आशा बाळगली होती. पण तसें घडलें नाहीं; मी निराश झालों. वाटलें कीं चिरसंचित आशा शेवटीं सदैव वंचितच राहील आणि मला आतां गिरसप्पाचें दर्शन मनांतल्या मनांतच घेणें भाग आहे :--

" मनसा चिन्तितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते !"

पण जोग म्हैसूर संस्थानच्या सीमेवर आहे येवढें मात्र मीं माहीत करून घेतलें होतें. तेथें जाण्याचे मार्ग दोन. वरचा मार्ग शिमोगा—सागरवरून. आणि दुसरा मुखाकडचा. त्यानें होन्नावर बंदरावरून होडींत बसून राना-वनांतून पार व्हावयाचें आणि गिरसप्पा खेड्यापर्यंत जावयाचें, व तेथून घाट चढायचा. दोन्ही बाजूंनीं जाऊन आलेले लोक सांगतात कीं एका बाजूची शोभा दुसरीकडे मिळायची नाहीं. एकीपेक्षां दुसरी वरचढ असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. सबब माझें जोगचें दर्शन अर्धेंच आहे असें म्हणणें भाग आहे.

जलप्रलयाच्या संकटांत गुजरात सांपडला होता. गांधीजी त्यावेळीं बंगळुरास आजारी होते. मी त्यांना भेटण्यास गेलों होतों. तेथून म्हैसूर संस्थानांत फिरत फिरत गांधीजी सागरपर्यंत गेले होते. बरोबर श्री. गंगाधरराव व श्री. राजगोपाळाचार्य होते. सागरला गेल्यानंतर गिरसप्पा बघायला न जाणें मला तरी अगदीं अशक्य होतें. मोटारीनें केवळ एक तासाचीच वाट. शिमोगा येथें तुंगेच्या तीरावर फिरावयास गेलों असतां मी गांधीजींना आग्रह केला कीं—"आपण गिरसप्पा पाहण्यास कां येत नाहीं ? लॉर्ड कर्झन केवळ गिरसप्पा पाहण्यासाठींच या बाजूला बुद्धया आले होते. आपलें येणें पुनः इकडे थोडेंच होणार आहे ! "

गांधीजी म्हणाले—" तेवढा सुद्धां स्वच्छंद माझ्यानें होणार नाहीं. तुम्ही

अवश्य पाहून जा. तुम्ही पाहून याल तर विद्यार्थ्यांना भूगोलाचा एखादा धडा शिकवाल. "

मी पुन्हां म्हटलें, " पण या जगामध्यें हें एक अद्‌भुत दृश्य आहे. नायगारापेक्षां जोग सहापट उंच आहे. येथें ९६० फुटावरून पाणी खालीं पडतें ! आपण हा एकदां तरी बघितला पाहिजे. "

गांधीजींनीं विचारलें, " पावसाचें पाणी आकाशांतून पडतें तें किती उंचावरून ? "

मीं मनांत म्हटलें,

" स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् । "

संगीताप्रमाणेंच सृष्टिसौंदर्याची गांधीजींना पराकाष्ठेची आवड आहे हें मला माहीत होतें. फिरावयास गेलों असतां सूर्यास्ताची किंवा ढगांतून लुक्-लुकणाऱ्या एखाद्या एकाकी नक्षत्राची शोभा त्यांनीं मला दाखविलीच नव्हती असें नाहीं. पण जनसेवेसाठीं बाहेर पडलेले गांधीजी ' स्वछंदें ' कसे वागतील ?

" कुलशिखरिणः क्षुद्रा नैते न वा जलराशयः । "

या एकीचा असा निकाल लागल्यावर मी दुसरी गोष्ट पुढें ठेविली, " आपण येत नाहीं म्हटल्यावर महादेवभाई सुद्धां येत नाहींत. आपण त्यांना सांगाल तरच ते येतील. "

" महादेवाची इच्छा असेल तर त्यानें खुशाल तुमच्याबरोबर जावें. माझी ना नाहीं; पण तो येणार नाहीं. मीच त्याचा गिरसप्पा आहें. "

आम्ही बाकीचे लोक व्यावहारिक आदर्शाला भजणारे होतों. चर्मचक्षूंनीं पर्वतावरील धबधबा पाहिल्याशिवाय आमचें समाधान झालेंच नसतें. म्हणून जेवणापूर्वींच आम्ही सागरवरून निघालों आणि मोटारींतून जंग-लाचा रस्ता कापीत सुटलों. आगगाडीसाठीं डोंगर पोखरून बोगदे तयार करण्यांत येतात त्याचें आपणास फार आश्चर्य वाटतें. पण मुंबईच्या वस्तीपेक्षांहि खचून भरलेल्या सह्याद्रीच्या जंगलांतून रस्ता तयार करणें अधिक अवघड काम आहे. तेथें तुमचा ' डिनामाईट ' चालत नाहीं. एकेक झाड फांद्यांच्या जाळ्यांतून बुंधा कापल्यानंतर सुद्धां मोकळें करणें हिंदु मुसलमानांतील भांडण

मिटविण्याइतकें कठिण आहे. खंडाळ्याच्या घाटांतील खोल बोगद्यांत मध्यभागीं पोंचल्यावर जी एक प्रकारची भयानक रमणीयता प्रत्ययाला येते तोच अनुभव या जंगलांत येतो. असल्या अरण्यांत शोभणारे प्राणी म्हणजे हत्ती, वाघ व अजगर. त्यांत माणूस इतका क्षुद्र भासतो कीं तो तेथें चुकून आला असें वाटतें.

अरण्य ओलांडून आम्हीं एकदांचे शरावतीच्या तीरावर आलों. या भागांत तिला भारंगी असेंहि म्हणतात. भारंगी म्हणजे बारगंगे. या नदीचें माहात्म्य गंगानदीपेक्षां बारापट आहे असें येथील लोक मानीत असल्यास आपण त्यांच्याशीं भांडणार नाहीं. प्रत्येक मुलाला आपलीच आई सर्वश्रेष्ठ वाटते. झिमझिम पाऊस पडत होता. तेथें गगनभेदी महावृक्ष होते, लहान मोठीं झुडुपेंहि होतीं; अमर तृण होतें तसेंच भुईवर व झाडांच्या जून सालीवर उगवणारें शेवाळ पण होतें. समोरच्या कांठावर लहान मोठीं झाडें नदीच्या पाण्याचा गारवा किंवा थांग पाहण्यासाठीं आपले पर्णाच्छादित हात पाण्यांत बुडवीत होतीं आणि धुक्याचे कित्येक ढग आळशी पोळांसारखे इकडून तिकडे भटकत होते.

नदी पाहतांच ही नदी कोठून आली आणि कोठें जात आहे असा पहिला प्रश्न पडतो. मला तरी नेहमीं नदी कोठून आली हाच पहिला प्रश्न पडतो. असेंच पुष्कळांना वाटत असेल. याचें कारण काय बरें? नदी जाते कुठें शोधणें सोपें आहे. स्वतःस नदींत सोडून दिलें कीं तीच आपणाला नेमकी आनल्यासवें घेऊन जाते. तिच्या गतीबरोबर जाववयाची भीतिच वाटली तर एखाद्या झाडाचें खोड कोरून बरोबर घेतलें म्हणजे झालें. पण नदी कोठून निघते हें पहावयास उलट गतीनें जावें लागतें. ती गोष्ट ऋषीच करू शकतात. त्या दिवशींचें तें दृश्य असें होतें कीं भारंगीचें अथवा शरावतीचें पाणी पर्वतांतून येत आहे कीं ढगांतून अशी शंका उत्पन्न व्हावी.

होडींत बसून आम्ही पलीकडच्या कांठावर गेलों. कांठावरच्या जमिनीवरून कितीतरी वाळझरे उड्या घेत घेत नदीला मिळत होते. त्यावरून आमच्या असें लक्षांत आलें कीं आदल्या दिवशीं पाऊस पडून नदीचें पाणी खूप वाढलें असावें. आज तें जवळ जवळ पांच फूट उतरलें होतें. आम्हांला परतीरावर सोडून बाकी राहिलेल्यांना आणण्यासाठीं होडी परत गेली. शांत

पाण्यांत डब् डब् आवाज करीत होडी येरझारा करीत होती, तें दृश्य किती छान होतें! आपल्या प्रियजनांना स्वतःच्या पोटांत स्थान देऊन होडी पाण्याच्या पृष्ठभागावरून घेऊन जाते, तेव्हां आपणाला अकारणच भीति वाटल्यावांचून रहात नाहीं. राजगोपालाचार्य आपल्या मुलाला व मुलीलाहि बरोबर घेऊन होडींत बसत होते तेव्हां मी म्हणालों,

" एकदम एका कुटुंबांतील सारींच माणसें एका होडींत असूं नयेत, असें वाडवडिलांनीं सांगितलें आहे. आमच्याबरोबर तुम्ही या किंवा मुलाला येऊं द्या. दोघांनीं एकदम येऊं नये. "

मित्रमंडळींत या रूढीची चर्चा सुरू झाली. कोणाला हींत प्रतिष्ठेचा दर्प आला तर कोणाला दुसरेंच कांहीं सुचलें. सर्वनाशाचा संभव टाळण्यासाठीं हा नियम करण्यांत आला आहे हें मात्र कोणाच्या ध्यानांत आलें नाहीं व मला हें सांगून भोंवताली विषण्णता आणणें बरें वाटलें नाहीं. त्यामुळें वाडवडिलांची निंदा ऐकत ऐकतच मी पैलतीरास पोंचलों. प्रवाहाच्या मध्यावर होडी पोंचली तेव्हां मंत्र म्हणून आचमन करण्यास मी विसरलों नाहीं, नदीच्या दर्शनाबरोबर स्नान, पान व दान हे विधि झालेच पाहिजेत; तरच नदीचा साक्षात्कार झाला असें म्हणतां येईल.

दुसरी तुकडी येऊन पोंचली. आम्ही उजवीकडील वाटेनें चालूं लागलों. तो नदीचा डावा कांठ होता. रस्त्यावरील मोठमोठीं झाडें मशिदीच्या खांबाप्रमाणें सरळ उंच जात होतीं. आमची टोळी इतकी मोठी होती कीं तें निर्जन अरण्यहि आमच्या गप्पांनीं आणि हास्यविनोदानें निनादून गेलें. पण हें फार थोडा वेळ! आम्ही थोडे दूर जात नाहीं तोंच नदीचा गंभीर ध्वनि कानीं येऊं लागला. या ध्वनीला कशाची उपमा द्यावी? " साम्यं वाऽयं " इतरत्र अनुभविलेंच नाहीं. उपमा देणार कशाची? मेघगर्जना भीषण असते. ती सारें आकाशहि दणाणून सोडते पण तिच्यांत सातत्य नसतें. तुम्ही ऐकून ऐकून थकलांत तरी येथील आवाजाला खंड पडत नाहीं. येथें हे ढग फुटत आहेत का? या इथें तोफा डागल्या जात आहेत का? पर्वतावरील विशाल प्रस्तरांच्या लाद्या तर फुटत नाहींत? कीं नदी आपलें ध्यानमौन सोडून महारुद्राचा स्तवराज गात आहे?

आम्ही पथिकाश्रमापर्यंत पोंचलों, तों अगदीं डोळे ताणून

ताणून बघत खूप उत्कंठेनें कीं आतां दृश्य कोणतें दिसेल! आतां देखावा कोणता पहावयाला मिळेल! धबधब्याचें दर्शन जेथून सर्वांत चांगलें होतें त्या ठिकाणीं म्हैसूर सरकारनें ही अतिथिशाळा बांधिली आहे. जेथून उत्कृष्ट सम्यक् दर्शन होतें त्या चबुतऱ्यावर आम्ही जाऊन पोंचलों. पण काय! सर्वव्यापी धुक्याशिवाय कांहींच दिसेना! धबधब्याचा गंभीर ध्वनि सारी दरी दणाणून टाकीत होता. कडकडीत दुपारीं सुद्धां सूर्यदर्शन नाहीं. सर्वत्र सर्वदूर धुकेंच धुकें! जणुं हे धुक्याचे लोटच्या लोट कुरुक्षेत्राच्या विराट युद्धाची धुमाळी माजवीत आहेत. आणि जोग त्यांना आपल्या तालाचा ' जोग ' ( योग–साथ ) देत आहे! आशेनें यावें आणि अशी निराशा व्हावी असें कधीं घडलें नव्हतें. मिनिटांमागून मिनिटें धांवूं लागलीं आणि आमच्या निराशेबरोबर धुकेंहि वाढतच चाललें. शेवटीं आम्ही मौन सोडून आपआपसांत बोलूं लागलों. बोलावयास कांहीं खास विषय होता असें नाहीं. पण निराशेची पोकळी भरून काढण्यास कांहीं तरी हवें होतें इतकेंच!

इंद्रदेव कोपला कीं वरुणदेव, याचा मी विचार करीत होतों. इतक्यांत वायुदेवानें साहाय्य केलें. आणि क्षणभर–केवळ एक क्षणभरच–धुक्याचें तें सघन व्यवधान दूर झालें आणि ज्या देखाव्यासाठीं जन्माची तळमळ लागून राहिली होती तो अद्भुत देखावा दृष्टीस पडला! कैलासनाथाच्या " चंद्रोद्भासित शेखरी " गंगेचें अवतरण व्हावें असा एक मोठा प्रपात खालच्या कड्यामधून बाहेर पडलेल्या एका हत्तीसारख्या खडकांवर आदळून पाण्याचा भुगा करीत दशदिशांना बाणाच्या चिळकांड्या सोडीत आहे. छे, या देखाव्याचें वर्णन अशक्य आहे. स्तिमितहृदय होऊन मी उद्गारलों,

" नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ॥
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ "

तत्क्षणींच समोरची हत्तीएवढी शिळा डोक्यावरील प्रपाताच्या जटा उडवीत उद्गारली,

> " सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।
> देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः ॥ "

धुक्याचा पडदा पुन्हां पहिल्यासारखा जमून बसला. आणि आतां आम्ही जें पाहिलें तें स्वप्न होतें कीं माया कीं मतिभ्रम अशी आमची स्थिति झाली. एवढी विस्तीर्ण दरी, तें रुंद पात्र, ती भयंकर खोली आणि त्यांच्यामध्यें पिठाचा नव्हे मेघाचा तो आश्चर्यकारक धबधबा !

सारेंच दृश्य कल्पनातीत होतें. उघडया डोळयांनीं येथें जें पाहतों तें सत्य आहे अशी प्रतीति दृढ होण्यापूर्वींच धुक्याचा क्षीरसागर पुनः पसरला आणि समोरच्या काव्यासमवेत आम्हीहि त्यांतच मग्न झालों.

कोणीच कोणाशीं बोलेना. जें आतां पाहिलें त्यावर सारे विचार करूं लागले. कांहीं नव्हतें त्यांतून येवढी उंच व खोल सृष्टि कशी अस्तित्वांत आली आणि बघतां बघतां पुनः कोठें अदृश्य झाली याच आश्चर्यांत आम्ही गुंग झालों.

मन म्हणालें, एक क्षणभरच का होईना पण जें पाहण्यास आलों तें पाहिलें, विलक्षण रीतीनें तें दिसलें ! त्या क्षणमात्र झालेल्या दर्शनाचें स्मरण व ध्यान करण्यांतच वाटेल तेव्हां घटकाच्या घटका घालवितां येतील !

इतक्यांत शुभ्रजटाधारी गजप्रस्तर पुन्हां म्हणाला,

> " व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं
> तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ "

धुक्याचें आवरण दूर झालें आणि आतां या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्वच स्पष्ट दिसूं लागलें. समोरून थेट डाव्या टोकाला ' राजा ' अर्धचंद्राकार शिळेवरून खालीं उडी घेत होता. त्याचें पाणी पावसाळ्यांतील चिखलानें कॉफीच्या रंगासारखें दिसत होतें. जास्तींत जास्त पाणी ' राजा'ला च मिळतें. छाती फुलवीत फुलवीत तो जेव्हां तीरासारखा सरळ खालीं पडतो तेव्हां निसर्गाची शक्ति किती अतुल आहे यांची कल्पना येते. ' राजा ' चा विस्तारहि कांहीं लहानसहान नाहीं. आणि त्याच्या दोन्ही अंगांस टपोर टपोर मोत्यांचे कितीतरी सर लोंबत धांवतात. खरोखर हा धबधबा ' राजा ' या नांवाला पात्र आहे !

त्याच्या शेजारच्या धबधब्याचें दर्शन मला सगळ्यांत अगोदर झालें होतें आणि मी ताबडतोब त्याचें नांव रुद्र असें ठेविलें. त्याचा भीषण ध्वनि ऐकल्यावर आणि त्याची जटा पाहिल्यावर दुसरें नांव सुचणेंच शक्य नाहीं!

अगदीं उजव्या अंगास एक लहान धबधबा आहे. त्याची कंबर फारच बारीक आहे; म्हणून मी त्याचें नांव 'पार्वती' ठेवलें!

पोटभर पाहून घेतल्यावर पुनः आमच्या गोष्टी चालू झाल्या. जें आपण स्वतः पाहिलें तें दुसऱ्यास दाखविण्याची हौस ज्याला नाहीं तो मनुष्यच नव्हे. मनुष्य संचारशील आहे; संवादशील आहे. आपण ज्याचा अनुभव घेतला त्याचा अनुभव दुसरेहि घेतात—घेऊं शकतात—अशी खात्री झाल्याशिवाय त्याला पूर्ण संतोष होत नाहीं. राजाजींनीं माझें लक्ष वेधलें,

"इकडे खालीं तर पहा! थंड वाफेचे हे लोटच्या लोट कसे वर उसळून येत आहेत!"

देवदास म्हणाला, "हे पक्षी पहा, कसे निर्भयपणें उडताहेत!"

मणिबेननीं असेंच कांहींतरी म्हटलें आणि लक्ष्मीनें आपल्या अण्णाला तामिळ भाषेंत असेंच कांहींतरी सांगून आपला आनंद व्यक्त केला. आमच्याबरोबर एक गृहस्थ होते. ते वाटेंत विनाकारण चिडले होते. आम्ही जेव्हां या स्वर्गीय दृश्यांच्या आनंदांत वेडे होऊन गेलों होतों तेव्हां ते गृहस्थ आपणच मानून घेतलेला अपमान मनांत घोळवीत होते. चंद्रशंकरांनीं त्यांच्या या अवस्थेकडे माझें लक्ष वेधलें. मी मनांत म्हणालों,

"पत्रं नैव यदा करीरविटपे दोषो वसंतस्य किम्।
नोलूकोप्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणम्॥"

या जगांत निराशा उपासमार, अप्रतिष्ठा किंवा वियोग हीं खरीं दुःखें नाहींत. पण अहंकाररोग प्रत्यक्ष धन्वन्तरीच्या हातूनहि बरा होणें शक्य नाहीं!

त्या गृहस्थांचे अनेक प्रकारचे घोटाळे व विकृति हीं मला विदित होतीं. म्हणून गिरसप्याच्या धबधब्यासमोरसुद्धां त्याला कांहीं वेळ दिल्याशिवाय माझ्यानें राहवलें नाहीं. मी त्याला जोगची थोडी माहिती दिली व त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला.

"राजा" च्या मागच्या पोकळींत शेंकडों पक्षी असतात. आणि ते दूर दूरच्या शेतांतून टिपून आणलेल्या 'उच्छिष्ट' दाण्यांचा संग्रह करितात,

तो संग्रह एवढा मोठा असतो कीं सरकार त्याचा लिलाव करतें असें एकदां कोणाकडून तरी आम्ही ऐकलें होतें. मधमाशांचा मध लुटणारे मानवी प्राणी पक्षांचाहि धान्यसंग्रह लुटतात यांत आश्चर्य तें काय ? जो संग्रह करतो तो लुटला जावा, अशी सृष्टीचीच व्यवस्था दिसते. "परिग्रहो भयायैव."

पुन्हां धुकें पसरलें आणि मला अंतर्मुख होऊन विचारांत बुडी मारण्याची संधि मिळाली. अशा भव्य देखाव्याचें रहस्य काय असावें ? भूगोलशास्त्रज्ञ व भूस्तरशास्त्रज्ञ चटकन् सांगतील कीं येथील पहाड निस् जातीच्या दगडांच्या थरांचा बनला आहे. दरींतून एकादी कपारी तुटून पडली असावी. त्यामुळें आसपासची माती धुवून गेली. एकदां धबधबा चालू झाला कीं खालच्या भुईला तो अधिकाधिक खोल खोदीत जाणार आणि जेथून धबधबा चालू होतो त्या कोपऱ्याला घाशीत जाणार. वरचें कपाळ जर कठिण दगडाचें असेल तर उंची हजारों वर्षें टिकेल. धबधब्यापासून समुद्र फार दूर नसल्यामुळें नदीचा पुढचा भाग साफ झाला आहे आणि धबधब्याची उंची टिकून राहिली आहे. हें धबधब्याचें जड रहस्य झालें. एकाद्या आधुनिक यांत्रिकाला विचाराल तर तो म्हणेल, एकट्या गिरसप्पाच्या धबधब्यांत येवढें प्रचंड सामर्थ्य आहे कीं, म्हैसूर व दोन्ही कानडी जिल्ह्यांना हवी तेवढी शक्ति तो पुरवील. मग तुम्हीं त्यांतून वीज उत्पन्न करा, कारखाने चालवा, प्रत्येक नगराला व गांवाला प्रकाशित करा कीं तुमच्या किंवा दुसऱ्या प्रांतांतल्या वाटेल तेवढ्या लोकांना बेकार ठेवून उपाशी मारा.

निसर्गापासून जो कांहीं लाभ होतो तो भूमातेच्या साऱ्याच लेकरांनीं गोडीगुलाबीनें आपसांत वाटून घ्यावा आणि जीवनयात्रेचें ओझें हलकें करावें अशी बुद्धि माणसाला सुचेल तेव्हांची गोष्ट वेगळी. पण आज मात्र मनुष्याच्या हातीं कोठल्याहि प्रकारची शक्ति आली कीं लागलीच तो दुसऱ्या मनुष्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतो. मग ती सरशी त्यांना मारून मिळो, गुलाम बनवून मिळो किंवा त्यांना अर्धपोटीं ठेवून मिळो.

म्हैसूर संस्थान आधुनिक सुधारणांत पुढें गेलें आहे. मोठमोठ्या एंजिनियरांनीं तेथील समृद्धि वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. साऱ्या जगाला चंदनाच्या तेलाचा पुरवठा म्हैसूर संस्थानाकडून होतो असें म्हटल्यास विशेष अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या सोन्याच्या खाणी

म्हैसूरमध्येंच आहेत. भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याची कीर्ति वाढतच आहे आणि कृष्णसागर तलाव हा मानवी पराक्रमाचा एक सुंदर नमुना आहे. अशा या म्हैसूर संस्थानाला गिरसप्पाच्या धबधब्यापासून पैसा उकळण्याचें सुचलें नसेल हें शक्यच नाहीं. पण आतांपर्यंत ती गोष्ट सिद्ध झाली नाहीं इतकेंच. एवढ्या शक्तीचा उपयोग कशा रीतीनें करून घ्यावा हें सुचलें नाहीं कीं सीमा प्रकरणींचें भाषण आडवें येतें कीं तिसरेंच कांहीं कारण आहे हें आतां मी विसरून गेलों आहे.

पण एवढें खरें कीं गिरसप्पाची शोभा अद्यापि होती तशीच भव्य राहिली आहे. भगिनी निवेदिता यांनीं केलेल्या प्रसिद्ध तुलनेची येथें आठवण होते. कोठल्याहि स्थळाच्या रमणीयतेनें हिंदी मनुष्याला आकृष्ट केलें कीं त्यानें लागलीच त्याला धार्मिक स्वरूप दिलेंच म्हणून समजावें. कोठलेंहि आश्चर्यकारक रमणीय किंवा भव्य दृश्य पहातांच हिंदी हृदयाला वाटतें कीं गाईनें वासराला बोलवावें त्याप्रमाणें हा परमात्मा जीवात्म्याला बोलावीत आहे. नायगाराचा धबधबा हा जर हिंदुस्थानांत गंगामाईच्या प्रवाहामुळें झाला असता तर येथील लोकांनीं त्याच्या भोंवतीं कशा प्रकारचें वातावरण निर्माण केलें असतें ! आमोद-प्रमोद व वनभोजनें करणाऱ्या टोळ्या किंवा आगगाडीचे प्रवासी यांच्या ऐवजीं धबधब्याची पूजा करण्यासाठीं वार्षिक अथवा मासिक यात्रेकरूंचे थवेच्या थवे येथें गोळा झाले असते ! भोगविलासाचीं सर्व साधनें पुरविणाऱ्या पथिकाश्रमाच्या ऐवजीं धबधब्याच्या कांठीं किंवा त्याच्या मधोमध सुद्धां उचंबळलेल्या हृदयांतील भक्तिभाव ओतण्यासाठीं त्यानीं मोठमोठीं देवळें उभारलीं असतीं सृष्टीचें वैभव पाहून चित्रविचित्र सुखविलास किंवा मौजमजा उडविण्याऐवजीं लोकांनीं येथें तप केलें असतें आणि एवढ्या प्रचंड शक्तीला ऐहिक द्रव्यलाभ व सुखसोयी यासाठीं बंदिस्त करून ठेवण्याऐवजीं निसर्गाशीं तद्रूपता अनुभवितांना येणाऱ्या धुंदींत भैरवझेंप घेऊन या जीवनप्रवाहांत आपलाहि जीवनप्रवाह मिसळून देण्याचें लोकांना सुचलें असतें. स्वभावभिन्नता आणि यापेक्षां वेगळी काय असूं शकणार !

हा निसर्गाचा भव्यपणा पाहून त्यांत आपला देह सोडून देणें यांत आध्यात्मिकता आहे ! देहाचीं बंधनें तुटून पडावीं, वाटेल तें करावें लागलें

तरी जगेन अशा प्रकारची पामर जीवनाशा मनुष्यानें टाकून द्यावी यांत आध्यात्मिक प्रगति आहे हें निःसंशय; पण ही वृत्ति स्थायी असली पाहिजे. क्षणिक उन्मादांत कांहींच अर्थ नसतो. आत्मार्पण करण्याची इच्छा मनुष्यांत एकाद्या वेळीं उत्पन्न होतेच, भोगशृंगाराची ती एक विकृति आहे. तींत आध्यात्मिक तत्त्वाची झांक असलेली पाहून तिचें वेड लागणें हें मात्र मानवी जीवनाच्या महत्तेला शोभत नाहीं. भगवान् बुद्धांनीं आपल्या अचूक दृष्टीनें तिला विभव तृष्णा हें नांव देऊन तिचा धिक्कार केला आहे. येथें विभव म्हणजे नाश. भगवान् मनूंनीं देखील हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे,

"नाभिनन्देत मरणं नाभिनन्देत जीवनम् ।"

असो. ते रुसलेले गृहस्थ स्वतःच मानून घेतलेल्या अपमानाच्या भगभगींत समोरील दृश्य विसरून गेले होते आणि मी माझ्या तात्त्विक कल्पनाविहारांत शून्य दृष्टीनें समोर पहात होतों. दोघेहि अभागी होतों. कारण, कल्पना अथवा भगभग चालू ठेवण्यास नंतर वाटेल तितका वेळ मिळाला असता. पण धुक्याचा पडदा पुनः पसरला; आतां धबधब्याचें दर्शन फिरून थोडेंच होणार ?

राजाजी म्हणाले, "उन्हाळ्यांत जेव्हां धबधबा पडतो तेव्हां पाण्याच्या तुषारावर नाना तऱ्हेचीं इंद्रधनुष्यें दिसतात. त्यावेळची शोभा सर्वस्वीं निराळीच असते."

आणि चांदण्या रात्रीं सुद्धा धनुष्यें दिसत नाहींत असें नाहीं. म्हैसूरच्या सर्वसंग्रहात (गॅझेटियर) लिहिलें आहे कीं गवताचे मोठमोठे भारे पेटवून धबधब्यांत सोडून दिल्यानें अंधाऱ्या रात्रीं साऱ्या दरीनें पेट घेतला आहे असा भास होतो! कित्येक लोकांनीं रात्रीं दारूचे पुष्कळ बाण सोडून येथें खूप मजा लुटली आहे!

खोडकर चळवळे मानव प्राणी काय काय करणार नाहींत ? मला मात्र असलें कांहींच आवडत नाहीं. निसर्ग जें अन्न वाढतो त्याची स्वाभाविक रुचि अनुभविण्यांतच खरी रसिकता आहे. मानवी मसाला मिसळल्यानें स्वाद व पचनशक्ति दोन्ही बिघडतात.

आम्ही बंगल्यांत जाऊन पोंचलों. खावयाचें बरोबर आणलें होतें तें

उदरस्थ केलें. येथील पाणी पितां कामा नये. लागलीच हिंवताप लागतो, बहुतेकांनीं ऊन्ह ऊन्ह कॉफी पिऊनच तहान भागविली. मी मात्र त्या दिवशीं चातकाप्रमाणें पावसाचे थोडे थेंब पिऊनच संतोष मानला.

धबधब्याचें पुनः एकदां दर्शन घेऊन आम्ही परत फिरलों. आतां मला आठवण झाली कीं, धबधबे तीन नसून चार आहेत. डाव्या बाजूचा पहिला मोठा तो, 'राजा'; त्याच्या शेजारीं उजव्या अंगास आक्रोश करीत त्याला येऊन मिळणारा 'रोअरर' तो आपला 'रुद्र'; डोक्यावर कारंजासारखी पांढरी पिंजारलेली जटा धारण केलेला तो 'रॅकेट'; त्याला आतां वीरभद्र म्हटल्याशिवाय गत्यंतर नव्हतें आणि शेवटच्या लहान धबधब्याचें, तन्वंगी 'पार्वती' हेंच नांव मी निश्चित केलें. इंग्रजांनीं रुद्राला 'रोअरर' वीरभद्राला 'रॅकेट' व पार्वतीला 'लेडी' हें नांव दिलें आहे.

आम्ही परत फिरलों. पायांना जळवा चिकटण्याची भीति होती. येथल्या लोकांनीं आम्हां सर्वांना सूचना दिलीच होती कीं, "संभाळून चला. जळवा लागल्या तर कळणार सुद्धां नाहीं आणि रक्त शोषलें जाईल."

मीं म्हटलें, "त्याची चिंता नको. इंग्रजांना सुद्धां ओळखूं लागलों आहों तें काय जळवापासून सावधगिरी बाळगणार नाहीं!"

तरी बहुतेक सर्वांच्या पायाला एकेक जळू डसलीच! माझ्या शरीरांतील रक्ताचें फारसें आकर्षण नसल्यानें म्हणा किंवा माझें रक्त कडू असल्यानें म्हणा अथवा मी 'काक' दृष्टीनें बघून बघून चालत होतों म्हणून म्हणा, कोण जाणे पण मी वचावलों खरा. आम्ही थोडे पुढें गेलों. पण मणिबेनच्यानें राहवलें नाहीं—

"जरा थांबा. पुनः एकदां जमल्यास धबधब्याचें दर्शन घेऊन येत्यें!"

"पण धुकें उडालें नाहीं तर?"

"उडालें नाहीं तर परत येऊं! पण एकदां पाहूं तर द्या."

परत फिरतांना रस्त्याला एक फांटा फुटत होता त्या वाटेनें जाऊन कित्येकांनीं पार्वतीचें जवळून दर्शन घेतलें. आणि भुई निसरडी असल्यामुळें 'पार्वतीला' वंदे मातरम् म्हणून साष्टांग नमस्कार सुद्धां घातला! जातेवेळीं ज्या मार्गानें अज्ञात व अननुभूत अवस्थेचें काव्य अनुभविलें होतें त्याच मार्गानें परत येत असतांना संस्मरणाचें स्मृतिकाव्य अनुभवूं लागलों. तेच

१ भक्ति.

देखावे उलट्या दिशेनें पाहण्यांत नाविन्य कमी नव्हतें. जातेवेळीं ज्या झाडांच्या विषयीं आम्ही बोललों होतों तींच झाडें परत फिरतांना आमचें लक्ष वेधीत होतीं. त्या परिचित मित्रांना 'कसें काय ?' असा प्रश्न केल्याशिवाय आमच्यानें पुढें जाववेल तरी कसें ? झाडांझाडांमधून प्रेमाचे पूल बांधणाऱ्या त्या वेली ! त्यांच्या नम्रतेला नमन केल्याविना पुढें तरी कसें जाववेल ? आम्ही हळुहळू नदीतीरापर्यंत येऊन पोंचलों. आतां त्याच शांत प्रवाहावरून परत जावयाचें होतें. धुक्याचे ढग विखुरले होते. नदीचें शांत पाणी हळूं हळूं धबधब्याकडे वाहत जात असलेलें पाहून माझ्या मनांत बलिदानासाठीं चाललेल्या मेंढरांच्या कळपांचें चित्र उभें राहिलें. मी या पाण्याला म्हटलें, " एवढें मोठें अधःपतन तुमच्या ललाटीं लिहिलें आहे याची थोडीसुद्धां कल्पना तुम्हांला नाहीं, म्हणूनच इतक्या स्वस्थ चित्तानें तुम्ही पुढें जात आहां ! अथवा नाहीं, मीच चुकलों; तुम्ही जीवनधर्मी आहां, तुम्हांला मरणाचें भय कसलें ? "

" प्रायः कन्दुकपातेनोत्पतत्यार्यः पतन्नपि । "

जितक्या उंचीवरून पडाल तितकें उंच उसळून याल. तुमची कींव करणारा मी कोण ? पवित्र जलाला स्पर्श करण्यासाठीं मी हात लांबविला. इतक्यांत पाणी खळखळा हंसून म्हणालें,

" नहि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति । "

होडी ऐलतीरावर आली. आमच्या मनांत असा विचार आला कीं मोटार या अंगानें थोडीशी खालीं घेतली तर याच धबधब्याला उजव्या अंगानेंहि प्रदक्षिणा होईल. आम्ही जाऊन आलों त्या अंगाला म्हैसूरसीमा म्हणतात; आणि उजव्या अंगानें जाण्यास निघालों तिला मुंबईसीमा हें नामाभिधान आहे. कारण, जोग दोन्ही राज्यांच्या सीमेवर आहे.

आम्ही अगदीं निकट येऊन पोंचलों. मोठमोठ्या खडकांमधून मी धावूं लागलों. दोन वर्षांचा रुग्णाईत म्हणून माझी चांगलीच प्रसिद्धी झाली होती. यामुळें मला धांवतांना पाहून राजाजींना आश्चर्य वाटलें. कोणीसें म्हटलें, " हा तर महाराष्ट्राचा मावळा आहे, आणि हिमालयाचा यात्रेकरू आहे. माशाला पाणी तसा मराठ्याला डोंगर ! " हे शब्द ऐकण्यासाठीं थांबण्याची माझी कोठें तयारी होती ? मी तर धांवत धांवत 'राजा' धब-

धब्याच्या शेजारीं जो प्रसिद्ध सुळका आहे, तेथें जाऊन पोहोंचलों; आणि त्यावर साष्टांग आडवा होऊन खालीं पाताळांत पाहूं लागलों. उभें राहून खालीं पहाणें येथें शक्यच नाहीं. घेरी येऊन मनुष्य खालींच पडावयाचा! कानांत चारहि धबधब्यांचे ध्वनि इतके गच्च भरले होते कीं दुसरें कांहीं ऐकण्यापुरता त्यांत अवकाशच उरला नव्हता. ज्याप्रमाणें नदीचें पाणी वरून खालीं दरींत पडून पुन्हां वर उसळत होतें त्याचप्रमाणें कानांतील ध्वनिसुद्धां पुनः उसळत असावेत. प्रथम माझें लक्ष वेधलें राजाच्या गंड-स्थळावर लोंबणाऱ्या मोत्यांच्या सरांनीं; आणि नंतर महापुरांतून लोकांचें रक्षण करण्यास ज्याप्रमाणें शूर पाणबुड्ये उड्या घेतात त्याप्रमाणें या धबधब्यांत चतुराईनें घुसणाऱ्या पक्ष्यांनीं. या पक्ष्यांना धबधब्याच्या भीषण भव्यतेची दरकारच नसेल का? कीं ईश्वरानें यांचा 'हिया' इतक्या धैर्याचा केला असेल? हे जोगवासी येथेंच जन्म पावले होते; आणि धबधब्याच्या पड-द्याच्या सुरक्षित जलावरणांत वाढलेले होते. आगंतुक पक्षी एवढें साहस करणार नाहींत. सिंहाचे छावे सिंहिणीला भिणार नाहींत. समुद्रांतील माशांना लाटांची मौजच वाटते. त्याचप्रमाणें हे जोगपुत्र जोगशीं खेळत असावेत!

'राजा' धबधबा म्हैसूर सीमेकडून दुरून पाहिला होता तेव्हां तो वेगळाच दिसत होता. येथें मात्र जणुं काय हत्तीच्या गंडस्थळावरच झोंपलों आहोंत इतक्या जवळ आम्ही होतों. वरचें पाणी धबधब्याकडे विलक्षण वेगानें धावत होतें. जणुं एकादा महान् लोकसमाज कळत न कळत, इच्छा असो वा नसो, प्रचंड क्रान्तीकडे धावत आहे! मोठा लोकसमाज जेव्हां सामाजिक अथवा राजकीय सुधारणांच्या ओघांत वाहात जातो तेव्हां पुढें काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नसते. आणि कल्पना असली तरी "आपल्यासंबंधीं हें खरें ठरणार नाहीं; आपण कसें तरी निभावून जाऊं," अशी आंधळी आशा तो बाळगतो. मध्यंतरीं सुधारणेचा मद वाढतच जातो. शेवटीं जहाल लोक संयम सुचवितात तर मवाळ लोक आंधळे होऊन बेजबाबदार लोकांशीं संगनमत करितात. मग त्यांची इच्छा असली तरी ते मागें फिरूं शकत नाहींत, आणि ते स्वतः मागें हटले तरी काय झालें? धनुष्यांतून सुटलेला बाण कधीं तरी मागें घेतां आला आहे काय? जी टाळतां येते ती क्रांति कसली?

धबधब्याचें पाणी खालीं कोठवर जातें तें पाहणें किंवा समजून घेणें अशक्य होतें. कारण उसळणाऱ्या पाण्याचीं मोठमोठीं अभ्रें धबधब्याच्या पायाला विळखा घालून होतीं. काय हा पाण्याचा भयंकर उन्माद ! जणुं काय महादेव प्रलयकाळचें तांडवनृत्यच करीत आहे आणि समोरचा 'रुद्र' त्याला ताल देत आहे ! पण रोमांचकारी शोभेचा परम उत्कर्ष समोरचा 'वीरभद्र' च दाखवितो. कोणाला वाटणारहि नाहीं कीं येथें पाणी पडतें आणि उडतें. मोठमोठ्या तोफांतून गोळ्यांच्या शक्तीनें कोरड्या पिठाचे लोटच्या लोट उडावेत; तसाच हा देखावा दिसत होता. त्याचें वर्णन शब्दांनीं करतां येणार नाहीं. कारण शब्द शांतता व सुव्यवस्था यांच्या सान्निध्यांत वाढत असतात.

पडल्या पडल्या आम्ही हा देखावा पोटभर पाहून घेतला; अथवा खरें सांगायचें म्हणजे वाटेल तितका वेळ पडून राहिलों तरी तृप्ति होणें अशक्य आहे अशी खात्री होईपर्यंत पाहिलें. उठून परत फिरलों; पण मागें फिरणें सोपें नव्हतें. कोणी उठतच नसे. त्याला ओढून आणण्यास दुसरा जाई. पण तो स्वतःच त्या नयनोत्सवांत मग्न होई; पहिला पस्तावून उठला तरी बोलावण्यासाठीं म्हणून गेलेला उठावयाचा नाहीं; आणि दोघेहि कसेबसे संयम करून मागें वळतात तों त्या दोघांवर चिडून त्यांना रागें भरण्यास आलेला तिसरा क्षणभर डोळे तृप्त करण्यासाठीं येथेंच उभा राही; आणि मग पहिले दोघेहि आपला निग्रह थोडा शिथिल करीत ! त्या दोघांनाहि वाटे, एवढा रागावलेला हा समाजनियंता गृहस्थ जितकी सूट घेत आहे तितकी आपणहि घेतली तर त्यांत काय बिघडलें ? त्याच्यापेक्षां आम्ही जास्त निग्रही आहोंत असा आमचा थोडाच दावा आहे ? मला वाटलें कीं थोडासा त्या पुढच्या खडकावर गेलों तर राजाच्या पाण्यांत पाय बुडवितां येतील. पण नदीचें पाणी थोडेंथोडें वाढत होतें. त्यांत तो लहान खडक लहानसें बेटच झाला होता. म्हणून राजाजींनीं मला जाऊं दिलें नाहीं. त्यांचें मी न ऐकेन तर दुहेरी उद्धटपणा होईल असें मलाहि वाटलें. राजाजींच्या आज्ञेचें उल्लंघन कसें करावें ? आणि 'राजा' च्या डोक्यावर पाय कसा ठेवावा ? आम्ही परत फिरलों. भक्ति, विस्मय, मानवी जीवनाची क्षणभंगुरता, देखाव्याचा भव्यपणा, त्या क्षणाची धन्यता इत्यादि अनेक वृत्तींचे ढग

हृदयांत कोंदले होते, आणि तेथून त्या वीरभद्राप्रमाणें आपले बाण माझ्या डोकींत सोडीत होते! विचारांचें हें दारूकाम आश्चर्यकारक असतें. हृदयांतून बाण सुटतो तो तडक डोक्यापर्यंत जाऊन तेथें फुटतो! त्यावेळीं स्वस्थ शरीर कसें अस्वस्थ होऊन जातें याचा ज्यानें अनुभव घेतला आहे त्यालाच हा चमत्कार कळून येईल.

या ठिकाणीं देऊळ कसें नाहीं? आमच्या लोकांचीं देवळें म्हणजे जन्मभूमीचीं काव्यमय स्थानें. अमुक शिखर उत्तुंग आहे असें दिसलें कीं तेथें एकादा ऋषि ध्यान करण्यासाठीं जाऊन बसलाच आणि भक्तांनीं तेथें एक देऊळ बांधलेंच. मग तें पुण्याजवळील पर्वती असो, चंपानगरीजवळील पावागढ असो, जुनागडजवळील गिरनार असो किंवा हिमालयावरील कैलास शिखर असो. दक्षिणेकडे वाहणारी एकादी नदी अमुक ठिकाणीं उत्तरवाहिनी झाली आहे ना? मग चला, बनवा त्या स्थळाला तीर्थ; कोट्यवधि लोकांनीं यावें आणि पावन होऊन जावें. मोठमोठ्या दोन नद्या एकमेकींना भेटतात म्हटलें कीं त्या प्रयागावर आपल्या संतांनीं आपली सरस्वतीहि वाहावयाला लावलीच. सगळ्या यात्रा पूर्ण झाल्या आणि तुम्ही समुद्रापर्यंत येऊन पोंचलां ना? मग तेथें भक्तांनीं जगन्नाथ अथवा सेतुबंध महादेव बसविलाच म्हणून समजा. जेथें भुईचा शेवट दिसला तेथें एकतर कन्याकुमारी असेल किंवा देवेन्द्र* असेल. मोठमोठ्या वाळूच्या रांगांत एकादें सरोवर दिसलें तर तें नारायणाचें§ सरोवर असलें पाहिजे, त्याची पूजा झालीच पाहिजे.

आपल्या संतकवींनीं तीर्थस्थळें कोठें कोठें स्थापिलीं आहेत तीं शोधूं लागलों तर हिंदुस्थानचा सारा भूगोल पालथा घालावा लागेल. मुसलमान फकीर व रोमन कॅथोलिक पाद्री यांनींहि आपल्या देशांत अशाच प्रकारें अद्‌भुत काव्यमय स्थळें शोधून काढिलीं आहेत आणि तेथें पूजाप्रार्थना करण्याची सोय केली आहे. मग याच धबधब्याजवळ देऊळ कसें नाहीं?

---

* सिंहलद्वीपाच्या दक्षिणेकडील टोकाला द्रेवेन्द्रं म्हणतात. 'Dundra H ad' हें त्यालाच इंग्रजी नांव आहे.

§ सिंध प्रांताच्या पूर्वेस व कच्छच्या उत्तरेस नारायण सरोवर आहे.

काय जीवनराशीचा एवढा मोठा अधःपात पाहून मुनिगण खिन्न झाले असतील ? भैरवघाटाप्रमाणें येथें देह खालीं सोडून देण्याचा उन्माद लोकांत उत्पन्न होईल असें वाटून लोकसंग्रहकार ऋषींनीं यात्रेसाठीं हें स्थान पसंत केलें नसावें का ? किंवा डोकें भणाणून टाकणारी अखंड व भीषण गर्जना ध्यानाला अनुकूल नाहीं असें समजून उपासक येथून विमुख झाले असतील ? किंवा हा धबधबा स्वतःच अभयब्रह्माची मूर्ति आहे, याच्या शेजारीं दुसरी कोणती मूर्ति बसवावी, असें मनाशीं ठरवून ते मागें फिरले असतील ? कोणी सांगावें ? आमच्या पूर्वजांनीं येथें देऊळ बांधलें नाहीं म्हणून मला यत्किंचित् दुःख वाटत नाहीं. परंतु हें स्थळ पाहून वाटलेल्या भावनांचें एकादें तांडवस्तोत्र त्यांनीं अवश्य लिहावयास पाहिजे होतें. जेथें पार्थिव मूर्तींचा कांहींच उपयोग होत नाहीं तेथें वाङ्मयमूर्ति अवश्य उद्दीपक होऊं शकेल.

ही सर्व शोभा आम्ही धबधब्याच्या डोक्यावरून पाहात होतों. होन्नावराकडून येणारे लोक उत्तर कानडा जिल्ह्यांतील घोर अरण्यांतून येत असतील तेव्हां त्यांना या धबधब्याचें आपादमस्तक दर्शन होत असेल. कोणतें अधिक सुंदर हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कोणाला सांगतां येईल ? आणि प्रत्यक्ष पाहिलें तरी काय झालें ? निसर्गाच्या निरनिराळ्या विभूतींची कधींतरी तुलना होऊं शकली आहे ? हिमालयाची भव्यता, सागराची गंभीरता, आणि वाळवंटाची भीषणता यांमध्यें तुलना अथवा निवड कोणाला करतां येईल ? म्हणून एकदां होन्नावर मार्गानें जोगचें दर्शन घेण्यास आलें पाहिजे. आरमारावरील अनुभव घेऊन कौशल्य संपादन केलेले जे लष्करी अधिकारी धबधब्याचें मोजमाप घेण्यास आले होते आणि पाळण्यांत बसून लटकत लटकत धबधब्याच्या मागील अंगास गेले होते त्यांना काय अनुभव आला असेल ? जोगच्या पक्ष्यांनीं त्यांचें कसें स्वागत केलें असेल ? पडद्यांतून बाहेर आंत पसरणारा प्रकाश त्यांना कसा दिसला असेल ? आणि अंधाऱ्या रात्रीं धबधब्यामागें गवत पेटवून जर मोठा उजेड केला तर साऱ्या दरींत कशी गंधर्वनगरी निर्माण होईल याची कल्पना कुणाला आली असेल का ? जेव्हां येथें विजेचा कारखाना चालू होईल तेव्हां कित्येक कल्पनाशूर या धबधब्याच्या मागें अवश्य विजेच्या दिव्यांच्या माळा लावून सोडतील आणि जगानें आजवर न पाहिलेलें इंद्रजाल निर्माण करून दाखवतील. त्यावेळीं

सगळी दरी एक मोठी रंगभूमि बनेल आणि चारांहि खंडांतील भूदेव ती पाहण्यास येथें अवतरतील !

पण त्या वेळीं कोणाला ईश्वराचें स्मरण होईल काय ?

मनुष्यानें आपली बुद्धिशक्ती ईश्वराला आळविण्यासाठीं वापरण्याऐवजीं त्याला विसरून जाण्याच्या युक्त्या आणि पद्धति शोधून काढण्यांतच वापरली आहे !

हेंहि शक्य आहे कीं सर्वांगांनीं कुंठित झाल्यावरच बुद्धि कदाचित् ईश्वराला चांगल्या रीतीनें समजूं शकेल.

प्रत्येक गोष्टीला शेवट असतोच; अर्थात् आमच्या या जोगयात्रेचाहि शेवट आला. अत्यंत पवित्र व मधुर स्मृति बरोबर घेऊन आम्ही मागें फिरलों. पण पुन्हां एकदां येथें येऊन जाण्याची वासना मात्र राहिलीच. म्हणून ' पुनरागमनाय च ' अशा शब्दांनींच आम्ही भारत-वैभवाच्या या असाधारण विभूतीचा निरोप घेतला.

## जोगचें पुनर्दर्शन १९

जोगच्या ह्या अलौकिक दृश्याचें प्रथम दर्शन करतेवेळीं एक कुतूहल तृप्त होऊं पहात होतें तोंच मानवी स्वभावानुसार एक नवा संकल्प उठला. इतक्या उंचीवरून उडी मारल्यावर ही नदी पुढें कोठें जाते, कशी दिसते, आणि सरित्पतीशीं तिचें मीलन कसें काय झालें आहे हें सर्व एकदां पहावें आणि शक्य झाल्यास मुलाप्रमाणें शरावतीच्या वक्षःस्थळावर नौकाविहार करावा ! अंतरात्म्याची ही जिज्ञासा सत्यसंकल्प परमेश्वरानें आशिर्वचिली आणि एका तपाचा अवधि पुरा होतो न होतो तोंच जोगच्या पुनर्दर्शनाचें सद्भाग्य मला लाभलें. पहिल्या वेळीं आम्ही वरच्या बाजूनें धबधब्याकडे गेलों होतों. यावेळीं नदीच्या मुखाकडून प्रवेश करून होडींतून उलट प्रवास केला आणि जेथें होडीचा मार्ग खुंटला तेथें तैल-वाहनांच्या साहाय्यानें घाट चढून धबधब्याच्या माथ्यावर जाऊन पोंचलों.

तेथें शरावतीच्या अर्धचंद्राकार दरींत चार धबधबे आहेत. उजवीकडे 'राजा' नऊशें साठ फुटांखालीं उडी घेतो. त्याची जलराशि, त्याचा उन्माद आणि त्याचें सौंदर्य जगदेकसम्राटास शोभेसें आहे. त्याच्या डाव्या बाजूला सारखा गर्जना करणारा 'रुद्र' राजाच्या चरणीं लोटांगण घालतो. रुद्राची घोर गर्जना आसमंतांतल्या टेंकड्यांत व दरींत कितीतरी मैलपर्यंत निनादित होत असते. त्या ध्वनीला मेघगंभीर म्हणतां येणार नाहीं आणि सागरगंभीरहि म्हणतां येणार नाहीं. मेघगर्जना आकाशविद्रावी असली तरी क्षणजीवी. सागराची गर्जना भरती ओहोटीच्या लहरींवर अवलंबून. परन्तु 'रुद्रा' चा ध्वनि अविरत, अखंड आणि धारावाही आहे. त्याचा उन्माद विलक्षणच आहे.

'राजा' आणि 'रुद्र' यांना जगांत कोठेंही सम्राटाची पदवी मिळूं शकेल. परन्तु जोगचें खरेंखुरें वैभव आकाशांत विविधरूपांनीं उडणाऱ्या 'वीरभद्रा' च्या शुभ्र जटाजालांतच सांठविलें आहे. वीरभद्राचा जलप्रपात हत्तीच्या गंडस्थळासारख्या एका विशाल शिलाखंडावर पडतो. तत्क्षणींच त्यांतून आतषबाजींतील बाणासारखीं कारंजीं वरवर उडत असतात. हें शंकराचें तांडवनृत्य कीं महाकवि व्यासाच्या प्रतिभेचा नव-नवोन्मेषशाली कल्पनाविलास ? कीं सूर्यबिंबाच्या पृष्ठभागांतून उफाळणाऱ्या सर्व संहारकारी परंतु कल्पनारम्य ज्वाला ? कीं भूमातेच्या वात्सल्याच्या स्तन्यधारांचे फवारे ?—अशा अनेक कल्पना मनांत उठतात. खरोखर वीर-भद्राचें दर्शन पाहणाऱ्याला 'पागल' बनवून टाकतें !

वीरभद्राच्या डावीकडे 'कर्पूरगौरा', तन्वंगी, आणि अनुदरी पर्वत-कन्या पार्वती ( Lady ) आपल्या लावण्यानें आपणांस आनंदित करीत असते.

ह्या चार प्रपातांचें जणूं रक्षण करण्यासाठीं त्यांच्या दोहों बाजूंना दोन प्रचंड पर्वत उभे ठाकले आहेत. धबधब्याच्या अखंड गर्जनेला क्षणोक्षणीं प्रतिध्वनित करायचें. इंद्रधनूच्या माला धारण करायच्या आणि विविध प्रकारच्या वनस्पतींनीं आपला देह शृंगारून पुलकित व्हावयाचें. हाच त्यांचा अविरत उद्योग बनला आहे. सतत खडी ताजीम देणारे हे पहारेकरी याहून दुसरें काय करणार ?

ह्या खेपेला आम्ही गेलों ते उन्हाळ्याचे दिवस होते. भारंगीचें पाणी

चांगलेंच ओसरलें होतें. वीरभद्राच्या जटा कोठेंच दिसत नव्हत्या. रुद्राच्या लांब लांब उड्याहि कमी झाल्या होत्या, पार्वतीनें विरहिणीचा वेश धारण केला होता. कांहीं झालें तरीहि राजाचें वैभव पूर्ववतच असावें अशी आम्हांला आशा होती. परन्तु विश्वजित् यज्ञ संपवून अकिंचन झालेल्या सम्राटाचें दारिद्र्यवैभवच त्यावेळीं राजा दाखवीत होता.

यावेळीं शरावतीच्या उजवीकडे म्हणजे उत्तरेकडे येऊन पोंचलों होतों. अतिथिगृहांत न थांबतां आम्ही धांवत 'राजा' च्या शेजारीं जाऊन उभे राहिलों.—

—तेव्हां कडकडून आणि खालून उडणाऱ्या तुषारांचें थंड्गार धुकें यांत सांपडल्यामुळें जी अवस्था झाली तिचें वर्णन करणें कठिण आहे. राजाच्या मुकुटाप्रमाणें शोभणाऱ्या गरम गरम शिलाखंडावरून वाकून खालीं दरींत आम्ही डोकावलों तों स्वप्नदुर्लभ दृश्य पहावयास मिळालें. वरून 'राजा'ची जी धारा खालीं कोसळत होती ती जमिनीपर्यंत मुळीं पोंचतच नव्हती. एकाद्या मदोन्मत्त हत्तीच्या सोंडेसारखा एक प्रचंड झोत वरून खालीं कोसळतांना आम्हांला दिसत होता. खालीं पडतां पडतां तो शतधा विदीर्ण होऊन त्याचें सहस्रधारांत रूपांतर होत होतें. पुढें गेल्यावर त्या धारांचे मोठाले जलबिंदु बनत असत व मौक्तिकमालांप्रमाणें चमकून शोभत. या मोत्यांचेंहि आणखी पुढें जातां चूर्ण होऊन त्याचे मोठमोठाले कण दिसूं लागले. आतां आणखी खालीं जाण्याचें सोडून देऊन त्यांनीं थोडा स्वच्छन्द विहार सुरू केला. ते मोठाले कणहि छिन्नभिन्न झाले व सीकर-पुंजाचें रूप धारण करून मेघपंक्तीप्रमाणें ते विचरूं लागले. पण येवढ्यानें प्रकृतिमातेचें समाधान झालें नाहीं. या ढगांचें पुढें धुकें बनलें व वाऱ्याच्या लहरींबरोबर उडून तें साऱ्या हवेंत गारवा भरून टाकूं लागलें. नवल असें कीं एवढ्या मोठ्या जलधारेचा एक थेंब देखील धरणीपर्यंत पोंचत नव्हता. खालची जमीन तापलेली आणि वरचें वातावरण मात्र गार गार! यावेळीं राजे लोकांच्या दानाची आठवण झाली. प्रजाजनांना दुष्काळानें गांजलेलें पाहून राजेलोक जेव्हां उदार हस्तानें तिजोरी उघडी करितात तेव्हां त्यांच्या जयनादानें सारें वातावरण दुमदुमून जातें. परंतु बिचाऱ्या पीडलेल्या जनतेच्या तोंडीं अन्नाचा एक कण देखील पडत नाहीं!

येथल्या इंद्रधनुष्याचें सौंदर्य मात्र अलकेश्वराच्याहि मनांत ईर्षा उत्पन्न करण्याजोगें होतें. हीं देवाचीं धनुष्यें स्थायी मात्र नव्हतीं. वाऱ्याची लहर जशी दिशा बदले तसे सीकरपुंज स्थानांतर करीत आणि हीं इंद्रधनुष्यें पार्वतीसमोर शंकरानें नाचावें तशीं इकडून तिकडे धांवत क्षणांत क्षीण होत तर क्षणांत मयासुराच्या प्रासादाचें सौंदर्य धारण करीत. कर्माबरोबर जसें त्याचें फल तसें प्रत्येक धनुष्याबरोबर त्याचें प्रतिधनुष्यहि आपला वर्ण-व्यत्यास करून हजर. आम्हीं आमची जागा बदलली तर त्या सुरधनुष्यांनीहि आपली जागा बदलविली. सरधनु आणि सुरधुनि यांची ती अद्भुत आल्हाद-जनक क्रीडा आम्हीं विस्मयमुग्ध भावानें कितीतरी वेळ बघतच राहिलों. जसजसे पहात गेलों तसतशी आमची दर्शनतृष्णा वृद्धिंगतच होत गेली. केवळ तास दोन तासच आम्हांला येथें थांबावयाचें आहे, याची आम्हांला जाणीव नव्हती असें नाहीं. प्रतिक्षणीं आमचें पुण्य क्षीण होत असून थोड्याच वेळांत मृत्युलोकांत प्रवेश करणें आहे याचें आम्हांला भान होतें. स्वर्गलोभी देव ज्या विषादानें स्वर्गसुखाचा उपभोग घेतात, पराक्रमी पुरुष आपल्या यौवनाच्या उत्तरार्धांत आपले संकल्प तडीस नेण्यासाठीं जसे अधीर होतात त्याच विषादानें आणि तितकेंच अधीर होऊन आम्ही सर्वजण डोळ्यांनीं, कानांनीं, नासिकत्वचा-सर्वेंद्रियांनीं त्या गंधर्वदरीचें दर्शन करूं लागलों. आमच्या कल्पनेच्या योगें तोच आनंद शतगुणित करून त्याचा अनुभव घेत चालूं लागलों.

आदल्या दिवशीं तीन होड्या घेऊन आम्ही निघालों होतों. मधल्या होडींत बायका आणि मुलें होतीं आणि आम्ही पुरुष दोन बाजूंच्या दोन होड्यांत बसलों होतों. रात्रीची वेळ होती. आकाशांत चंद्रमा हंसत होता. त्याचें तें काव्य मुलींनीं हृदयांत सांठविलें. आणि तें आलापांच्या रूपानें बाहेर झरूं लागलें होतें. प्रत्येकीनें आपलें आवडतें गीत नदीच्या प्रवाहावर सोडून दिलें. तो गीतध्वनि कानीं पडतांच नारळी आणि पोफळी पुलकित झाल्या आणि आपलीं उंच उंच मस्तकें किंचित् लववून आलापाचें पान करूं लागल्या. मुलींनीं थकून जाईपर्यंत गाणीं म्हटलीं. त्या झोपीं गेल्या व चंद्रहि विसावा घ्यायला निघून गेला. अंधाराचें साम्राज्य सर्वत्र पसरलें. आकाशांतील अनंत तारका आसपासच्या टेंकड्यांकडे स्थिर दृष्टीनें पाहूं

लागल्या. आसमंतांतली नीरव शांतता जागत होती कीं झोपी गेली होती कुणास ठाऊक !

मध्येंच झोपेंतून जेव्हां जाग येई तेव्हां कधीं वल्ह्यांचा आवाज, तर कधीं नावाड्यांच्या बावूंशीं लगट करून खळखळणाऱ्या पाण्याचा आवाज, तर कधीं नावाडी परस्परांना हांका मारीत तेव्हांची तीक्ष्ण साद ऐकूं येई. अखेर पहांट फुटली. पक्ष्यांनीं आपला कलरव सुरू केला. मधल्या होडींत झोंपलेल्या कोकिळाहि जर जाग्या होतील तर किती चांगलें, असें मला वाटलें. माझ्या गद्यनिमंत्रणाचा त्यांनीं आलापांनींच स्वीकार केला. रात्रीं ऐकलेल्या आलापांची आठवण करून 'हेंच तें गेल्या रात्रीचें संगीत.' असें एकमेकांना कळविण्यासाठीं वृक्ष देखील आपापलीं मस्तकें हलवूं लागले. निशाकाळींचा तो जलविहार खरोखरच सात्त्विक, शांतिमय, प्रसन्नयौवनमय होता.

आणि जलप्रपाताचें दर्शन देखील अद्‌भुत, भीषण आणि रोमहर्षण असें होतें !!

परततांना त्या मुलींच्या तोंडावर प्रातःकाळची ती मुग्ध प्रसन्नता दिसून येत नव्हती. असलें अद्‌भुत दृश्य कसें निर्माण झालें असेल ? आपण खरोखरच पृथ्वीतळावर आहोंत कीं, स्वप्नसृष्टींत आहोंत याबद्दलचा विस्मय त्यांच्या चेहऱ्यावर दृग्गोचर होत होता. त्या एकमेकींकडे पाहून आपला विस्मय वाढवीत जात होत्या आणि त्यांचा तो अचंबा पाहून जणूं आम्हीच त्या काव्यमय सृष्टीचे विधाते आहोंत असा अभिमान आम्हांला वाटत होता.

जेवणाची वेळ टळून गेली होती. आम्ही एका खेड्याजवळ येऊन पोंचलों होतों. तेथें एक भात भरडण्याची गिरणी होती. भक् भक् भक् भक करणारी ती, गिरण लोकांतील शांति, त्यांचें आरोग्य आणि त्यांचें उपजीविकेचें साधन भरडून टाकीत होती. आम्ही पोटभर जेवलों. आणि आमची वाट पहाणाऱ्या तैलवाहनावर आरूढ झालों.

वाटेंत आमच्या सारथ्यानें पेट्रोलच्या डब्यांत थोडेंसें पेट्रोल उरलें होतें त्यांतच पाणी भरून आणलें आणि तें मोटारींत ओतलें, पाणी झालें गरम आणि त्यांत तेलाची वाफ मिसळली. मग काय विचारतां ? पावलापावलावर मोटार अडूं लागली; आरडाओरड करूं लागली; तक्रार करूं लागली आणि दुर्गंध सोडूं लागली. आम्ही कंटाळून गेलों, चिडलों, रागावलों

आणि कांहीं उपाय नाहीं हें पाहून आपोआपच थंड झालों. कसेबसे महा कष्टानें पाण्याच्या जागीं आम्ही जेव्हां जाऊन पोंचलों तेव्हां त्या बंडखोर पाण्याला काढून टाकलें व 'सज्जन' पाणी आंत भरलें. आणि मग आमचा मार्ग सुकर झाला.

गिरसप्पा येथील जोगसारख्या रोमहर्षण दृश्याच्या सहवासांत यंत्रें, अश्वशक्ति, विद्युत्प्रकाश व कारखाने यांचा विचार करणें म्हणजे आत्म्याला विसरून बाह्य वैभवाचें ध्यान करण्यासारखें आहे. पण आजूबाजूचा प्रदेश दुष्काळानें पीडलेला असेल, लोक अनेक प्रकारच्या रोगांना बळी पडत असतील आणि या धबधब्याच्या अमाप पाण्याचा दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें उपयोग करूनच प्रजेचें हें दुःख दूर करण्याचा उपाय सांपडत असेल तर आपण अशा वेळीं कोणता आग्रह धरावा? सृष्टिसौंदर्याचा रसास्वाद घेणाऱ्या आपल्या चित्ताचें सुखद साधन असा जो हा धबधबा, त्याला तसाच ठेवावा कीं आपद्ग्रस्त अशा आपल्या बंधूंना दुःख-मुक्त करण्यासाठीं त्याचें बलिदान करावें? पुरेसें धान्य मिळत नाहीं अशा-ठिकाणीं धान्याची शेती सोडून गुलाबाचे बगीचे उठवून दिले तर त्यामुळें आपला हृदयविकास होईल काय? गुलाबांत भूमातेचें काव्य आहे. धान्यांत कारुण्य आहे. दोहींतून कोणतें पसंत करावें? इंग्लंडच्या एका प्राचीन राजानें पुष्कळ खेडीं उध्वस्त करून मृगयेसाठीं तेथें एक मोठें उपवन तयार केलें होतें. तो पौरुषविनोदनाचा भोक्ता होता यांत संशय नाहीं. पण त्याला प्रजासेवक म्हणतां येईल किंवा नाहीं हा प्रश्न आहे. तेव्हां काव्य व कारुण्य यांतील कोणत्या वृत्तीचा परिपोष करावा हें निश्चित करावयाचें असेल त्यावेळीं हा निर्णय करतांना कोणता निकष घ्यावा? रोम जळत आहे आणि नीरो सारंगी वाजवीत बसला आहे. मिथिला जळत आहे आणि जनक-राजा आध्यात्मिक चर्चा करीत बसला आहे. यांत अंतर आहे. प्रजेची सेवा यथाशक्ति केल्यावर व्यर्थ चिंता करीत हृदय जाळण्याऐवजीं हृदयांत अंतर्यामीचें स्मरण दृढ करण्याचा प्रयत्न करणें हें आर्यवृत्तीचें द्योतक होय. मूठभर लोकांच्या विलासासाठीं अथवा ऐश्वर्यासाठीं निसर्गाच्या शक्तीचा उपयोग करून घेणें आणि प्राकृतिक सौंदर्याचा नाश करणें हा अधर्म होय. पण आर्तिनाशनाच्या योगानें होणारा हृदयविकास सोडून प्रकृतीच्या विभूति-

दर्शनामधून तो प्राप्त करून घेण्याची इच्छा बाळगणें इष्ट आहे कीं काय ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

या धबधब्यांतून वीज उत्पन्न करावी किंवा नाहीं याची चर्चा आज अनेक वर्षें चालू आहे. शरावतीचें पाणी एकीकडे नेऊन मोठमोठ्या नळांतून खालीं उतरवून त्यांच्या साहाय्यानें जर तेथें वीज उत्पन्न केली तर सबंध म्हैसूर संस्थानाला अगदीं स्वस्त दरांत वीज पुरवितां येईल, इतकेंच नव्हे तर उत्तर आणि दक्षिण कर्नाटकलाहि पुरवठा करतां येईल व मोठें लोकहित साधेल खरें. परंतु असें केल्यानें तें अद्भुतरम्य नैसर्गिक दृश्य कायमचें नष्ट होईल त्याचें काय ? या दोन गोष्टींपैकीं इष्ट कोणती याचा निर्णय अद्याप होऊं शकला नाहीं. हजारों, नव्हे लाखों लोकांना पोटभर खायला मिळेल; शेकडों विज्ञानवेत्त्या तरुणांना आपली योग्यता सिद्ध करण्याची संधि लाभेल. हजारों जनावरांची पीडा दूर होईल ! ! एका ठिकाणीं असा कारखाना यशस्वी झाला तर हिंदुस्थानांतल्या सगळ्या प्रपातांचा अशाच प्रकारें उपयोग करतां येईल आणि एका महान् शक्तीचा देशाला सततचा लाभ होईल ! असें असतांना केवळ एका भीषणरम्य दृश्याचा लोभ धरून आपण या सर्व हितकर गोष्टींचा त्याग करावा का ? तें इष्ट तरी होईल ? कलेच्या हव्यासालाहि कांहीं मर्यादा आहेच ना ? आपल्या राणीचें मनोविनोदन व्हावें म्हणून आपली राजधानी जाळणाऱ्या नीरोची सुलतानी वृत्ति आणि वरील कलासक्ति या दोन्ही गोष्टी तत्त्वतः एकच आहेत कीं नाहीं ?

या प्रश्नाचें जें उत्तर देण्यांत येतें त्याचा उल्लेख करण्यापूर्वीं थोडेंसें विषयांतर करणें जरूर आहे. युरोपांत जेव्हां पहिलें महायुद्ध सुरू झालें आणि लाखों तरुण तोफा आणि बंदुकांच्या भक्ष्यस्थानीं पडले तेव्हां साहित्यशिरोमणि रोमाँ रोलँच्या भूतदयेला द्रव आला व घायाळ झालेल्या सैनिकांच्या शुश्रूषेची त्यानें थोडी व्यवस्थाहि केली. परंतु उभयपक्षांच्या शत्रूंनीं जेव्हां परस्परांच्या कलापूर्ण इमारतींवर बाँबची सरबत्ती सुरू केली तेव्हां मात्र त्याच्यानें राहवलें नाहीं. त्यांचा कलात्मा पुण्यप्रकोपानें भडकला आणि बुलंद आवाजानें गर्जून त्यानें अवघ्या यूरपला इषारा दिला कीं– " हे करंट्यांनो ! तुम्हांला एकमेकांना ठार करायचें असेल तर खुशाल करा. जगांतून नष्ट व्हायचें असेल तर नष्ट व्हा एकदांचे. पण या कलाकृति म्हणजे

आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या अमर कृती आहेत. त्यांच्या करवींच अखिल मानव जातीचा आत्मा स्वतःला व्यक्त करीत असतो. निदान त्यांचा तरी विध्वंस करूं नका !"

रोमाँ रोलाँची आर्षवाणी यूरपनें ऐकली. आणि युद्ध्यमान पक्षांनीं कलाकृतींचा संहार बंद केला. कलाकृति ह्या खरोखरच मानवी आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या द्योतक वा प्रेरक आहेत कीं केवळ उच्च अभिरुचीनें झांकलेल्या विलासितेचीच साधनसामुग्री आहेत ?

खरा कलाविज्ञ असेंच सांगेल कीं कला आणि विलासिता यांत जमीन-आणि अस्मानाचें अंतर आहे. आणि कलाकृतींच्या द्वारें माणसाला जो निरतिशय आनंद होतो तो खरोखरच सुप्त आत्म्याला जागा करीत असतो. कोट्यवधि वोल्टची विद्युत्शक्ति उत्पन्न करून लाखों लोकांच्या पोटा-पाण्याचा प्रश्न सोडविणें ही अनिष्ट गोष्ट खासच नव्हे. परंतु असंख्य लोकांना कलेच्या द्वारें जो आनंद आणि जी संस्कारिता मिळते त्यायोगें आत्म्याचें पोषण होतें.—आत्म्याला खाद्य मिळतें !

आणि जोग म्हणजे कांहीं 'पौरुषेय' कलाकृति नव्हे. कलाकारांना भव्यता आणि रमणीयता यांचें एकाच वेळीं शिक्षण आणि दीक्षा देणारी प्रकृतिमातेची ती अलौकिक विभूति आहे. तिला भंगविणें म्हणजे नास्तिक विद्रोह करणें आहे व तो पुकारण्यापूर्वी आपणांला हजारदां विचार करावा लागेल. जोगचा धबधबा ही केवळ याच युगाची संपदा वारसदारी नव्हे. यापूर्वीं आपल्या अनेक ऋषि पूर्वजांनीं त्याच्या संमुख अनुष्ठान मांडून जग-दात्म्याचें ध्यान धरलें असेल आणि यानंतरहि आपलेच काय पण आपल्या वंशजांचे वंशजहि या प्रपाताचें दर्शन घेऊन जीवनाच्या अज्ञात व सुप्तशक्तीचा साक्षात्कार करून घेतील.

केवळ उपयुक्ततावादाचा आश्रय घेऊन—

"अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन्"—अशा प्रकारचे जडवादी आपण बनतां कामा नये. या प्रपाताला अभंग ठेवून जर कांहीं लाभ मिळवितां आला तर अवश्य मिळवावा आणि ही गोष्ट मानव बुद्धीला अशक्य नाहीं. परंतु या 'तांडव योगा' च्या दर्शनापासून मनुष्य जातीला वंचित करण्याचा धर्मतः कोणालाच अधिकार नाहीं. देवळांत आपण मूर्तीची स्थापना करतों

तद्वत् निसर्गानेंहि त्याच विराट स्वरूपाच्या भव्य प्रतिमा आमच्या संमुख उभ्या केल्या आहेत. तेथें केवळ दर्शन, ध्यान आणि उपासना यांच्यासाठींच यावें—

आणि हृदयांत कांहीं सामर्थ्य असेल तर तदाकार व्हावें !!

## पाषाणहृदय

१७

"बौद्ध, शैव आणि जैन या तीन पंथांत कांहीं साम्य आहे काय ?" या प्रश्नाचें उत्तर आपण एकाद्या तत्त्वज्ञान्याकडून मागीत नाहीं. तर महाराष्ट्राच्या हृदयस्थानावर बसलेल्या एलापूरच्या फत्तराना विचारतों आणि ते उत्तर देतात, 'साम्यच काय पण हे तीन्ही पंथ एकाच परंपरेच्या तीन पिढ्या आहेत. याविषयीं जर शंका वाटत असेल तर या, येथें आम्ही आपलें हृदय उघडून ठेवलें आहे त्याचें दर्शन घेऊन जा !"

एलापूर, एल्लूर अथवा वेरूळ—ज्याला इंग्रजींत एलोरा असें म्हणूं लागले आहेत—हें आज एक लहानसें गांव आहे. जुन्या काळीं येथें चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे राजवंश राज्य करीत होते. एकमेकांशीं लढणारे व परस्परांवर विजय मिळवून त्याचा डांगोरा पिटण्यासाठीं मोठमोठे विजयस्तंभ उभारणारे राजे दुनियेंत सर्वत्र आढळतात; परंतु या ठिकाणीं मात्र आपली धर्मश्रद्धा सेवेच्या व भक्तीच्या रूपानें व्यक्त करण्यांत महाराष्ट्रांतील प्राचीन राजांमध्यें चढाओढ लागली असावी असें वाटतें. जगाची जिज्ञासावृत्ति तृप्त करावयाची आणि भारतीय संस्कृतीची थोडी दिशा दाखवावयाची एवढेंच केवळ या लेण्यांचें आज काम उरलें आहे ! तथापि एके काळीं हीं लेणीं एका मोठ्या विद्यापीठास आश्रय देत असत. देशोदेशींचे श्रमण, जंगम व साधु येऊन या लेण्यांतून रहात; आसपासच्या गांवांतील लोक जें कांहीं अन्नवस्त्र पुरवितील त्यावर संतुष्ट असत; धर्मांची चर्चा व चिंतन करीत आणि हिन्दुस्थानांतील जनतेला कल्याणाचा मार्ग दाखवीत असत. एकाद्या सरोवरांतून पुष्कळसे कालवे काढून लोक आसपासची जमीन जशी सुपीक

बनवितात त्याचप्रमाणें या लेण्यांतून राहणारी साधुमंडळी धर्मात नवे नवे शोध लावून त्या धर्मामृताची पाणपोयी गांवोगांवीं घालीत. अथवा त्याची कावड भरभरून लोकांच्या घरोघरीं पोहोंचवीत. आणि त्याकाळचे राजे जसें आपलें वैभव या साधुवृंदाच्या चरणीं अर्पण करीत त्याचप्रमाणें देशांतील मूर्तिकार व चित्रकार या लेण्यांना सजविण्यांत आपल्या कलेची सार्थकता मानीत.

सारांश, लेण्यांची ही मालिका आमच्या पूर्वजांच्या राजकीय व प्रजाकीय आकांक्षांची प्रतिनिधि आहे. एका काळच्या एका बादशहानें आपल्या प्रेमाला कलेचें रूप देण्यासाठीं बनविलेला हा कांहीं 'ताज' नव्हे ; तर हिन्दुस्थानांतील महाजातींच्या हृदयींचें भाव या लेण्यांमधून अमर करून ठेवले गेले आहेत. आणि म्हणूनच ज्या भक्तिभावानें आपण वेद, उपनिषत्, रामायण व महाभारत वाचतों त्याच भक्तिभावानें या लेण्यांचें दर्शन आपण घेतलें पाहिजे.

येथें आपल्याला लाकूड, माती, मेण किंवा धातु यांचें कोरीव काम दिसणार नाहीं. अथवा संगमरवरासारख्या गुळगुळीत दगडांची कलाकुसरहि येथें आढळायची नाहीं. येथें महात्म्यांच्या चारित्र्याप्रमाणें कठिण असणाऱ्या दगडांवर त्यांच्याच कारुण्याप्रमाणें कोमल असणारीं फुलें, वेलबुट्टी, आणि मूर्ति खोदलेल्या दिसतील. 'वज्रादपि कठोर' पाषाण निवडून त्यावर 'कुसुमादपि मृदु' अशा मूर्ति उठविण्याची हिंमत करणाऱ्या कारागिरांची पूजा करून त्यांच्याकडून कलेची दीक्षा घ्यायला स्वर्गातून साक्षात् ब्रह्मदेव आले असले तरी कांहीं आश्चर्य नाहीं. या कृति पाहून देशोदेशींचे कलाप्रेमी आश्चर्यचकित झाले तर त्यांत नवल कसलें ? या लेण्यांविषयीं एका ताम्रपटावर लिहिलें आहे कीं, " देव जेव्हां आपापल्या विमानांत बसून स्वच्छंद विहार करीत असतांना या ठिकाणीं आले. तेव्हां या स्थापत्याचें सौन्दर्य पाहून ते ध्यानमग्न झाले. विशेषतः कैलासमंदिराची शोभा पाहून ते उद्गारले, 'हें मंदिर मनुष्यनिर्मित असणें शक्यच नाहीं. महादेवाप्रमाणेंच हें स्वयंभू असलें पाहिजे !' ब्रह्मा आणि विश्वकर्मा यांचा समकालीन जो स्थपति या लेण्यांचा कर्ता होता तो देखील स्वतः म्हणूं लागला, 'ही कृति तर अत्यंत अद्‌भुत आहे ! मी ही कशी निर्मिली हें

माझें मलाच माहीत नाहीं. अशीच दुसरी एकादी कलाकृति तयार करण्यास जर पुनः कोणी मला सांगितलें तर तसें करण्याची माझी हिंमत व्हावयाची नाहीं! हें जें कांहीं निर्माण झालें तें झालें!"

तेव्हां अशा या कृतीला जर आम्ही अपौरुषेय म्हटलें तर काय हरकत आहे? ती बनवणाऱ्या स्थपतीलाहि जर ती वस्तु कशी बनली हें माहित नाहीं तर ती मानवकृति आहे असें आपण कसें म्हणूं शकतों?

कालिदासानें जेव्हां रघुवंश रचिला तेव्हां सरस्वतीनें त्याला वरदान दिलें होतें आणि जेव्हां त्यानें चौथा किंवा पांचवा सर्ग सुरू केला तेव्हां तर सरस्वतीनें त्याच्या हातून लेखणी हिसकावून घेतली आणि स्वतःच तो सर्ग लिहून टाकला. तात्पर्य या सर्गांत सुंदर शब्दांची इतकी कलाकुसर आणि भावनांचा इतका अद्‌भुत विलास आहे. येथेंहि साक्षात् स्थापत्यकलेनें जातीनें या स्थपतीच्या हृदयांत, हातांवर, डोळ्यांत आणि बोटांवर आपलें आसन ठोकलें असेल आणि मग समाधिस्थितींतच स्थपतीनें हें सर्व खोदकाम करून टाकलें असेल!

कोणा एका मूर्तिकाराचें सलग असें हें काम नव्हे. शेंकडों मूर्तिकार येथें एकत्र आले असतील; परन्तु काम सुरू करण्यापूर्वींच त्यांचा जो पुढारी स्थापत्याचार्य असेल त्यानें आपल्या प्रत्येक साहाय्यकाच्या छातीला स्पर्श करून असा संकल्प केला असेल कीं,

ॐ मम व्रते हृदयं ते ददामि।
मम चित्तमनुचित्तं तेऽस्तु॥

आणि मग सर्व डोकीं, सगळीं हृदयें आणि सारीं बोटें जणूं तीं एकाच माणसाचीं असावींत अशा प्रकारें काम करूं लागलीं असतील.

—२—

वेरूळचीं लेणीं पाहण्यास पहिल्याप्रथम आम्ही नागपूर कॉंग्रेसनंतर गेलों होतों. कोणत्या रस्त्यानें जायला हवें याचीहि आम्हांला माहिती नव्हती. कदाचित् पाचोऱ्यास उतरून आम्ही अजिंठ्यास गेलों असूं. दौलताबादच्या स्टेशनावर उतरून तेथील किल्ला पाहिल्यानंतर एक भाड्याची गाडी करून आम्ही वेरुळास गेलों होतों. श्री. नरहरिभाई परीख यांच्याव्यतिरिक्त

आमच्याबरोबर आणखी कोणकोण होते हें मला आतां नीट आठवत नाहीं. वाटेंत खुल्दाबाद लागलें असावें असें अंधुक स्मरतें. तेव्हां आरंभापासून अखेरपर्यंत त्या कुंद गाडींतच मी बसून राहिलों नाहीं. अधिकांश रस्ता मी पायींच आक्रमिला होता, दुपारचें ऊन इतकें कडक होतें कीं इकडून तिकडून मोठमोठीं हिरवींगार पानें आणून मी तीं आपल्या डोकीवर ठेवी आणि त्यावर गांधी टोपी घाली. पानें सुकून गरम होत तेव्हां मी तीं बदली. त्यावेळीं मला जो आनंद झाला होता तो कांहीं औरच होता. त्यावेळीं म्हणजे एकोणीस वर्षांपूर्वीं माझी दृष्टि तरुण होती; माझी देहयष्टि तरुण होती आणि मी भारतीय संस्कृतिचें स्वरूप जाणून घेण्यासाठीं अधीर झालों होतों. कैलासाचें मंदिर, जैन लोकांची इन्द्रसभा, महारवाडा—धेडवाडा या नांवानें ओळखलीं जाणारीं बौद्ध लेणीं वगैरे सर्व कांहीं मी नव्या डोळ्यांनीं पाहिलें होतें. त्याचें स्मरण अद्यापिहि आहे.

एकादी गोष्ट दुसऱ्यांदा पाहिली कीं तिच्या पहिल्या वेळच्या आठवणी आपोआप बुजतात व नवीन चित्र जुन्या चित्राची जागा घेतें असा सर्व-साधारण समज आहे व तो निःसंशय खराहि आहे. परन्तु वेरूळच्या लेण्यांच्या बाबतींत मात्र मला असा अनुभव आला नाहीं. जुनीं चित्रेंहि मज-जवळ आहेत अन् नवीनहि ! या दोन्ही चित्रांचा एकमेकांवर प्रभाव पड-लेला आहे ही गोष्ट मी नाकारीत नाहीं. पण जुन्या चित्रांचें वैशिष्ट्य अजून नाहींसें झालेलें नाहीं.

पहिल्या खेपेप्रमाणें या खेपेसहि आम्ही सर्वांत आधीं कैलासचेंच लेणें पाहिलें. हें लेणें म्हणजे येथलि चौतीस लेण्यांची शिराणी ! ज्याच्याजवळ पुरेसा वेळ नसेल त्यानें तर प्रथम हेंच लेणें पाहिलें पाहिजे. परंतु जर कोणी असें म्हणेल कीं कैलास लेणें पाहिल्यानें वेरूळच्या सर्व लेण्यांची कल्पना येईल तर तें मात्र चूक आहे. सोळा नंबरचें हें कैलास लेणें, एकुणतीस नंबरची ' सीता न्हाणी ', तेहतीस किंवा चौतीस नंबरची इन्द्रसभा – निदान इतकीं लेणीं तरी पाहायलाच हवींत आणि बौद्ध लेण्यांत जे विहार व चैत्य आहेत त्यांपैकीं निदान एक एक नमुना तरी बघितलाच पाहिजे. विशेषतः दहा नंबरच्या लेण्यांत जें लांकडाचें अनुकरण केलें गेलें आहे तें पाहिल्यावांचून कार्ली व अजिंठा यांच्याशीं याचें किती साम्य आहे याची पूर्ण कल्पना येणें

शक्यच नाहीं. चौदावें लेणें म्हणजे श्री गजाननाच्या मातांचें सम्मेलनच आहे जणुं; हें लेणें न पाहून भागणार नाहीं. पंधराव्या लेण्याच्या बाबतींत हें लेणें आहे कीं नंतरची बनावट आहे याविषयीं हटकून सन्देह निर्माण होतो. पुरेसा वेळ असेल तर यांपैकीं एकहि लेणें सोडतां येण्यासारखें नाहीं. ज्याला पुरेशी फुरसत असेल त्यानें निदान दोन तीन वेळां तरी हीं लेणीं पाहण्यास गेलेंच पाहिजे. आम्ही या खेपेस सप्टेंबर महिना निवडला होता. हें अनेक दृष्टींनीं योग्यच झालें. कारण पावसाळ्याचा उत्तरार्ध असल्यामुळें सगळीकडे हिरवेंगार होतें आणि आकाशांतील ढगहि अगदींच विरक्त झालेले नव्हते.

या लेण्यांविषयीं मी लिहूं तरी कसें हेंच मला समजत नाहीं. एक एक लेणें घेऊन त्यावर एक एक स्वतंत्र लेख लिहिला तरी संतोष होणार नाहीं. कारण प्रत्येक लेण्यांत कित्येक लहान मोठ्या मूर्ति असतील, अनेक प्रसंग कोरलेले असतील, अनेक पशु त्यांच्या स्वाभाविक स्थितींत चित्रित केले गेले असतील. ज्याप्रमाणें आम्ही प्रत्येक गोष्ट एकाग्र होऊन पहात होतों त्याचप्रमाणें प्रत्येक मूर्ति किंवा प्रसंग याविषयीं स्वतंत्र लेख लिहिले पाहिजेत. तेव्हां कुठें संतोष होणार आणि जर तसें होऊं शकणार नसेल तर एकेका लेण्यावर एकेक लेख लिहिण्याचा तरी काय फायदा ?

कैलास लेण्यांत अनेक ठिकाणीं रावण आपल्या वीस हातांवर कैलास उचलत आहे आणि वर शिव-पार्वती व नंदी विराजमान आहेत असे प्रसंग कोरलेले आहेत. हें सगळें मंदिर, त्याच्या आजूबाजूच्या ओसऱ्या आणि त्याच्या आंत एका बाजूस कोरलेलें दुसरें मंदिर, हें सर्व पाहून शिल्पकाराच्या कल्पनाशक्तीच्या साहसानें मन दंग होऊन जातें. मंदिराच्या दोहों बाजूस दोन हत्ती आणि दोन विजयस्तंभ आहेत. हत्तींची अगदीं दुर्दशा होऊन गेली आहे. आजहि जर एकादा मूर्तींचा 'सर्जन' खटपट करील तर या हत्तींचे तुकडे एकत्र करून एक कामचलाऊ हत्तीसारखा हत्ती अवश्य बनवूं शकेल. असें सांगतात कीं औरंगजेबानें या लेण्यांचाहि बराच नाश केला आहे. त्यानें घृष्णेश्वराचें मंदिर पाडविलें हें कोणीहि समजूं शकेल. जर त्यानें मनांत आणलें असतें तर त्या मंदिरांत एकहि मूर्ति राहूं शकली नसती. परंतु मूर्तिविनाशक लोक मूर्तींचा चुरा करून टाकीत नाहींत. त्यांना भग्न करून

टाकतात. कुणाचें नाक कापलें, कुणाचा कान उडवून दिला, कुणाचे हात किंवा पाय नाहींसे केले! असें करून मूर्तिगणिक कांहींतरी वैगुण्य उत्पन्न केलें कीं झालें. कारण मग त्यांची पूजा कुणी करणार नाहींच!

एक कट्टा मुसलमान चित्रांचा शोकीन होता. त्यानें आपला धर्म आणि चित्रें या दोहोंचा संचय करण्याचा एक मध्यम मार्ग शोधून काढला. त्यानें चित्रांचें एक अल्बम विकत आणलें आणि काळ्या शाईत बोटें बुडवून सर्व चित्रांच्या चेहऱ्यावर एक एक डाग पाडला. असें केल्यानें त्याच्या मनांत असा विश्वास उत्पन्न झाला कीं, सजीव वस्तूंच्या प्रतिकृति बनविण्यानें ईश्वराचा जो अपमान होतो त्याचें मी परिमार्जन केलें. आतां हीं चित्रें पाहण्यास कांहींच हरकत नाहीं. अशा प्रकारच्या सोयी नसत्या तर जितक्या कलाकृति उरल्या आहेत तितक्याहि उरूं शकल्या नसत्या.

हें मंदिर जेव्हां कोरलें गेलें असेल त्यावेळीं मूळ कल्पना त्यावर गिलावा करून त्या गिलाव्यावर चित्रें काढण्याची होती कीं नाहीं हें आज आपल्याला कसें समजणार? मला असें वाटतें कीं, कोरतांना दगडांतच सारें सौन्दर्य आणण्यांत कांहीं कसर ठेवली गेली नाहीं. तरीहि त्यावर पातळ गिलावा करून अत्यंत सुंदर रंगांचीं चित्रें काढण्याचा संकल्प प्रारंभापासून असावा. अजिंठ्याच्या भिंतीवरील चित्रकारी अद्यापिहि थोडीबहुत टिकून राहिली आहे. या मंदिरावरहि कोठें कोठें किंचित् रंगांचा आभास दृष्टिस पडतो. मंदिराच्या गच्चीवर एके ठिकाणीं छतामध्यें थेट अजिंठ्याच्या कारागिरीच्या अवशेषासारखा थोडासा भाग उरलेला आहे. यांतील एका ठिकाणचा एक मोर उडून गेला आहे. पण तसबिरीची कला नष्ट झालेली नाहीं. एके ठिकाणीं एका रमणीचें डोकें आणि तिचे कमलाच्या पाकळ्याप्रमाणें दिसणारे डोळे एवढेंच शिल्लक राहिलें आहे. या चित्राचा रंग, नाजुकपणा आणि ढब हीं अजिंठ्यापेक्षां किंचिदपि कमी नाहींत.

सर्व मंदिराचें ओझें उचलून धरणारे लहान लहान हत्ती विहार करीत असलेले दाखविले आहेत. कोणी आपल्या सोंडेनें दुसऱ्याचा पाय पकडीत आहेत, दुसरे दोन हत्ती आपआपल्या सोंडी एकमेकांच्या सोंडींना लावीत आहेत; कांहीं हत्ती सोंडेनें गंडस्थळावरील माशा उडवीत आहेत आणि कांहीं मोठें धारिष्ट करून वाघाच्या मागें लागले आहेत. मंदिराच्या आसपास

एक सुंदर आंगण आहे आणि त्यानंतर तीन्ही बाजूंस खालीं ओसऱ्या आहेत. त्यांत विशाल मूर्ति कोरलेल्या आहेत. या मूर्ति शक्ति व भावना व्यक्त करण्याच्या बाबतींत भारतीय मूर्तिकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. एकेक मूर्ति पाहतांच हृदय कसें दडपलें जातें! आणि अशा बलवती मूर्तींची कल्पना करणारे आमचे पूर्वज कसे संकल्पवीर असतील, कसे समर्थ कल्पनावीर असतील याचें अनुमान होऊन आपल्या क्षुद्रतेबद्दल तिरस्कार वाटूं लागतो.

कैलास लेणें पाहून आम्हीं सरळ जैनांची इंद्रसभा पाहण्यास गेलों. येथील आंगणांत एका बाजूस एकच हत्ती आहे आणि दुसऱ्या बाजूस जो एकच विजयस्तंभ होता त्याचे तीन तुकडे होऊन तो जमिनीवर पडला आहे. हें लेणें म्हणजे कैलासाचीच एक छोटीशी आवृत्ति आहे. यांत याचें स्वतःचें असें पुष्कळ वैशिष्ट्य आहे. तथापि कैलास पाहिल्यानंतर याचें-महत्त्व आपोआप कमी होतें. नव्या प्रेक्षकांना आमची अशी शिफारस आहे कीं त्यांनीं प्रथम डावीकडे वळून शेवटची इंद्रसभा पहावी आणि मग कैलासाकडे यावें.

महावीराच्या या लेण्यास इंद्रसभा कां म्हणतात हें कोणालाहि माहित नाहीं. पण इतक्या आकर्षक लेण्यास एकादें नांव तर हवेंच ना? 'इंद्रसभा' हें नांव चालत आलें आहे, तेंच राहिलें तर हरकत काय?

यानंतर पहात पहात आपण परत आलों कीं एकोणीस नंबरचें लेणें आपलें ध्यान आकर्षित करून घेतें. भव्यतेच्या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि लेण्याहून हें लेणें कमी नाहीं. हें लेणें पाहतांच मुंबई जवळील घारापुरी ऊर्फ 'एलिफंटा केव्हज'ची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. सिंहाच्या मूर्ति असाधारण उंच आणि मोठ्या आहेत, पण एकहि मूर्ति प्रमाणबाह्य नाहीं. याच्याच एका बाजूनें वेळगंगेचा धबधबा अथवा 'सीतान्हाणी'कडे जाण्याचा रस्ता आहे.

आरंभीं साधूंना राहण्यासाठीं म्हणून हें लेणें कोरलें गेलें असेल, परन्तु तें इतकें भव्य, सुंदर आणि उदात्त झालें कीं त्यांत जास्त दिवस राहण्याची कोणी हिम्मतच करीत नसे. असें तर झालें नसेल ना? अशा-

या लेण्यांत राहूनहि अस्वस्थ न होण्याइतका स्वतःला मोटा कोण वरें मानून घेईल?

शेवटचीं जैन लेणीं, मधलीं शैव लेणीं आणि उजव्या बाजूस शेवटीं बनलेलीं बौद्ध लेणीं वगैरे सर्व मिळून इतका विस्तार आहे कीं मनुष्य थकून जातो. आणि प्रत्येक लेणें आंत इतकें खोल आहे कीं बाहेरून बरोबर कल्पनाहि येत नाहीं. शहरांत जागेची कमतरता असते. म्हणून उंच उंच घरें बनविलीं जातात. येथें तीन तीन मजली लेणीं बनविण्याचें कारण एवढेंच कीं येथील दगड विशाल आहेत. आडवे तिडवे, उंचसखल, वाटेल तितकें दूरवर खोदण्याची शक्यता आहे.

या लेण्यांचे चौकोनी खांबहि शोभेच्या बाबतींत येथील प्रचंड मूर्तींहून यत्किंचित्‌देखील कमी नाहींत. मी अगदीं थकून गेल्यामुळें एका लेण्याच्या आंत न जाण्याचा विचार करीत होतों. पण मनांत विचार आला, 'एवढेंसेंच सोडलें असें व्हायला नको. थोडा त्रास होईल खरा पण आंत जाऊन आलें पाहिजे' आंत जाऊन पाहिलें तों काय! दोन अगडबंब खांबांच्या मध्यावर त्यांना एक दुसऱ्याशीं जोडणाऱ्या गणितांतील 'धनुष्य-कंसा' च्या आकाराच्या कमानी होत्या. या कमानींची जाडी पाहून मी तर थक्क होऊन गेलों. ही मनुष्याची कला असणें शक्यच नाहीं. किंवा ही दैवी आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. हिचा आकार किंवा प्रमाण हें आसुरी किंवा राक्षसीच म्हटलें पाहिजे.

सगळीं लेणीं घाईघाईंत पाहून घेतलीं. ज्याप्रमाणें माकडें भराभर खाऊन आपल्या गालांतील थैल्या भरून घेतात आणि मग फावलें कीं, आरामांत त्यावर ताव मारतात, अथवा ज्याप्रमाणें जनावरें आधीं भराभर खाऊन घेतात आणि मग रवंथ करतात त्याचप्रमाणें मी वेळेचें अवधान बाळगून घाईघाईनें सारें पाहून घेतलें आणि आतां कित्येक वर्षेंपर्यंत त्या संस्कारांचें स्मरण करकरून रवंथ करीत राहीन. ही लेखमाला म्हणजेसुद्धां या 'रोमन्थ क्रिये' चाच एक प्रकार आहे असें समजा. यांतहि खरी मजा नाहीं. कारण ही तर रवंथाची सुरुवात आहे.

ज्यांनीं या धर्मालयाचें दर्शन घेतलें ते माझे हे डोळे धन्य होत! ज्यांना असें हें दिव्य पोषण दोन वेळां मिळालें ते हे माझे नेत्र धन्य आहेत!

आणि ज्यांनीं मला प्रेमानें निमंत्रण देऊन एवढी मोठी मेजवानी दिली ते माझे स्नेहीहि धन्य होत ! आणि जर माझ्या वाचकांना हीं स्थानें पाहण्याची उत्कंठा झाली तर तेहि धन्य होत ! कारण भारतवासी असूनहि हीं स्थानें न पाहण्यासारखी जीवनाची विफलता दुसरी कोणती असणार ? या स्थानांहूनहि ज्या महात्म्यांची जीवन-विभूति अधिक भव्य आहे ते असलीं स्थानें पाहण्यास न जाईनात का ?

## अजिंठा १८

सतरा वर्षांपूर्वी नागपूर काँग्रेस संपल्यावर आम्हीं अजिंठ्याचीं लेणीं पाहायला गेलों होतों. त्यावेळीं मनांत आलेला एक विचार मी जुगतराम-भाईपाशीं बोलून दाखविला होता. एकादा विचार लिहून काढला किंवा कोणास सांगून टाकला कीं तो माझ्या डोक्यांतून निघून जातो. ह्या विचाराच्या बाबतींतहि तसेंच झालें होतें. परंतु अजिंठ्याला जातांच पुन: नेमका तोच विचार त्याच ठिकाणीं चिंचेवरच्या भुतासारखा 'हाऊ' म्हणून समोर येऊन उभा ठाकला.

बौद्ध साधूंना हीच जागा कशी सुचली, हीच कशी सुचली ?

अजिंठ्याचा रस्ता म्हणजे जणूं ध्यानाचा विशुद्धिमार्गच. निरनिराळीं वळणें घेऊन, आंत खोल खोल जाऊन, अखेर त्याचें रहस्य काय तें शोधायचें. गाई राखणाऱ्या गुराख्यांना, मेंढ्या पाळणाऱ्या धनगरांना त्याच-प्रमाणें इंद्रियाचें दमन करणाऱ्या वानप्रस्थांना आणि अखंड भटकणाऱ्या परिव्राजकांना देखील हा दरींतून येणारा जीवनप्रवाह, हा चैतन्यप्रवाह येतो तरी कोठून हें समजून घेण्याची उत्कंठा व्हावयाची ! 'वाघोरी' नदीचा उगम कोठें आहे, तेथलें वातावरण कसें असेल हा प्रश्न ज्या उत्कटतेनें गोवाऱ्यांना पडला असेल त्याच उत्कटतेनें हे भिन्न भिन्न संकल्प विकल्प हृदयांत कसे उठतात, कोठून उसळ्या मारतात, अगदीं सुकून गेलेले असले तरी आशेची थोडीशी वृष्टि मिळतांच त्यांना पूर कसा

येतो हें शोधल्यावांचून गत्यंतर नाहीं असें कित्येक साधनवीरांना वाटलें असेल. ते एकांत शोधीत निघाले. त्यांनीं घर सोडलें, दार सोडलें, माया-ममता सगळें कांहीं सोडलें. त्यांची धनदौलत, जातपात, सामाजिक प्रतिष्ठा आणि गौरव हीं तर गेलींच होतीं; पण त्यांनीं आपले प्रिय विषय, आपला विनोद आणि आपली रसिकता सुद्धां मन कठिण करून त्यागली होती. साहित्य, संगीत आणि कला हीं त्यांना आंबट, तुरट आणि खारट लागूं लागलीं होतीं. तोंडांत माती किंवा राख पडली असतां आपण थू थू असें करून ती थुंकून टाकतों तशी पंचेंद्रियांच्या विषयांसंबंधीं त्यांना विरक्ति वाटूं लागली होती. त्यांनीं साधकवीर व्हावयाचा निर्धार केला होता. ‘अरतिर्जन संसदी’ असें जपत जपत ते शहरी ‘समाज’ सोडून खेड्यांत गेले. तेथेंहि कंटाळले म्हणून जंगलांत गेले. स्वयं निम्नगा नदी त्यांना उत्तेजन देतच होती. ‘अजून पुढें चला, अजून आंत चला, आंत आंत प्रवेश करा, मुक्कामावर पोंचल्याशिवाय थांबूं नका’ आणि आपले हे नदीशिष्य संपूर्ण जीवनाच्या उत्साहानें गिरि-गव्हरांत प्रवेश करूं लागले. अखेर दोहोंकडच्या टेकड्या एकदम समोर येऊन भिंतीप्रमाणें उभ्या ठाकल्या. बिचाऱ्या नदीला अडचण पडूं नये असा विचार करून त्यांनीं थोडीशी मोकळी जागा आपणांमध्यें ठेवली. आपली ही भयंकर उंची पाहणाऱ्या मनुष्याला उभें राहण्यापुरती जागा जर मिळूं दिली तर अशी गर्दी करण्यापासून फायदा तो काय?

परंतु अरुंद गल्ली सरळ तर असायची! दृष्टीला एकीकडे बराच वेळ विश्रांति मिळाली तरी मन म्हणणारच ‘इदानिमस्ति संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः।’ मनाला इतका आराम तरी कां घेऊं द्यावा? म्हणून ह्या कपारींनींहि सापासारखा नागमोडी रस्ता धारण करून ह्या गूढ जागेला अधिकच निगूढ बनविली आहे. आणि जेथें ही खडकाळ दरी संपते तेथें त्यांची ही पार्वतीकन्या महादेवाचें पाणिग्रहण करण्यासाठीं सप्तपदीचा विधि करीत होत्साती उंचावरून सात उड्यांत सात कुंडें भरत खालीं उतरते.

येथपर्यंत तर येऊन पोंचलों, पण आतां पुढें काय?

मागले पुढले कडे साद घालीत विचारते झाले ‘पुढें काय?’

आतां एक तर ह्या कड्यावरच डोकें फोडून घ्यायचें; नाहीं तर पुढें

चालायचें. ह्या कड्यानेंच जर परम रहस्य लपवून ठेवलें असेल तर त्याचाहि वेध घेतला पाहिजे. ठरलें. साधकवीरांनीं खडक फोडायला सुरुवात केली. पुष्कळ पैस झाला. उबारा, शांतता आणि प्रकाश तिन्ही मिळालीं. रोज उगवणारा आणि चैतन्य देणारा सूर्य प्रभातींचे थोडे तरी 'रश्मि-समूह' टाकल्याशिवाय राह्यचा नाहीं. खालचें प्रवाहित जीवन, समोर चढणारा प्रकाश, वर पसरलेलें अनंत आकाश आणि गुहेंतील अखंड शांतता! आणखी काय हवें? साधकांनीं ध्यान धरलें. सगळें कांहीं त्यजून ते येथें आले होते पण एका गोष्टीचा त्याग करायचा ते विसरले होते. चुकून म्हणा, आसक्तीमुळें म्हणा, किंवा कारुण्यप्रेरित होऊन म्हणा, येतांना त्यांनीं प्रमार्थी पण स्नेहार्द्र असें मन बरोबर आणलें होतें. आणि मन म्हणजे महान् जादुगार. त्याच्या स्मरणरूपी पोतडींत तसेंच विस्मरणरूपी भुयारांत किती तरी गोष्टी भरलेल्या असतात. गुहेंतील आकाश आणि अवकाश दिस-तांच त्यानें विश्वामित्राप्रमाणें एक सुप्रसिद्ध सृष्टि पाहतां पाहतां निर्माण करण्यास सुरुवात केली. हां हां म्हणतां त्या गुहेंत निरनिराळ्या वर्णांचे राज-पुत्र आले. त्यांना अस्वस्थ करून सोडणाऱ्या राजकन्या उतरल्या. हत्ती, घोडे, दासदासी सगळें कांहीं तयार झालें आणि 'आम्हीं तर तुमच्याच जातीचे' असें म्हणत म्हणत अगदीं हक्कानें झाडांबरोबर त्यांच्यावरचीं वानरेंहि आलीं. नाना देशींचे वीर पुरुष आणि वकील नजराणे घेऊन आले. चारण आणि दूत शुभाशुभ समाचार घेऊन आगमन करते झाले!

आणि 'तुमच्या साधनेंत आमची मदतच होईल' असें आश्वासन देणाऱ्या भिन्नभिन्न जातककथाहि तयार झाल्या.

पूर्वपरिचित सृष्टि अशा अकल्पित वैविध्यानें कल्पना–देह धारण करून उभी ठाकल्यावर मग पूर्वाश्रमींची रसिकता आणि कलाकौशल्य थोडेंच विसांवा घेणार?

लोण्यासारखा मऊ चिखल तयार झाला. भाताच्या कुसांनीं तो मजबूत आणि गुळगुळीत बनविला गेला. समुद्रांतील शिंपले भरभरून रंग आणला गेला. खारीच्या झुबकेदार शेपट्यांचे लहानमोठे कुंचले तयार झाले. हळूं हळूं गुहेच्या छतावर कमळें फुलूं लागलीं. त्या कासारीं कलहंस विहार करूं लागले. मतंगज ताडांच्या फांद्या तोडून हत्तिणींना वारा घालते झाले.

आणि मग मूर्तिकारांचे हात स्वस्थ कसे बसतील ? ते म्हणाले, 'आम्हीं कोरून कोरून या दगडांचें अगदीं मेण करून टाकूं.' चेहऱ्यावर ज्या भावना व्यक्त झाल्या पाहिजेत, त्या ह्या निर्जीव दगडांना दाखवाव्याच लागतील. जड आणि चेतन हा भेदच चुकीचा आहे.

जिवंत माणसें अगदीं दगडाप्रमाणें अचल राहून ध्यान करण्यासाठीं म्हणून येथें आलीं आणि त्यांनीं शेवटीं या अचलेश्वराच्या पोटांत शिरून जड फत्तरांतून अगदीं जितींजागतीं माणसें निर्माण केलीं. विधात्यानें निर्माण केलेल्या माणसांपेक्षां भव्य आणि तितकींच दिव्य !

प्रति ब्रह्मदेवासारखे हे कलाधर कालाच्या पोटांत गडप झाले. परन्तु त्यांच्या त्या कलाकृति मात्र कालाशीं झगडत एकादा हात, एकादा कान, एकादा पाय यांचें बलिदान देऊन अजूनहि येथें विराजमान आहेत. काय हें विविध वैचित्र्य !

या गुहांतून प्रस्तुत झालेला हा कलाविलास येथल्या निर्वाणकामी साधूंच्या साधनेंत साधक ठरला असेल कीं बाधक ? कोणी प्रणयी राजा आपल्या प्रमद्वरा राणीला मदिरेचा प्याला घेण्याचा आग्रह करीत आहे आणि ती मानेनें नको म्हणत पण हातानें जवळ करीत आहे असें दृश्य कोणत्या समाधीमार्गाला अनुकूल ठरलें असावें ? कोणी राजकन्या मरणाच्या पंथाला लागली आहे आणि तिची दासी खिन्न मनानें तिची अखेरची शुश्रूषा करीत आहे अशीं करुण वातावरणांतलीं चित्रें पाहून साधकांना वैराग्य सिद्ध होईल काय ? किंवा ते मृत्युंजय बनतील काय ?

आजकाल एकाद्या दुःसाध्य रोगावर औषध मिळेनासें झालें म्हणजे धन्वन्तरी त्याच रोगाची लस काढून ती तेजाबांत घालून मारून टाकतात; आणि मग ती मेलेली लस—रोगजंतूचे मुडदे—शरिरांत घालून तोच रोग सौम्य स्वरूपांत रोग्याच्या शरीरांत निर्माण करतात. लस निर्विष केलेली असल्यामुळें त्यापासून प्राणघातक रोग उत्पन्न होऊं शकत नाहींत. शरिरांत अशा प्रकारें अगदीं सौम्य रीतीनें रोग उत्पन्न केला म्हणजे शरिरांतील नैसर्गीक शक्ति त्याचा प्रतिकार करायला सुरुवात करते. आणि तें विषम युद्ध शरिरांतल्या प्राणशक्तीच्या आटोक्यांतलें असल्यामुळें ती हळू हळू रोगावर विजय मिळविते. दुसऱ्या रीतीनें म्हणावयाचें झालें तर रोगाचा

होणारा परिणाम सहन करण्याइतकें शरीर खडतर बनतें आणि अखेर ही क्षमता इतकी वाढते कीं रोगाचे जिवंत जंतु जरी शरिरावर हल्ला करायला आले तरी त्यांचा कांहींच प्रभाव पडत नाहीं.

विषयवासना मारून टाकावयाची असेल तर पहिल्यानें विकारी परिस्थितीपासून स्वतःच दूर राहिलें पाहिजे. येवढ्यानें यश मात्र मिळत नाहीं. पुष्कळ वेळां प्रत्यक्ष सहवासापेक्षां विरहावस्थेत होणारें ध्यान अधिक आकर्षक, अधिक काव्यमय आणि तितकेंच अधिक बाधक व भयावह असतें. आतां तें टाळण्यासाठीं विषयांचा प्रत्यक्ष सहवास करणें म्हणजे साधकानें अध्यात्मिक आत्महत्या करणें होय. नाहीं का?

अशा स्थितींत आपण ज्या जगाचा त्याग करून आलों त्याचें केवळ प्रतिबिंब आपल्या आसपास पसरवून दिलें तर प्रापंचिक वातावरणाचें प्रत्यक्ष दर्शन टळेल आणि विरहामुळें होणारें विकृत ध्यानहि थांबेल. चित्रस्थ दुनिया खऱ्या दुनियेचा परिचय टिकवूं शकत असली तरी ती नेहमींकरिता बद्ध होऊं शकत नाहीं. रोज हें सगळें पहात राह्यचें आणि हें सगळें नश्वर आहे, दुःखपूर्ण आहे, ह्याचा उपशमच केवळ मंगलमय आहे अशी मनाची दृढ समजूत करत राह्यचें अशी एकादी साधना तर ह्या भिक्षूंनीं योजिली नसेल ना? ही साधना अखेर खरी ठरली ह्याचा अनुभव जर ते आपल्यामागें ठेवून गेले असते तर किती चांगलें झालें असतें?

ह्या गुहा एकाच व्यक्तीनें, एकाच टोळीनें किंवा एकाच संघानें एकदम तयार केल्या असें नाहीं. इसवी सनापूर्वीं दोनशें वर्षांच्या सुमारास येथल्या कांहीं गुहा खोदण्यांत आल्या. त्यापूर्वीं येथें साधूंच्या किती पिढ्या होऊन गेल्या तें समजण्यास आतां मार्ग नाहीं. ह्या गुहा आतां वापर न होतां पडलेल्या आहेत. तशाच त्या प्राचीन काळांतहि असल्या तर त्यांत कांहीं नवल नाहीं. कांहीं काळानंतर पुनः दुसरी पिढी आली. त्या पिढीनें दुसऱ्या पांच सात गुहा तयार केल्या. त्यांनाहि उतरती कळा लागली. असा हा भरती ओहोटीचा क्रम जवळजवळ हजार वर्षें चालला. विंध्याद्रीच्या कडेवर विराजमान झालेल्या ह्या गुहा आज पाठोपाठच्या बहिणीसारख्या वाटतात. पण कालानुक्रमें पाहतां मधल्या गुहा बाजूच्या गुहांच्या खरोखर आजीबाई आहेत.

आणि ह्या गुहांतलीं चित्रें चित्रकारांच्या कोणत्या पिढींचीं प्रतिबिंबें आहेत तें तरी कुणाला सांगतां येणार ?

चित्रकलेचे जे कांहीं नमुने आज शिल्लक आहेत, त्यांवरून पाहतां ह्या सगळ्यांचा कुंचला एकच आहे. शैलींत थोडा थोडा फरक वाटतो. पण त्यांतहि तीन चारांपेक्षां अधिक प्रकार नाहींत. ह्या गुहांची सुरुवात कधीं झाली तें तेथल्या शिलालेखांवरून कळतें. परंतु गुहांतल्या चित्रणांची सुरुवात कधीं झाली त्याचा कसलाच माग लागत नाहीं. परंतु जी चित्रशैली अजिंठ्यांत आहे तीच ग्वाल्हेर संस्थानांतल्या 'बाघ' गुहेंत आहे. तीच शैली लंकाद्वीपांत सिगीरी (श्रीगिरी) येथेंहि प्रकट झाली आहे. आणि तिचीच एक वसाहत मध्य आशियांतील तिबेटी मंदिरांत जाऊन वसली आहे. दुनियेंत कौशल्य नेहमीं दुर्लभच असायचें. एका ठिकाणीं साधना होण्याचाच उशीर कीं तिचे पडसाद जगाच्या अगदीं दुसऱ्या टोंकापर्यंत जाऊन पोहोंचावयाचे. तलावांत एकादा दगड टाकून पहा. तेथें जी तरंगमाला निर्माण होते ती आपलीं वर्तुळें विस्तृत करीत करीत अगदीं तलावाच्या कांठापर्यंत जाऊन भिडते. बोधि वृक्षाखालीं बसून केलेला संकल्प आणि त्यांत सांपडलेला मार्ग जर अडीच हजार वर्षें आणि पंचवीस हजार मैल दूर जाऊन पोहोंचूं शकतो तर अजिंठ्याच्या लेण्यांत विकसित झालेली चित्रकला दक्षिणेकडलीं द्वीपद्वीपान्तरें भरून साऱ्या जंबुद्वीपांत पसरावी यांत आश्चर्य तें कोणतें ?

अजिंठ्याची चित्रकला स्थलकालाचा पट चिरून थेट येथपर्यंत टिकून राहिली. परंतु तेथल्या साधनेच्या चित्रकलेचें काय झालें ? ती अधिक सूक्ष्म असल्यामुळें अधिक स्थायी, जवळ जवळ अमर व्हायला हवी होती. कदाचित् ह्या गुहांत तसे साधनासंग्राम आणि तशीं 'मार' युद्धें झालींच नसावींत. येथें उपासक येऊन राहण्याऐवजीं अनुकरण करणारे विस्तारप्रिय पुजारीच येऊन बसले असावेत. मला वाटतें, कदाचित् अजिंठा ही उपासकांची तपोभूमि नसावी तशीच ती पुजाऱ्यांची उत्सवभूमीहि नसावी. सर्व विद्याकलासंपन्न, कुशल विद्वान् आणि अध्यापनधुरीण योगी येथें राहात असले पाहिजेत. आणि अजिंठा हें एक ऐहिक आणि पारलौकिक

विद्येचें विद्यापीठ असलें पाहिजे. एरवीं अव्याहत चालणाऱ्या परंपरेशिवाय एक हजार वर्षें ह्या गुहा कशा बरें गाजत राहिल्या असत्या ?

पण हें सगळें अखेर गेलें कोठें ? हजार वर्षांची ही परंपरा नामशेष झाली येवढेंहि आज म्हणतां येत नाहीं. कारण त्या परंपरेचें नांव देखील आज कोठें ऐकायला मिळत नाहीं !

ज्यांनीं ही गुहा खोदली त्यांनीं आपला संकल्प येथें टिपून ठेवला आहे. ज्ञानाच्या उपासनेसाठीं ह्या गुहा तयार करण्यांत आल्या. या दानाच्या पुण्य-प्रतापानें दात्यांच्या मातापितरांपासून ते थेट विश्वाच्या अशेष तत्त्वापर्यंत सर्वांचें कल्याण होवो, सर्वांना उच्च गति मिळो !

किती उदात्त आहे हा संकल्प ! येथें जाति नाहीं, वर्ण नाहीं; पंथ नाहीं, देश नाहीं; स्त्रीपुरुष असा भेद नाहीं तर मग आपपरभाव तरी कोठून असणार ?

ज्यांनीं हें धर्मकार्य सुरू केलें त्यांना कल्पना तरी असेल काय कीं हें सारें अनंत काळपर्यंत टिकणारें नाहीं ? येथली ती सगळी साधना गेली कुठें ? तिचा नाश कशामुळें झाला ? आंतून कीड लागल्याशिवाय बाहेरून नष्ट होणें सोपें नसतें. विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास घ्या, किंवा आपलें मराठ्यांचें हिंदवी स्वराज्य घ्या,आंतून कुजल्याशिवाय काहीं नष्ट झालेलें नाहीं. ह्या बौद्ध प्रयोगाचा अंत कसा झाला तें कोण सांगूं शकेल ? सगळ्याच इतिहास–संशोधकांपुढें हा प्रश्न उभा आहे. कोणालाच त्याचें उत्तर सांपड-लेलें नाहीं. ह्या अजिंठ्याच्या लेण्यांसंबंधीं इतिहासहि अधिक सांगूं शकत नाहीं. परंतु ह्या गुहा मात्र प्राचीन काळच्या सामाजिक इतिहासावर भरपूर प्रकाश पाडूं शकतात. अगदीं कोपऱ्यांत-आंधारांत हीं चित्रें पडून राहिलीं म्हणूनच त्यांच्यांत भूतकालावर प्रकाश टाकण्याची शक्ति आली.

'शकुंतलां' तला विरही दुष्यंत आपल्या मनाचें समाधान करण्यासाठीं शकुंतलेचें लावण्य रेखांकित करीत असे. 'मेघदूतां' तील यक्षपत्नी आपल्या 'शापेनास्तंगमितमहिमा' भर्त्याचें भावगम्य चित्र आलेखीत असे. उषेला तिच्या चित्रलेखा सखीनें निरनिराळ्या राजपुत्रांचीं चित्रें काढून दाखविलीं. कारण उषेच्या स्वप्नांत दिसलेला राजपुत्र कोणता तें नक्की ठरवायचें होतें. 'अनिरुद्धा'चें चित्र पाहतांच उषा लाजली. 'उत्तररामचरितांत' आर्यपुत्र सीतादेवीला वनवासांतलीं रम्य चित्रें दाखवून तिची पूर्वस्मृति जागृत

करीत असे आणि तीं चित्रें पाहून सीतेला आपण खरोखरच पुन्हा वनवासास गेलों आहोंत असें वाटूं लागे. आपल्या पूर्वजांना नुसत्या कल्पनेनें इतकीं हुबेहुब चित्रें काढतां येत असावींत ! कवींना अतिशयोक्ति सहज करतां येते. रामविजय, पांडवप्रताप वगैरे पोथ्यांतून छापलेलीं चित्रें आणि आपल्या देवळांतल्या भिंतीवरील देवदेवींचीं चित्रें पाहून खात्री पटली कीं, आमच्या देशांतील चित्रकारांना आपल्या चित्रांत प्राणच काय तो फुंकतां येत नव्हता. बाकी अगदीं हुबेहुब चेहरे, सूक्ष्म गति, सूक्ष्म भाव-प्रदर्शन, निरनिराळ्या लोकांचे हावभाव, राजमहालांचीं, बगीच्यांचीं आणि जंगलांचीं अगदीं खरीं-खुरीं दृश्यें ते सहज निर्माण करूं शकत असत. हत्ती, गाय, वासरें, पशुपक्षी उठावदार रीतीनें तयार करून अशी बहार करून सोडीत कीं, त्यांत तन्मय झालेल्या मनुष्यास सांगावें लागे कीं, 'अरे बाबा, तीं केवळ चित्रें आहेत. त्यांत पागल होण्यासारखें काय आहे ?' खानदेशच्या गॅझेटियरमध्यें गुहेगुहेंतल्या प्रत्येक चित्रांतील प्रसंगाचें आणि व्यक्तीचें इतकें सविस्तर वर्णन दिलेलें आहे कीं तें वाचत असतां अजिंठ्याच्या भिंतीवरचें सारें महाभारत समोर नाचूं लागतें. शाक्य मुनी, बोधिसत्व, शुद्धोधन राजा, मातामाया मावशी, महा प्रजापति गोपा, यशोधरा आणि छोटा राहुल सगळे तेथें आहेत. पुलिकेशीच्या दरबारीं इराणी वकील आपल्या रिसाल्यासहित आलेला आहे. छदंत हत्ती आपल्याच सोंडेनें आपले सहाहि दांत उपटून लोभी पारध्याला अर्पण करीत आहे आणि ते दांत पाहून पूर्वजन्मीं त्याची पत्नी असलेली राणी पश्चात्तापानें होरपळून निघाली आहे. एका ठिकाणीं क्रोधानें अंध झालेला राजा आपल्या पायाशीं वेलीप्रमाणें वाकलेल्या दासीला शिक्षा फर्मावीत आहे; तर दुसरीकडे इच्छाभोजन मिळाल्यामुळें भिकारी संतुष्ट झालेला आहे. हिंदुस्थानच्या महा-प्रजेचा इतिहास जेव्हां कधीं तयार होईल तेव्हां त्या काळचें सामाजिक चित्र रेखाटण्यासाठीं या गुहांतील चित्रांचा उपयोग केला जाईल. अजिंठ्यांतले हे निरनिराळे प्रसंग पहात असतां आपण एक गोष्ट विसरून जातों कीं चित्रकारानें हे शेंकडो प्रसंग कसे खुबीनें एकमेकांत मिसळवून टाकले आहेत. एका चित्राची पार्श्वभूमि दुसऱ्या चित्राची पुरोभूमि म्हणून उपयोगांत आणली गेली आहे. डोळ्यांना कोठेंच असंगत असें वाटत नाहीं. ज्याप्रमाणें महाभारतकाराला युद्धाचीं वर्णनें आणि सात्त्विक संवाद, स्त्रियांचीं

नांवें आणि तीर्थांचीं वर्णनें, मुत्सद्यांची मसलत आणि कमळें चोरणाऱ्या ऋषींचा विनोद ह्या सगळयांची संसृष्टि करतां येते त्याचप्रमाणें या गुहेंतील अंधःकारांत तत्कालीन जीवनावर प्रकाश पाडणारे चित्रकार जीवनाचें साकल्यपूर्वक दर्शन करूं शकत होते. भारतरचना, भारतीयांची नगर-रचना आणि गिरिगव्हरांतील ही बौद्धकालीन चित्ररचना हा सर्व एकाच संस्कृतीचा मानसिक विलास आहे.

प्राचीन संस्कृतीचे असे अवशेष आजहि आहेत. परंतु त्यांचें करायचें काय याविपयीं मोठा मतभेद आहे. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं जुनें जें कांहीं तुटलें फुटलें असेल, उडून गेलें असेल, त्याची दुरुस्ती करून त्याला अगदीं पहिल्यासारखें बनवावें. मूर्तीचा एकादा हात तुटला असेल तर एकाद्या मूर्तीच्या ' सर्जनाला ' बोलावून अगदीं तसा हात जोडून द्यावा. सिमेंटची अगदीं बेमालुम मलमपट्टी करावी आणि कांहीं खोट म्हणून राहूं देऊं नये.

लाहोरच्या संग्रहालयांत एका मूर्तीची अशा प्रकारची सर्जरी फारच कौशल्यानें केली आहे. भिन्न भिन्न काळीं आणि निरानिराळ्या ठिकाणीं सांपडलेले मूर्तीचे कित्येक अवयव एकाच मूर्तीचे असले पाहिजेत असें अनुमान चालवून आणि ते सगळे एकत्र करून छिन्नभिन्न झालेली एक अति प्राचीन सुंदर मूर्ति अखंड बनविण्यांत आलेली आहे. त्या मूर्तीनें आपणांला अशा प्रकारें जीवदान देणाऱ्या सर्जनला आभारपूर्वक म्हटलें असेल कीं, 'या उपकाराची फेड मी कशी करूं ? मरून तुझ्या पोटीं यावें असें वाटतें.' पोटीं दगड जन्माला येणें त्या मूर्तिकाराला कितपत आवडलें असतें हा प्रश्न निराळा !

आम्ही 'आबू' वर गेलों होतों तेव्हां दिसलें कीं तेथल्या देलवाड्याच्या मंदिरांत कांहीं मोडतोड झाली कीं जयपुरी किंवा जोधपुरी संगमरवरी दगड मागवून कसलेल्या कारागिरांकडून ताबडतोब बेमालुम दुरुस्ती करून घेण्यांत येत असे. तेथें खास याच कामासाठीं पिढ्यान् पिढ्या काम करणारे कारागीर कायमचे ठेवले आहेत.

परंतु इतकी काळजी नि इतकें कौशल्य सगळीकडेच पाह्यला मिळत नाहीं. काठेवाडांत पालिठाण्याजवळील ' शत्रुंज ' पर्वतावर जैन लोकांच्या

मंदिराचें एक मोठें बन आहे. तेथल्या मंदिरांतल्या एकाद्या मूर्तीचें नाक किंवा कान मोडला म्हणजे संगमरवरी मूर्तीला देखील सिमेंटचें नाककान जोडून देतात आणि तेंहि इतकें बेडौल कीं आपल्या लावण्यमय कृतीची ही विडंबना पाहून मूळ मूर्तिकाराला जीव नकोसा व्हावा. नव्या पिढीच्या हातून होणाऱ्या अशा प्रकारच्या बेअकली सुधारणेंत किती धोका आहे हें पाहून जगांतील पुढाऱ्यांनीं असें ठरविलें आहे कीं प्राचीन वस्तूंचें नूतनीकरण न करतां किंवा अपूर्णतेची पूर्ति न करतां जें आहे त्याचेंच संरक्षण करणें योग्य ! त्याच न्यायानें अजिंठ्यांतील उरलेल्या चित्रकलेचें हल्लीं फारच काळजीपूर्वक संरक्षण करण्यांत आलेलें आहे. दुभंगलेलीं चित्रें नव्या कारागिरांकरवीं चांगलीं करून घेण्याचा जर कोणी प्रयत्न करील तर त्याला 'हजाम' ठरवून हांकून लावण्यांत येईल.

अजिंठ्याच्या चित्रांचें केवळ संरक्षण करणें हेंच योग्य आहे. परंतु तेथें जाणाऱ्या चित्रकारांनीं आपल्या अनुकृतींत पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांत कांहींच अनुचित नाहीं. मात्र भ्रम उत्पन्न होऊं नये म्हणून आपण तशी सुधारणा केली आहे असा स्पष्ट उल्लेख त्यांनीं केला पाहिजे.

यद् यद् साधु न चित्रे स्यात् क्रियते तत्तदन्यथा ।
न्यूनं संपूर्णतां याति शिल्पीभावप्रसादतः ॥

अजिंठ्याची चित्रकला जोंपर्यंत आधुनिकांच्या दृष्टिआड होती तोंपर्यंत ती खूप सुरक्षित होती. लेण्यांत आराम करणाऱ्या वाघानें भिंतीवर पंजा घासला तर त्याचे ओरखडे अगदीं खालच्या भागावरच उठत. कदाचित् भिकारीच आसऱ्यासाठीं येथें राहात असावेत ! वटवाघळांनीं घरटीं बांधून किंवा मलोत्सर्ग करून चित्रें बिघडविलीं असतीं तर तीं युक्तिपूर्वक धुवून काढून पहिल्यासारखीं करतां आलीं असतीं. पण एकादा गांजेकस बैरागी आंत धुनी पेटवून बसला कीं, मग धुरानें सारींच चित्रें मातीमोल व्हायचीं. पावसाळ्यांतल्या आर्द्र हवेमुळें ओलसर झालेल्या चित्रांचा लेप धुनीच्या उष्णतेनें लवकर वाळून जायचा. आणि मग त्याचे पापुद्रे सुटून हळूं हळूं गळूं लागायचे. अशा प्रकारचें नुकसान येथें बरेंच झालें आहे. कांहीं ठिकाणीं अर्धदग्ध युरोपीयन चित्रकारांनीं चित्रांवर वार्निश चोपडून त्यांना काळेंकुट्ट करून टाकलें आहे. युरोपीयन प्रवाशांनीं तर सुरी

चालवून सबंधच्या सबंध चित्रें जशीं हातीं आलीं तशीं लांबवलीं असें म्हणतात. आणि आपल्या देशांतील कित्येक असंस्कारी लोकांनीं ह्या चित्रांवर आपलीं नांवें आपल्या दिव्य हस्ताक्षरांत कोरून अमर केलीं आहेत! अमर चित्रकलेचा अशा प्रकारें नाश करणारे हे नाशकर्मी दुर्जन कोण होते तें नांवावरून ओळखतां येईल. अनंत काळपावेतों लोकांनीं आपणांस शिव्या शाप द्यावेत अशी सोय त्यांनीं करून ठेवली आहे असेंच म्हणावें लागेल. दुसरें काय!

नव्या दिल्लीला व्हॉइसरायच्या महालाजवळ एक सरकारी संग्रहालय आहे. तें मीं नुकतेंच पाहून आलों. हिंदी सरकारच्या गोऱ्या अंमलदारांनीं मध्य आशियांतून पुष्कळच महत्त्वाच्या वस्तू लुटून आणून येथें ठेवल्या आहेत. पुष्कळसा माल तर विलायतला पोहोंचला आहे. परंतु येथल्या पैशानें आणि येथेंच रक्त सांडवून केलेल्या युद्धांतल्या लुटीचा थोडासा भाग येथें देऊन सरकारनें भलेपणा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. या संग्रहस्थानांत मध्य आशियांतील मोठमोठ्या मंदिरांतल्या भिंतींवरचे लेख फोडून आणून त्यावरचीं चित्रें अगदीं मूळ चित्राप्रमाणें बसवून दिलीं आहेत. लोभाच्या आधीन झालेला मनुष्य कोणतें पाप करणार नाहीं? "मध्य आशियांत केव्हांतरी यांचा नाश होणारच होता. आणि सुधारलेलीं माणसें येथपर्यंत जाऊन या अप्रतिम कलाकृति पाहणें शक्य नव्हतें. म्हणून आम्हीं त्या तेथून घेऊन आलों" असें ते आपलें समर्थन करतात.

ज्यांनीं या कलाकृति निर्माण केल्या ते लोक आणि त्यांचे वंशज तर आरण्यक होते. त्यांच्यांत लुटारूंची बुद्धि किंवा शक्ति कोठून असणार?

ज्या पक्षाकडे तोफा आहेत, बंदुका आहेत त्यांना न्यायनीतीची काय चाड!

एक प्रश्न नेहमीं मनांत उठतो. हीं सगळीं चित्रें येथें राहणाऱ्या कलाकार बौद्धभिक्षूंनीं स्वतः काढलीं होतीं कीं धनाढ्यांनीं आणि गुणाढ्यांनीं या गुहा तयार करून दिल्यावर एकाद्या चित्रकार संघानें संघसेवा म्हणून या सगळ्या भिंती रंगवून दिल्या होत्या? किंवा असेंहि असेल कीं, एकाद्या राजानें एकाद्या चित्रकार मंडळाचा अपमान केला असेल म्हणून चिडून जाऊन त्यांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन वनवास पत्करला असेल. आणि

मग मोठमोठया चक्रवर्ति सम्राटांनाहि ईर्षा उत्पन्न होईल अशीं चित्रें तयार केलीं असतील !

द्रव्यलोभानें किंवा कीर्तीच्या मागें लागून केलेल्या कामांपेक्षां धर्मासाठीं आणि शाश्वत कल्याणासाठीं केलेलीं कामें नेहमीं अप्रतिम ठरायचींच !

हीं लेणीं तयार करायला हजार वर्षें लागलीं. पण त्यांचा इतिहास सांपडत नाहीं. त्याचें रहस्य शोधण्यांत आणखी हजार वर्षें घालविलीं तरी त्याचें काय ? " सा रम्या नगरी महान् स नृपति " असें म्हणून एका विरागी राजानें काळाला नमस्कार केला, परंतु काळाच्या साम्राज्यालाहि विसरविणाऱ्या या कलेला वंदन करणें हेंच अजिंठ्याच्या लेण्यांत बसल्या बसल्या अधिक स्वाभाविक आणि उचित वाटतें.

राजपुतान्यांत एक म्हण आहे कीं—चीतडां भीतडां अने गीतडां (चितोड, भिंती किंवा तट आणि गीतें) या तिहींमुळें नांव अजरामर होतें. अजिंठ्याच्या लेण्यांत भिंतीवर चित्रें आहेत. फक्त येथें येऊन गीतें गाणाऱ्या कवींचीच उणीव आहे.

महाराष्ट्रांत अशीं कितीतरी कलात्मक सौन्दर्य—स्थानें आहेत. पण त्यांचीं गीतें गाणारे कवी ? ?

## वैराग्यवैभवाचा वारसा* १९

लेणीं पाहून इतके विचार मनांत आले आहेत कीं जर सगळे लिहायला बसलों तर ते एकदम बाहेर पडून धांवत पळत आणि एकमेकांना मागें

*[पश्चिम हिंदुस्थानांत ज्या सुप्रसिद्ध लेण्या आहेत त्यांच्याविषयीं मी एक पत्रमाला लिहिणार होतों. ती अपुरीच राहिली......एका दृष्टीनें तें चांगलेंच झालें. त्यामुळें एखाद्या प्रवास-रसिक युवकाला सर्व लेणीं पाहण्याची आणि त्यांच्याविषयीं एक विस्तृत ग्रंथ लिहायची प्रेरणा कदाचित् होईल. वैराग्यवैभवाच्या ह्या वारशांतूनच भारतीय जीवन पुनः जाग्रत करावयाचें आहे.—का. का.]

टाकीत बाहेर पडायचे. परन्तु त्यांची कांहीं तरी नोंद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

'जोगेश्वर' 'काणेरी' आणि 'घारापुरीचीं' लेणीं समकालीन आहेत कीं वेगवेगळ्या काळचीं आहेत ? तीं कोणीं खोदलीं ? त्यांच्या मुळाशीं हेतु काय असावा ? कसलें निमित्त झालें असावें ? त्या काळीं त्या लेण्यांचा काय उपयोग होत असावा ? तो किती दिवस चालला ? तिन्ही ठिकाणीं चालणाऱ्या प्रवृत्तींचा शेवट कसा झाला ? मुंबईत राहूनहि आणि हीं तिन्ही लेणीं इतक्या जवळ असूनहि आपणांस यांच्याविषयीं काडीचीहि माहिती नाहीं. म्हणून केवळ कल्पनेनेंच तो काळ आणि तें दृश्य 'प्रत्यक्ष' करण्याचा प्रयत्न करायचा.

मुंबई एका दृष्टीनें आज हिंदुस्थानची राजधानी आहे. कलकत्ता किंवा दिल्लीपेक्षांहि मुंबईचें महत्त्व अनेक रीतींनीं अधिक आहे. परन्तु या लेण्यांच्या काळांत हीं सगळीं बेटें फार प्रख्यात असतील असें वाटत नाहीं. इतिहासांत जें '**कल्याणी**' नगरीचें वर्णन आहे ती म्हणजे आजचें कल्याण तर नसेल ? आणि संपन्न कल्याणीच्या आसपास चांगलीं सुंदर बेटें पाहून तर हीं लेणीं खोदलीं नसावीं ? जोगेश्वरी आणि घारापुरी तर अगदीं सनातनी शैवसंप्रदायाचीं लेणीं आहेत. 'काणेरी' हिंदूंचीं कीं बौद्धांचीं ? पुष्कळ साधूंनीं एकत्र असावें, एकत्र अध्ययन करावें, एकत्र बसून चिंतन आणि चर्चा करावी ही प्रथा बौद्धांचीच कीं सनातन्यांची देखील ? आज 'हृषिकेष' जवळ शेंकडों संन्यासी झोंपड्या बांधून याच पद्धतीनें जंगलांत राहतात. ही पद्धत किती जुनी आहे ? भगवान व्यासाइतकी ? आद्य शंकराचार्यांइतकी ? कीं तें बौद्ध मठांचें अनुकरण आहे ?

भगिनी निवेदितानें अशी कल्पना केली आहे कीं काणेरी हें एक विश्वविद्यालय होतें आणि घारापुरीचीं लेणीं मंदिर आणि मठ. हें जर खरें असेल तर मग जोगेश्वरीची गुहा तंत्रमार्गी किंवा नाथसंप्रदायी योग्यांचें ध्यान करण्याचें स्थान असेल. ह्या गुहांमध्यें उभे राहून तिथल्या वातावरणांत प्रत्यक्ष भूतकाळाला प्रश्न विचारला कीं, "याचें रहस्य कोण सांगू शकेल ?" तर तुटलेल्या दगडी भिंती प्रतिप्रश्न करतात—"कोण सांगू शकेल ?"

कार्ल्यांचीं आणि भाज्याचीं लेणीं येथून फार दूर आहेत असें नाहीं. जुन्नर शिवनेरी जवळचीं लेण्याद्रीचीं लेणीं नाना घाटांच्या मार्गानें या लेण्यांशीं संबंध ठेवून आहेत असें वाटतें. नाशिक देवळालीकडच्या ' पांडव-गुहाहि ' मुंबईच्या रस्त्यावरच आहेत. या सगळ्या लेण्यांचा एकमेकांशीं काय संबंध असावा ? गुहांचें हें एक मोठें कुटुंब असावें कीं एकामागून एक गादी चालविणारी शिष्यपरंपरा ?

आणि ' अजिंठा ' व ' वेरूळच्या ' लेण्यांचें काय ? हीं लेणीं म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरच्या या लेण्यांचें वैभवशाली अनुकरण आहे कीं अजिंठा वेरूळच्या लेण्यांची अस्पष्ट नक्कल करण्याच्या दृष्टीनें या तटवासिनी गुहा खोदल्या गेल्या आहेत ?

—२—

लेण्यांची कल्पना माणसाला कोठून बरें सुचली असावी ? याचें उत्तर अति प्राचीन अशा ' अबूला ' विचारलें पाहिजे. तेथल्या कितीतरी नैसर्गिक गुहा प्रख्यात आहेत. त्यांचा संबंध गोरखनाथ, मच्छिंद्र आणि राजा गोपीचंद यांच्याशीं आहे. निवृत्तिपरायण साधु ध्यानमग्न जिवन कंठण्यासाठीं अशीं गिरिकंदरें शोधीत असत असें पुराणांत वर्णन आहे. डोंगरांत मोठीशी ढोल पाहून तिच्यांत निवासाची सोय पाहण्याची प्रथा हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांतल्या सगळ्या देशांत चालत आली आहे. थंडी, पाऊस आणि ऊन यांपासून रक्षण करण्यासाठीं भटकणारा मानव गुहांतच शिरणार हें अगदीं स्वाभाविक आहे. एकदा का नैसर्गिक गुहांचें साधन मिळालें कीं तशाच कृत्रिम गुहा तयार करण्याचा प्रयत्न करणें हा मनुष्यस्वभाव आहे, आणि एकदां त्यांत यश मिळालें कीं ती वस्तु विशाल, व्यापक आणि व्यवस्थित बनविण्यास माणसाला वेळ लागत नाहीं. लोकसंगीतांतून शास्त्रीय संगीत विकसित होतें. तद्वत् नैसर्गिक गुहांतूनच खोदलेल्या गुहा निर्माण झाल्या असें अनुमान काढण्यांत अतिशयोक्ति नाहीं.

भिक्षा, भजन, आणि ध्यान ह्यांत जीवन व्यतीत करणारे तपस्वी नेहमीं पाण्याचा आसरा शोधीत असतात. मग तो झरा असो, तलाव असो, नदी असो कीं महानद असो. जितके आश्रम आणि शहरें प्राचीन म्हणून

भरभराटींत आलीं आहेत तीं सगळीं जलाशयाच्या किनारींच आहेत. धनगर, गुराखी, शिकारी आणि साधु झरण्यांचें आणि नदनद्यांचें मूळ शोधत यांत नवल नाहीं. अजिंठ्यांच्या लेण्यांनीं आसमंत पहा. तेथें वाकड्या तिकड्या टेंकड्यांमधून एक लहानसा प्रवाह वहात आहे. पाणी चांगलें आहे. आसपासची भूमि शांत, रमणीय आणि प्रसन्न आहे. म्हणून साधूंनीं तेथें जाऊन वस्ती केली. हृदयांत खोल खोल प्रवेश करण्याची इच्छा धरणारे साधुजन उघड्या मैदानांत नदीच्या कांठीं पुष्कळ दिवस कसे राहूं शकतील ? मग हें सारें पाणी कोठून येतें, पर्वताच्या दरींत काय दडलेलें आहे, याचा शोध घ्यायला ते निघणारच. घाट आणि कावें चढतां चढतां ते टेंकड्यांच्या जाळ्यांत घुसले, आंत आंत गेले आणि अखेर चंद्राकार कड्यावरून जलप्रपात पडतांना त्यांना दिसला. नदीचा उगम त्यांनीं गाठला. काय त्या स्थानाची भव्यता ! जणूं निसर्ग शांततेची दीक्षा घेण्याच्या तयारींतच आहे. आणि येथेंच मुक्काम ठोकला तर ? निर्भय साधूंनीं त्या निर्जन प्रदेशांत निवास केला. अडचणी सहन करणें म्हणजे त्यांचें इच्छाभोजनच. वाघ, लांडगे आणि इतर प्राणी कवि किप्लिंगच्या मोगली ( Mogli ) बरोबर ज्या आत्मीय भावानें राहात असतील त्याच भावनेनें ह्या साधूंबरोबरहि राहावयाचे !

मनुष्यस्वभावाची काय ही विचित्रता ! समाज करून राहाणेंहि त्याला सुचतें आणि समाजाचा त्याग करून एकांतसेवनाचीहि इच्छा त्यालाच होते. आणि त्याहिपेक्षां नवल हें कीं असे एकांतप्रेमी दोघे चौघे जमले कीं एकांताचे अखंड गोडवे गात गात चोवीस तास एकत्र राहायचे ! नाहीं तर मग ' अलख निरंजनाचे ' ध्यान करणाऱ्या बाबाजीचा आखाडा जमावा तरी कसा ?

अशा साधूंनीं आजिंठ्यांत एकत्र जमून प्रत्यक्ष गुहा शोधल्या असतिल. मग किल्ल्याच्या तटासारखा अंतर्वृत्त चंद्राकार कडा पाहून त्यात गुहा खोदण्याचा निश्चय केला असेल. निवृत्तिमार्गियांची ' प्रवृत्ति' वाढली. पाषाणांचें हृदय कोरलें गेलें. त्यांतून उबदार गुहा तयार झाल्या !

निर्वाणाच्या शोधार्थ जरी हे साधु एकत्रित झाले असले तरी ते जातिवंत कलाकार असले पाहिजेत. राजांचे महाल बांधण्याचें काम त्यांनीं सोडून दिलें.

पण धर्मराज तथागतांच्या सेवेपासून ते कसे बरें परावृत्त होऊं शकतील? जी कलासमृद्धि त्यांनीं राजप्रासादांत स्वार्थबुद्धीनें ओतली असती तीच त्यांनीं येथें विहारांत सर्वत्र भरून टाकली. —राजर्षी विजयाचें सिंहलद्वीप जिंकण्यासाठीं प्रयाण; इराणच्या वकिलांचें पुलिकेशीच्या दरबारांत आगमन, धर्मचक्र चालू झाल्यामुळें अप्सरा आणि यक्षकिन्नरांचें आनंदून चाललेलें गायन, अशीं अनेक चित्रें त्यांनीं मातीच्या प्लॅस्टरवर काढलीं. तो उत्सव पहायला कोण कोण जमले असतील ? गरीब श्रीमंत इत्यादि भेदाभेद त्या काळीं पडले नव्हते. म्हणून राजे आणि रंक, बालक आणि पंडित, सती आणि गणिका, तपस्वी आणि रसिक सगळेच तेथें उलटले असावेत !

वेरुळचीं लेणीं अजिंठ्यानंतर तयार झालीं असें वाटतें. अजिंठ्यांत लालित्य अधिक आहे तर वेरुळांत भव्यतेचा उन्माद आहे. आजिंठ्यांत ध्यानवीर राहात असतील तर वेरुळांत विद्यावीर ज्ञानप्रार्थींचीं अनेक क्षेत्रें पालथीं घालत असतील. बाहेरची दुनिया आजिंठा पाह्यला आली तर या लेणींत ते सहन करतील. उलट बाहेरचें जग वेरूळ पाह्यला आलें नाहीं तर तें त्याला निमंत्रण देईल !

आणि वेरूळचें खोदकामहि अजिंठ्याहून अगदीं निराळेंच. तेथलीं लेणीं वाटेल त्या पंथाच्या लोकांनीं खोदलेलीं असोत; पण ते सगळे शक्तिउपासक होते हें पक्कें. कैलासासारख्या मंदिराची कल्पना ज्याला प्रथम स्फुरली तो अलौकिक वैभवशाली बलाढ्य शिल्पसम्राट असला पाहिजे. आणि कैलासाच्या आसपास ज्या विशाल मूर्ति खोदलेल्या आहेत, त्यांची मुद्रा, त्यांचे हात आणि आयुधें, इतकेंच नव्हे तर त्यांचे उभे राहण्याचे पवित्रे इतके शक्तिशाली आहेत कीं ते पाहतांच उपशांत माणसालाहि सारी दुनिया पादाक्रांत करून आजपर्यंत कोणीहि केला नाहीं असा विक्रम करून दाखविण्याचा हव्यास निर्माण होईल. भव्यता सामान्यतः एकाकीच असते. परंतु येथें तर हिमालयाच्या शिखराप्रमाणें प्रत्येक प्रकारच्या भव्यतेचें मूक प्रदर्शनच मांडलेलें आहे. तथापि ती निःशब्द शांति कांहीं कमी वक्तृत्वशालिनी नाहीं ! ही सारी सृष्टि ज्या लोकांनीं निर्माण केली ते किती पराक्रमी असतील ?

—३—

कार्ल्यांचीं आणि नाशिकचीं लेणीं अजिंठ्याच्याच वळणाचीं आहेत. मधोमध एक विशाल सभामंडप; त्याच्यासमोर बोधिसत्व किंवा बुद्धाची मूर्ति अथवा स्तूप; बाजूच्या भिंतींत अंधारांत लपलेल्या श्रमणांच्या खोल्यांची ओळ आणि सभामंडपात व समोरच्या मूर्तीवर प्रकाश पडण्यासाठीं प्रवेशद्वाराच्या माथीं पिंपळपानाच्या आकाराचें मोठें गवाक्ष, हें या लेण्यांचें सामान्य स्वरूप म्हणतां येईल. ह्या गुहा तिन्हीहि ऋतूंत स्थिरसुख असल्यामुळें साधूंना विशेष अनुकूल आहेत. एक वेळ खोदल्या कीं संपलें. मग दरवर्षीं तिची डागडुजी करण्याची दगदग नाहीं. बाहेर मुसळधार पाऊस पडत असला तरी आतल्या खोल्या कोरड्या ठणठणीत. हिवाळ्यांत चामडी फाडून टाकणारा वारा बाहेर वाहात असला तरी आंतली ऊब कधींच दगा देणार नाहीं. आणि हिंदुस्थानांतील प्रखर ग्रीष्म ऋतूंत जाल तरी आंत शीतल शांतीच आढळेल. प्रत्येक गुहेंत पाण्याचें टाकें हें असायचेंच. आणि तें डोंगरांतल्या जीवंत आणि अमृततुल्य पाण्यानें नेहमीं भरलेलेंच असायचें. निवृत्त व्हावयाचें असेल तर येथें बाहेरचें सारें जग विसरतां येईल. आणि बाहेर डोकावयाचेंच असेल तर मोठा जलप्रपात, दूरवर पसरलेली गालिच्यासारखी वनराजी अथवा जीवनाशीं तुलतां येईल अशी समुद्राची विशाल जलराशी सहज नजरेस पडेल. त्यांच्यांत सौंदर्य आणि वैविध्य ओतण्याचें काम प्रकाश आणि अंधाराचें आहे. हे सनातन संवगडी येथें अक्षय, अनंत क्रीडा करीत असतात. भरती ओहटीची लीला जेव्हां थकेल तेव्हां तमःप्रकाशाची क्रीडा विराम पावेल.

आणि ह्या गुहांत राहणाऱ्या तपस्व्यांच्या आणि संन्याशांच्या हृदय-गुहेंत प्रवृत्ति, रसिकता आणि संयम, कारुण्य आणि उग्रता यांच्या अनेक जोड्यांची अखंड क्रीडा चालत नसावी काय ? शांत वातावरणांत अशा प्रकारची गूढ अशांतता किती मधुर, किती गंभीर वाटत असेल !!

## उपसंहार २०

लहानपणीं भव्यतेचें प्रथम दर्शन घडलें तें सह्याद्रीच्या घाटांतच. सावंतवाडीकडचा 'आंबोली' घाट, गोव्याकडे जातांना लागणारा दुधसागराचा 'तिनई घाट' आणि मुंबई पुण्यामधला 'बोरघाट' या तीन घाटांपेक्षां अधिक भव्यता इतरत्र कोठें असेल अशी कल्पना देखील होत नाहीं. या तीन घाटांमध्यें पसरलेला महाराष्ट्र, लहान लहान टेंकड्या, वाकडीं तिकडीं शेतें, अंबराया आणि गवताचीं कुरणें यांमुळें आकर्षक वाटतो. महाराष्ट्रांत सूर्योदय आणि सूर्यास्त अशा दरबारी थाटाचा असतो कीं पहातां पहातां आपले रंग बदलवून थोड्याच वेळांत आपला खेळ संपविण्याची इतकी घाई त्यांना कां सुटावी असा विचार मनांत येऊन मन अस्वस्थ होतें. महाराष्ट्रांतील गाई म्हशींचीं खिल्लारें, शेळ्यामेंढ्यांचे कळप, हवेंत उडणाऱ्या हरिणाच्या झुंडी एकवेळ पाहिल्यावर कांहीं केल्या तें चित्र हृदयफलकावरून पुसलें जात नाहीं.

महाराष्ट्रांतल्या पक्षांचे थवे आकाशांत जेव्हां सर्पाकार उंच उडत असतात तेव्हां हें वरुणाचें लष्कर कोणत्या नव्या प्रदेशीं आक्रमणार्थ सीमोल्लंघन करीत आहे, त्याबद्दल जिज्ञासा वाटूं लागते. तथापि महाराष्ट्राचें भवितव्य तर त्याच्या सह्याद्रिरूपी कड्याशीं आणि त्याच्यावर वीरांच्या मालिकेप्रमाणें शोभणाऱ्या किल्ल्यांशीं संलग्न झालेलें आहे हें निःसंशय !

असें असतां महाराष्ट्रांतील कवींनीं आणि भाटचारणांनीं ह्या पर्वताच्या भव्य आणि रम्य विस्ताराचें वर्णन करून आपली वाणी आजवर कां बरें पावन केली नाहीं ? ह्या अलौकिक सौन्दर्याच्या दर्शनानें रसमत्त झालेल्या आपल्या वाक्सुधेचा आस्वाद घेण्यासाठीं त्यांनीं रसिक जनांना निमंत्रण कां केलें नाहीं ? प्राचीन कवींना धर्मजड आणि भक्तिमूढ मानणाऱ्या आधुनिक कवींनीं तरी येथल्या रम्याद्भुत वनश्रीविषयीं महाकाव्यें कोठें रचलीं आहेत ?

महाराष्ट्राच्या उत्तुंग भव्यतेचें वर्णन करण्याचें सामर्थ्यच आपणांत नाहीं असें मानून घेऊन विषय हाताळला नसता तर त्यांतहि औचित्य संभाळलें

गेलें असें एका दृष्टीनें म्हणतां आलें असतें. परंतु कित्येक कवींनीं संस्कृत आणि इंग्रजी काव्यांचें अनुकरण करून महाराष्ट्रभूमीचें साध्या घरगुती भाषेंत वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. मग असा प्रश्न निर्माण होतो कीं, ज्याच्या पाळण्यांत शिवाजी, संभाजी आणि राजारामासारखे वीर निर्माण झाले; धनाजी, बाजी, राघो बल्लाळांसारखे राष्ट्रस्तंभ ज्या महाराष्ट्राच्या खडकांतून कोरले गेले त्याच राष्ट्रांत उत्तुंग प्रतिभा व्यक्त करणारे आणि हृदयांत महत्त्वाकांक्षेचा स्वैर नाच नाचविणारे कवी कसे निर्माण झाले नाहींत ? आणि असे लहान मोठे कवी होऊन गेले असल्यास त्यांचीं जीं प्रकृतिकाव्यें खाणींतील रत्नाप्रमाणें जिकडे तिकडे पडलीं आहेत, तीं सारीं गोळा करून या 'आनंद-वनभुवनाचें ' यशोगान करणारीं ' निसर्ग काव्यें ' एका कोंदणांत बसविण्याचें कार्य आजपर्यंत कोणी कसें केलें नाहीं ?

स्कॉटलंडच्या सरोवरांचेंच उदाहरण घेऊं या. तेथल्या दऱ्याखोऱ्यांत आणि सरोवरांच्या नागमोडी किनाऱ्यावर भटकणाऱ्या कवींनीं तेथलि प्रत्येक गुहा, दरेक शिखर, प्रत्येक वन आणि एकूण एक सरोवरें आपल्या कवित्व-शक्तीनें अमर बनविलीं आहेत. त्या कवींचीं वर्णनें वाचून ज्यांचीं हृदयें भावार्द्र बनलीं आहेत असे असंख्य प्रवासी जगांतल्या देशांतून स्कॉट-लंडला येतात आणि आपल्या हृदयांतली भक्ति आणि खिशांतील पैसे तेथे ओततात. महाराष्ट्राच्या प्रत्येक खोऱ्यांत राष्ट्रवीरांनीं आपलें ऊन ऊन रक्त सांडविलें आहे. महाराष्ट्रांत इतिहासाला आणि दंतकथांना तोटा नाहीं. महाराष्ट्रांत धर्मपरायण चारित्र्यधन संतांची उणीव नाहीं. कल्पनेलाहि कापरें भरावें आणि तिच्या शरीरावर बाभळीच्या काट्याएवढे रोमांच उभे रहावेत अशा भूतपिशाच्च्यांच्या गोष्टीहि महाराष्ट्रांत खूप प्रचलित आहेत. महाराष्ट्रां-तले साप, महाराष्ट्रातले बिबटे, महाराष्ट्रातले शिकारी आणि महाराष्ट्रांतले मांत्रिक ह्यांनींहि अद्‌भुत रस पुरविण्याच्या कामीं अगदीं भरपूर सहाय्य केलें आहे. असें असतांना महाराष्ट्र ' गिरा ' च तेवढी ह्या बाबतींत कंगाल कां ? आणि महाराष्ट्र गिरेला विषय सुचत नाहींत असें म्हणून डोकें खाजविण्याची आणि त्या समस्येलाच काव्यविषय बनविण्याची वेळ कां आली ?

बाळपणीं हे तीन घाट पहात असे तेव्हां हृदय भरून येई आणि क्षणभर कृतकृत्य झाल्यासारखें वाटे. परंतु दुसऱ्याच क्षणीं असा विचार येई कीं

हृ सारें सौंदर्य हृदयात ठेवूं तरी कसें? कोणाला देऊं नि कोणाला दाखवूं? अशा भक्तीची साठवण करायला हृदयहि तेवढेंच भव्य बनविल्यावाचून कसें चालेल? पण हें घडणार कसें? योग्यापाशीं अणिमा, महिमा आदि अष्ट-सिद्धि असतात. पण आपण काय केलें असतां त्या आपणांस प्राप्त होतील? आणि आतां असें वाटतें कीं अरेरे! सारा जन्म फुकट गेला. ही विशालता, ही दृढता आणि ही वीरता व्यक्त करण्यापुरती भाषा तरी आजवर कां कमाविली नाहीं मीं?

मुंबईहून पुणें आणि पुण्याहून मुंबई अशा 'दख्खनच्या राणी'च्या सहाय्यानें येरझारा करणारे महाराष्ट्रबंधू आज कांहीं कमी नाहींत. पन्नास रुपये खर्चून लोखंडी पंख लावून ह्याच प्रदेशावरून उडून जाणाऱ्या महाराष्ट्रियांची संख्याहि थोडीबहुत असेलच. परन्तु सह्याद्रीच्या चेतोहर भूभागाची एक स्वतंत्र चित्र–मंजूषाहि अद्याप कोणी तयार केली नाहीं. उन्हाळ्यांतला दावानल, हिवाळ्यांतलें धुके, पावसाळ्यांतली वनश्री आणि पर्वताच्या मांडीवर निर्भयपणें खेळत मस्ती करणारे जलप्रपात ह्यांचें काव्यहि कोणी रचलें नाहीं.

भाविक लोक म्हणतात कीं यात्राधामें सुलभ झालीं कीं यात्रेचें पुण्य क्षीण होतेंच. पण सुलभतेचा श्रमशून्य प्रवास करतां करतां काव्यवृत्ति व प्रतिभा देखील क्षीण होतात का?

मग काय सह्याद्रीच्या प्रत्येक कड्याला आणि प्रत्येक दरीला इंग्रजांनीं आपलें नांव देत रहावें? आणि आपण केवळ इंग्रजी साहित्याकरवीं त्या माहितींत निष्णात झालों अशी प्रौढिच मिरवीत रहावें?

हें माझें पत्र प्रसिद्ध झाल्यावर महाराष्ट्राभिमानी अनेक आधुनिक साहित्यवीर माझ्यावर अनेक चर्चात्मक लेखांचा मारा करतील आणि मी गुजरातेंत राहून गुजराती बनल्यामुळें माझ्यांत महाराष्ट्राभिमान उरलेलाच नाहीं असें म्हणून माझी कुचेष्टा करतील. परंतु मला बचावाचे लेख नको आहेत. मी जें वर मागितलें आहे तेंच मला हवें हें मी कोणत्या शब्दांत त्यांना समजावूं?

आणि जर तें तुम्ही देऊं शकत नसाल तर माझ्या वाटेस जाऊं नका!!

REFBK-0007166